ॐ

मुंगेली (बिलासपूर, म.प्र.) येथील सत्पुरूष

## प. पू. वासुदेव रामेश्वर तिवारी गुरूजी



# साधना आणि दिव्य अनुभूती

(मराठी चरित्र)

अनुवाद : दत्तात्रय यशवंत पतकी

ॐ

मुंगेली (बिलासपूर, मध्यप्रदेश) येथील सत्पुरुष

## प. पू. श्री वासुदेव रामेश्वर तिवारी गुरुजी

# साधना आणि दिव्य अनुभूती

: मूळ इंग्रजी आवृत्ती :

ए डिप इन टू डिव्हाइन कॉन्फ्ल्युएन्स

: लेखक :

प्रा. ए. के. कुरियन (ख्रिश्चन शिष्य), बिलासपूर, म. प्र.

□

: मराठी अनुवाद :

द. य. पतकी, पुणे

---

दत्तात्रय [illegible] पतकी
[illegible]ए, सुखद, श्री [illegible] सोसा."
कोथरुड, पुणे - ४११ [illegible] ३

फोन नं.
5449414

**मुंगेली (बिलासपूर, म. प्र.) येथील सत्पुरुष**
**प. पू. श्री वासुदेव रामेश्वर तिवारीगुरुजी**
**साधना आणि दिव्य अनुभूती** (मराठी चरित्र)

□ २२ जुलै १९९९

© **प्रकाशकाधीन**

□

**प्रकाशक**
वासुदेवाश्रम, मुंगेली (बिलासपूर, मध्यप्रदेश)

□

**निर्मितीसाहाय्य**
श्रीनिवास पाध्ये, 'मुद्रित-शोधक'
संतोषनगर, कात्रज, पुणे - ४११ ०४६.

□

**अक्षरजुळणी**
यशश्री एंटरप्रायजेस, कोथरूड, पुणे २९. फोन : ३६०६०२

□

**मुखपृष्ठमांडणी व छपाई**
एस. पी. बर्वे
परशुराम प्रोसेस, एरंडवणा, पुणे ४११ ००४.

□

**पुस्तकछपाई**
प्रकाश मुद्रणालय
सदाशिव पेठ, पुणे ३०

□

**मूल्य**
शंभर रुपये

**: हिंदी अनुवाद :**
**दिव्याम्बु निमज्जन**
डॉ. आशा श्रीवास्तव

**: संस्कृत अनुवाद :**
**प्रा. (डॉ.) विद्याकांत त्रिपाठी**
सामरबार, जि. रायगढ़ (म. प्र.)

# ब्रह्मकमळींचा सुगंध

प्रा. ज. वा. जोशी

□

माझे स्नेही श्री. द. य. पतकी यांनी सादर केलेला 'प. पू. वासुदेव रामेश्वर तिवारी (श्रीगुरुजी) : साधना आणि दिव्य अनुभूती' हा मराठी अनुवादग्रंथ हे अर्वाचीन परमार्थ साहित्यास लाभलेले बहुमोल योगदान आहे. मूळ इंग्रजी चरित्र श्री. कूरियन यांनी लिहिले. त्याचे संस्कृत, हिंदी अनुवादही पूर्वप्रसिद्ध आहेत. श्री. पतकी यांचा हा मराठी अनुवाद ग्रंथ मूळ संहितेशी पूर्णत: संवादी, पण स्वतंत्र ग्रंथ वाटावा इतका रसपूर्ण, प्रवाही, अकृत्रिम आणि सर्वांना आवडेल असा झाला आहे. श्री. पतकी यांचे पूर्वलेखन मराठी ललितसाहित्य समीक्षेशी निगडीत आहे. साहजिकच त्यांच्या ललित भावशैलीचा प्रत्यय वाचकांना अनुवादाचा आस्वाद घेतानाही येत राहतो.

प. पू. श्री तिवारी गुरुजी हे उत्तर प्रदेशातील अलाहाबाद जवळचे अर्वाचीन सत्पुरुष आहेत. पण संत व्यक्तिमत्त्वाला स्थल, भाषा, प्रादेशिकता यांच्या सीमा नसतात. त्यांचे अंतरीचे नाते चिन्मय, आनंदमय, विभू अशा परमात्म तत्त्वाशी असते. प्रस्तुत चरित्र ग्रंथातील प्रकरणे, विवेचन, शंका समाधान या सर्वांतून या सत्पुरुषाचा जीवनप्रवाह, जीवनदृष्टी आणि पारमार्थिक प्रश्नावरील जीवनसंवाद असा 'त्रिवेणीसंगम' प्रगट झाला आहे. श्री. पतकी यांचे पूर्वायुष्य प्रशासकीय स्वरूपाच्या सेवात गेले. त्यांना श्री गुरुजींच्या रूपात भगवत्कृपेचा भावस्पर्श लाभला. अनुवाद ग्रंथरूपात श्री. पतकी यांनी सद्गुरुंची वाङ्मयीन पूजा पूर्ण केली आहे. अशा चरित्रातून प्राचीन ऋषी, मध्ययुगीन-अर्वाचीन संत यांची भावदृष्टी व्यक्त होते. 'आत्मानुभूतीचे व्याकरण' (Grammer of Spiritual Experience) प्रगट होते. शुद्धचित्त साधकांना, उपासकांना भारतीय साक्षात्कार दर्शनातील सिद्धांत-साधना, प्रमेय-प्रचीती यांचा अंतरंग अभ्यास करण्यास ही चरित्रसंहिता निश्चितच पथदर्शी ठरेल.

श्री. तिवारी गुरुजींची 'जीवनमुक्तीची आनंदयात्रा' ही मुमुक्षू, साधक, सिद्ध सद्गुरू अशा अवस्थातून संक्रांत होत गेली आहे. जिज्ञासू-आर्त-ज्ञानी अशा भक्तीची उत्कट रूपे त्यात व्यक्त झाली आहे. त्यांना भगवद् दर्शनाच्या, विश्वात्मक अभेदवृत्तीच्या, अतींद्रिय स्वरूपाच्या दिव्य अनुभूती प्राप्त झाल्या. हे अनुभूतींचे भांडार या चरित्र ग्रंथात आहे. केवळ 'ईश्वरेच्छा' म्हणून, 'भगवद् प्रेरणेचे निमित्तमात्र' म्हणून त्यांनी साधक-उपासकांना मार्गदर्शन केले. अशा भगवद्विभूतीचे सान्निध्य, शब्द, स्पर्श, दृष्टी या सर्वांतून सदाचारसंपन्न साधकांना 'देवात्म शक्तीचा दिव्यप्रसाद' लाभतो. क्रमश: 'धन्य मी कृतार्थ मी !' अशी भावानुभूती येते. हे अंतरंग साधनाजीवन 'शब्देवीण संवादिजे' अशा स्थितीचे असते. प. पू. श्री गुरुजींनी हा स्वानंद अनेकांना प्रदान केला.

श्री. तिवारी गुरुजींचे जीवन, कार्य, प्रबोधन यात वेदवेदांत दृष्टीचे आत्मभान आहे. आगमोक्त तंत्रविद्येतील कुंडलिनी महायोगाची रहस्ये त्यात स्पष्ट झाली आहेत. योगसाधनेचे यथार्थ मार्गदर्शन त्यात आहे. चित्तशुद्धीस पायाभूत अशी साधनभक्ती आणि स्वरूपानुसंधान, उत्कट भगवत्प्रेम स्वरूपातील पराभक्ती यांचे हृद्य दर्शन यात आहे.

भगवत्कृपाश्रयी गुरुमार्गदृष्टीचे प्रबोधन यात आहे. ज्याने त्याने आपल्या अभिरुचीप्रमाणे आपला साधनमार्ग निवडावा आणि आपली आनंदयात्रा पूर्ण करावी. श्री. पतकी यांनी चरित्रग्रंथरूपात श्री. गुरुजींच्या चरित्ररूपात 'पारमार्थिक प्रगतीचे पाथेय' उपलब्ध करून दिले आहे. मूळ लेखक प्रा. कूरियन आणि मराठी अनुवादक श्री. पतकी यांनी हे जे सद्गुरूसेवा कार्य पूर्ण केले ते त्यांना अंतरीचे समाधान देत राहील, इतरांना त्यांच्या वाटचालीस (Pilgrima Progress) प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.

परमहंस योगानंद यांचा Autobiography of Yogi हा अप्रतिम चरित्र ग्रंथ, अर्वाचीन मराठी संत श्री बाबा महाराज आर्वीकर यांचा कुंडलिनी महायोग साधनेच्या अंतरानुभूती व्यक्त करणारा 'साधनासंहिता' हा ओवीबद्ध उत्कृष्ट ग्रंथ असे काही उत्तम पण दुर्मिळ, अल्प संदर्भ यात उपलब्ध आहेत. प्रस्तुत चरित्रग्रंथात एका बहुमोल संदर्भाची यात भर पडली, याचे समाधान वाटते. केवळ माहितीप्रधान ग्रंथापेक्षा अंतरानुभूतीची परिमाणे स्पष्ट करणारे ग्रंथच निश्चितार्थक मार्गदर्शन करू शकतात.

प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. मेघनाद सहा यांनी आपल्या 'सायन्स अँड रिलिजन' या लेखात (कल्चरल हेरिटेज ऑफ इंडिया, भा. ३ प्र. ३३९-४०) अशा संदर्भाची उपयुक्तता स्पष्ट केली आहे. केवळ चमत्कारकथा, आठवणी आणि आख्यायिका यांचे सांप्रदायिक भारूड अशा स्वरूपातील संतचरित्रे निरुपयोगी ठरतात. धर्मानुभूतींच्या मनोवैज्ञानिक अभ्यासास उपयुक्त अशी चरित्रे हवीत. त्यामुळेच अश्रद्धा, अंधश्रद्धा यांचे निराकरण घडेल. खरी अंतःश्रद्धा जागृत होईल. त्यावरच 'धर्माचे भवितव्य' अवलंबून आहे.

आज पोटार्थी परमार्थ, धार्मिक कर्मकांड, व्यापारी वृत्ती यांची प्रदूषणे माजली आहेत. 'न च कश्चित् शृणोतिमां' (आमचे म्हणणे कोणी समजूनच घेत नाही) असे म्हणण्याचे प्राक्तन 'व्यासांचा आक्रोश' संत सत्पुरुषांच्या वाट्याला येत आहे. अशा वेळी संतसत्पुरुषांचे मनोगत नीटसपणे कळायला हवे. त्यासाठी प्रस्तुत चरित्रासारखे ग्रंथ हवेत. कारण भारतीय साक्षात्कार दर्शनाच्या महन्मङ्गल भागीरथी प्रवाहाचे यात दर्शन होते. अनुवाद ग्रंथरूपात, श्री. तिवारी गुरुजींची, ऋषिसंत यांची भावदृष्टी श्री. पतकी यांनी शब्दबद्ध केली, मराठीत आणली, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

प. पू. तिवारी गुरुजींची जीवनवेल अमेरिकेतील जॉर्जटाऊन (ब्रिटिश गियाना) इथे अंकुरली. पण ईश्वरी संकेतानुसार ऋषी आणि संत यांची तपोभूमी, देवतांची दिव्यभूमी अशा भारतात ही जीवनवेल बहरली. दिव्य अनुभूतींनी संपन्न असे हे जीवन लौकिकदृष्ट्या भारतातच अंतर्धान पावले. वस्तुतः अशा भगवद्विभूतींची लौकिक, पार्थिव काया जरी जन्म-मृत्यू-जरा-व्याधी यांच्या प्राकृतिक नियमांनी ग्रस्त वाटली तरी आत्मानुभूतींनी संपन्न अशी त्यांची दिव्यकाया, कार्यरूपातील त्यांची यशःकाया 'मृत्युंजयी' असते. २३ जुलै १९०८ ते १४ मार्च १९९७ हा त्यांच्या लौकिक जीवनाचा कालपट असला तरी 'अनंताचे आनंदयात्री' या दृष्टीने हे जीवन कालातीत आहे. लौकिकाकडून अलौकिकाकडे, पार्थिवतेकडून परतत्त्वाकडे होणाऱ्या प्रवासाचे, त्यात आवाहन आहे, आश्वासन आहे. साधक उपासकांनी त्याकरता डोळस दृष्टीने त्यांची पूर्णत्वाची पदयात्रा समजून घ्यायला हवी. त्यासाठी श्री. पतकी यांचा हा अनुवाद निश्चितच उपयुक्त आहे.

प. पू. श्री तिवारी गुरुजींचा अनुग्रह ख्रिश्चन, हिंदू, जैन, शीख, मुस्लिम अशा

विविध धर्मपंथातील सर्वांना लाभला. धार्मिक राजकारण आणि राजकारणातील अधर्म यांनी ग्रस्त अशा, आजच्या विदारक अवस्थेत, त्यांचे हे लोकोत्तर सद्गुरू कार्य विशेष मोलाचे आहे. धर्म, नीती, अध्यात्म, साक्षात्कार यांची यथार्थ दृष्टी देणारे आहे. त्यामुळे असे चरित्रग्रंथ, असे अनुवाद आज विशेष स्वागतार्ह आहेत.

स्वत:ची साधना, तपश्चर्या, उत्कटभक्ती यांच्या आधारे प. पू. श्री तिवारी गुरुजींनी 'यद्गत्वा न निवर्तन्ते । तद्धाम् परमं मम ।' अशी परधाम् स्थिती प्राप्त केली. त्यांचे जीवन ब्रह्मरसानुभूती संपन्न असे पूर्ण विकसित ब्रह्मकमळ झाले. त्यांच्या दिव्य अनुभूतींचा सुगंध चरित्ररूपात सर्वांना प्राप्त आहे. त्यांच्या अभ्यासाने, आस्वादाने सर्व साधक उपासकांचे जीवन, भगवत्कृपा, सद्गुरुकृपा, दिव्य अनुभूती संपन्न व्हावे; प. पू. श्री तिवारी गुरुजींच्या आंतरिक शुभाशीर्वादाने, प्रत्येकाची पूर्णत्वाची आनंदयात्रा, सफल संपूर्ण व्हावी, ही श्रीचरणी प्रार्थना !

□

**डॉ. ज. वा. जोशी**
'संवाद', २८/३२७, गंगानगर, प्राधिकरण, निगडी, पुणे ४११ ०४४.

॥ ॐ ॥

# – अर्पणपत्रिका –

## वंदनीय परमपूज्य वासुदेव रामेश्वर तिवारी गुरुजी यांच्या दिव्य स्मृतीस...

— दत्तात्रय यशवंत पतकी

# लेखकाचे निवेदन

इ. स. १९८१-८२ साली प. पू. तिवारी गुरुजींच्या भेटीचा योग वर्धा मुक्कामी आला. त्यावेळी त्यांनी प्रा. ए. के. कुरियन यांनी इंग्रजीत लिहिलेल्या त्यांच्या चरित्राची प्रत मला भेट म्हणून दिली. त्यावेळी मी सहज म्हणालो, ''हे चरित्र मराठीत नाही का?''

त्यावर प. पू. गुरुजी म्हणाले, ''तुम करो !''

खरं म्हणजे 'तुम करो' ही गुरुजींची आज्ञा होती, आदेश होता; पण माझे त्याकडे संपूर्ण दुर्लक्ष झाले. मला त्यांच्या आज्ञेचे फारसे गांभीर्य वाटले नाही; पण दोन-तीन वेळा गुरुजींनी माझ्या अपरोक्ष चरित्रलेखनाची चौकशी केली, ते माझ्या कानावर आले. त्यानंतर मी चरित्रलेखनाचे काम हाती घेतले. सलगतेने हे काम, माझी पत्नी सौ. सुधा (उषा) हिच्या संधिवाताच्या आजारामुळे होत नव्हते, याबद्दल मला खंत वाटत होती. अनेक अडचणी येत होत्या; पण १९९१-९२ साली वर्ध्याहून माझ्या कन्येचा निरोप आला, 'हे काम लवकर पूर्ण करा. येत्या उत्सवात ते सादर झाले पाहिजे.' ही एक प. पू. गुरुजींची अप्रत्यक्ष आज्ञाच होती. ह्या कामावर दोन-तीन महिने मी लक्ष केंद्रित केले.

आणि एक मोठी आनंदाची गोष्ट घडली. २३ जुलै १९९२ रोजी ग्वाल्हेर येथील गुरुपर्व महोत्सवात (गुरुपौर्णिमा) मराठी चरित्राची टंकलिखित प्रत मी गुरुजींच्या चरणी सादर केली. या मराठी आवृत्तीला मी नाव दिले : **'प. पू. श्री वासुदेव रामेश्वर तिवारी गुरुजी — साधना आणि सिद्धी'** (आता सिद्धी या नावात बदल करून 'दिव्य अनुभूति' असे नाव दिले आहे)

गुरुवर्यांचा जीवनवृत्तांत या पुस्तकात आला आहे. त्याची पुनरुक्ती इथे करीत नाही. एखाद्या महाकाव्यातील धीरोदात्त नायकाच्या जीवनात जसे प्रसंग घडतात, तसेच हे जीवन. पण या निमित्ताने एक-दोन आठवणी सांगाव्याशा वाटतात.

१) १९९० च्या डिसेंबर महिन्यात प. पू. गुरुजी पुण्याला आमच्या घरी (अजंठा सोसायटी, सेनापती बापट मार्गानजिक. एकूण तीनदा ते पुण्याला आले होते. आमच्या घरीच मुक्काम होता.) राहिले होते. त्यावेळी चरित्रातील लिहिलेल्या (मराठी) सुरुवातीचा भाग त्यांना वाचून दाखवला. हा भाग दक्षिण अमेरिकेतल्या वास्तव्याचा. मी तन्मयतेनं वाचून दाखवत होतो. मला पाच-दहा मिनिटांनी त्यांनी थांबावयास सांगितले. ते त्यातील तपशीलाशी इतके समरस झाले, की त्यांना पुढचे काही ऐकण्याची आवश्यकता वाटली नसावी. २) पुण्याच्या मुक्कामातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे आळंदीला जाणे. यावेळीही आम्ही आळंदीला गेलो होतो. गुरुवर्यांना समाधीचे दर्शन मुख्य दरवाजातून झाले ! ते पुढे यावयास तयार नव्हते ! पहिल्या मुक्कामात 'हमे दर्शन मिला' असेच त्यांनी सांगितले. आम्ही तासन्‌तास रांगेत उभे राहतो, कंटाळतो, अन्‌ कसेबसे दर्शन घेऊन बाहेर पडतो; पण प. पू. गुरुजींना जे दर्शन होते ते एखाद्याला साक्षात्कार घडावा असे असते. प. पू. गुरुजींची पुण्याई मोठी. त्यांना दुर्लभ असे देवदर्शन सहजतेने होते !

गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वावर ज्ञानेश्वरादि संत - एकनाथ, रामदास यांच्या शिकवणुकीचा प्रभाव आहे. त्याचा उल्लेख ते वारंवार मोठ्या अभिमानाने करीत. त्यांच्या जीवनातील परमेश्वराची शोधयात्राही मोठी रोमहर्षक आहे. परमेश्वराच्या शोधार्थ त्यांनी खडतर असे

जीवन पत्करले अणि गावोगावी भ्रमंती केली. आपले ईप्सित साध्य करण्याच्या दृष्टीने त्यांचा मुक्काम ठिकठिकाणी होत असे. तेथील कार्यभाग उरकला की ते पुढे जात. अनेक प्रकारचे मानमरातब, सन्मान, महंतपद त्यांचेकडे चालून आले; पण त्यांनी त्या सर्व मोहांचा त्याग केला ! म्हणूनच प. पू. गुरुजी आपल्याला वेगळ्या स्वरूपात दिसत. त्यांच्या जीवनातील बाल्यावस्थेतील उत्कट प्रसंग आठवले, की आपल्याला त्याचे वेगळेपण कळून येते. पण परमेश्वराच्या शोधार्थ ते जेव्हा बाहेर पडतात आणि हेतूपुरस्सर ऐहिक जीवनाकडे दुर्लक्ष करतात, त्यावेळी घडलेल्या सर्व घटना क्लेशकारक, तापदायक आणि सर्वस्वी कसोटी पाहणाऱ्या आहेत. परमेश्वर भक्ताला तावून-सुलाखून कसे पाहतो आणि तो त्या कसोटीला उतरला की त्याला परमेश्वर कसा जवळ करतो, हे आपल्याला -

१) कलकत्ता येथे कालीमातेचे दर्शन घेण्याकरिता वासुदेव देवळाच्या पायऱ्या चढू लागला. तिसरी पायरी चढून गेल्यावर त्याला मूर्तीच्या ठिकाणी सजीव कालीमाताच सिंहासनावर आरूढ झालेली दिसली. २) औरंगाबाद येथे पुन: सिंहावर आरुढ झालेल्या कालीमातेचे दर्शन ३) बुलाखी महाराज यांचे घरी देवीमाता भगवतीचा झालेला साक्षात्कार ४) वृंदावन येथील राधेचे घडणारे मोहमयी दर्शन ५) संत एकनाथांनी अयोध्येला जावे हे सांगण्याकरिता साक्षात् दिलेले दर्शन ६) बीजमंत्र मिळाला पण नारायण कवच हवेच, ते सांगणारे इमाम साहेब ! अशी कितीतरी उदाहरणे त्यांच्या चरित्रात उत्कटतेने आली आहेत. कल्पितापेक्षा कधी कधी वास्तव अधिक रोमांचकारी असते. त्याची प्रचिती या चरित्रावरून येते. खडतर तप:श्चर्येतून ईप्सित प्राप्त झाल्यावर प. पू. गुरुजींचे जीवन सर्वार्थाने उजळून निघाले. मनाला शांतता मिळाली. ते गृहस्थाश्रमात रमले. पत्नी आणि मुले यांच्या सहवासात त्यांनी सुमारे वीस वर्षे समाधानाने घालवली. होमिओपॅथी व आयुर्वेद यांचा तेल्हारा (विदर्भ) येथे दवाखाना चालवला. संगीताची उपासना केली. दुर्ग (म. प्र.) येथे संगीत महाविद्यालय चालवले. ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला.

मुले मोठी झाली. आता स्वत:च्या पायावर उभी राहिली आहेत. ज्याचा तो उदरनिर्वाह करीत आहे. माँजी त्यांच्याजवळ राहू शकतात, हे पाहिल्यावर प. पू. गुरुजींची भ्रमंती पुन्हा सुरू होते, ती जिज्ञासूंना दीक्षा देण्याकरिता. 'बहुजन हिताय, बहुजय सुखाय !', 'हे भिक्षूंनो, सर्वत्र संचार करा', हा गौतम बुद्धाने आपल्या शिष्यांना जसा उपदेश केला, तेच कार्य गुरुजींनी केले. निरलसपणे, नि:स्पृहपणे, निष्कांचन राहून. यापेक्षा कर्मयोग तो काही वेगळा असतो का? त्यांच्या दीक्षामंत्रांनी अनेक शिष्य पावन झाले. त्यांचे अनुभव ऐकले, की आपण क्षणभर संभ्रमित होतो. प. पू. गुरुजींच्या शिष्यांनी ठिकठिकाणी आश्रम उभे केले आहेत. दरवर्षी त्यांचा जन्मोत्सव मोठ्या निष्ठेने, श्रद्धेने साजरा होतो.

प. पू. गुरुजींना प्रसिद्धी, बडेजाव, डामडौल, गाजावाजा नको वाटे. त्यांची दैनंदिनी अगदी साधी, जेवणही साधे, जपजाप्य, सोवळे-ओवळे, पूजा-अर्चा (आमच्या मागील पिढीवर याचा मोठा अंमल होता) आहारातील डावे-उजवे इ. गोष्टी त्यांना पूर्णावस्थेत त्याज्य वाटत. त्यांनी दाखवलेला मार्ग हा तुमचे-आमचे जीवन उजळून टाकणारा आहे ! तोच मार्ग आपण अनुसरू या. त्यामुळेच आपले जीवन सुखी, समाधानी होईल, अशी गुरुचरणी प्रार्थना करून हे माझे निवेदन पुरे करतो.

(२३।७।१९९२ रोजी ग्वाल्हेर येथे गुरुपौर्णिमेला केलेल्या भाषणाचे आधारे)
□

# अनुक्रमणिका

१. जन्म : दक्षिण अमेरिका .......................... ९
२. हिंदुस्थानकडे प्रयाण .............................. २०
३. परमेश्वराच्या शोधार्थ ............................. २७
४. नारायण कवच .................................... ४०
५. संत एकनाथांचे मार्गदर्शन .......................... ५६
६. अयोध्या येथील अनुष्ठान ........................... ६४
७. पवित्र संगमातील स्नान ............................ ७१
८. तेल्हारा गावी दवाखाना ............................ ८१
९. विठ्ठल येई घरा .................................. ९१
१०. मौंजीबंधन ...................................... ९८
११. मज़हरखान आणि तेजोगोल ..................... १०२
१२. वृंदावन ........................................ १०६
१३. तेल्हारा : संगीत आणि ज्योतिष .................. १२०
१४. संगीतकलेची सेवा ............................. १२५
१५. परजनहिताय परिभ्रमण .......................... १३९
१६. परमोत्कर्ष ..................................... १५५
तत्त्वज्ञान
अ) दर्शन (तात्त्विक विचार) ......................... १६३
ब) शरीररचना आणि योग (कुंडलिनी) ................ १६९
क) आसन आणि ध्यान ............................ १८१

**परमपूज्य गुरुजींकडून शंका-समाधान** ............... १९८

# ॐ १

# जन्म : दक्षिण अमेरिका

ही चरित्रकथा, गेल्या शतकातील शेवटच्या दशकातली आहे. ह्या सुमारास ब्रिटिशांची सत्ता व वैभव हे उत्कर्षास गेलेले होते. त्यांच्या साम्राज्याने जगाचा जवळजवळ निम्मा भाग व्यापला होता. म्हणजे पूर्वेकडे हिंदुस्थान (भारत), ब्रह्मदेश वगैरे प्रदेश आणि पश्चिमेकडे अमेरिकेचा बराचसा भाग. हा काळच असा होता, की ब्रिटिशांनी मोठ्या अभिमानाने सांगावे ''ब्रिटिशांच्या राजसत्तेवरचा सूर्य कधी मावळत नाही!''

ब्रिटिशांना, ह्या काळात ठिकठिकाणी असलेल्या आपल्या वसाहतींचा विकास साधण्याकरिता, प्रत्यक्ष काम करणारे पुष्कळ लोक हवे होते. इंग्लंडसारख्या त्याच्या छोट्या देशांतून प्रशासक, राजप्रमुख, वरिष्ठ सेनानी मिळणे अवघड होते. हिंदुस्थान हे वसाहतीचे राज्य होते. तेथे पुष्कळ लोकसंख्या होती, म्हणून कमी लोकसंख्या असलेल्या इतर खंडांतील - आफ्रिका, दक्षिण अमेरिका इ. देशांचा विकास करण्याकरिता, हिंदुस्थानातील लोकांचा उपयोग करण्याचे राज्यकर्त्यांनी ठरवले. त्यानुसार हिंदी (भारतीय) लोकांची कामगार म्हणून भरती करावयाची, कंत्राटी पद्धतीने त्यांना परदेशात पाठवावयाचे. ही मुदत साधारणत: पाच वर्षांची. ती संपल्यावर त्यांना परत येण्याची मुभा होती किंवा तिथेसुद्धा कामावर राहण्याची सोय होती. सदरहू वसाहतीचे नागरिक म्हणून ते राहू शकत होते. जमीन घेऊन त्यांना शेतीही करता येत असे. त्यांच्या आवडीनुसार इतर कोणताही व्यवसाय निवडता येत असे.

अशांपैकीच, उत्तर प्रदेशातील अलाहाबाद या शहरातील तिवारी या नावाचे एक ब्राह्मण कुटुंब ब्रिटिश गियानात (द. अमेरिका) गेले होते. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अशी कुटुंबे, जॉर्ज टाऊन शहरात तेथील रहिवासी म्हणून राहू लागली.

श्री. रामेश्वर तिवारी हे प्लॉट क्रमांक ४, प्लेन्टेन वॉक डेमेरारा नदीच्या पश्चिमेस राहत होते. त्यांचे जॉर्ज टाऊन भागात कापडाचे दुकान होते. त्यांच्याच कुटुंबात २३ जुलै १९०८ रोजी, पहाटे ४ वाजता, एका मुलाचा जन्म झाला. त्याचे नाव वासुदेव रामेश्वर. परमेश्वराने जणू हा मुलगा अध्यात्मक्षेत्रातला एक मोठा मार्गदर्शक, मित्र व तत्त्वज्ञ म्हणूनच सर्वांकरिता जन्माला घातला होता. पुढील कथन -हे ह्या बालकाची बाल्यावस्था, यौवनावस्था व प्रौढावस्था सांगणारी कहाणी आहे. त्या बालकाने सत्य व विवेक यांचा मागोवा घेणारी, त्याची योगसाधना सांगणारी, त्याकरिता त्याला उपसावे लागलेले कष्ट, सहन करावे लागलेले दुःख, त्यातूनच लाभलेली दिव्य शक्ती, त्यामुळे त्याला सांसारिक जीवनात चढ-उतार होत असताना मार्गदर्शन करणारी, त्या उपासनेतून झालेली आत्मानुभूती आणि शेवटी ईश्वरानुभूती.

वासुदेवाने लहानपणापासूनच आपल्या व्यक्तिमत्त्वातील काही विशेष प्रगट केले.

त्याच्या पहिल्या वाढदिवसाचा एक प्रसंग त्याच्या व्यक्तिमत्त्वातील गूढता प्रगट करणारा ठरला. ह्या दिवशी छोटा वासुदेव, वास्तविक आनंदी आणि खेळकर असावयास पाहिजे होता; पण त्या दिवशी वरवर पाहता त्याचे चैतन्यच हरपल्यासारखे वाटत होते. तो त्याच्या अंथरुणावर पडून होता. त्याचे हात-पाय थंड वाटत होते. त्याच्या डोळ्यातील बुबुळे हालत नव्हती. नजर कोठेतरी स्थिर होती, हे सर्व पाहून पालक घाबरून गेले. त्यांनी डॉक्टरला बोलावले; पण त्यांना कोठल्याच रोगाची लक्षणे आढळली नाहीत. डॉक्टर स्वतःच बुचकळ्यात पडले. त्यांना ह्या अवस्थेचे निदान करता आले नाही, म्हणून त्यांनी कोणतेच औषध सांगितले नाही. वासुदेवाच्या शरीरातील उष्णतामान ठीक रहावे, म्हणून त्याला कोमट पाण्याचा शेक द्यावा, असे डॉक्टरांनी सुचवले. तसे करून, चिंताग्रस्त मातापिता त्याच्याकडे पहात, देवाची प्रार्थना करीत राहिले. कितीतरी वेळ वासुदेवामध्ये कोठलीच हालचाल दिसली नाही. सुमारे

बारा तास झाल्यावर वासुदेव हालचाल करू लागला. थोड्याच वेळाने तो पहिल्यासारखा झाला. त्याला काय झाले असावे? देहभान हरवणारी परब्रह्माची तर भेट झाली नाही ना?

वासुदेवाचे मातृछत्र त्याच्या वयाच्या तिसऱ्याच वर्षी गेले. तो आपल्या आजोळी रहात होता. तेथे त्याच्या आजोळाकडचे नातेवाईक-मामा, मामी आणि इतरांनी त्याचे पालनपोषण केले. त्याला इंग्लिश शाळेत किंडरगार्टन वर्गात घातले. शाळेतही वासुदेव इतर मुलांपासून दूर-अलिप्त रहात असे. त्याही ठिकाणी त्याच्या व्यक्तिमत्त्वातील वेगळेपण दिसू लागले. इतर मुलांसारखा त्याला गप्पागोष्टी करण्यात आणि खेळण्यात वेळ घालवावासा वाटत नसे. स्वत:ची स्वप्ने पहाण्यात तो दंग असे. इतर मुलांबरोबर खेळण्यात त्याला गंमत वाटत नसे. त्याचा हा अलिप्तपणा वडील मंडळींच्या लक्षात आल्यावर त्याला ते एकटेच राहू देत. आईच्या मायेला पारखा झाल्यामुळे कदाचित तो अंतर्मुख होत असेल.

तो अलिप्त रहात असला तरी बुद्धीने मंद नव्हता. अगदी क्वचित आढळणारी प्रतिभाशक्ती आणि कुशाग्र बुद्धी त्याचेठायी होती. तीन वर्षांचा असताना, त्याने २०० श्लोक, मंगलाचरण, देवपूजा मंत्र - हवन मंत्र इ. पाठ केले होते. पाचव्या वर्षी - चाणक्यनीती, सत्यनारायण कथा यातील ११४ श्लोक पाठ झाले होते. इतक्या लहान वयात दाखवलेली ही हुशारी म्हणजे साधारण बाब नव्हती. लोक त्याला हे श्लोक म्हणावयास सांगत आणि त्याला भेट म्हणून थोडेसे पैसे देत.

तीन वर्षांचा असतानाच आणखी एक प्रसंग त्याच्या आईच्या मृत्यूनंतरचा. त्याच्या मातुल घराण्यातील मामा श्री. नंदकिशोर दुबे हे सकाळी स्नानास निघाले होते. छोटा वासुदेव दुकानात होता. त्याच्या मामानी बाहेर जाण्यापूर्वी त्यांचे सोनेरी घड्याळ नीट रहावे म्हणून त्याच्याजवळ दिले होते. ते सुरक्षित रहावे म्हणून वासुदेवाने कापडाच्या गठ्ठ्याखाली ठेवले. परत आल्यावर मामांनी ते मागितले नाही. मामा व भाचा दोघेही ही बाब विसरून गेले. तीन दिवसांनी मामाला आठवण झाली आणि त्यांनी वासुदेवाजवळ घड्याळ मागितले. वासुदेवाने कपड्याच्या ताग्याखाली जपून ठेवले होते, तिथे पाहिले; पण तिथे ते घड्याळ नव्हते. भराभर सगळे तागे काढून शोध घेतला. घड्याळ

तेथे नव्हते. सर्वांना आश्चर्य वाटले. दु:ख झाले. संतप्त झालेले मामा चिडले. त्याला रागावले. इतर वडील मंडळीही त्याला निष्ठूरपणे रागावून बोलली. त्यांना वाटले, वासुदेवानेच हे घड्याळ कोणाला तरी थोडेसे पैसे घेऊन दिले असावे. तसेच ते कुठे ठेवले आहे ते तो खोटेच सांगत असावा. वासुदेव ओक्साबोक्शी रडत होता. पुन: पुन्हा तो दाखवत होता, की मी ते घड्याळ कापडाच्या ताग्याखालीच ठेवले होते. वडील मंडळी मात्र घड्याळ गायब झाल्यामुळे कोड्यात पडली होती. ही घटना विसरून जाण्याव्यतिरिक्त ते काय करू शकत होते? काही महिने लोटले. ख्रिसमसचा सण जवळ आला होता. दुकानात विक्री जोरात सुरू होती. कापडाचे गठ्ठेच्या गठ्ठे विकण्याकरिता बाहेर काढले जात होते. ख्रिसमसच्या अगोदर एक दिवस ग्राहकाला सुटाचे कापड मोजून देत असताना सोनेरी घड्याळ कापडाच्या ताग्यातून पडले. वासुदेव दुकानातच होता. वडील मंडळी व वासुदेव अशा प्रकारे पडलेले घड्याळ पहातच राहिले. लहानग्या वासुदेवाची मान ताठ झाली. त्याची प्रतिष्ठा कलंकित झाली नाही. या घटनेने वासुदेवाच्या मनावर एक गोष्ट ठसली की, सत्य हेच खरे ठरते. त्यापुढे स्तुती किंवा निंदा ह्याला जीवनात काहीच किंमत नाही. ह्या स्वत:च्या अनुभवावरूनच त्याला कळून चुकले की, *सत्याचाच शेवटी विजय होतो.*

सुमारे पाच वर्षांचा असताना लहानग्या वासुदेवाला आणखी एक वेगळा अनुभव आला. वासुदेवाचे आजोबा प्रेमळ होते; पण त्यांची शिस्तही कडक होती. वासुदेव आता किंडरगार्टनमध्ये जात असल्यामुळे त्याला तेथील अभ्यास, खेळ व इतर वेळही नियमित ठेवावा लागत असे. रात्रीचे दहा वाजले की, प्रत्येकाने झोपी गेले पाहिजे असा दंडक असे. एके दिवशी वासुदेवाला रात्री दहा वाजता झोपावयास सांगितले; पण त्या रात्री त्याला झोप आलीच नाही. तो बिछान्यावर छातीशी पाय दुमडून पहुडला होता. मध्यरात्री तो लघुशंकेकरिता उठला. त्याकरिता त्याला त्याच्या खोलीशेजारी असलेल्या, आजोबांच्या खोलीत भांडे ठेवले असल्यामुळे जावे लागत होते. त्यांच्या खोलीतून बाहेर आल्यावर त्याला एक सुंदर पण चमत्कारिक अशी ३०-३५ वयाची व्यक्ती आजोबांच्या खोलीत सोफ्यावर आरामात बसलेली दिसली. ती व्यक्ती उंच, साधारणत: सात फूट असावी. ह्या व्यक्तीचा चेहेरा तेजस्वी व आकर्षक होता आणि त्याभोवती प्रसन्न, आल्हाददायक प्रकाश पडला होता. ह्या व्यक्तीत काहीतरी दिव्य होते.

त्या रात्री वासुदेवाला तीनदा उठावे लागले. तिन्ही वेळा त्याला ती दिव्य स्वरूपाची व्यक्ती सोफ्यावर बसलेली आढळली. एकही शब्द वासुदेवाकडून किंवा त्या दिव्य व्यक्तीकडून उच्चारला गेला नाही. आजोबा त्यांच्या खोलीत गाढ झोपलेले होते. त्यांच्या खोलीतील ही अद्‌भुत घटना त्यांना माहिती नव्हती. हे दृश्य त्या रात्री तीनदा दिसले. त्यामुळे वासुदेवाला दैवी जीवनाचे तत्त्वज्ञान जाणून घेण्याची तीव्र इच्छा झाली.

त्याच्या आजोबांच्या घरात दररोज रामायण, महाभारत व श्रीमद्‌भागवत व इतर धार्मिक पुस्तकांचे पठण करण्याचा प्रघात होता. वासुदेवाला या ग्रंथांतील पठणाचे श्रवण करण्यात गोडी वाटत असे. प्रभू श्रीरामचंद्र, भगवान श्रीकृष्ण आणि प्राचीन काळातील ऋषिमुनी यांच्या जीवनचरित्राचे श्रवण करीत असताना वासुदेवाचे अंगावर रोमांच उभे रहात. त्यांच्या कथांनी तो प्रोत्साहित होई. *प्राचीन योगी-ऋषिमुनींप्रमाणे आध्यात्मिक क्षेत्रातील अनुभव घेण्याची त्याला तीव्र इच्छा निर्माण झाली व ती दिवसेन्‌दिवस वाढू लागली. हिंदुस्थानात जावे, थोर विभूतीची भूमी पहावी, अशी इच्छा त्यांच्या मनात प्रबळ होऊ लागली.* अगदी एकटा असताना तो मनाने हिंदुस्थानची यात्रा करी - श्रीकृष्णाचे जन्मस्थान, प्रभूरामचंद्राची अयोध्या, संत तुलसीदास, कबीर, सूरदास यांचे जन्मस्थान आणि वैदिक काळातील ऋषिमुनींचे वास्तव्याचे ठिकाण.

वासुदेवाची चिंतन करण्याची सवय आणि एकांतात रहाण्याची वृत्ती यामुळे तो घरातील मोठ्या मंडळींच्या उपहासाचा विषय झाला. त्याला कुत्सितपणे बाबाजी म्हणून संबोधू लागले.

त्याच्या वडिलांनी, आजोबांनी आणि इतर नातेवाईकांनी त्याची ही वृत्ती, एकांतवासाची सवय, त्याच्या शालेय शिक्षणाच्या आड येऊ दिली नाही. त्यांनी त्याचा अभ्यास सेंट स्विथिन इंग्लिश स्कूलमध्ये चालूच ठेवला.

वासुदेवाची मुंज - (उपनयनविधी) त्यांच्या वडिलांनी घरी ४ प्लेन्टेन वॉक, कदली मार्ग, येथे वयाच्या सातव्या वर्षी केली. ह्या वेळेपासून तो आपल्या वडिलांकडे राहू लागला. त्याचे वडील, रामेश्वरजी त्याला पद्धतशीरपणे संस्कृत आणि हिंदी लिहावयास व वाचावयास शिकवू लागले. *अगदी अल्पावधीत त्याने पवित्र मंत्राचे पठण आकर्षक व तालबद्ध पद्धतीने म्हणण्यात प्रभुत्व मिळवले. त्यामुळे पुढील जीवनात त्यांचे व्यक्तिमत्त्व घडण्यास चांगली मदत*

*झाली.* अगदी वयाच्या नवव्या वर्षी ही गोष्ट सहजसाध्य कशी झाली हे समजणे मनोरंजक वाटते.

एकदा प्लेन्टेन वॉक या ठिकाणापासून काही अंतरावर असलेल्या वसाहतीत हिंदी लोकांनी त्यांच्या आजोबांना-पंडित जयमंगल दुबे - यांना श्रीमद्‍भागवताचा पाठ म्हणण्यास बोलावले होते. (हा पाठ सात दिवस होणार होता.) त्याप्रमाणे पंडित जयमंगल दुबे पाठ म्हणू लागले. सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी त्यांना काहीसा त्रास होऊ लागला आणि त्यामुळे त्यांचा आवाज बसला. त्यांना पाठ चालू ठेवणे अवघड होऊ लागले, म्हणून कार्यक्रमाच्या संयोजकांनी छोट्या वासुदेवाला पाठ म्हणशील का, म्हणून विचारले. वासुदेवाने ताबडतोब हे काम हाती घेतले आणि उरलेल्या चार दिवसांत पूर्ण केले. *ह्या प्रशंसनीय कार्यामुळे वासुदेवाचे ह्या धर्मग्रंथावरचे प्रेम आणि श्रद्धा वाढली. आदर-भक्तिभाव निर्माण झाला. त्यामुळे आपण हिंदुस्थानात जावे; जिथे देव, देवता आणि ऋषितुल्य माणसे राहतात, त्यांचे दर्शन घ्यावे, अशी तीव्र इच्छा त्याला होऊ लागली.*

वयाच्या पाचव्या वर्षीच आजोबांच्या घरी वासुदेवाला दिव्यकृपा कशी प्राप्त झाली, हे आपण पाहिले आहेच. जिथे दिव्य शक्तीचे दर्शन घडले, तिथेच सैतानाने सुद्धा कृपादृष्टी करण्यास मागेपुढे पाहिले नाही ! वासुदेवाची मुंज झाल्यावर थोड्याच दिवसांत त्याची गाठ जिनीशी पडली. ती कशी पडली ते पाहू.

एकदा रामेश्वरजींना लग्नसमारंभाला न्यु स्टेटमध्ये जावयाचे होते. रस्त्यात कॅनॉलवर एक मोठा पूल होता. कॅनॉलमुळे अमेझॉन व डेमेरारा या नद्या जोडल्या होत्या. हा पूल ब्रीदन होप चर्चजवळ होता. ह्या चर्चच्या आवारात सेंट स्विदीन स्कूल होते. तेथे वासुदेव शिकत होता. न्यु स्टेटकडे जाताना हा पूल ओलांडून जावे लागत असे. लग्नसमारंभानंतर रामेश्वरजी आणि छोटा वासुदेव घरी परत येत होते. रात्र पुष्कळ झाली होती. सुमारे एक वाजून गेला असावा. ते पुलाजवळ आले, तोच वासुदेवाला मोठ्या आकाराचा जिनी पुलावर उभा असलेला दिसला. जिनीने आपला एक पाय एका कठड्यावर व दुसरा पाय दुसऱ्या कठड्यावर ठेवलेला दिसला. अशा प्रकारे रस्ताच अडवलेला होता. जर कोणाला जायचे असेल तर दोन्ही पायाचे मधून जाणे, पण तसा प्रयत्न केल्यास जिनी जाऊ

देणार नव्हता. वासुदेवाने तसे वडिलांना सांगितले, की पुढे जाऊ नका, कारण जिनीने त्यांचा रस्ता आडवला आहे. रामेश्वरजी मात्र जिनीला पाहू शकले नाहीत; पण ते मंत्र म्हणू लागले. कदाचित त्यामुळे ते विघ्न दूर होईल. काही वेळ दोघेही एकमेकांकडे पहात राहिले. नंतर एकाएकी जिनीने पाय उचलले आणि कॅनॉलमधील पाण्यात मोठा आवाज करीत बुडी मारली. पिता-पुत्रांनी पूल ओलांडल्यावर जिनी पाण्यातून बाहेर आला आणि त्यांच्या पाठोपाठ जाऊ लागला. त्यांच्या घरापासून सुमारे शंभर यार्डपर्यंत तो गेला. नंतर तो थांबला आणि म्हणाला, ''रामेश्वरजी, मी तुमच्यावर खुष आहे. तुम्ही आणि हा मुलगा पहिलेच आहात, की ज्यांना मी पूल ओलांडू दिला आहे. ह्यावेळी पूल आमच्या ताब्यात असतो. मी तुम्हाला मदत करण्याचे वचन देतो. ज्या ज्या वेळी तुम्ही अडचणीत याल, त्या त्या वेळी माझे स्मरण करा,'' असे म्हणून जिनी दिसेनासा झाला.

वासुदेव सुमारे आठ वर्षांचा असताना असाच एक प्रसंग घडून आला. वेळ सायंकाळची, सूर्यास्त झाला होता. पश्चिमेकडे मावळत्या सूर्याची गडद तांबडी छाया पडली होती. पृथ्वीवर तितकासा काळोख पसरलेला नव्हता. यावेळी रामेश्वरजींना त्यांचे सासरे जयमंगल दुबे आजारी असल्याची तार आली. लगेच रामेश्वरजी व वासुदेव रात्रीचे जेवण करून बग्गीत बसून त्वरेने न्यु स्टेटकडे निघाले. त्यांना ब्रीदन होप चर्चजवळचा पूल, ज्याचा उल्लेख वर आला आहे, तो ओलांडावयाचा होता. पुलाच्याजवळ आल्यावर बग्गीचा घोडा एकदम थांबला आणि खिंकाळू लागला. मागील पायावर उभा राहू लागला, मार्गावर वासुदेवाने मांजरीची पिल्ले खेळताना पाहिली. थोड्यात वेळात ती नाहीशी झाली. बग्गी चालू लागली. वस्तीच्या भागातून ते पुढे गेले. दोन-तीन मैल निर्मनुष्य अशा भागातून ते पुढे गेले. पुन: बग्गीचा घाबरलेला घोडा पुढे जाईना. तो पुन: खिंकाळू लागला. त्याने पुढील पाय वर घेतले. वासुदेवाने पाहिले की रस्त्यावर पुष्कळ शवपेटिका पडलेल्या आहेत आणि त्यामुळे रस्ता अडवला गेला आहे. रामेश्वरजी मंत्र म्हणू लागले. सुमारे तासभर ते इथे अडकून पडले. कारण या शवपेटिका त्यांना जाऊ देईनात, की रस्ता सहज मोकळा करीनात. परंतु वासुदेवाला या दुष्ट शक्तीचे भय नव्हते. कारण *जन्मत:च लहानपणापासून त्याला दिव्य शक्तीचे संरक्षण व मार्गदर्शन लाभले होते.* दिवस असेच जात

होते.

वासुदेव सुमारे नऊ वर्षांचा असताना एक अत्यंत आश्चर्यजनक अनुभव आला. एका रात्री तो जागा होऊन अंथरुणावर बसला होता. झोप येत नव्हती. यावेळी त्याला एक वेगळीच अनुभूती आली. त्याच्या गुदद्वारातून थंड हवा वर येत आहे आणि गरम हवा बाहेर पडत आहे. तो या अद्‌भुत बाबीकडे काहीसा आश्चर्याने आणि कुतूहलाने पाहू लागला. काही क्षणातच त्याला जोरकस पाण्याचे बुडबुडे असावे तसे गुदद्वारातून गळ्यापर्यंत हे बुडबुडे येत आहेत, असे वाटू लागले. नंतर लगेच हा अनुभव बदलला. त्यांनी स्वत:ला विशाल अशा अटलांटिक सागरात घेरलेले पाहिले. अटलांटिक सागर सर्वत्र पसरलेला आहे. सागराच्या प्रचंड लाटा वर येत आहेत. जग बुडवित आहेत. त्याला आपले घर, घरातील झोपण्याचा पलंग, ज्यावर तो झोपत असे आणि जॉर्ज टाऊन शहर, हे सर्व समुद्राच्या तळाशी जात आहे, ज्या चादरीवर तो निजत असे, ती पाण्याच्या लाटांवर तरंगत आहे आणि त्याला कुठेतरी नेत आहे, पाण्याच्या लाटा त्याला वर नेत आहेत, खाली आणत आहेत, पुढे नेत आहेत, कुठे जात आहे हे त्याला माहीत नाही. हे दृश्य, हा अनुभव रात्रभर येत होता. उजाडल्यावर हे दृश्य आपोआप नाहीसे झाले. वासुदेवाला वास्तवाचे भान झाले. तो दैनंदिन कामात मग्न झाला.

रात्री आलेल्या वरील अनुभवाची आठवण त्याला दिवसभर सतत होत होती. तो त्याची नित्य कामे - शाळेत जाणे, अभ्यास करणे, अगदी तांत्रिक स्वरूपाचे व अर्धवट लक्ष देऊन करीत होता. रात्री झोपी गेल्यावर ते दृश्य दिसत होते, तो अनुभव त्याला पुन: येत होता. हेच दृश्य आणि तोच अनुभव त्याला पुढील तीनही रात्री आला. तो मोहावस्थेत होता. दिवसा तो इतरांसारखा वागत असे; पण त्याच्या मनावर मात्र रात्रीच्या दृश्याचा सतत प्रभाव होता. दिवसभर, रात्रीची तो वाट पहात असे. कारण *रात्री त्याला ते दिव्य दृश्य दिसत होते आणि त्यापासून आनंद मिळत होता.*

तिसऱ्या रात्रीचे दृश्य, त्याच्या अनुभवाने मागील अनुभवाचा उत्तम शेवट केला, ह्या आनंदमयी रात्री, वासुदेवाने शांत, लाटविरहित अथांग समुद्र पाहिला. हा पॅसिफिक महासागर असावा. वासुदेव पाण्यावर तरंगत होता. वडाचे पान त्याच्याकडे वहात येत आहे, ते वडाचे पान जवळ आल्यावर

त्याला दिसले की त्यावर एक दिव्य, सुंदर, गौरकांती, मोहक वाटावे असे बालक पहुडले आहे. त्या बालकाभोवती प्रकाश पसरलेला होता. त्या वातावरणात फक्त दोनच व्यक्ती दिसत होत्या. दिव्य बालक - वडाच्या पानावर निजलेले आणि वासुदेव अंथरुणावर पहुडलेले. ते दिव्य बालक पानावर खेळकरपणे आपल्या उजव्या पायाचा अंगठा चोखत होते. रात्र संपल्यावर हे दृश्य संपले; पण या सुखद आठवणी वासुदेवाच्या स्मृतीत अद्यापही ताज्या आहेत.

वरील घटनेनंतर आणखी एक घटना घडली, त्यावेळी वासुदेव नऊ वर्षांचा होता. ह्या घटनेत दैवी कृपेचा भाग आढळतो.

तिवारी कुटुंबियांचे घर वर उल्लेख केल्याप्रमाणे प्लॉट क्रमांक ४ प्लेन्टेन वॉक येथे होते. घोड्याच्या तबेल्याच्या पाठीमागे पाण्याचा छोटा तलाव होता. शेजाऱ्याने ती जागा शेण, मलमूत्र विसर्जनाकरिता केली. थोड्याच अवधीत तो तलाव केरकचऱ्याने भरून गेला. त्यातून दुर्गंधी येत होती. पुष्कळ लोक तलावात घाण टाकत होते; पण स्वच्छ मात्र करायला कोणी नव्हते. दुर्गंधीमुळे श्वासोच्छ्वास घेताना भोवतालच्या घाणीचा त्रास होत होता. रामेश्वरजी आणि त्याच्या शेजारच्यांना तलाव स्वच्छ करावयास पाहिजे, ह्याची जाणीव होती; पण हे अस्वच्छ काम करण्यास त्यांना माणसे मिळत नव्हती. काही दिवसांनी, एका रविवारी सायंकाळी रामेश्वरजी नेहेमीप्रमाणे त्यांच्या मित्रांशी बोलत बसले होते - घरासमोरील हिरवळीवर, नीम वृक्षाच्या झाडाखाली. इतर विषयांवरील चर्चेबरोबर तो तलाव त्वरित स्वच्छ करण्यासंबंधीही आपसात बोलले. आपल्या घराकडे कोणी एक मनुष्य मुख्य रस्त्यावरून येत आहे, हे त्यांनी पाहिले. तो आला. घरासमोर उभा राहिला.

"तू कोण आहेस? तुला काय पाहिजे?" असे त्याला विचारले. त्याने आपले नाव "इनामदार" असे सांगितले आणि आपल्याला काही काम पाहिजे, असे म्हणाला. आपल्याला काम मिळाल्यास बरे वाटेल, असे त्याने सांगितले. तो बावीस-चोवीस वर्षांचा उमदा तरुण होता. रामेश्वरजींनी त्याला विचारले, की तू तलाव स्वच्छ करशील का? तो तरुण हे काम करण्यास तयार झाला आणि मजुरी फक्त - जेवणखाण, राहणे आणि अंगावर घालण्यास कपडे.

लगेच दुसऱ्या दिवशी इनामदाराने काम सुरू केले. दिवसभराचे काम

संपल्यावर तो त्याचा वेळ, वासुदेव आणि टायगर (कुत्रा) यांच्याशी खेळण्यात आणि मुलांना रमविण्यात घालवी.

तिवारी कुटुंबियांचा टायगर कुत्रा एका वेगळ्या प्रवृत्तीचा आणि कुत्र्याच्या श्वानजातीपैकी वेगळा - ह्याची नोंद घ्यावयास पाहिजे. हा टायगर एखाद्या सनातन्यासारखा-पवित्र हिंदूसारखा राही. एकादशीसारखा उपवास तो निक्षून करी. तो त्या दिवशी खात-पीत नसे. त्याला सहावे इंद्रिय असावे, ज्यामुळे तो एकादशी लक्षात ठेवी. एकदा ह्या कुटुंबात एकादशी आहे हे कोणाच्याही लक्षात आले नाही. त्या दिवशी टायगरने अन्न घेतले नाही. एकादशीच्या दिवशी त्याला मृत्यु आला, हे सुद्धा लहानसहान आश्चर्य नव्हे. इनामदार, वासुदेव आणि टायगर यांची दाट मैत्री होती. इनामदार मांस आणून शिजवून टायगरला भरवीत असे. तिघेही आपली मैत्री टिकवून होते. तो तलाव स्वच्छ करण्यास इनामदारला सुमारे चार महिने लागले. आता त्याचे काम संपले. त्याने जाण्याचे ठरविले. रामेश्वरजींनी त्याला पैसे व कपडे दिले; पण त्याने ते घेण्यास नकार दिला. आमच्या कुटुंबात रहा म्हणून त्याला आग्रह केला, पण तो तसे रहाण्यासही तयार नव्हता. तो निघायच्या सुमारास मि. सुब्रतिमियाँ - रामेश्वरजींचे मित्र, यांनी विचारले :

''हा केव्हा आला? तुमच्याकडेच का आला?

आणि घाणेरडे काम का पत्करले?

तो, मुसलमान म्हणून इतर जवळपासच्या मुस्लिमात का मिसळला नाही? तसेच नमाज वगैरे का पढत नाही?

यावर इनामदार नुसता हसला. त्याने वासुदेवाकडे अंगुलीनिर्देश केला.

''मी केवळ ह्या मुलाकरिता आलो.'' तो म्हणाला आणि लगेच निघून गेला. रामेश्वरजी आणि सुब्रतिमियाँ आश्चर्यचकित होऊन मुख्य मार्गावरून जाणाऱ्या त्या तरुणाकडे पहात राहिले. सुमारे दोनशे यार्ड गेल्यावर तो दिसेनासा झाला. असे वाटले की, तो अदृश्य झाला असावा. रस्ता सरळ आणि रुंद होता. त्यामुळे दूरवर दिसत होते. जवळपासच्या लोकांनीही त्याला पाहिले नाही.

काही दिवस लोटल्यावर, वासुदेव गूढ स्वप्नात अधिकाधिक दंग होऊ लागला. दैनंदिन जीवनातील त्याचा आनंद कमी होऊ लागला. वासुदेवाचे वडील, आजोबा आणि इतर नातेवाईक त्याच्या विचित्र प्रवृत्तीमुळे आणि विशिष्ट

स्वभावामुळे चिंताग्रस्त झाले. रामेश्वरजींनी त्याला इतर धर्मातील विद्वान धर्मगुरू - प्रिस्ट, बिशप, (कॅथॉलिक आणि प्रॉटेस्टंट) कडे घेऊन गेले. ह्या धर्मगुरूंनी आपली असाह्यता प्रकट केली. त्याला हिंदुस्थानात घेऊन जावे, तिथे मदत व मार्गदर्शन होईल असे सुचविले. एका वृद्ध मुस्लिमानेही त्याचा गूढपणा पाहून तसाच सल्ला दिला. इनामदाराने सांगितलेल्या गोष्टीवरून त्याच्या येण्याचे उद्देश, तसेच त्याची घाणेरडे काम करण्याची तयारी, ते काम संपल्यावर परत जाण्यातील तत्परता, ह्या घटना वरील संदर्भात लक्षात घ्यावयास पाहिजेत. सुब्रतिमियाँचेही मत रामेश्वरजींनी आपल्या मुलाला हिंदुस्थानात लवकर घेऊन जावे, असेच पडले. हिंदुस्थानात जाणे भाग आहेच असे रामेश्वरजींने ठरवले. अगदी स्वत:च्या मनाविरुद्ध. त्यांनी आपली मालमत्ता मेव्हण्याचे नावावर व इतर कुटुंबियांचे नावावर केली.

आता बाप-लेक हिंदुस्थानच्या प्रवासाला सिद्ध झाले.

|| ॐ ||



**आमचे वंदनीय गुरुजी**

# २

# हिंदुस्थानकडे प्रयाण

ऑगस्ट १९१९ च्या शेवटच्या आठवड्यात रामेश्वर तिवारी व त्यांचा मुलगा वासुदेव सतलज ह्या प्रवासी बोटीतून हिंदुस्थानकडे यावयास निघाले. ह्यावेळी वासुदेव अकरा वर्षांचा होता. त्याच्या कोवळ्या मनात हिंदुस्थान ह्या पवित्र देशाविषयी गोड कल्पना घोळत होत्या, त्यामुळे ह्या दीर्घ प्रवासातील आलेले अनुभव त्याच्या फारसे लक्षात राहिले नाहीत. त्याला अस्पष्टपणे आठवले, की बोट केप ऑफ गुडहोपला वळसा घालून सुमारे आठवडाभर केपटाऊनला कोळसा घेण्याकरिता थांबली. काही वेळा बोटीला अशांत, खवळलेल्या समुद्रातून जावे लागले. पुढचा प्रवास विशेष काही न घडता झाला.

सहा आठवड्यांनी -म्हणजे ४ ऑक्टोबर १९१९ रोजी सतलज बोट कलकत्त्याच्या फोगटिस बंदरावर नांगरली. हा दिवस दसरा सणाचा होता. हिंदुस्थानात हा सण दरवर्षी प्रभू रामचंद्राने लंकेतील रावणावर विजय मिळवला - सुष्टाचा दुष्टावर विजय - या स्मृतिप्रित्यर्थ साजरा होत असतो.

अशा महत्त्वपूर्ण सणाचे दिवशी वासुदेवाची बोट हिंदुस्थानच्या किनाऱ्याला लागावी, हा केवळ योगायोग होता काय? किंवा *अंतर्मनाचा शोध घेण्याच्या त्याच्या प्रयत्नातील यशाचा टप्पा होता काय?* सतलजवरील सुमारे एक हजार प्रवाशांना उतरल्यावर बंदरावर ह्या दिवशी थांबावे लागले. कोणाही प्रवाशाला किनाऱ्याकडे जाऊ दिले जात नाही. कारण बराच मोठा समुदाय

शहरातील रस्त्यांतून या सणानिमित्त जात होता.

पाच ऑक्टोबर १९१९ ला अकरा वर्षांच्या वासुदेवाने आपली दीर्घ जलयात्रा संपवली. हिंदुस्थानच्या म्हणजे भारत - त्याची स्वप्नभूमी - किनाऱ्यावर तो आला.

कलकत्त्यात, रामेश्वरजींना वासुदेवाला घेऊन बंगाली लोकांची देवता - कालीमाता हिच्या दर्शनाला जावयाचे होते. *वासुदेव कालीमातेचे दर्शन घेण्यास उत्सुक होता. त्याला या देवतेबद्दल नितांत आदर व प्रेम होते.*

सतलजवरील एक बंगाली गृहस्थ श्री. भिखारी हे रामेश्वरजींच्या दीर्घ प्रवासात बरोबर होते. त्यांनी कालीमातेच्या देवळाकडे नेतो असे सांगितले. श्री. भिखारींनी उभयता पिता-पुत्रांना कलकत्त्यातील एक उपनगर मुटिया बुर्ज येथे आपल्या निवासस्थानी नेले. स्नान व फराळ झाल्यावर ते देवळाकडे निघाले. श्री. रामेश्वरजी आणि श्री. भिखारी पुढे होते. ते देवळाच्या पायऱ्या चढत होते. वासुदेवाला मात्र फुलझाडे, खेळणी, हलवायाचे पदार्थ इ. दुकाने पाहून आकर्षण होत होते. त्यामुळे तो मागे राही.

वासुदेव पायऱ्या चढू लागला. त्याची नजर, सरळ आतील गाभाऱ्यात, ज्या ठिकाणी कालीमाता सिंहावर आरूढ झालेली होती, तिथे लागली होती. तिसरी पायरी चढून गेल्यावर *त्याला मूर्तीच्या ठिकाणी सजीव कालीमाताच सिंहासनावर आरूढ झालेली दिसली.* सिंह गर्जू लागला. कालीमाता त्याला शांत करीत होती. ह्या दिव्य दर्शनामुळे तो स्वत:ला पूर्ण विसरला. तो पायरीवर पडला. त्याची शुद्ध हरपली. इतर यात्रेकरूंनी त्याच्या वडिलांचे लक्ष वासुदेव पडला होता, इकडे वेधले. अशा स्थितीत श्री. रामेश्वरजी व श्री. भिखारी वासुदेवाला घेऊन मुटिया बुर्ज येथे परत आले.

वासुदेवाला ताप आला होता. तीन दिवस होऊन गेले, परंतु ताप कमी न होता तो वाढतच राहिला. चौथ्या दिवशी मूढावस्थेत तो म्हणू लागला, ''मला अलाहाबादला न्या-पुढच्या गाडीने. हावरा स्टेशनवर आल्यावर माझे डोळे उघडतील. ही गाडी सिग्नलच्या बाहेर जाईल तेव्हा मी शुद्धीवर येईन आणि बरद्वान स्टेशन आले की मी उठून बसेन.''

प्रवासातील दगदग आपल्या मुलाला सहन होईल काय? या विचाराने रामेश्वरजी त्रस्त झाले. रस्त्यातच वासुदेवाची स्थिती खालावली तर? *मुलगा* -

*वासुदेव जे मूढावस्थेत बोलला ती दैवी अधिसूचना आहे का?* श्री. रामेश्वरजींचे अंतर्द्वंद्व श्री. भिखारीने जाणले. त्यांनी लगेच सांगितले, की *मुलाचे उत्तर हे पवित्र कालीमातेचे आहे*. म्हणून तुम्ही पुढच्याच गाडीने अलाहाबादला जा.

हावरा स्टेशनवरून एक्सप्रेस गाडी निघाली. वासुदेवाचा ताप उतरला. गाडी सिग्नल पार करून पुढे गेली, तसा वासुदेव शुद्धीवर आला. गाडी बरद्वानला पोचली. वासुदेव त्याच्या जागेवर उठून बसला, हे पाहून रामेश्वरजी चकितच झाले! *आपला मुलगा हा दैवी प्रभावाखाली आहे व तसाच राहील ही वस्तुस्थिती त्यांना आता समजून आली.*

अलाहाबादला गाडी पोचली. इथेच तीन नद्यांचा संगम - गंगा-यमुना आणि सरस्वती-आहे. पुढे ही नदी बंगालच्या उपसागराकडे जाते. तीन नद्या एकत्र येतात त्या ठिकाणास त्रिवेणी संगम म्हणतात. इथे स्नान करणे इतके पवित्र मानतात, की एकदा जरी बुडी मारली तरी पापातून माणूस मुक्त होतो, अशी श्रद्धा आहे. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे त्याला मुक्ती लाभते. लहानग्या वासुदेवाने तुलसीदासकृत रामायणात ह्या संगमाची प्रशस्ती वाचली होती आणि म्हणून इथे स्नान करण्यास तो उत्सुक होता. रामेश्वरजींनाही पवित्र गंगेत स्नान करण्याची इच्छा होती.

पंडे संगमाजवळ यात्रेकरूंची वाट पहात होतेच. पिता-पुत्र तेथे येताच त्यांनी त्यांना घेरले. संगमातील स्नान पवित्र कसे होते, यासंबंधी माहिती त्यांना सांगितली. नुसती एक बुडी मारली तरी ती जीवनात कशी पवित्र होते- पंड्यांचे हे असे सांगणे कोणाही भाविक यात्रेकरूच्या मनात पवित्रपणाची भावना निर्माण करू शकत होते!

वासुदेवाला नदीच्या पाण्यात कसे पोहावे, हे माहिती नव्हते. म्हणून त्याने दोरीला धरून आंघोळ करावी अशी व्यवस्था केली होती. तो उत्सुक होता. त्याला आशीर्वाद हवा होता, म्हणून तो आपले पवित्रस्नान पंधरा मिनिटे करीत होता. त्याचे वडील रागाने ओरडत होते.

त्याचे स्नान झाले. तो पाण्यातून बाहेर आला, त्यावेळी मनस्वी आनंदी होता. यापूर्वी असा आनंद त्याने कधी अनुभवला नव्हता. पण स्नान केल्यामुळे त्याला समाधान झाले नाही किंवा त्याच्या आध्यात्मिक उंचीत वाढ झाली नाही. त्याने सुमारे तीस वेळा संगमात बुडी घेतली. एक बुडी घेतली तर मुक्ती

मिळते, तर मग समाधान व आनंद किती वेळा मिळावयास पाहिजे? पण इथे तर याला मुक्तीचे समाधान किंवा आनंद मिळाला नाही; पण वडिलांकडून मात्र अपमान आणि अपशब्द ऐकावे लागले. *वासुदेवाच्या मनाने मात्र पक्के घेतले, की दुसरीकडे कुठेतरी त्रिवेणी संगम असला पाहिजे.* हा तो संगम - तीन नद्या अलाहाबादला एकत्र आल्याचा नसावा. त्याबद्दल तुलसीदासाने कष्ट घेतले आहेत. मग संगम नेमका कुठे आहे? त्याचा शोध घ्यावा असेच वासुदेवाने ठरवले. त्या संगमातच पवित्र स्नान करावे, मग काय होईल ते होवो !

नाराज होऊनच, पण मनाशी निश्चय करून वासुदेव आपल्या वडिलांबरोबर अलाहाबाद जिल्ह्यातील-भेजा तालुक्यातील सेमरिहा खेड्यात गेला. इथे त्यांनी एक आठवडा नातेवाईकांच्या गाठीभेटी घेण्यात घालवला. रामेश्वरजींना स्वत:चे रहाण्याचे ठिकाण ठरवण्यापूर्वी नातेवाईकांना भेटावयाचे होते, म्हणून ते सेवाई, मुझा-नागेसर आणि नंतर कालुपूर या त्यांच्या वाडवडिलांच्या गावी गेले. अखेर रामेश्वरजीने सेवाई येथे स्वत:चे घर बांधले आणि तिथेच खेडेगावी राहण्याचे ठरवले.

काही महिने लोटले. वासुदेव बारा वर्षांचा झाला. ते १९२० साल होते. उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळा कॉलेजेस् सुरू झाली. वासुदेवाला त्याच्या वयाच्या बरोबरच्या मुलांबरोबर शाळेत जावेसे वाटू लागले. त्याने वडिलांना शाळेत घालण्यासंबंधी विनंती केली. रामेश्वरजींनी मात्र नकार दिला. *त्याऐवजी त्याला शेतात कामास व गुरे राखण्यास पाठवले*, यामुळे वासुदेव अस्वस्थ होत होता. त्याला तर शिकावेसे वाटत होते. इतर विषयांबरोबर *त्याला संस्कृत शिकावेसे वाटे. ती भाषा पवित्र आहे - वेद, उपनिषद् व श्रीमद्‌भगवत्‌गीतेसारखे पवित्र ग्रंथ या भाषेत हिंदुस्थानात आहेत, म्हणून ती भाषा शिकावीशी वाटली. ही भाषा जर शिकलो नाही तर आपल्याला पवित्र ग्रंथ मुळात अभ्यासता येणार नाहीत. त्याचा अर्थ व शास्त्रवचन समजून घेता येणार नाही.* जॉर्ज टाऊनमध्ये लहान असताना, आजोळी असल्यापासूनच त्याची ही तीव्र इच्छा होती. त्या वयातही तो या पवित्र ग्रंथांचे पठण ऐकत असे. आपल्याला कळून आले आहेच, की वासुदेवाला या देशातील महाभारत, रामायण या ग्रंथांतील वीर पुरुषांचे अद्‌भुत आकर्षण सुरुवातीपासून होते. त्या ओढीने तो हिंदुस्थानात आला. कारण इथे पवित्र स्थाने, क्षेत्रे आहेत, म्हणून वासुदेव वडिलांना वारंवार

विनम्रपणे सांगे, की मला बनारसला पाठवा. असे सांगताना त्याच्या डोळ्यात अश्रू येत. कारण तिथे त्याला संस्कृत व वेद शिकता येईल. बनारसमधील संस्थानांत गरजू व कामसू विद्यार्थ्यांना अन्न, वस्त्र, निवारा व शिकविण्याची सोय होती, म्हणून वडिलांनी आपल्याला बनारसला घेऊन जावे व तिथेच सोडावे, असे वासुदेवाला वाटत होते. वडिलांकडून त्याला आर्थिक मदत नको होती. पण वडील मात्र या विचारावर रागावले. त्यांनी वासुदेवाच्या पाठीवर छत्रीने पाच-सहा वेळा मारले आणि शेवटचे सांगितले, की येथून पुढे शिकण्यासंबंधी एकदाही बोलू नकोस. रामेश्वरजींनी ही गोष्ट सहानुभूतीने किंवा दयेने पाहिली नाही. कारण ह्या मुलाकरिता त्यांना साऊथ अमेरिकेतील भरभराटीचा उद्योग व श्रीमंतीचे जीवन टाकून अगदी खेडेगावी जीवन जगावे लागत होते.

वासुदेवाला जे हवे होते, ते तो वडिलांच्या आदेशाखाली शिकला; पण कोणा पंडिताकडून नाही. शेतात गुरेढोरे, म्हशी यांची राखण करूनही तो काही शिकला.

पुढील तीन वर्षं वासुदेवाने शेतातच काम करून आणि गुरांची निगा राखून काढली. *शेतात तो आपल्याबरोबर कोणाला नकळत पुस्तके - रामायण, महाभारत, गीता, सूरदास इ. जी ब्राह्मणांच्या घरी असत ती नेई.* अवतीभोवती गुरे चरत असताना तो ती पुस्तके झाडाखाली बसून वाची व त्यावर मनन करी. योगायोगाने एके दिवशी *महाराष्ट्रातील एक थोर संत रामदासस्वामी यांचे चरित्र त्याच्या हाती पडले.* ते त्याने अधाशीपणे वाचले. त्यावरून त्याने लक्षात घेतले, की लग्नमंडपातून रामदास कसे पळून गेले, कारण त्यांना लौकिकदृष्ट्या बंधनात पडावयाचे नव्हते. *ह्यावरून वासुदेवाला दृष्टी मिळाली, की आपणही लौकिक व्यवहारापासून अलिप्त रहावे, त्याकरिता आपणही रामदासांप्रमाणे उच्च आध्यात्मिक साधना करावी, अशी त्यांना तीव्र इच्छा झाली.*

रामेश्वरजींना मात्र आपल्या मुलाच्या तथाकथित आध्यात्मिक साधनेबद्दल सहानुभूती नव्हती. यावेळी वासुदेवाचे पंधरा वय झाले होते. खेडेगावच्या रीतिरिवाजानुसार त्याचे हे लग्नाचे वय होते. म्हणून रामेश्वरजींना वाटले, की लहान सुंदर मुलीच्या सहवासाने आणि साहचर्याने वासुदेवाचे गूढविषयीचे वेड जाईल. ह्या विचाराने त्याला न विचारताच, त्यांनी त्याचे लग्न ठरवले.

लग्नसमारंभाकरिता लागणाऱ्या वस्तूंची त्यांनी जुळवाजुळव सुरू केली. कारण एक महिन्याचे आत लग्न करावयाचे होते. लग्नाची गोष्ट जेव्हा वासुदेवाला कळली, तेव्हा लग्न करण्यास त्याने स्पष्ट नकार दिला. तो आपल्या विचाराशी पक्का होता. यावेळी तो वडिलांच्या रागाला, क्रोधाला तोंड देण्यास तयार होता. हिंदुस्थानात तो केवळ एका स्त्रीच्या बंधनात - घोरपड बांधून घेण्याकरिता आला नव्हता.

जणू दैवानेच धावून यावे, तसे झाले. रामेश्वरजी एकाएकी महिन्याचे आतच स्वर्गवासी झाले.

वासुदेव अगदी लहान वयातच पोरका झाला. त्याला मोठा धक्काच बसला. त्याच्या दुःखाला परिसीमा नव्हती. दीर्घकाळ त्याला दुःख होत होते. त्याच्या डोळ्यांतून अश्रू वहात होते. अगदी प्रेमाने आणि भक्तीने त्याने आपल्या मृत वडिलांचे शेवटचे विधी केले. आपल्या पूज्य वडिलांचे दुःखद निधन झाल्यापासून तीन दिवस तो अन्नपाणी न घेता सतत रडत होता. काही दिवस गेल्यावर त्याने स्वतःला या आघातातून सावरले. जमीनजुमल्यावरील आपला अधिकार सोडून तो सावत्र आईला दिला व घर सोडून निघून गेला. बऱ्याच वर्षांनी तो पुनः त्या गावी आला.

आता वासुदेव हा आपल्या दैवाचा शिल्पकार होता. *संस्कृत भाषा शिकण्याची त्याला बालपणापासून तीव्र ओढ होती. त्याला विविध प्रसंगी गूढ संवेदना कशा होत होत्या, हे आपण वर पाहिलेच आहे. आपल्याला आलेल्या अनुभवाची सत्यता शास्त्राधारे तपासून पहाण्यास तो फार उत्सुक होता.* वासुदेवाने आता सेवाई सोडले आणि तो कालुपूरगावी आला. ह्या खेड्यात त्याच्या वडिलांचे नातेवाईक होते. इथे तो आपल्या आत्याजवळ - सुदानियाजवळ राहू लागला. ही आत्या त्याला प्रेमाने वागवीत असे. कालुपूरजवळील बरोवर खेड्यात एक विद्वान ब्राह्मण पंडित-रघुवीर प्रसाद मिश्रा रहात होते. हे वासुदेवाच्या आत्याचेही कुलगुरू होते. ह्या पंडिताने गायत्री पुरःश्चरण केले होते, अशी त्यांची ख्याती होती. वासुदेव पंडित मिश्राकडे संस्कृत शिक्षणाकरिता गेला; पण पंडितजींनी त्याला संस्कृत शिकवण्याचे कबूल केले का? वासुदेवाने तशी विनंती केली. कारण पंडितजींच्या हाताखाली इतरही विद्यार्थी शिकत होते. पंडित मिश्रा तसे करणार नव्हते. कारण ते सनातनी आणि कर्मठ ब्राह्मण

असल्यामुळे वेदातील पवित्र मंत्र कसे शिकवणार? *पंडितजींच्या मताप्रमाणे वासुदेव जन्माने ब्राह्मण होता, तरी तो शूद्र होता. कारण त्याचा जन्म समुद्रापलीकडील देशात झाला होता* आणि समुद्रपर्यटन करून तो हिंदुस्थानात आला होता. जर शूद्राला वेदातील पवित्र सूत्र शिकवले तर ते फार मोठे पाप होणार होते. तरीपण पंडितजी याबाबत एक सवलत देणार होते - वासुदेवाने पंडितजी व विद्यार्थ्यांपासून काही अंतरावर बसावे आणि ऐकावे. त्यावरून धडे शिकावे. अशा प्रकारे वासुदेव शिकला तर पंडितजींना त्याचे पाप लागणार नव्हते. अशा प्रकारची व्यवस्था वासुदेवाच्या संस्कृत अध्ययनाचे आड येणार नव्हती. सहा महिन्यांतच, पंडित मिश्रांना दिसून आले, की *वासुदेवाने -ज्याला शूद्र म्हणून दूर ठेवले होते- चांगले अध्ययन केले आहे, हे इतर शुद्ध ब्राह्मण स्नातकांपेक्षाही अधिक चांगले होते.*

वासुदेव आता सोळा वर्षांचा झाला होता. त्याची आत्या आणि इतर नातेवाईक, त्याने लग्न करावे म्हणून त्याची मनधरणी करीत होते. *इंदिरासा नावाची जेमतेम सहा वर्षांची वधू त्याच्याकरिता निवडली होती. कुलगुरू पंडित मिश्राने वासुदेवाच्या मनावर ठसवले, की लग्न हे त्याच्या आध्यात्मिक साधनेचे आड येणार नाही.* आता जरी त्याने लग्न केले तरी, दहा ते बारा वर्षांचा काळ ही मुलगी वयात येईपर्यंत त्याच्या हाती आहे. हा काळ आध्यात्मिक साधनेत घालवता येईल. वासुदेवाला मनापासून पटले नसले तरी; तो लग्नाला तयार झाला. थोड्याच दिवसांत त्याचे लग्न झाले.

लग्नानंतर एका आठवड्यातच वासुदेवाने आपले गाव परमेश्वराचे शोधार्थ सोडले.

॥ ॐ ॥

जनीं सर्वसुखी असा कोण आहे । विचारे मना तूंचि शोधूनि पाहें ।
मना त्वांचि रे पूर्वसंचित केलें । तया सारिखें भोगणें प्राप्त जालें ॥

*- कांहीं सुखें व कांहीं दुःखें अपरिहार्य म्हणून भोगावींच लागतात संचिताप्रमाणें आपल्या वाट्याला येणारी दुःखे भोगल्याशिवाय काही सुटका नाही, असा विचार करून धैर्याने त्यांना तोंड द्यावे.*

***- मनोबोध (समर्थ रामदास)***

# ३

# परमेश्वराचे शोधार्थ

लग्नाचे वेळी वासुदेव सोळा वर्षांचा होता. त्याने आपले घर सोडले. तो आपल्या पत्नीबरोबर मधुमीलनाकरिता निघाला नव्हता.

आपण कोठून कोठे चालतो आहोत? त्याने प्रवासात बरोबर जे साहित्य घेतले त्यात एक लोटा, धोतराची जोडी, शाल (अनेक प्रकारे उपयोगात येईल असा लोटा) आणि थोडेसे पैसे. *तो गुरूच्या शोधार्थ जात होता. जो गुरू त्याला देवदर्शन घडवू शकेल, अशा गुरूकडे तो जात होता !*

पण कुठे जावे हे ठरवणे तितकेसे सोपे नव्हते. त्याला एवढे आठवत होते, की त्याचे एक काका - पंडित परमसुखजी पांडे हे एका पसान येथील गोंड राजाचे घरी उपाध्याय म्हणून काम करीत होते. स्टेशनपासून हे गाव मध्यप्रदेशातील बन प्रदेशात पेंड्रारोडपासून सुमारे एकवीस मैल आत होते. वासुदेवाने ह्या काकाकडे जावयाचे ठरवले. त्याला वाटले, कदाचित ह्या काकाकडून आपल्याला मदत होईल. पसान गावी पोचल्यावर त्याला कळले, की त्याचे काका राजाबरोबर यात्रेकरिता मातीन येथे प्रवासास गेले आहेत. त्यांच्या काकाचे एक शिष्य-व्यवसायाने ते सुतार होते - त्यांनी- त्याला अन्नपाणी आणि आसरा दिला.

काही दिवस लोटले. तरीही काका प्रवासातून परत आले नव्हते. एकदा बनवासू आहेर गवळी हे पसान येथे पंडित परमसुखजींच्याकडे मदतीकरिता आले. पंडितजी नाहीत म्हणून त्याला वाईट वाटले. पंडित नाहीत, आता कोठे

जावे? काय करावे? हे त्याला कळेना. कोणाकडून प्रश्न सोडवावा? पण बनवासूला सांगण्यात आले, की पंडितजींचा पुतण्या इथे आहे. त्यांनाच आपण आपली व्यथा सांगावी. कदाचित आपल्याला मार्गदर्शन मिळेल.

बनवासूचा प्रश्न असा होता, की त्याच्याजवळ हजारो दुभती जनावरे - गाई, म्हशी आहेत. ही गुरे गाभण राहत असत; पण तीन महिन्यांचे आत त्यांचा गर्भपात होत असे. प्रत्येक दिवशी असे गर्भपात होत. काही दिवस असे घडत राहिले. बनवासू आणि त्याच्या घरातील इतर मंडळी या घटनेमुळे व्यथित झाली. ही गुरे, त्यांचे दूधदुभते हीच बनवासूची उपजीविकेची साधनसंपत्ती होती. काही दुष्ट वाईट शक्ती असे गर्भपात घडवून आणीत असावेत. ज्या ठिकाणी गुरे बांधली जातात, त्या ठिकाणच्या झाडावर हा सैतान असावा. पंडितजींच्या गैरहजेरीत कोणाकडे मदत मिळण्याची शक्यता नव्हती. हा त्यांचा पुतण्या- छोटा पंडित आपल्याबरोबर घेतल्यास, तो त्या दुष्ट सैतानास घालवून देईल का? अशी विचारणा बनवासूंनी केली. पुतण्याने तसा प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. तो त्यांच्याबरोबर सुमारे दहा मैल दूर असलेल्या गावी गेला.

बनवासूच्या गावी गेल्यावर वासुदेवाने एक-दोन दिवस त्या ठिकाणाचे निरीक्षण करण्यात घालवले. नंतर त्याने दुर्गा सप्तशतीचा पाठ सुरू केला. चार दिवसांनंतर गर्भपात थांबले आणि दुष्ट शक्ती एकदाची नाहीशी झाली. *अवघ्या सोळा वर्षांच्या लहान मुलाच्या दृष्टीने ही बाब भूषणावह होती.* ह्या घटनेने सर्व गावकरी एकदम त्यांच्यावर प्रेम करू लागले. त्याला आदराने दैवीकृपा प्राप्त असलेला म्हणून ग्रामस्थ ओळखू लागले. ही आश्चर्यकारक बातमी सर्वत्र पसरली. त्यावेळेपर्यंत वासुदेवांचे काका परगावाहून परत आले हाते. पुतण्याची किमया काकाचे कानावर गेली. काकाजवळ राऊत बनवासू अहिरे यांनी आग्रह धरला, की हा तरुण- ज्याने त्याला संकटातून वाचवले- तो काही दिवस येथे रहावा. वासुदेवाने तिथे सहा महिने बनवासूबरोबर वास्तव्य केले. त्याच वेळी वासुदेवाने आपली साधनाही चालू ठेवली. होळीचा सण आला. परमसुखजीकाका वासुदेवाने होळीकरिता आपल्या कालुपुराचेजवळ असलेल्या गावी यावे, म्हणून आग्रह करू लागले. थोड्याशा नाखुषीने वासुदेव काकाबरोबर गेला.

सण साजरा झाला. पसान गावी वासुदेव परत गेला नाही. आता त्याचा प्रवास महाराष्ट्रातील शेगाव रेल्वे स्टेशनपासून सुमारे पस्तीस मैल दूर असलेल्या

दानापूर गावाकडे चालू होता. इथे त्याचे दुसरे काका नोकरी करीत होते. सुमारे पंधरा दिवस त्याने इथे काकांकडे पाहुणचार घेतला. येथून तो तडक बाहेर पडला. *व्यापक जगात, सद्‌गुरूंच्या शोधार्थ जो त्याच्या इच्छा पूर्ण करील, अशा गुरूच्या शोधार्थ...*

आता वासुदेवाचे भ्रमण पश्चिम महाराष्ट्रात सुरू झाले. तो सतत चालत असे. थकल्यानंतर गर्द छाया असलेल्या झाडाखाली विश्रांती घेई.

आपण बंधनातून पूर्ण मोकळे आहोत अशी त्याची भावना होती. चंडोल पक्षासारखे हिंडणे ध्यान-साधना करणे आणि भ्रमण करणे हेच त्याचे लक्ष्य होते. कोणी धान्य दिल्यास ते तो शिजवून खात असे. शिजवलेले अन्न तो घेत नसे. भिक्षा कधी मागितली नाही किंवा कोणाच्या आश्रयाला गेला नाही. जर एखादे दिवशी त्याला अन्न मिळाले नाही, तर तो उपवास करी. *बऱ्याचवेळा त्याने आपली तहान-भूक ही फळांवर, तृणावर, झाडपाल्यावर भागवली. तसेच रस्त्याचे बाजूने वहात जाणारे पाणी, ओहोळ, निर्झर, विहीर यांचा तो उपयोग करी.* रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडाशी किंवा देवळात तो विश्रांती घेई. पावसाळ्यात मात्र जर कोणी आसरा दिला तर तेथे राहात असे. पण तशी गरज संपली की तो निघून जाई. अशा प्रकारे फिरता फिरता तो भुसावळला आला. येथून त्याने आगगाडीने प्रवास केला. तो भडोचला पोचला आणि पुढे सुरतला गेला. आनंद, गोध्रा, गुजराथमधील इतर काही ठिकाणे पाहून पुढे राजस्थानमध्ये आला. आगगाडीनेच त्याने सतत प्रवास केला. बऱ्याच तिकिट तपासनिसांनी व गाडीच्या गार्डने त्याला सोबत केली. *ह्या सर्व ठिकाणी वासुदेव हिंदुस्थानातील पवित्र ऋषिमुनींचा शोध घेत होता. अनेक साधुसंत, महंत आणि वैदिक पंडितांना तो भेटला. धर्मशास्त्रावरचे दीर्घ प्रबंध, त्यावरील व्याख्याने याबाबत त्याने ऐकले होते. त्याची बालपणापासून त्याला ओढ होती. त्याला आध्यात्मिक अनुभव किंवा खऱ्याखुऱ्या सत्पुरुषाची ओळख मात्र अद्याप झाली नव्हती. याबाबत तो तितकासा भाग्यवान नव्हता. त्या मार्गातील इतर साधकांनाही तसा अनुभव आलेला नव्हता. अशा व्यावसायिक साधकाकडून त्याला आदेश मिळाला, की "जा. अमुक अमुक पुस्तक वाच, ही पवित्र देवांची नावे म्हण." इ.*

वासुदेव मात्र कठोर निश्चयाने पुढे गेला. काठेवाड, सुरत, विरमगाव,

भुसावळ आणि शेगाव करीत करीत तो वारी या महाराष्ट्रातील गावी आला. इथे हनुमानाचे एक मंदिर होते. ते ''वारीका हनुमान'' म्हणून ओळखले जात होते. ह्या मंदिराला लागून एक मठ होता. त्याची व्यवस्था महंत दासबाबा पहात होते. इथेच ह्या तरुण साधकाने काही दिवस ध्यानमग्नतेत घालवले. इथे तो स्वत: कडक शिस्तीत वागत असे. त्याची तीव्र भक्तिसाधना, अलिप्तता, सत्याचा शोध घेण्याचा संकल्प - हे सगळे दासबाबाने पाहिले. ह्याला आपण कालांतराने शिष्य करून आपला वारस म्हणून नेमावा, असा विचार त्याच्या मनात आला. एके दिवशी वासुदेवाला महंताने तसे सांगितलेही. वासुदेवाला मात्र सत्ता, मान व वैभव नको होते. त्याच रात्री महंत झोपी गेल्यावर तो तिथून निसटला. वासुदेव अशा प्रकारे निघून गेल्याचे कळल्यावर मात्र महंतबाबा निराश झाले. त्यांना वासुदेवाची योग्यता माहिती होती, म्हणून त्याने आपली शेवटची इच्छा व आज्ञा म्हणून वासुदेवाला, त्याच्यानंतर महंत म्हणून वारस नेमावे असे ठरवले. त्यानंतर मात्र दासबाबा फार दिवस राहिले नाहीत. परंतु त्यांचे इच्छापत्र शेठ जोखीराम, शेठ छोटालाल व सौंदलाल गावचे शेठ श्रीराम यांच्या अधिकारात राहिले.

वासुदेवाला श्री दासबाबाचे वारसदार म्हणून नेमले जाण्यापूर्वीच तेथून तो निसटला होता. तो सुरजी अंजनगाव येथे आला. त्याच्याजवळ पैसे नव्हते, खावयास अन्नही नव्हते. त्याने वनस्पती खाऊन दिवस काढले. इथे मात्र त्याने रोजगार मिळविण्याचा प्रयत्न केला. तसे कामही त्याला एका जिंनिंग फॅक्टरीत मिळाले. महिन्याला मजुरी फक्त रु. पाच व दोन वेळचे जेवण. तरुण एडिसन न्यूयार्क येथे गोल्ड टिकर कंपनीत जसा व्यवस्थापकांचे नजरेस आला, तसाच हा तरुण फिरस्ता व्यवस्थापकाच्या नजरेस आला.

एक दिवस फॅक्टरीतील ऑईल इंजिन बंद पडले. चालू केले की थोडा वेळ चाले आणि पुन्हा बंद पडे. श्रीराम आष्टीकर, फॅक्टरीचे इंजिनिअर हे रजेवर होते. तेल घालणाऱ्याने दोष शोधण्याचा पुष्कळ प्रयत्न करून पाहिला; पण त्याला तो दोष सापडला नाही. आमचा हा तरुण साधक हे पहात होता. त्याने सुचवले, की इंजिनची गव्हर्नर बॉक्स उघडून तपासून पहा. हा एवढा भाग तपासायचा राहिला होता. तेल घालणाऱ्या माणसाने गव्हर्नर बॉक्स उघडली आणि इथेच दोष होता. तो दोष दूर करण्यास त्याला वेळ लागला नाही.

श्री. आष्टीकर रजेहून आल्यावर त्यांना ही घटना ऑईल घालणाऱ्या माणसाने सांगितली. हे ऐकून इंजिनिअर आष्टीकर खुष झाले. ही गोष्ट त्यांनी मॅनेजर शामराव तालोकर यांच्या नजरेस आणली. त्यांनी लगेच वासुदेवाला रु. पाच महिना वाढ दिली. त्याला शिकवून इंजिनिअर करावेसे आष्टीकरांना वाटले. परंतु वासुदेवाला ही कल्पना पसंत पडली नाही. कारण पैसा किंवा स्वार्थपरायण जीवन हे त्याच्या शोधाचे लक्ष्य नव्हते. *भौतिक साधनसंपत्तीचे सुख जर त्याला हवे होते, ते तर त्याच्याजवळ मूळ गावी जॉर्ज टाऊन येथे होतेच. त्याचाच त्याने त्याग केला होता.* जिनिंग फॅक्टरीचा मोसम संपत आला होता. सुरजी अंजनगाव येथे रामलीला कंपनी आली होती. ही कंपनी गावोगाव जाऊन धार्मिक -विशेषत: रामलीलाचे-कार्यक्रम करीत असे. वासुदेवाने ह्या कंपनीत प्रवेश मिळवला. इथे काही वर्षं नाटक कंपनीच्या वातावरणात घालवली. ह्या कंपनीतसुद्धा त्याने स्वत:चे अन्न स्वत:च शिजवण्याचे काम चालू ठेवले. त्याची आध्यात्मिक साधनाही थांबली नव्हती. इथे आणखी एक उपक्रम त्याने सुरू केला- शरीरसंपदा कमविण्याचा. उत्तम शरीरसौष्ठव हे रंगभूमीवर काम करणारास लाभदायकच ठरते. निरनिराळ्या ठिकाणी प्रयोग करून रामलीला कंपनी नागपूरला आली. तिचा मुक्काम भंडारा रोडवर एका जुन्या घरात होता. ह्या घराला मोठे कुंपण होते. कुंपणाच्या आत तीन लहान देवळे होती. दोन देवळे तर अगदी लहान म्हणजे - तेथे कोणालाही प्रवेश करता येत नव्हता. तिसरे देऊळ थोडेसे मोठे होते. एखादा माणूस आत बसू शकत होता. हे देऊळ भगवान शंकराचे होते. त्याच नावाने ते ओळखले जात होते. *इथे फिरस्ता- वासुदेवाला आणि आता रामलीलेतील एक नट -आध्यात्मिक दृष्टी प्राप्त झाली. भटकंती करायला लागल्यापासून प्रथमच आलेला हा उत्कट अनुभव. त्याचा प्रभाव वासुदेवावर फार पडला. हा अनुभव असा होता :*

हे वर्ष होते १९३०. वासुदेवाचे वय बावीस होते. उन्हाळा संपत आला होता. पाऊस केव्हाही येण्याचा संभव होता. नाटक कंपनी ह्या वेळेस इतवारी भागात रामलीलेचे प्रयोग करीत होती. दिवसाचे नाट्यप्रयोग संपले. एके रात्री नाटक कंपनीतील लोक विश्रांती घेऊन झोपी गेले. काही घरांच्या व्हारांड्यावर तर काही घरात झोपले. *वासुदेवाने शंकराच्या मंदिरातील चबुतरा विश्रांतीसाठी व ध्यानधारणेसाठी निवडला. मध्यरात्रीची वेळ, एक वाजण्याचा सुमार होता.*

वासुदेव ध्यानधारणा सुरू करणार होता, तोच एका माणसाच्या आगमनाकडे त्याचे लक्ष वेधले गेले. त्याला एक सुंदर, तेजस्वी, सुमारे सात फूट उंचीची विलक्षण दिव्य तेज असलेली आकृती प्रवेशद्वारातून शंकराच्या मंदिराकडे येत असलेली दिसली. तीस-पस्तीस वय, सुंदर कुरळे केस. हीच ती दिव्य व्यक्ती- जी वासुदेवाने बालवयात सोफ्यावर बसलेली, जॉर्ज टाऊन येथील त्याच्या आजोबांच्या निजावयाच्या खोलीत पाहिली होती! वासुदेव अधीरतेने व्हरांड्यात आला. त्याने मुंगीलालना - हार्मोनियम वादक - घाईघाईने उठवले आणि सांगितले - लवकर ऊठ, पहा शंकरमंदिराकडे. तुला देवाचे दर्शन पाहिजे ना? मुंगीलाल घाईघाईने उठला. बाहेर पहाण्याचा त्याने प्रयत्न केला; पण त्या प्रयत्नात त्याचे डोके भिंतीवर आपटले. तो डोळे मिटून खाली पडला. मुंगीलालला कळले की, आपली दृष्टी गेली आहे. तो तक्रार करू लागला, "मला तू का उठवलेस? मी दुर्दैवी, पातकी आहे. दिव्य पुरुषाचे दर्शन हे माझ्यासारख्या पातकी लोकांना मिळत नसते." मुंगीलाल आपल्या नशिबाला दोष देत राहिला. सकाळ होताच त्याला दृष्टी प्राप्त झाली.

सुमारे सहा महिने रामलीला कंपनी नागपुरात होती. नंतर ती पुढील मुक्कामास निघाली. ह्या वेळेला कंपनीने पांढुर्णा, मुलताई, बेतुल, कटोल, वर्धा, आरवी मुळगाव, मोर्शी या ठिकाणी रामलीलाचे प्रयोग केले. पुढे ती वरुड गावी आली. वासुदेवाला वरुड या गावी दोन संस्मरणीय अनुभव आले. एक उच्च आध्यात्मिक आणि दुसरा नेहेमीच्याच जीवनातील. त्याचा थोडक्यात वृत्तांत असा -

वासुदेव त्याच्या मित्रांबरोबर उघड्यावर झोपला होता. पहाटेची वेळ. सूर्योदय व्हावयाचा होता. मुंगीलाल उठले. घरात गेले. वासुदेव जागा होता, तरी अंथरुणावर पडूनच तो पूर्वेकडे आकाशात पहात होता. तो आश्चर्यचकित झाला. त्याने चंद्राचा मोठासा आकार -चाळीस फूट व्यासाचा- पूर्वेकडे उगवताना पाहिला. त्याला मोठा अचंबा वाटला. ह्या वेळेस चंद्र पूर्वेकडे कसा? म्हणून त्याने विरुद्ध दिशेस पाहिले. तो त्याला आश्चर्य वाटणारे दृश्य दिसले. दुसरा चंद्र तितकाच मोठा आणि भव्य, प्रकाशमान पश्चिमेकडे दिसला. त्याने पुन्हा पूर्वेकडे पाहिले. पूर्वेकडील चंद्र त्यांच्या बाजूने येत आहे, असे दिसले. त्या दृश्याने तो आश्चर्यचकित झाला. चंद्र त्याच्यापासून शंभर फुटांवर आला आणि थांबला.

*चंद्राच्या आतील गोलाकार भागात एक आकृती दिसत होती. शांत आणि प्रसन्न प्रभा सर्वत्र त्याच्या परीघातून येत होती. आत सुवर्णमंचकावर प्रभू श्रीरामचंद्र व डावीकडे सीतामाई बसलेली. वसिष्ठ गुरू उजवीकडे. भक्तांना प्रभू श्रीरामचंद्रांनी आशीर्वाद दिले. जरा वेळाने चंद्र पुन्हा दूर जाऊ लागला. तो त्याच्या माथ्यावर आला, उत्तरेकडे सरकला आणि हळूहळू अस्तंगत झाला.*

परमेश्वर त्याच्या भक्तांना अंतर देत नाही. त्यांच्या अडचणीच्या वेळेला कुठून तरी अनपेक्षितपणे मदत येते आणि अटळ मार्ग भक्तांना दाखवले जातात. वासुदेव या भक्ताला, शोधकाला असे पुष्कळ अनुभव आले. वरुड येथे अशीच मदत वासुदेवाला मिळाली. त्यावेळी वासुदेवाला तशी गरजही होती.

वरुडमध्ये असताना वासुदेवाला हगवणीचा त्रास झाला. त्याला सतत पातळ शौचास होत होते. थोड्याच अवधीत त्रास वाढला. तो परसाकडेला सतत जाऊ लागला. अशाप्रकारे दोन दिवस गेले. त्यामुळे त्याची शारीरिक स्थिती खालावली. तो उभासुद्धा राहू शकेना. आहे त्या सर्व शक्तीनिशी तो सरपटत एका मोठ्या घरात कसाबसा आला. त्या घराला कुंपण होते; पण ते ठिकठिकाणी मोडलेले होते. ते घर नदीजवळ, लोकवस्तीपासून दूर होते. इथे तो जमिनीवर पडून होता. तो अशक्त झाला होता, त्यामुळे उभा राहू किंवा चालू शकत नव्हता. त्याची स्थिती अधिक बिकट झाली. पाणी पडावे तसे त्याला अधिकच जुलाब होत होते. एक सबंध दिवस व रात्र निभावली; पण कुणीही त्याला मदत करावयास तिथे नव्हते. रामलीला कंपनीतील त्याच्या सहकाऱ्यांना तो कोठे गेला हे माहीत नव्हते. दुसऱ्या दिवशी सुमारे चार वाजता एक चोवीस वर्षांचा तरुण ह्या कुंपणामध्ये आला. तो गुराख्यासारखा दिसत होता. त्याच्या डोक्याला मुंडासे आणि हातात एक काठी होती. वासुदेवाच्या जवळ तो आला आणि म्हणाला, ''महाराज, तुम्ही अशा अवस्थेत कसे पडला आहात? आता उठा.'' वासुदेवाने क्षीण आवाजात आपली स्थिती सांगितली. हे ऐकताच गुराख्याने आपल्या डोक्याचे पागोटे काढले. त्याचे एक टोक खांबाला बांधले. वासुदेवाला उभे राहण्यास मदत केली. मग त्याच्या पोटाला पागोटे गुंडाळले आणि दुसरे टोक धरून ठेवले. गुराखी जरा बाजूला झाला. त्याने वासुदेवाला सहानुभूतीने सांगितले, 'पागोट्याच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फिर म्हणजे पागोटे पोटाभोवती गुंडाळले जाईल -तार जशी गुंडाळतात तसे - तू बरा

होशील.'

पोटात हालचाल होऊ लागल्याबरोबर हगवण बरी होईल. तसा हा उपचार विचित्रच होता. वासुदेव अशक्त झाला होता. मानसिकदृष्ट्या तो विमनस्क झाला; पण त्याने तसे करायचे ठरवले. थोडा वेळ त्याने स्वत:ला गुंडाळून पाहिले. दुखणे कमी होऊ लागले. त्याने सुटकेचा नि:श्वास सोडला. थोड्याच वेळात त्याला पुन्हा शक्ती येऊ लागली. ''तू आता ठीक आहेस, तुझ्या ठिकाणी तू परत जा.'' असे तो गुराखी पागोटे गुंडाळीत म्हणाला. तो कुंपणाकडे चालत गेला आणि पुन्हा दिसेनासा झाला. त्यानंतर मात्र वासुदेवाला पुन्हा कधीही हगवणीचा त्रास झाला नाही.

रामलीला कंपनीने वरुड गाव सोडले. नंतर अमरावती, यवतमाळ, पुसद करीत कंपनी अकोल्याला आली. खोलेश्वर भागातील राममंदिराजवळ रामलीला कंपनीचा मुक्काम होता. तिथेच तिचे खेळ होत होते. इथे कंपनीच्या मुक्कामाच्या काळात वासुदेव एका प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य (डॉ.) नंदलाल भारती यांच्या संपर्कात आला. ही प्रासंगिक भेट पुढे दीर्घकाळ आणि अगदी जवळची अशी ठरली. ह्या संदर्भातला काही भाग पुढे पाहू. पहिली भेटच मोठी उत्साहवर्धक होती.

एक दिवस डॉ. भारतींनी संगीताचा कार्यक्रम योजला होता. नियोजित जागा होती, देवळाचा पहिला मजला. डॉ. भारतींचे निकटवर्ती असे सात-आठ श्रोते होते. वासुदेव संगीताचा भोक्ता होताच आणि त्या दिवशी त्याला वेळही होता. आपणही संगीताचा आस्वाद घ्यावा, असे त्याला वाटले, म्हणून तो जिन्यात जाऊन बसला. मध्यंतरात डॉ. भारतींनी चहाची व्यवस्था केली होती. पण पान व सिगरेटची व्यवस्था केली नव्हती. नानुराम मिश्री नावाचे एक डॉ. भारतींचे जवळचे मित्र पान आणि सिगारेट न आणल्याबद्दल कुरकुरू लागले. हे पाहताच डॉ. भारती बाहेर आले. 'कोणीतरी पान सिगारेट आणील का?' त्यांनी कोणीतरी अनोळखी माणूस जिन्यात बसलेला पाहिला. डॉक्टरांनी त्याला 'पान-सिगारेट आणशील का?' म्हणून विचारले. वासुदेवाने लगेच त्या वस्तू आणल्या. मध्यंतरात अजून काही श्रोते आले. त्यामुळे वासुदेवाने आणलेले पान-सिगारेट कमी पडले. नानुराम मिश्रांनी डॉक्टरांच्या कंजुषपणाबद्दल उपरोधाने बोलू लागले. डॉ. भारती गप्प बसले.

डॉ. भारतींनी किती सिगारेट व पान आणावेत हे सांगितले नव्हते. हॉलमध्ये जेवढे लोक होते, तेवढ्याकरिता पान-सिगारेट आणले होते; पण अनपेक्षितपणे प्रश्न निर्माण झाला तो अधिक लोक मध्यंतरात आल्यामुळे. त्यामुळे वासुदेवाचे डोळ्यात पाणी आले. तो जोरात रडू लागला. डॉ. भारती तिथे आले. त्यांनी त्याच्या पाठीवर थोपटले. त्याचे सांत्वन केले. डॉक्टरांनी रडण्याचे कारण विचारले. वासुदेवाने खुलासा केल्यावर डॉक्टर व्यथित झाले. कार्यक्रम संपेपर्यंत त्यांनी वासुदेवाला आपल्याजवळ बसवून घेतले.

कार्यक्रम संपल्यावर डॉ. भारतींना ह्या पाहुण्या तरुणाची माहिती पाहिजे होती. ''तुम्हाला तपशील कसा पाहिजे? खरा की खोटा?'' असा वासुदेवाने प्रतिप्रश्न केला. ह्या प्रश्नामुळे डॉक्टरांना अचंबा वाटला. त्यांना खरीखुरी माहिती हवी होती. वासुदेवाने सगळी कथा तपशीलवार, ब्रिटिश गियानामध्ये जन्म झाल्यापासून तो थेट अकोल्याला येईपर्यंतची सांगितली. त्याचबरोबर त्याने आपले आध्यात्मिक अनुभव सांगितले. आपण *अशा गुरूच्या शोधात आहोत, की जो मला परमेश्वराचा साक्षात्कार घडवील-तो मला दिव्य अनुभव देईल!*

ह्या तपशीलाने डॉक्टर भारावून गेले. त्यानंतर रामलीला कंपनीच्या मुक्कामात डॉ. भारती व वासुदेव नित्य भेटत असत. डॉ. भारतीने वासुदेवाने आपल्याबरोबर जेवावे असा आग्रह धरला होता. अशा प्रकारे दोघांच्यामधील स्नेह वाढला. एक दिवस डॉ. भारतीनी सांगितले, की वासुदेवाने संस्कृतचा अभ्यास चालू ठेवावा. तसेच पवित्र ग्रंथाचेही मनन करावे. त्याकरिता बनारसला किंवा त्याला योग्य वाटेल अशा ठिकाणी वासुदेवाने जावे. त्याचा सर्व खर्च डॉ. भारती देण्यास तयार होते; पण वासुदेवाने नकार दिला. कारण त्याचे आता पुस्तकी ज्ञानाचे आकर्षण संपले होते. त्यावर डॉ. भारती यांनी विचारले, की 'तू कोणती पुस्तके वाचत आहेस? आणि कोणती उपासना, साधना चालविली आहेस?' त्यावर वासुदेवाने समर्पक उत्तर दिले. *डॉ. भारतींनी मग सांगितले, की ''प्रणव'' (ओंकाराचा मूळ मंत्र) याचे ध्यान कर. वासुदेवाने तसे करण्याचे कबूल केले.*

इथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे, की वासुदेवाने कोणालाही गुरू (मार्गदर्शक) खऱ्याखुऱ्या अर्थाने केले नाही. आतापर्यंत आणि पुढेही. त्याने कधीच कुठल्याही संप्रदायाची दीक्षा घेतली नाही. कारण डॉ. भारतींनी प्रणवाची

उपासना करण्यास सांगितले. त्यांना गुरू म्हणून ते आदराने मानू लागले. तसेच ते डॉ. भारतींना स्वामीजी म्हणून संबोधू लागले.

स्वामीजींना (डॉ. भारती) वासुदेवाने आपल्याजवळ रहावे असे वाटले; पण वासुदेवाने त्यास नकार दिला. कारण त्याचा परमेश्वराचा शोध पुरा व्हावयाचा होता. स्वामीजींनी सांगितले की, ''माझे दार तुम्हाला सतत खुले आहे. ज्या ज्या वेळी तुम्हाला ह्या भटकंतीचा कंटाळा येईल, तेव्हा तुम्ही माझ्याकडे या. मी तुमचे स्वागत करीन. ''

रामलीला कंपनीने अकोला सोडले. वाशिम गावी कार्यक्रम केला. नंतर हिंगोली, नांदेड आणि पुढे हुमनाबाद.

हुमनाबाद येथे वासुदेवाला एक वेगळाच आध्यात्मिक अनुभव आला. त्याने आपल्या वास्तव्याकरिता शिवमंदिर निवडले. मुक्कामाच्या दिवशी भर दुपारी, तो देवळाच्या परिसरातील चबुतऱ्यावर झोप घेऊ लागला. त्यावेळी त्याला एक चमत्कारिक आवाज आला.

''अजमेरचे ख्वाजासाहेब मोइनुद्दिन चिस्ती तुला भेटू इच्छितात.'' दोन सुंदर देवदूत - ज्यांचे वर्णन करणे अशक्य आहे- त्याच्यापुढे येऊन उभे राहिले. त्यांच्या हातात पाळणा होता. तो फुलांनी सुशोभित केलेला होता. त्यांचा मधुर सुगंध वातावरणात सर्वत्र पसरला होता. ''आम्हाला तुला अजमेरला घेऊन जाण्याकरिता इथे पाठवले आहे. यावर वासुदेव गप्प बसला. दूतांनी त्यांचे हात पुढे केले. वासुदेवाला दिसून आले, की आपण पाळण्यात बसलो आहोत आणि तो पाळणा वर जात आहे. उदात्त असे वातावरण निर्माण झाले आहे. वासुदेवाला त्यांनी दूरवर नेले आणि खाली उतरवले. 'इथपर्यंत आम्ही आणू शकलो, असे त्यांनी सांगितले. कारण इथपर्यंत आणण्याचे आमचे काम होते. पुढचा रस्ता दाखवण्याचे काम दुसरे दूत करतील', असे सांगून ते दूत अंतर्धान पावले.

नंतर तिथे चार दूत आले. सुंदर आणि भव्य असा पाळणा त्यांनी उचलला आणि ते वर जाऊ लागले. काही वेळाने ते वालुकामय प्रदेशात उतरले. ''इथली वाळू थोडीशी दूर कर.'' असे ते म्हणाले आणि निघून गेले. वासुदेवाने पायाने वाळू दूर केली आणि दार उघडले. सुंदर आणि प्रकाशमान असा जिना दिसला. तेथे एक वृद्ध फकीर (इमाम) ज्याला ख्वाजासाहेब यांचेकडे

न्यावयाचे काम होते, तो उभा होता. त्या पायऱ्या उतरून ते दिवाणखान्यात आले. तिथे दोन - एक मोठं व एक लहान असे थडगे होते. वासुदेव दिवाणखान्यात हिंडू लागले. एका कोपऱ्यात त्यांना एक लहानसे पाण्याने भरलेले टाके दिसले. त्यात एक चांगला मोठा सोन्याचा तुकडा तळापासून वर येताना आढळला. पृष्ठभागावर आल्यावर त्या तुकड्याने उडी मारली आणि तो बाजूच्या भिंतीवर येऊन बसला. त्याने आवाज ऐकला, ''ते घे. तुझ्याकरिता आहे.'' यावर त्याने प्रत्युत्तर दिले. ''*मी भिकारी नाही. मी इथे सोन्याचा तुकडा घ्यावयास आलो नाही. मला तो नको आहे. तो इतरांना द्या. ज्यांना त्याची गरज आहे.*''

तो पुढे निघाला. पुढच्या कोपऱ्यात त्याने अग्नीच्या ज्वाळा पाहिल्या. त्यातून पुन्हा सुवर्णाचा एक तुकडा उडाला आणि पुन्हा तोच आवाज, ''ते घे. ते तुझ्याकरिता आहे.'' पुन्हा त्याने नाकारले. तिसऱ्या कोपऱ्यात तो गेला. त्याने आवाज ऐकला. ''तुला काय पाहिजे ते माग. ते तुला मिळेल.'' त्याने उत्तर दिले, ''*मी भिकारी नाही. मी स्वतःहून इथे आलो नाही. मला काहीही नको.*''

चवथ्या कोपऱ्यात पुन्हा त्याला सांगितले, ''तुला काय पाहिजे ते माग. ते तुला मिळेल.'' त्याने पुन्हा काहीही मागण्याचे नाकारले आणि तो फकीर जेथे होता, तिकडे वळाला.

''ख्वाजासाहेबांचे दर्शन तुला मिळाले का?'' फकीराने विचारले. वासुदेव म्हणाला, ''तिथे काय पाह्यचे आहे? थडगे?'' ते पाठीमागे वळाले. जिना चढू लागले. ''तू सोने का घेतले नाहीस? तुला नको होते तर तू मला द्यायचे.''

''मी काय म्हणालो हे तू ऐकले आहेस ना? तुला पाहिजे तर स्वतःलाच विचार.'' वासुदेव म्हणाला.

''ये. ख्वाजासाहेब तुझ्याकरिता थांबले आहेत. *तुझ्या निःस्वार्थीपणावर ते खुष आहेत.*'' इमाम फकीर म्हणाला. मग त्याने त्याला पुढील रस्ता दाखवला. जमिनीवर आल्यावर वासुदेवाला दिसून आले, की संगमरवरी चौथरा - भोवती सुंदर फुलांची बाग आहे.

ह्या चौथऱ्यावर एक मनुष्य चादर घेऊन पडला होता. ही आकृती उंचीपुरी आणि तेजस्वी होती. ''*मला वृद्ध माणसाला भेटावयाचे नाही.*'' वासुदेव म्हणाला. ''मला ख्वाजासाहेबांना दर्शन द्यावयाचे असेल तर त्यांनी लहान

मुलाचे स्वरूपात यावे.'' थोड्याच वेळात चादरीच्या आत हालचाल दिसली. सुंदर असे तेजस्वी बालक, कुरळे केस गळ्यापर्यंत आलेले, चादरीच्या बाहेर आले. चौथऱ्यावरून बालकाने उडी मारली. वासुदेवाला त्याने त्याच्या पाठीमागून यावयास सांगितले. नंतर ते बागेकडे गेले. त्याने काही फुले तोडली व वासुदेवाला दिली.

''हे घे.'' तो म्हणाला आणि अदृश्य झाला. नंतर वासुदेवाला सोबत घेऊन पुन्हा हुमनाबादला पाठवले.

ह्या प्रसंगानंतर एक तरुण पठाण त्यांच्याकडे (वासुदेवाकडे) आला. त्याने आपली शेरखान म्हणून ओळख करून दिली. तो म्हणाला, ''तुम्ही त्याच्या आजोबांना भेटावयाचे आहे.'' पण कोणाकडेही जावे असे वासुदेवाला वाटत नव्हते. ''मनात आले तर मी बळजबरीने माझ्या आजोबांकडे नेईन,'' असे शेरखान म्हणाला. वासुदेव अशा प्रकारे होणाऱ्या बळजबरीला तोंड देण्यास तयार होता. तो काही कोणाच्या सांगण्या-सवरण्यावरून ऐकणारा नव्हता. तो पठाण तरुण अडचणीत आला. त्याला प्रश्न पडला. त्याला कळून चुकले, की आपण काहीसे चुकलो.

क्षणभराने शेरखान नम्रतेने म्हणाला, ''माझे आजोबा एकांतात बसले आहेत. ते धार्मिक वृत्तीचे आहेत.''

''काही दिवस ते स्वत:चा शोध घेत आहेत. म्हणून एकांतात वेळ घालवून प्रार्थना व ध्यान करीत आहेत. कुटुंबातील व्यक्तींनासुद्धा आत प्रवेश नाही. त्यांच्या खोलीच्या बाहेर आम्ही अन्न ठेवतो, म्हणून ते तुमच्याकडे येऊ शकत नाहीत. तुम्ही माझ्याबरोबर त्यांना भेटावयास याल का?'' त्याने विचारणा केली.

मग वासुदेव शेरखानबरोबर जावयास निघाला. त्याच्या घराच्या वरच्या मजल्यावर त्या वृद्ध माणसाकडे वासुदेवाला नेले.

ह्या तेजस्वी तरुणाचा प्रवेश झाल्याबरोबर तो वृद्ध पठाण त्याच्याकडे धावत आला. त्याने वासुदेवाला मिठी मारली. त्याच्या हाताचे चुंबन घेतले. त्याला अंथरुणावर बसवून घेतले. भावनाप्रधान होऊन म्हणाला, ''तुझ्यामुळे मी भाग्यवान झालो. कारण ख्वाजासाहेबांचे आज प्रत्यक्ष दर्शन झाले. आज माझ्या आयुष्यातील प्रार्थना व कष्ट यांना फळे आली. तुला खुद्द ख्वाजासाहेबाने

बोलावले. त्याची तुमच्यावर कृपा झाली. तू खरोखर देवदूत आहेस. माझा आनंद ओसंडत आहे - तू भेटल्यामुळे.'' वृद्ध माणसाच्या डोळ्यातून अश्रू ओघळत होते. वृद्ध पठाणाने आपल्या मुलाला व इतर कुटुंबियांना खोलीत बोलावले. वासुदेवाचा परिचय करून दिला. काय घडले ते त्याने सांगितले. तो एकांतात का रहात होता? हे ऐकून ते आश्चर्यचकित झाले. सद्‌गदित झाले. ते सौजन्याने वागू लागले. त्या वृद्धाने दूध, फळे मागविली आणि त्या तरुण योग्याला दिली. तो वृद्ध आणि वासुदेव आता मित्र झाले. हुमनाबादमध्ये असताना वासुदेव वरचेवर त्या कुटुंबियांकडे जाऊ लागला.

|| ॐ ||

*सध्या हिंदुस्थानातून अमेरिकेकडे जाण्याचा ओढा आहे. प.पू. गुरुजींचा जन्म अमेरिकेत झाला. जीवनाला लागणाऱ्या सर्व सुविधा - घरदार, व्यवसाय, आप्तसंबंध, सर्व तिथे होते. तरीही त्यांना हिंदुस्थानकडे येण्याची ओढ लागली.*

*त्यांना लहानपणापासून प्रभू श्रीरामचंद्र, भगवान श्रीकृष्ण आणि प्राचीन काळातील ऋषिमुनी यांच्या जीवनचरित्राचे आकर्षण होते. (घरातील वातावरण धार्मिक, प्रसन्न असे.) त्यांच्या कथांनी तो प्रोत्साहित होई. प्राचीन योगी ऋषिमुनींप्रमाणे आध्यात्मिक क्षेत्रातील अनुभव घेण्याची त्याला तीव्र इच्छा निर्माण झाली. अखेर त्यांच्या वडिलांना रामेश्वरजींना त्याला हिंदुस्थानात घेऊन यावे लागले. तो दिवस दसरा सणाचा होता.*

*हिंदुस्थानात येऊन त्याला संस्कृत शिकावेसे वाटे. ती भाषा पवित्र आहे. 'वेद', 'उपनिषद' व 'श्रीमद्‌भागवत गीता' यांसारखे पवित्र ग्रंथ या भाषेत आहेत. ही भाषा जर शिकलो नाही तर आपल्याला हे पवित्र ग्रंथ मुळात अभ्यासता येणार नाहीत. त्याचा अर्थ व शास्त्रवचन समजून घेता येणार नाही. थोडक्यात भारतीय संस्कृतीचा हा ठेवा अन्यत्र कोठे मिळणार नव्हता. म्हणून हिंदुस्थानात आले. जे जे हवे ते ते मिळवले आणि जीवनाचे सार्थक केले !*

# ॐ ४ नारायण कवच

रामलीला कंपनीने हुमनाबाद सोडले. नांदेड, देगलूर इ. ठिकाणी कार्यक्रम करीत ती कंपनी मदनूर येथे आली. पावसाळा सुरू झाल्यामुळे कंपनीने इथे मुक्काम केला. ह्या मुक्कामी असताना एक प्रसंग असा घडला, की त्यावरून वासुदेवाच्या चरित्रावर उत्तम प्रकाश पडतो.

मदनूर येथे रामलीला कंपनीचा मुक्काम एका वाड्यात होता. (ह्या घराला मोठे कुंपण होते) पावसामुळे रामलीलेचे कार्यक्रम होऊ शकले नाहीत. या गावातील एका श्रीमंत माणसाने - त्याला नगरशेठ म्हणत. ते जातीने कोमटी होते. त्यांनी सात दिवसांचा श्रीमद्‌भागवताचा पाठ योजला होता. ज्या ठिकाणी कंपनीचा मुक्काम होता, त्याच वाड्यात याकरिता जागा योजली होती. ह्या संपूर्ण कार्यक्रमप्रसंगी वासुदेव स्वत: अलिप्त होता. एकांतात त्याचे ध्यानधारणेस दिवाणखान्याच्या मागच्या बाजूस बसला होता. तो ह्या कार्यक्रमास व शेवटच्या दिवशी प्रसादालाही उपस्थित नव्हता. कार्यक्रमाचे शेवटी शेटजींना कोणीतरी सांगितले, की एक पाहुणा ह्याच दिवाणखान्याचे मागे या कार्यक्रमाचे वेळी शेवटपर्यंत अलिप्त राहिला होते. त्यावेळी नगरशेठ, तहसीलदार व इतर अधिकाऱ्यांसमवेत होते. त्यांनी पाहुण्याकडे निरोप पाठविला. त्याच वेळी तेथील एक पुजारी, एक तेलगू ब्राह्मण - जो तेथील पटवारी होता - त्याला वासुदेवाची माहिती होती. त्यांनी नगरशेठला त्याच्यासंबंधी सांगितले. वासुदेवाला त्यांच्यासमोर आणले. नगरशेठनी त्याला प्रवासाचा खर्च देण्याची तयारी

दाखविली. त्याला घरी जावयाचे असेल तर किंवा इतर गरजा भागविण्याकरिता खर्च द्यावयास ते तयार होते. नगरशेठनी विचारले, "तुम्हाला काय पाहिजे?"

वासुदेव काहीच बोलला नाही. शेठजींनी पुन्हा प्रश्न केला. वासुदेव गप्पच राहिला. तिसऱ्या वेळेला नगरशेठनी विचारले, "तुम्हाला काय पाहिजे?" यावेळी त्यांचा आवाज चिडखोरासारखा झालेला होता. पुजाऱ्याने शेठजींच्या तोंडावर हात ठेवून त्यांचे तोंड बंद केले. तो म्हणाला, "कृपया थांबा. त्यांना अधिक काही विचारू नका. मला माहीत आहे, की जर त्याने तुम्हाला तुमच्या तिजोरीच्या किल्ल्या मागितल्या, इतर चीज-वस्तू मागितल्या आणि तुम्हाला नुसते नेसत्या वस्त्रानिशी जावयास सांगितले, तर तुम्ही तसे कराल का?"

ह्या पुजाऱ्याच्या सांगण्यामुळे नगरशेठ आणि इतर अधिकारी ह्यांना कळून चुकले, की हा पाहुणा वासुदेव कोणत्याही ऐहिक सुखाच्या मागे नाही. ते आदराने नतमस्तक झाले.

काही दिवसांनी रामलीला कंपनीने मदनूर गाव सोडले. हैद्राबाद, सिकंदराबाद, बेगमबझार, अमीरपेठ इ. ठिकाणी कार्यक्रम करून कंपनी औरंगाबादला आली. इथे कार्यक्रम झाल्यावर शेवट झाला. वासुदेवाचे रामलीला कंपनीशी बरेच दिवस असलेले संबंध इथे संपुष्टात आले. इथे त्यांनी रामायणावर काही दिवस प्रवचने दिली आणि तेथून प्रयाण केले.

त्यांनी जालना सोडले. निश्चित पुढे कुठे जावयाचे हे ठरवले नव्हते, तरी ते सरळ पुढे जाऊ लागले. त्यांच्या पायात चपला नव्हत्या. पायात काही नसताना चालणे त्यांना त्रासदायक होऊ लागले. पायांच्या टाचांना झालेल्या जखमांकडे दुर्लक्ष करून त्याने त्या दाबून टाकल्या. त्यांचे पाय ठणकू लागले. पायांच्या तळव्यावर फोड आले. टाचांवर कापलेले व्रण दिसत होते. थोड्याच वेळात तेथून रक्त वाहू लागले. पुढील हालचाल अशक्य झाली. प्रत्येक वेळी त्यांना रस्त्याच्या कडेला थांबावे लागे. शरीरातील तपमान वाढू लागले. ते म्हणू लागले, "कोणी मला मदत करील का?" थोडा वेळ गेला. शहराकडे जाण्याकरिता मला वाहन मिळेल का, असा विचार केला. त्यानंतर एक मोटारगाडी रस्त्याने आली. ती त्याच्या जवळ आल्यावर त्याने पाहिले, की त्या गाडीत ड्रायव्हरशिवाय कोणी नाही. त्याने ड्रायव्हरला हात केला. काही अंतरावर ड्रायव्हरने गाडी थांबविली आणि तो पाहू लागला. वासुदेवाने त्रास होत असल्याचे

खुणेने कळविले, पण दोघांत अंतर असल्याने तोंडी सांगूनही कळणार नव्हते. तो अडचणीत आहे आणि त्याला मदत केल्यास त्याला विशेष वाटेल. पण ड्रायव्हरला रस्त्याकडेच्या माणसाने केलेली मागणी तितकीशी बरोबर वाटली नाही. त्याने गाडी सुरू केली आणि पुढे नेली. थोड्याच वेळात तो दिसेनासा झाला. वासुदेव तिथेच थांबला. कारण तो हलू शकत नव्हता. तेथून जाणाऱ्या मोटारीकडे तो पहात राहिला. काही वेळानंतर तीच गाडी परत येताना त्याने पाहिली. ती त्याच्या समोर थांबली. ड्रायव्हरने त्याचे डोके खिडकीतून बाहेर काढले. तो अपशब्द बोलू लागला. ही शक्तिमान रोल्सराइस गाडी कोणाकरिता आहे हे माहिती आहे का? ती गाडी नबाबाची होती. तो ह्या भागाचा मुख्य कार्यकारी अभियंता होता. त्याचा हैद्राबादच्या राजघराण्याशी संबंध होता. अशी राजघराण्याशी संबंधित असलेली नबाबाची गाडी थांबवण्याचे धैर्य त्याला कसे झाले? ती गाडी नुकतीच परदेशातून आणलेली होती. लहान माणसे मोठ्यांच्या सहवासात राहून जे गृहित धरून वागतात, तसाच हा ड्रायव्हर वागला. वासुदेवाने विनम्रपणे त्याची दयनीय स्थिती सांगितली. तो कोणा राजपुत्राशी बोलत नव्हता, तर जो गाडी चालवत आहे अशा ड्रायव्हरशी. त्याला पुढे जाण्यास तो मदत करील का? मग्रूर ड्रायव्हरने त्याला उत्तर दिले. त्याने ॲक्सिलेटर दाबला, गाडी सुरू केली आणि तो दिसेनासा झाला.

काही मिनिटांनी ती गाडी पुन्हा वासुदेवाकडे येताना त्याने पाहिली. त्याच्या बाजूला ती थांबली. ड्रायव्हरचा शांत आवाज ऐकला. त्याने त्याला आपल्या शेजारी बसावयास सांगितले. वासुदेव आत बसला. गाडी सुरू झाली. ड्रायव्हर त्याच्याशी माणसासारखे वागू लागला. तो औरंगाबादला जात होता. तिथेच वासुदेवाला उतरावयाचे होते. ड्रायव्हरने सौजन्याने विचारले. राममंदिरात उतरावयाचे असे सांगितल्यावर ड्रायव्हरने तिथे नेले. महंताला बोलावून सांगितले, की 'पाहुणे आले आहेत.' गाडीतून उतरण्यास वासुदेवाला ड्रायव्हरने मदत केली. नंतर नमस्कार करून त्याने गाडी पुढे नेली.

औरंगाबाद येथील राममंदिरात वासुदेवाने पंधरा दिवस आपली तब्येत पूर्ववत होण्यात घालवली. त्याचा तापही उतरला.

मधल्या काळात त्याने रामायणावरील चर्चेत भाग घेऊन लोकांना मदत केली. पायाने तो व्यवस्थित चालू लागल्याबरोबर त्याने तेथून प्रस्थान ठेवले.

तो शहराबाहेर  पडला. पण चालण्याचे श्रमाने तो दमला, म्हणून तो एका झाडाखाली बसला आणि थोडावेळ विश्रांती घेतली. निश्चित कुठे जायचे हे त्याने ठरवले नव्हते. भुकेने व तहानेने तो व्याकुळ झाला होता. आंतरिक समाधान हे आत्म्याच्या बाबतीत ठीक; पण शरीराला त्याचा काय उपयोग? शरीराला चांगले भक्कम खाद्य हवे होते.

*परंतु अन्न आणि पाणी मिळवून देण्याकरिता दैव थोडेच साथ देणार होते?* सबंध दिवस अन्नपाण्याविना तसाच घालवला. दुसऱ्या दिवशी अन्न आणि पाणी घेणे भागच होते, म्हणून वासुदेव परत शहरात-औरंगाबाद येथे आला. राममंदिराकडून सार्वजनिक पाणवठ्यावर गेला. पोटभर पाणी प्याला आणि परत वडाच्या झाडाखाली पडून राहिला. सबंध दिवसभर त्याला अन्न मिळाले नाही. कारण ते विकत घ्यावयास त्याच्याजवळ पैसा नव्हता, तसेच कोणत्याही परिस्थितीत तो भीक मागणार नव्हता, हा त्याचा शिरस्ता होता. दुसऱ्या दिवशीही तो शहरात परत आला. सार्वजनिक नळावर पाणी प्याला आणि परत झाडाखाली येऊन बसला. असा एक आठवडा गेला. वासुदेव फार अशक्त झाला. ह्या दिवसांत त्याला कोणीही काहीही खावयास दिले नाही. सातव्या दिवशीही तो पाण्याच्या नळावर आला, पाणी प्याला नि हळूहळू चालू लागला. थोडेसे चालत पुढे गेल्यावर वरच्या मजल्यावरच्या खिडकीतून एक बाई अन्न खाली टाकीत होती. निश्चितच हे चांगल्या घरातील उरलेले अन्न असेल, असे त्याला वाटले. त्याची पोटाची भूक त्याला अस्वस्थ करू लागली. हे अन्न, माझी गरज भागविण्याकरिता देवानेच टाकलेले आहे ! म्हणून वेळ न घालवता लगेच पुढे व्हावे आणि जेवढे लागेल तेवढेच घ्यावे-ते खाण्याला अयोग्य होण्यापूर्वी. त्याचे मन त्या वेळच्या परिस्थितीचा विचार करू लागले. *शरीराची भूक ही शरीराची गरज, ती भागवली पाहिजे. आध्यात्मिक विचाराकडे ओढ कितीही असली तरी तुम्ही शरीर नष्ट करू शकत नाही आणि आत्मा शरीराला वाचवू शकत नाही. कारण शरीर हे आत्म्याचे स्थान आहे. आत्मा शरीरात आहे तोपर्यंत त्याला हे कळलं पाहिजे.*

*म्हणून शरीराचे मुख्य स्थान हे महत्त्वाचे आहे. मग त्याच्या मनात विचार आला, की परमेश्वर प्रत्येक वस्तुमात्रात आहे. प्रत्येक वस्तुमात्र ही परमेश्वरामुळेच अस्तित्वात आहे. तिथे परमेश्वर आहे. अन्नात परमेश्वर आहे.*

*परमेश्वरामुळेच अन्न आहे. त्याला वचन आठवले - अन्नम् ब्रह्मम् ।* मग ते तर्कशुद्ध नव्हे का? तो भुकेला आहे हे पाहून, त्याच्याकरिता देवाने हे अन्न पाठवले होते का? जवळपास कोणी नाही? ते घेण्यात काय दोष आहे? तसा त्याने विचार केला. विश्वामित्र ऋषींनी मेलेल्या कुत्र्याची हाडे चघळली ना? शिवाय ही हाडे ज्या पाण्यात उकळली होती ते पाणी तो प्याला ना? हे सुद्धा अस्पृश्यांच्या संगतीत, केवळ शरीर रक्षणाकरिताच ना? जर विश्वामित्र ऋषींची ही गोष्ट दुर्भिक्ष्य असताना होते, तर मग वासुदेवाने, जे अन्न टाकून दिले आहे, त्यातले त्याने का घेऊ नये? तो विचार करू लागला. पण नंतर त्याच्या मनात विचार आला, की आपण अद्याप मरत नाही. अजून काही दिवस आपण जगणार आहोत. ह्या मानसिक द्वंद्वातून त्याने ते अन्न घ्यावयाचे ठरवले. ते त्याच्या वाट्याचे आहे, अशी त्याची खात्री पटली तरी तो तिथे थांबला. त्याने काही हालचाल केली नाही. काही संकेत व्हावा असे त्याला वाटले. थोड्याच वेळात तिथे गुरे आणि रस्त्यावरची कुत्री आली. समोरचे ते अन्न खावयास धावली. एक-दोन कावळेसुद्धा खाण्याकरिता धावले. झटकन वासुदेवाला जाणवले, की हे अन्न आपल्याकरिता नसून जनावरांसाठी आहे. तो लगेच आहे त्या शक्तीनिशी - अशक्त असूनही -तेथून निसटला. तो अशा गतीने तेथून निघाला, की जणू पिसाळलेले कुत्रे त्याच्यामागे लागले आहे. तो वडाच्या झाडाकडे वळाला आणि जरा पुढे गेल्यावर एकदम पडला. त्या ठिकाणी अर्धवट बेशुद्धावस्थेत आपण किती वेळ पडलो आहोत, हे त्याला माहिती नव्हते. त्याने डोळे उघडले. *सिंह जसा ओरडतो तसा आवाज त्याने ऐकला. त्याला हळूहळू दिसू लागले. त्याच्याभोवती पाच सिंह आहेत. ते हळूहळू त्याच्याजवळ येत आहेत. नंतर त्याची नजर सुमारे पन्नास वय असलेल्या एका सुंदर स्त्रीवर पडली. ती सुमारे सात फूट उंच होती. तिने सिंहांना न ओरडण्याची आज्ञा केली व आहे त्या ठिकाणीच थांबण्यास सुनावले. तिने सांगितले, "तो आमच्यापैकी एक आहे." ती त्याच्याजवळ आली आणि अगदी हळुवार आवाजात म्हणाली, "आता तुला अन्नाकरिता याचना करावी लागणार नाही. याचना न करताच तुझ्या गरजा भागतील. तिने त्याला आशीर्वाद दिला आणि सिंहाबरोबर ती अदृश्य झाली. ती दुसरी-तिसरी कोणी स्त्री नसून ती दुर्गादेवी होती किंवा तिला कालीमाताही म्हणतात.* ह्या घटनेनंतर थोडा वेळ तो आत्मविस्मृतीच्या अवस्थेत

होता. नंतर सामान्य स्थितीत आल्यावर त्याने शाळेतील एका शिक्षकाला पाहिले. तो त्यांना ओळखत होता. तो बाजूला उभा होता. शिक्षक त्याला म्हणाले, ''महाराज, कृपा करून उठा आणि माझ्याबरोबर चहा घ्यायला चला.''

ह्या सात दिवसांत कोणीही त्याच्याकडे लक्ष दिले नव्हते. पाणी पिण्याकरिता तो गावात जात असे. जे लोक त्याला ओळखत होते, ते पाणी पिताना त्याला पहात आणि निघून जात; पण कोणीही त्याला त्याच्या सुखसोयीविषयी किंवा खाण्यापिण्यासंबंधी विचारले नाही. हे सात दिवस त्याची दैवी परीक्षा पहाणारे, त्याची तृष्णा आणि इच्छाशक्तीची परीक्षा घेणारे नव्हते का? देव भक्तांची अशी कठोर परीक्षा पहातो. हीच साधी गोष्ट - बाब या घटनेवरून कळते.

वासुदेव औरंगाबादहून पैठणला आले. इथे त्यांच्या परिचयाचे हिम्मतसिंग ठाकूर होते. त्यांच्याकडे तो एक रात्र राहिला. दुसऱ्या दिवशी गोदावरी नदीवर तो स्नानास गेला आणि तिथेच त्याने ध्यानधारणा सुरू केली. परत येताना तो भाजी मंडईतून एकटा येत होता, त्यावेळी एकदम असा भास झाला, की पाठीमागून कोणीतरी बोटाने टोचत आहे. वळून पाहतात तो एक हसऱ्या चेहऱ्याची अनोळखी व्यक्ती! त्याने स्वत:हूनच परिचय करून दिला. मी एकनाथ महाराजांच्या देवळाचा पुजारी आहे. त्या व्यक्तीचे नाव भागवतबुवा. ''माझ्याबरोबर चला, एकनाथ महाराजांचे दर्शन घ्या.'' असे तो म्हणाला. दोघेही घळीवर असलेल्या देवळाकडे आले. भागवतबुवांनी प्रथम त्यांना जेवावयास दिले. नंतर दोघेही काही वेळ बोलत बसले. भागवतबुवांनी वासुदेवाकडून रामायणावरील रचना आणि त्याचे गायन ऐकण्याची इच्छा प्रदर्शित केली. वासुदेवाने थोडेसे गाऊन दाखवले. पुजारी खुष झाले. त्यांनी सायंकाळी वासुदेवाचे रामायणावरील प्रवचन देवळात ठेवले. यावेळी त्यांनी सुचवले, की भागवतबुवांनी हार्मोनियम पेटी वाजवावी, काही राग शिकवावेत, म्हणजे तो रामायण गाऊन दाखवू शकेल. असे म्हणताच भागवतबुवांनी संगीताचे पाठ द्यावयाचे त्यांना वचन दिले. इथे एक बाब नमूद करावीशी वाटते, की वासुदेवाला लहानपणापासूनच संगीताची-गाण्याची आणि वाद्यवादनाची गोडी होती. चांगले वाद्य वाजवले की किंवा चांगले गाणे म्हटले की त्यांचेठायी सौंदर्याची अनुभूती होत असे. आतापर्यंत त्यांना संगीत शिकण्याची संधीच मिळाली नव्हती, म्हणून

वासुदेवाने ठरवले, की ह्या चालत आलेल्या संधीचा फायदा घ्यावयाचा. ह्या संगीत उपासनेचा त्याला पुढील काळात पुष्कळच उपयोग झाला. त्याचा उल्लेख पुढे येईलच. दुसऱ्या दिवशी पहाटे चार वाजता त्यांच्या साधनेची सुरुवात होणार होती. देवळाला जोडूनच असलेल्या खोलीत साधनेकरिता तो बरोबर नेमलेल्या वेळेला हजर होई. भागवतबुवांना त्याच्या वक्तशीर आणि प्रामाणिकपणाबद्दल विशेष वाटले. त्यांनी त्याला राग शिकविण्यास सुरुवात केली. हार्मोनियमवर कोणती बोटे कोठे ठेवली की कोणते स्वर उमटतील हे दाखवले. वक्तशीर आणि उत्सुक असलेल्या वासुदेवाने संगीताचे पाठ गिरवले. थोड्याच दिवसांत हार्मोनियम आणि तबल्याचे साथीने तो रामायण गाऊ लागला. त्याची प्रवचने व गायन लोकांना आकर्षित करू लागले. श्रोत्यांची, भक्तांची संख्या वाढू लागली. त्याची लोकप्रियताही वाढू लागली.

*भागवतबुवांना ह्या तरुण शिष्याचे संगीतावरील प्रेम, स्वतःची शिस्त, काटकसरीचे जीवन आणि विशेष म्हणजे जाणूनबुजून पत्करलेले दारिद्र्य याबद्दल विशेष वाटू लागले.* त्यांनी एक धोतरजोडी, डोक्याला बांधावयाचा रुमाल आणि पायात घालावयाचा जोडा भेट म्हणून दिला. त्याच्या प्रवचनाला आलेल्या मंडळींनी जे पैसे दिले ते वासुदेवाने देवापुढे ठेवले.

चाळीस वर्षांनंतर साठीला आलेले वासुदेव भागवतबुवांना भेटायला पैठणला पुन्हा गेले. पण भागवतबुवांनी नादसमाधी घेतल्याचे त्यांना कळाले.

वासुदेवाची रामायणावरील प्रवचनाची ख्याती जवळपासच्या भागात पसरली होती. एके दिवशी जालन्याहून एक गृहस्थ आले. त्यांनी वासुदेवाला जालन्यास येण्याचे निमंत्रण दिले. त्यामुळे तेथील लोकांना त्यांच्या प्रवचनाचा लाभ होईल. जालन्याचे लोक त्यांचे प्रवचन ऐकण्यास उत्सुक आहेत, म्हणून त्या लोकांनी पाठविले आहे, असे त्या गृहस्थाने सांगितले. मग वासुदेवाने पैठण सोडले. जालन्याला त्या गृहस्थाबरोबर गेले. तेथील राममंदिरात त्यांचे वास्तव्य होते. हे राममंदिर कालीकुर्तीका राममंदिर म्हणून प्रसिद्ध होते. ह्या मंदिराची देखरेख महंत भागवताचार्य ह्यांच्या व्यवस्थेखाली होती. त्यांनीही वासुदेवाला रामायणावरील प्रवचने सांगण्यास व पाठ म्हणावयास प्रोत्साहन दिले. त्यांच्या प्रवचनातील आशय व शैली यामुळे अनेक श्रोते आकर्षित झाले. महंतही खूष झाले. त्यामुळे त्यांच्या प्रवचनास सतत गर्दी वाढू लागली.

प्रवचनकार म्हणून त्यांनी काय केले? ह्या पवित्र ग्रंथावरील टीकेचे आकर्षण लोकांत काय कारणाने झाले? ह्याचे एक कारण, त्यांचे निवेदन हे क्रमिक पुस्तकावर आधारित नव्हते. अशी पुस्तके बाजारात उपलब्ध असतात. कोणीही भगवद्भक्त विशिष्ट भूमिका घेऊन स्वत:चे भाष्य पवित्र ग्रंथावर करीत असतो. काही कैदी दीर्घकाळ शिक्षा भोगत असणारे, त्यांनी त्यांच्या तुरुंगातील मोकळ्या वेळात श्रीमद् भगवद्गीतेवर टीका लिहिलेली आहे. वासुदेवाचे पठण आणि प्रवचन हे आकर्षक का व्हावे? ते विद्याविभूषित स्कॉलर नव्हते. त्यांना शालेय शिक्षण मिळाले नव्हते. त्यांचे संस्कृत भाषेचे ज्ञान अल्प होते. आपण वासुदेवाची जीवनगाथा शोधत आहोत. त्यांचे लक्ष ईप्सित दिव्य ज्ञान प्राप्त करून घेणे, हे होते. आपण मागील वृत्तांतात पाहिले आहेच, की त्यांच्यावर अनेकवेळा दैवीकृपा झालेली आहे. *ज्यावेळी रामायणावरील श्लोकांचे ते स्पष्टीकरण करतात, तेव्हा त्यांचे शब्द अंत:करणापासून येतात. कारण त्याला स्वत:च्या अनुभवाचा आधार होता. ते जेव्हा उत्स्फूर्त बोलत, तेव्हा त्यात अतिशयोक्ती नसे. ते वासुदेवाचे उद्गार नव्हते तर कोण्या एका दैवी कृपा प्राप्त झालेल्या वासुदेवांच्या तोंडून येणारे होते. ह्या दैवी कृपाप्राप्त झालेल्या उद्गारांनी श्रोत्यांवर परिणाम घडविला.* ह्या श्रोत्यांनी नेहेमीच्या पद्धतीने फक्त प्रवचने ऐकलेली होती; पण त्या प्रवचनाचे निरूपणाची पद्धती ही ठरीव साच्याची नव्हती. प्रसंग आणि श्रोते पाहून ते आपल्या निरूपणाची पद्धती बदलीत असत. काही वेळा श्रोत्यांना ते प्रश्न विचारीत. काही श्लोक म्हणून झाल्यावर, ते त्यातील महत्त्वाचा शब्द पकडून त्याचे स्पष्टीकरण करीत आणि त्यातील अर्थभाव आणि अर्थव्याप्ती सांगत. भागवतबुवांकडून त्यांनी संगीताची साधना केली होती, त्याचाही उपयोग प्रवचनाचे वेळी श्रोत्यांना आकर्षित करण्यात झाला. ज्या लोकांनी त्याचे (प्रवचन) ऐकले, त्यांचे त्यासंबंधी ज्ञान व समज वाढली. त्यामुळे त्यांचा पवित्र ग्रंथाबद्दलही आदर वाढू लागला.

जालन्यामध्ये वासुदेवाचा संबंध एका प्रसिद्ध संस्कृत पंडित शिवकुमार शास्त्री या ब्राह्मणाशी आला. वासुदेवाला संस्कृत शिकण्याची गोडी होतीच. म्हणून त्याने फावल्या वेळात ह्या शास्त्री-पंडिताकडून काही संस्कृत पाठ घेतले.

थोड्याच दिवसांत, महंत भगवताचार्यांना वासुदेवासंबंधी अधिक कळू लागले. त्यांचे व्यक्तिसामर्थ्य लक्षात येऊ लागले. त्यांनी स्वत: आणि इतरांच्या

सूचनेवरून वासुदेवाला रामायण मंडळ स्थापन करून त्याद्वारा ठिकठिकाणी प्रवचने देण्यास प्रोत्साहित केले. अशा प्रकारे एक दिवस तो चार सभासद असलेल्या रामायण मंडळाचा पुढारी झाला. इतर सभासद तबला, पेटी इ. वाद्ये वाजवीत असत. अशा प्रकारे वासुदेव रामायण मंडळातर्फे ठिकठिकाणी जाऊन प्रवचने करू लागला. महंत भागवताचार्यांनी स्वत: बीड जिल्ह्यात एका मंदिरात त्यांना नेले. हे मंदिरसुद्धा एका महंताचे ताब्यात होते. इथे वासुदेवांनी एक महिना रामायणाचे पठण व निरूपण केले. नंतर ते जालन्याला परत आले. इथे काही दिवस घालवल्यावर ही मंडळी देऊळगावराजा इथे आली. बालाजी मंदिरात त्यांचे प्रवचन झाले. पुन्हा जालन्याला परत आले. इथे पंधरा दिवस घालवले. महंत भागवताचार्य यांनी वासुदेवाचे शुद्ध, सात्विक जीवन, आध्यात्मिक धारणा आणि आध्यात्मिक साधना, लोकांना मार्गदर्शन करण्याचे त्यांचे अप्रतिम कौशल्य पाहून त्यांना बीड जिल्ह्यातील देवळांचे महंत करण्याचे ठरवले. पण वर यासंबंधी एका घटनेत उल्लेख आला आहेच. वासुदेवाला कोणतीही बंधने नको होती, मुक्त जीवन हवे होते. त्यांना मठाधीश होऊन बांधून घेणे नको होते. नंतर एक असा प्रसंग घडला, की त्यामुळे वासुदेवाला घाईने जालना सोडून जावे लागले.

आपण वर पाहिले आहेच, की प्रवचनकार म्हणून वासुदेवाची प्रसिद्धी वाढत होती. सतत त्याला ठिकठिकाणाहून रामायणावरील प्रवचनासंबंधी विचारणा होत होती. याचा परिणाम पंडित शिवकुमार शास्त्री यांचे उत्पन्न व लौकिकावर होत होता. त्यांनी एक दिवस वासुदेवाकडे तशी तक्रार केली, "तुम्ही तुमची प्रवचने सुरू केल्यामुळे श्रोत्यांची त्याला गर्दी होत आहे. आजकाल क्वचितच श्रोते माझ्या प्रवचनाला येतात. मला येथून गाशा गुंडाळून जावे लागेल, नाहीतर भुकेले रहावे लागेल." वासुदेवाने त्या संस्कृत पंडिताचा केविलवाणा चेहरा पाहिला आणि लवकरात लवकर हे ठिकाण सोडण्याचे ठरविले. *थोड्या दिवसांनी वासुदेव, पंडितशास्त्रींच्या घरी गेले. पंडितजी बाहेर आल्यावर, त्याला ज्या काही आजपर्यंत चीजवस्तू मिळाल्या होत्या, त्या पंडितजींच्या पायापुढे ठेवल्या. आदर व्यक्त करीत मान खाली घालून ते म्हणाले, "तुम्हाला जालना सोडण्याचे कारण नाही. मीच ही जागा सोडून जात आहे. मी तुमचा आशीर्वाद मागत आहे. मी जातो." वासुदेवाच्या ह्या अनपेक्षित*

*कृतीने पंडितजी दुखावले. ते माफी मागू लागले आणि वासुदेवाने इथेच रहावे म्हणून आग्रह करू लागले. पंडितजींच्या डोळ्यातून अश्रू येऊ लागले. ते नतमस्तक झाले. वासुदेवांनी आपली वळकटी घेतली आणि पाठीमागे न पाहता ते चालू लागले.*

ते औरंगाबादला आले. राममंदिरात राहू लागले, इथेच यापूर्वी ते प्रथम आले होते. अगदी असाह्य अवस्थेत, पाय फुटलेल्या स्थितीत आले होते. आता पुन्हा ते रामायणावर प्रचवने व पाठ करू लागले. येथील श्रोत्यांमध्ये औरंगाबादच्या प्रतिष्ठितांपैकी एक शेठ मगनलाल (श्रीमंत गुजराथी) आणि श्री. बुलाखी महाराज यांचा उल्लेख करणे जरुरीचे आहे. कारण त्यांचा सहवास वासुदेवाचे जीवनात महत्त्वपूर्ण ठरला.

शेठ मगनलालना समजले, की हा तरुण, तपस्वी वासुदेव रामायण मंडळाला जे पैसे मिळतात, ते स्वत:करिता न ठेवता ते तो तबलजी आणि मंडळामधील इतरांना देऊन टाकतो. यामुळे शेठ मगनलाल आश्चर्यचकित झाले. प्रभावित झाले. त्यांनी वासुदेवाला विनंती केली, की तुम्ही मंडळ बंद करा आणि त्यांच्याकडे -शेठ मगनलालकडे रहा. वासुदेवाने ही विनंती मान्य केली. अशाप्रकारे रामायण मंडळ एकाएकी बंद झाले.

शेठ मगनलाल यांचेकडे काही दिवस राहिल्यावर वासुदेवाने त्याचे वास्तव्य शेठजींच्या घराजवळ असलेल्या मुरलीमनोहर मंदिरात केले. नंतर ते जवळच असलेल्या गायत्री मंदिरात रहावयास गेले. ह्या घरात तळघर होते. आत कोणालाही जाण्याची परवानगी नव्हती; पण वासुदेवाची मनोवृत्ती आणि उद्दिष्ट पाहून देवळाच्या अधिकाऱ्यांनी ती खोली ध्यानधारणेकरिता वापरण्यास परवानगी दिली. वासुदेवाला ही खोली ध्यानधारणेस फारच सोईस्कर वाटली. एका बैठकीत सहा तास किंवा त्यापेक्षा अधिक वेळ लागला तरी ते सहज बसू शकत होते. दिवस असेच ध्यानधारणेत जात होते.

एक दिवस योगायोगाने, दैवगतीने घडून यावे तसे झाले.

शेठ मगनलालच्या मधल्या मुलाने वासुदेवाला काहीशा दूर असलेल्या आपल्या बागेत यावयास विनविले. सुमारे चार एकर जागेत ही मोठी सुंदर बाग होती. तिथे एक दुमजली 'गोल छत्री' होती. खोल्या हवेशीर होत्या आणि सगळ्या बाजूला खिडक्या होत्या. ही जागा चित्रदर्शी, सुंदर आणि शांत वातावरण

असलेली, योगी माणसास ध्यानधारणेस अत्यंत आदर्श अशी होती. गोविंददासाने ह्या तरुण योग्यास इथे गोलछत्रीत राहावयास व काही दिवस ध्यानधारणा करण्यास सांगितले. त्याने अन्नपाण्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी घेतली. वासुदेवाने हे निमंत्रण आनंदाने स्वीकारले. कारण गायत्री मंदिरातील तळघरातून इथे येणे हा चांगलाच बदल होता.

या ठिकाणी वासुदेवाला अविस्मरणीय अनुभव आला. एक दिवस दुपारची एकची वेळ, *वासुदेव ध्यानमग्न होता. चक्राकार येणाऱ्या उजेडाच्या झोताने त्याचे डोळे उघडले. त्या चक्रझोतात त्याने एक उंचापुरा मुसलमान संत पाहिला. त्याला लांब दाढी होती. तो सुमारे पन्नास वर्षांचा होता. तो दुसरा कोणी नसून पेश इमाम होता. त्याने या ठिकाणापासून सुमारे अर्ध्या मैलावर अडीचशे वर्षांपूर्वी जिवंत समाधी घेतलेली होती. अजूनसुद्धा तिथे फकीर व इतरांना अन्नदान केले जाते.*

ह्या सुफी संताने विचारले, ''*तू बीजाच्या शोधात आहेस की नाही?*''

''*होय. मी बीजाच्या शोधात आहे. मला इतर काहीही नको आहे.*'' वासुदेवाने प्रत्युत्तर दिले.

''ठीक. *बीज हे तुला यथावकाश मिळेल; परंतु तू ''कवच'' म्हणजे संरक्षण असल्याशिवाय तू तुझे शरीर, मन आणि बुद्धी यांची धारणा कशी करशील? म्हणून कवच हे महत्त्वाचे आहे आणि त्याकरिता तू गायत्री मंदिरात कासुपारक मोहल्ल्यात जा. तिथे तुला श्रीमद्‌भागवत हा पवित्र ग्रंथ पहावयास मिळेल. त्यातील सहावा स्कंध उघड. त्यातील श्लोक लिहून घे आणि पाठ कर. हे तुझे नारायण कवच. अशा प्रकारे तू तुझे संरक्षण केले की बीज तुला प्राप्त होईल.*'' असा उपदेश करून तो सुफी संत अदृश्य झाला.

इथे एक विचार नमूद करावासा वाटतो, की सबंध विश्व आणि त्यातील विविधता हिंदूधर्मविचाराप्रमाणे - वृक्ष, त्याच्या फांद्या, पाने, खोड, फळे, फुले, इ. बीजातून निर्माण होतात. म्हणजे बीजातून वृक्ष, त्याची पाने, फांद्या, फळे, फुले ही येतात. त्याला जीवन प्राप्त होते. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे म्हणजे *जीवनाचे सत्त्व हे बीजात दडलेले असते. ह्याचाच व्यंग्यार्थ बीज म्हणजे अंतिम सत्य जगन्नियंता. सर्वेसर्वा, ज्याला आपण देव म्हणतो. काय हा अनुभव! मुस्लीम योगी एका हिंदूचे हिंदूच्या पवित्र ग्रंथाकडे लक्ष वेधतो आणि त्यातील*

*रहस्य उलगडून दाखवतो. आपल्याला माहिती आहे, की हा पहिलाच मुस्लिम संत नाही, ज्याने मार्गदर्शन करूनही वासुदेवावर कृपा केली आहे. या अगोदर अजमेर येथील सुप्रसिद्ध ख्वाजा मोइनुद्दिन चिस्ती यांनी त्यांना दर्शन दिले होते.* अशा दर्शनाचा अर्थ काय? अंतिम सत्याचे दृष्टीने मुस्लिम आणि ख्रिश्चन धर्म यात महत्त्वाचा फरक आहे काय? प्रत्येकजण नियमाचे पालन व उपासना निरनिराळ्या पद्धतीने करतो किंवा असे म्हणू, की प्रत्येक जण वेगळ्या वेगळ्या मार्गाने केंद्राकडे जातो. वस्तुत: *निरनिराळे धर्म निरनिराळे मार्ग दाखवतात; पण या सर्वांचे उद्दिष्ट एकच - ते म्हणजे परमेश्वराची उपासना.*

निरनिराळ्या धर्मांचे नावाखाली आम्ही काहींना मारतो. द्वेष करतो. हे निश्चितच क्लेशकारक, दुःखद. प्रत्यक्षात ह्या धर्मवादात महत्त्वाचे भेद नाहीत. हा महत्त्वाचा विचार (मौलिक) लक्षात घेतला, तर आध्यात्मिक साधनेतील बाह्य मतभेद नाहीसे होतात आणि शेवटी विविधतेतील एकात्मता अनुभवास येते.

ह्या चमत्कारिक दर्शनानंतर, वासुदेवाला पूर्वावस्थेत यावयास काही वेळ लागला. कारण एकाच अवस्थेत ध्यानधारणा करण्याकरिता बसल्यामुळे त्याची गात्रे शिथिल झाली होती.

तिसऱ्या प्रहरी ते गायत्री मंदिराकडे कवच लिहून घेण्याकरिता जाऊ लागले. त्यांचे मन मात्र वरील दृश्यावर विचार करीत होते आणि पेश इमामचे अलौकिक शब्द - ज्याची काही माहिती नाही ते आठवण्यात गढले होते - ते त्या बुलाखी महाराजांचे घराकडे जात आहेत, ह्याचेही भान त्यांना राहिले नाही. त्यांच्या घरी पोचल्यावर त्यांना आपण कोठे जाणार होतो याची आठवण झाली. पण इथे दार बंद होते, कुलूप होते, पण त्यांनी कुलूप पाहिले नाही.

वर ज्या घराचा उल्लेख केला आहे, त्या घरासंबंधी व तेथील कुटुंबियांची माहिती सांगितली तर ती इथे अप्रस्तुत होणार नाही. श्री. बुलाखी महाराज आणि त्यांची कुटुंबीय हे देवी भगवती (कालीचे) दोन पिढ्या उपासक होते. देवीची मूर्ती एका स्वतंत्र खोलीत होती आणि तिची उपासना, पावित्र्य राखून मन:पूर्वक भक्ती करीत होते. बुलाखी महाराजांचे वडील हे देवीचे परमभक्त होते. तिची कृपा त्यांना लाभलेली होती. याबाबत एक गोष्ट सांगितली जाते -

एकदा एक ब्राह्मण पैशाच्या अडचणीत होता. त्याने आपल्या घरातील

एम्ब्रॉयडरी केलेली सिल्क साडी महाराजांकडे गहाण ठेऊन पैसे घेतले. काही दिवसांनी ती साडी पैसे घेऊन परत द्यावयाची असे ठरले होते. सुमारे अकरा वर्षे होऊन गेली होती; पण तो ब्राह्मण पैसे घेऊन ती साडी परत नेण्याकरिता आला नाही.

एक दिवस महाराजांचे घरी महायज्ञ व्हावयाचा होता. त्याकरिता वस्त्र द्यावयाचे होते. मोठ्या महाराजांना वाटले, की गहाण टाकलेली सिल्कची साडी देण्यास योग्य आहे. आता तो ब्राह्मण न्यावयास येणार नाही, अशी खात्री यावेळपर्यंत झाली होती. त्यांनी ती साडी महायज्ञाच्या ज्वाळेत टाकून दिली; पण दुर्दैव उभे राहिले. तो ब्राह्मण महायज्ञ झाल्यावर मोठ्या महाराजांना तिसऱ्या दिवशी भेटला. त्याला पाहिल्यावर मोठे महाराज अस्वस्थ झाले. एकदम त्यांच्या मनात विचार आला, की त्या ब्राह्मणाला आपल्याला होत असलेल्या त्रासापासून दूर कसे ठेवावे? दुसरा विचार - खरे काय ते सांगावे. जर ब्राह्मणाने साडी मागितली तर तो असे सांगू शकत होता, की अकरा वर्षे झाल्यावर तुम्ही साडी न्यावयास परत येणार नाही. कारण गहाणवट हे इतकी वर्षे लक्षात घेऊन केले जात नाही. तो त्या ब्राह्मणावर तसा ठपका ठेऊ शकत होता; पण मोठ्या महाराजांचे संवेदनशील मन, प्रामाणिक वृत्ती तसे सांगावयास तयार नव्हती. त्यांचा लौकिक आणि प्रतिष्ठा ! जर ब्राह्मण ही गोष्ट सगळीकडे सांगत गेला असता तर महाराजांची पत, प्रतिष्ठा, प्रामाणिकपणा ह्यांना गालबोट लागले असते.

अगदी विमनस्कपणे मोठ्या महाराजांनी त्यांचे मागणे देवीकडे मांडले. त्यांनी ब्राह्मणाला निरोप दिला, की तुझी साडी थोड्याच दिवसांत परत मिळेल. महाराज कुलदेवीवर पूर्ण विश्वासून तिच्यापाशी प्रार्थना करीत बसले. दोन दिवस त्यांनी अन्नपाणी घेतले नाही. त्यांच्या कुटुंबियांनीसुद्धा उपोषण केले. सगळे चिंताग्रस्त होते. तिसऱ्या दिवशी चमत्कार घडला. महाराज ध्यान करीत देवीसमोर बसलेले होते. तोच तीच साडी आवाज होत घडी घातलेली त्यांच्यासमोर पडली. आवाज झाल्यामुळे ते ध्यानस्थ अवस्थेतून जागे झाले. समोर त्यांनी साडी पाहिली, तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून आनंदाचे, कृतज्ञतेचे अश्रू उभे राहिले. त्यांच्या मुलाने -श्री बुलाखी महाराज यांनी- आपल्या वडिलांकडून देवीच्या भक्तीची परंपरा त्याच पद्धतीने चालू ठेवली होती.

आता वासुदेव बुलाखी महाराजांच्या दारासमोर उभे होते. त्याला दार लावलेले आहे, असे दिसून आले; पण दाराला बाहेरून कुलूप लावलेले त्यांच्या नजरेस आले नाही. महाराज आत आहेत, असे समजून त्याने महाराज म्हणून हाक मारली. त्यांनी पुन्हा महाराज म्हटले. काहीच होकार येत नाही, हे पाहून तिसऱ्यांदा हाक मारली.

''कोण आहे?'' तो स्त्रीचा आवाज होता. हा आवाज घराच्या दुसऱ्या मजल्यावरून येत होता.

''दुसरा कोण? काळा चोर, काळा चोर.'' त्याने उत्तर दिले आणि दार उघडेल म्हणून थांबला.

त्याने स्त्रीच्या पावलांचा आवाज खाली येताना ऐकला. पायाचा आवाज, प्रत्येक पायरीवर होता होता. दाराजवळ आल्यावर आवाज थांबला. कुलूप त्याच्या एकदम पायाशी पडले. दारात असलेल्या गोल छिद्रातून वासुदेवाने पाहिले, की सुंदर हात असलेली, हातात हिरव्या बांगड्या असलेली, लांबसडक बोटे असलेली एक सुंदर स्त्री, आतून दार उघडताना पाहिली. दार आत उघडत होते, त्याचवेळी पाठीमागून कोणी तरी बोलावत आहे, असे वासुदेवाने ऐकले. त्याने मागे वळून पाहिले. बुलाखी महाराजांची आई आणि इतर कुटुंबीय त्यांच्यापासून थोड्याच अंतरावर होते. बाहेरील एक कार्यक्रम संपवून ते घरी परत येत होते. त्या वृद्ध बाईने वासुदेवाला हाक मारली. त्याने जरी ऐकले तरी तो तिकडे लक्ष देऊ शकत नव्हता. कारण त्यावेळी तो आत्मविस्मृती स्थितीत होता. त्याचे लक्ष आतील दार उघडत असलेल्या हाताकडे होते. ती वृद्ध बाई जवळ येत होती. तिने पुन्हा हाक मारली, तेव्हा तो हात एकदम अदृश्य झाला. ती वृद्ध बाई दाराजवळ आली. दार उघडायला किल्ली काढली, तोच तिला आश्चर्याचा धक्का बसला. कारण वासुदेवापुढे जमिनीवर कुलूप पडलेले होते.

''हे काय? हे कसं घडलं?'' ती आश्चर्याने म्हणाली. आता वासुदेवाचे लक्ष त्या वृद्ध बाईकडे गेले. तिने काय झाले म्हणून परत विचारले. काय घडले ते त्याने सांगितले. घडलेल्या घटनेचा वृत्तांत ऐकून ती सद्गदित होऊन रडू लागली. तिने त्याचे पाय धरले.

ती खेदाने म्हणाली, ''*आमचे हे दुर्दैव आहे, की देवी माताजीचे दर्शन आम्हाला घडू शकले नाही. या, तुम्ही आता इथेच रहा, म्हणजे आम्हाला*

*मातांजींचे दर्शन मिळण्याची कृपा होईल."* तिने नमस्कार केला.

नंतर बुलाखी महाराज आले. तेही इतर कुटुंबियांप्रमाणेच वासुदेवाला राहण्याचा आग्रह करू लागले. त्या वृद्ध स्त्रीने त्यांचे पाय सोडले. त्यावेळी त्यांनी राहण्याचे कबूल केले. ते तीन आठवडे या कुटुंबात राहिले.

श्री बुलाखी महाराजांचे घर जुने होते. रस्त्याचे बाजूने त्याला आत जाण्याचा दरवाजा होता. घरात गेल्यावर, बाजूच्या खोलीत देवी भगवतीची (काली) मूर्ती बसवलेली होती. ह्या खोलीच्या एका बाजूने वरच्या मजल्यावर जाण्यास जिना होता. ह्या खोलीच्या दुसऱ्या बाजूस एक मोठा दिवाणखाना होता. तिथे भजन-कीर्तन, यज्ञ इ. कार्यक्रम होत असत. देवी असलेल्या खोलीच्या बाहेर व्हरांड्यात तेलाचा दिवा तेवत असे. हा दिवा वर्षभर सतत तेवत राहील, अशी दक्षता कुटुंबीय घेत होते.

संध्याकाळची उपासना व जेवण झाल्यावर सगळे कुटुंबीय रात्री निजावयास वरच्या मजल्यावर नेहेमीप्रमाणे गेले. वासुदेव या पाहुण्याकरिता व्हरांड्यात देवी असलेल्या खोलीच्या दुसऱ्या बाजूस अंथरूण घातले होते. ही सोय वासुदेवाचे ध्यान निर्विघ्नपणे व्हावे, या दृष्टीने केली होती. रात्री ते ध्यानमग्न होत असत.

अशीच एक रात्र. नेहेमीप्रमाणे ही कुटुंबीय मंडळी विश्रांतीसाठी माडीवर गेली. वासुदेवसुद्धा रात्रीची ध्यानधारणा झाल्यावर झोपावयास गेले. आकाशात ढग गोळा झाले. एकाएकी शहरभर वादळ होऊ लागले. घराच्या सगळ्या भागात वारे वाहू लागले. देवी भगवतीच्या खोलीतील दिवा विझला. सगळे घरच अंधारात बुडाले होते. वासुदेव जरी जागे होते, तरी दिवा पुन्हा लावण्याचे दृष्टीने काही करू शकले नाहीत. नंतर त्यांनी पाहिले, की बुलाखी महाराजांची आई हातात दिवा घेऊन जिन्यावरून येत आहे. ती खाली आली, तिने देवीच्या खोलीतील दिवा लावला आणि शांतपणे न बोलता ती वर निघून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी या कुटुंबीयांबरोबर नाश्ता करीत असताना, त्याने रात्रीच्या वादळाचा उल्लेख केला आणि माताजींना, बुलाखी महाराजांच्या आईला म्हणाले, "तुम्ही खाली येऊन देवीच्या खोलीतील दिवा लावला हे फार चांगले केले. वादळ खरोखरच भयंकर होते."

माताजींनी आश्चर्याने विचारले, "कोणी दिवा लावला? तुम्हाला वाटतं

मी स्वत:? ते कसे? तुम्ही चुकत आहात. एकदा रात्रीची प्रार्थना अन् जेवण झाले की आम्ही वर जातो. मग कोणीही खाली येत नाही. नक्कीच मी काल रात्री खाली आले नव्हते. दिवा विझला असावा, असे आम्हाला वाटत होते.''

''मोठेच आश्चर्य !'' वासुदेव प्रत्युत्तरला आणि खुलासा करू लागला. ''परंतु मी तुम्हाला हातात दिवा घेऊन येताना पाहिले. तुम्ही आलात आणि विझलेला दिवा पुन्हा लावलात. देवी असलेल्या खोलीतला तो दिवा वादळाने विझला होता. तुम्ही पुन्हा वर गेलात !''

माताजींच्या व इतर कुटुंबीयांच्या लगेच लक्षात आले, की जी स्त्री जिना उतरून खाली गेली आणि जिने दिवा पुन्हा लावला ती दुसरी कोणी नसून ती देवी माता भगवती स्वत:च होती. त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. ते आनंदित झाले. कारण देवीचे आशीर्वाद आणि अस्तित्व त्यांच्या घरात होते. ती स्त्री- जिला वासुदेव या पाहुण्याने मानवी स्वरूपात पाहिले होते, त्या देवीचे कृपादर्शन माताजी व इतर कुटुंबीयांना झाले नव्हते. त्यामुळे त्यांच्यात नैराश्य आले. आपण देवीच्या दर्शनास अपात्र आहोत, अशी त्यांची भावना झाली. त्यामुळे त्यांच्या दु:खात भर पडली. त्यांना अश्रू आवरेनात. त्यांची समजूत काढणे वासुदेवाला अवघड जात होते.

त्या घटनेनंतर पंधरा दिवसांनी वासुदेवानी श्री बुलाखी महाराजांचे घर सोडले. *ते गायत्री मंदिरात 'नारायण कवच' लिहून घ्यावयास गेले. सुफी धर्मातील संताने त्यांना तसे सांगितले होते. हे वर्ष १९३५ होते.*

|| ॐ ||

### *कर्मयोग कशाला म्हणतात?*

*कर्मयोग म्हणजे कर्माच्याद्वारे ईश्वराशी संयोग प्राप्त करणे. प्राणायाम, ध्यानधारणायुक्त अष्टांगयोग, राजयोग इ. गोष्टीही जर अनासक्तपणे केल्या तर तो देखील कर्मयोगच आहे. संसारातील लोकांनी आपआपली सांसारिक कर्मे देखील जर अनासक्तपणे, भक्तियुक्त मनाने आणि ईश्वरार्पण बुद्धीने केली तर तोदेखील कर्मयोगच होय. ईश्वरलाभ हाच कर्मयोगाचा उद्देश आहे.*

— रामकृष्ण उपदेश संग्रह

५

# संत एकनाथांचे मार्गदर्शन

'नारायण कवच' साध्य केल्यावर, वासुदेव शेठ मगनलाल यांच्या गोलछत्री या ठिकाणी परत आले. बीज प्राप्त करून घेण्याकरिता ते उत्सुक होते. म्हणून त्यांनी आपली ध्यानधारणा, उपासना तीव्र स्वरूपात चालू ठेवली. शेठ मगनलाल यांच्या मधल्या चिरंजीवांनी- गोविंददासने - अन्नपाणी व फराळाची व्यवस्था वर उल्लेख केल्याप्रमाणे केली होती.

काही दिवसांनी जवळच्याच गोपाळकृष्ण मंदिरात त्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर प्रवचन करावे, अशी त्यांना विनंती केली, ती त्यांनी मान्य केली. श्रीकृष्णाच्या जीवनावरील त्यांचे कथन आणि श्रीकृष्णाच्या उपदेशाचे स्पष्टीकरण श्रोत्यांना आकर्षित करू लागले. ते जे सांगत, ते नेहेमीच्या पद्धतीप्रमाणे चाकोरीबद्ध नव्हते. त्यांचे शब्द अंत:करणातून बाहेर पडत. त्या पाठीमागे त्यांचा खोलवर आध्यात्मिक अनुभव होता, त्यामुळे श्रोत्यांवर त्याचा परिणाम चांगला झाला.

एक दिवस त्यांचे प्रवचन चालू असताना दोन सद्गृहस्थ -श्री. बापूसाहेब देशपांडे आणि दादा भीमराव जोशी -सहज आत आले. साधारणत: देवदर्शन, कीर्तन, पुराण, भजन याबाबत ते उदासीन असत. कारण त्यांची आध्यात्मिक साधना पुष्कळ झाली होती. त्यामुळे नेहेमीचे देवदर्शन ते टाळू शकत होते. ते दारातच उभे राहिले. तरुण वासुदेवाचे शब्द कानावर पडत होते - श्रीकृष्ण आणि अर्जुन यांचा संवाद ते स्पष्ट करीत होते. त्यांच्या स्पष्टीकरणातील विचार

व भावना यांचा परिणाम त्या दोघांवर इतका झाला, की त्यांच्या डोळ्यांतून गालावर अश्रू ओघळू लागले.

अशा अवस्थेत असताना, त्यांना द्वारकादासाने पाहिले. तो पुजाऱ्याचा मुलगा होता. तो त्या दोघांनाही ओळखीत होता. त्यांची पार्श्वभूमीही त्याला माहिती होती. आश्चर्यचकित होऊन तो उठला. त्यांना दिवाणखान्यात घेऊन आला आणि वक्त्याच्या समोरील पहिल्या रांगेत त्यांना बसवले.

प्रवचन झाल्यावर श्रोतृवर्ग निघून गेला; पण बापूसाहेब देशपांडे आणि दादा भीमराव जोशी पाठीमागे थांबले. आपला परिचय वक्त्याला करून दिला आणि अधिक त्याची माहिती व्हावी, म्हणून विचारणा केली. ही प्रासंगिक भेट पुढे अगदी जवळच्या मित्रनात्यातील वाटू लागली.

त्यांच्या सान्निध्यात आल्यावर, बापूसाहेब व दादा भीमराव त्या तरुण योग्याचे- वासुदेवाच्या दैनंदिनीचे निरीक्षण करू लागले. ध्यानधारणेत तो किती वेळ घालवतो, त्याचा आहार, त्याचा साधेपणा आणि विशेष म्हणजे जे श्रोत्यांकडून पैसे मिळत ते तो देवळाला देत असे. वासुदेवाच्या ह्या गुणधर्मामुळे तो गोलछत्रीत राहू लागला. तो आपली सायंकाळ शेठ मगनलाल, बुलाखी महाराज, बापूसाहेब देशपांडे आणि दादा भीमराव जोशी यांच्या सहवासात घालवी. भेटण्याचे ठिकाण हे बापूसाहेब भीमराव जोशी यांचे घर होते. ह्या भेटीमुळे उभयतांचे संबंध वासुदेवाशी दृढ होत गेले. ही मैत्री पुढे इतकी वाढली, की त्यांना त्रिकुट मानण्यात आले.

काही दिवसांनी वासुदेवानी औरंगाबाद सोडले आणि ते जालन्याला आले. तेथे थोडे दिवस तेथील काली-कुर्तीका-राम मंदिरात घालवले. जालन्याहून ते अकोल्याला आले. इथे थोडे दिवस स्वामींच्या जवळ राहिले. (डॉ. नंदलाल भारती हेच एक प्रकारे त्यांचे मार्गदर्शक होते) वासुदेवाने आपल्या बालवधूला - बायकोला सोडून सुमारे अक्रा वर्षे झाली हाती. तेव्हापासून तो अंतिम सत्याचा शोध घेत हिंडत होता. त्याच्या वडिलांच्या गावी - कालुपूर गावी जाण्याची वेळ आली आहे, असे त्याला वाटू लागले. ती १९३० सालच्या वर्षाची सुरुवात होती.

आता त्यांनी अकोल्याहून प्रयाण केले. भुसावळला आले. तेथे ते अलाहाबादला जाणाऱ्या गाडीत बसले. ह्या गाडीतील त्यांचा प्रवास संस्मरणीय

झाला. कारण इथेच त्यांची अघोरीबाबाशी गाठ पडली.

तृतीय श्रेणीचा हा डबा गर्दीने गच्च भरला होता. वासुदेवाने कसाबसा प्रवेश मिळवला व तो वळकटीवर बसला. त्यांच्या समोरच दुसऱ्या बाजूला अघोरीबाबा बसले होते, अत्यंत ओंगळ अवस्थेत. याबद्दल ते कुप्रसिद्ध होते. ह्या बाबांबरोबर त्यांचे शिष्य, यजमान मंडळी, मुंबई, कलकत्ता, अहमदाबाद येथील श्रीमंत कुटुंबातील होती. ते अलाहाबादला जात होते. त्यांच्या डब्यात येणे बाबाजीला आवडले नाही. बाबाजी चिडले. त्यांनी आपल्या गूढ विद्येचा उपयोग करून शीतयुद्ध सुरू केले. बाबाजी वासुदेवाकडे स्थिर नजर करून पाहू लागले. सगळी मानसिक शक्ती याकरिता त्याने एकवटली होती. ह्याला योगात 'त्राटक' असे म्हणतात. आपल्या शिष्यावर प्रभाव पाडण्याचे दृष्टीने वासुदेवाला बाहेर घालवून धडा द्यावा, म्हणून बाबाजी कपाळावर हात मारून घेत होते. त्राटकाचा उपयोग करीत होते. बाबाजीचा हा उद्देश लक्षात यावयास वासुदेवाला तीळमात्र वेळ लागला नाही. त्यांनीही तितक्याच त्वेषाने बाबाजींच्या नजरेस नजर भिडवली ! दोघेही एकमेकांकडे टक लावून डोळे न मिटता पाहू लागले. फक्त भंग होत होता - जेव्हा ते संडासाला जात असत तेव्हा तेथे जाऊन स्वत:ची विष्ठा खाऊन अघोरी शक्ती वाढवत होते. अघोरी विद्येचे साधक आपला मळ भक्षण करीत असतात.

एकमेकांकडे टक लावून पहाणे, हा संघर्ष जबलपूर स्टेशन येईपर्यंत चालू होता. भुसावळ ते जबलपूर ह्या मोठ्या प्रदीर्घ प्रवासात बाबाजींना समजून आले, की त्यांच्यातील गूढ शक्ती त्या अनोळखी माणसावर काही करू शकली नाही, तसेच त्यांच्यातील गूढ शक्ती ही त्या अनोळखी माणसापुढे शक्तिहीन झाली. म्हणून बाबाजींनी विचार केला, की शत्रुत्व पत्करू नये, हाच उत्तम मार्ग. जबलपूरला गाडी थांबल्याबरोबर ते प्लॅटफॉर्मवर खाली उतरले. दोन डझन केळी घेतली. त्यातील एक त्याने वासुदेवाला दिले.

अशा प्रकारे बाबाजींचा उरलेला प्रवास मनाच्या चांगल्या अवस्थेत सुरू झाला. त्यांचे पुढील जीवन बदलण्याचे दृष्टीने एक धक्का मिळाला. गाडीने जबलपूर सोडले. बाबाजी त्यांच्या जागेवर बसले होते. वासुदेवानी प्रथमच काही बोलण्याची इच्छा प्रदर्शित केली. बाबाजींचे शिष्य त्यांच्या बरोबर प्रवास करीत होते. ह्या अनोळखी गृहस्थाशी त्यांचे गूढ वर्तन कसे होईल याचे औत्सुक्य

त्यांना होते, हे सांगण्याची गरज नाही. आता ते याबाबत शेवट कसा होतो हे पहात होते.

## अनुज्ञा मिळाली

वासुदेव म्हणाले, ''तुमचे गुरुजी, अध्यात्मातले मार्गदर्शक, ते आता जिवंत नाहीत. तुम्हाला एक बायको आणि तीन मुले आहेत. एका खेड्यात त्यांना असाहाय्य स्थितीत तुम्ही सोडले आहे. जर तुम्ही माझे म्हणणे ऐकाल तर तुम्ही त्यांच्याकडे जा आणि प्रापंचिकासारखे रहा.''

बाबाजींच्या ह्या गुप्त घटनेची माहिती कोणालाही नव्हती. त्यामुळे त्यांना धक्काच बसला. तसेच त्यांचे शिष्यही आश्चर्यचकित झाले. ही बाब उघड झाल्याने बाबाजींना चांगलीच चपराक बसली. ते आपल्या जागेवर बराच वेळ आश्चर्यचकित होऊन बसले. बाबाजींना कळून चुकले, की ह्या तरुण माणसाची आध्यात्मिक साधना व उपासना उच्च कोटीची आहे.

गाडी अलाहाबादला वेळेवर पोचली. मंडळी उतरली. बाबाजी आता घरी जाण्याच्या तयारीत होते. अघोरीबाबांचे बाबतीत त्यांचे मानापमान झाले. त्यानंतर वासुदेव आपल्या वाडवडिलांचे गावी -कालुपूरगावी गेले.

वासुदेव लवकरच जवळ असलेल्या त्यांच्या पत्नीच्या गावी गेले. तिला घरी आणले आणि प्रापंचिक माणसासारखे जीवन -त्यांचे काका गोमटी यांचेकडे सुरू केले. हे १९३५ साल होते.

दोन महिने सांसारिक सुखात गेले. वासुदेवाला पुन्हा भ्रमंतीची लहर आली. जगातील सत्याचा शोध घेण्याची त्याची तृष्णा त्याला स्वस्थ बसू देईना, म्हणून एके दिवशी त्याने त्याच्या तरुण पत्नीला तिच्या माहेरी पाठवले. तिला निर्धाराने शांतपणे राहण्याचा उपदेश केला आणि अधिक काही न बोलता तो तेथून निघाला.

तो अकोल्याला परत आला. स्वामीजींकडे (डॉ. नंदलाल भारती) राहू लागला. स्वामीजींच्या मार्गदर्शनाखाली व आश्रयामुळे इथे काही काळ गेला. पुन्हा ते पूर्वी भेट दिलेल्या ठिकाणी भ्रमंती करू लागले. अशा भ्रमंतीत सुमारे एक वर्ष गेले. १९३६ मध्ये ते पुन्हा औरंगाबादमध्ये, त्यांच्या पूर्वीच्या मित्र-परिवारात - बापूसाहेब देशपांडे, दादा भीमराव जोशी, श्री बुलाखी महाराज इ.कडे आले. यावेळी ते गायत्री मंदिरातील मुरलीमनोहर मंदिरात राहिले.

ध्यानधारणेत वेळ जात होता. सायंकाळी नेहेमीप्रमाणे त्यांचा वेळ बापूसाहेब देशपांडे व दादा भीमराव जोशी यांच्या सहवासात जाई. त्यामुळे ते अधिक एकमेकांच्या जवळ आले. अशा भेटीत, प्रत्येकजण आपल्या आध्यात्मिक प्रश्नाचे बाबतीत एकमेकांचा सल्ला घेत असत. वासुदेव मात्र, त्या दोघांचा तरुण मित्र, आध्यात्मिक साधनेत त्यांच्यापेक्षा पुष्कळ पुढे गेला होता, त्यामुळे त्यांच्याकडून वासुदेवाला काही मदत होणार नव्हती. पण त्यांच्या मते संत एकनाथ महाराज- एक गृहस्थाश्रमी संत, दीर्घ जीवन लाभलेला, वासुदेवाला याबाबतीत पुढील शोधात मदत करतील काय? त्यांनी वासुदेवाला सल्ला दिला, की *त्यांनी पैठणला जाऊन तेथे नाथांच्या समाधीच्या ठिकाणी आश्रय घ्यावा. त्यांना खात्री होती, की वासुदेवाची इच्छा तेथे पूर्ण होईल. कारण त्यांना स्वत:ला संतांचा आशीर्वाद मिळाला होता.*

पुन्हा वासुदेवाची आशा प्रबळ झाली. बापुसाहेब देशपांडेंनी बसच्या भाड्याकरिता दिलेला एक रुपया घेऊन वासुदेव पैठणला निघाले.

पैठण हे गाव गोदावरी नदीच्या काठी वसले आहे. दक्षिणेकडील गंगा असे या नदीला म्हणतात. पैठण हे शांत आणि सुस्त गाव. त्याचा लौकिक एक यात्रेचे स्थान म्हणून होता. इथे संत एकनाथ महाराजांना दिव्य संकेत- पुण्याजवळील आळंदी या गावी जाण्याचा-मिळाला होता. अजानवृक्षाच्या मुळ्या, संत ज्ञानेश्वरांच्या समाधीच्या ठिकाणी त्यांच्या गळ्याला लागत आहेत, त्या काढून टाकाव्यात. संत एकनाथांच्या अगोदर संत ज्ञानेश्वरांनी सुमारे दोनशे वर्षे अगोदर जिवंत समाधी आळंदी या क्षेत्री घेतली होती, ही गोष्ट इथे नमूद केली पाहिजे.

दुपारच्या वेळी वासुदेव पैठणला पोचले. इथे ते तिसऱ्यांदा आले होते. पण यावेळी मात्र ते संत एकनाथांकडून आशीर्वाद व मार्गदर्शन घेण्याच्या प्रयत्नात होते. मग कितीही का वेळ लागेना ! इथे एक जुनी आठवण करून देता येईल, की पूर्वी वासुदेव इथे आले असताना भागवतबुवांशी त्यांची मैत्री झाली होती. त्यांच्याकडे ते हार्मोनियम शिकले. इथे आल्यावर ते तडक हिंमतसिंग ठाकूर-ग्रोसरी विकणारा जुना मित्र, त्याच्याकडे गेले.

नदीच्या पूर्वेकडील बाजूस नीम वृक्षाची मोठी रांग होती. रस्त्याचे एक वळण नदीकडे जात होते. तिथेच गुलाम अहमदचे पानाचे दुकान होते. तो

कुस्तीगीर होता. त्याला तेथील लोक उस्ताद म्हणत. कुस्तीगीर जरी होता, तरी तो माजलेला नव्हता. तो कनवाळू आणि परोपकारी होता. एके दिवशी गुलाम अहमदने अनोळखी वासुदेवाला त्याच्या दुकानाचे बाजूने जाताना पाहिले. वासुदेवाच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष त्याच्या चेहऱ्यावरून दिसला. त्यामुळे गुलाम अहमदला वासुदेवाबद्दल आकर्षण वाटू लागले. त्यामुळे उभयतांची मैत्री व्हावयास फारसा वेळ लागला नाही.

ध्यानधारणेकरिता वासुदेवाने गोदावरी नदीच्या वाळवंटात जागा शोधली. कारण इथे पुष्कळ शांतता आणि एकांत होता. वासुदेवाला असा एकांतच हवा होता. नदीच्या काठी त्यांनी जागा निवडली आणि ध्यानधारणा सुरू केली. ही ध्यानधारणा बराच वेळ -म्हणजे दुसऱ्या दिवशीची पहाट झाल्यावर, कोंबड्याचे आरवणे, पक्षांचा किलबिलाट होईपर्यंत चालू होती.

वासुदेव इथे काही विशिष्ट उद्देशाने-म्हणजे संत एकनाथ महाराजांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन मिळावे म्हणून आणि ते साध्य होईपर्यंत ते तिथेच राहणार होते. अशा साधनेत, गोदावरीच्या वाळवंटात, पंधरा दिवस गेले. त्यानंतर एका रात्री ध्यानधारणेनंतर ते वाळवंटात विश्रांती घेत होते. एक हात उशीसारखा उपयोगात आणला. त्यांची नजर नदीतील वाहणाऱ्या पाण्याकडे होती. पहाटेचा ३-४ चा सुमार होता. *पाण्यातून बाहेर येणाऱ्या एका माणसाचे प्रसन्न दर्शन त्याला झाले. ही व्यक्ती मध्यम उंचीची, सावळ्या रंगाची होती. आंघोळ केलेली, स्वच्छ धोतर नेसलेली, खांद्यावर एक वस्त्र टाकले आहे, अंगात सैलसर अंगरखा आणि हातात लोटी - अशी व्यक्ती वासुदेवाकडे येत होती. वासुदेव वाळवंटात पहुडलेले होते. ती व्यक्ती वासुदेवाजवळ आली आणि मराठी भाषेत म्हणाली,*

*"इथले तुझे काम संपले आहे. आता तू अयोध्येस जा. तिथे तुझी इच्छा पूर्ण होईल."*

ह्या सूचक शब्दात, त्यांनी वासुदेवाला आशीर्वाद दिला आणि ती व्यक्ती अदृश्य झाली. ती व्यक्ती दुसरी-तिसरी कुणी नसून सुप्रसिद्ध संत एकनाथ महाराज होते.

ह्या दर्शनाने, त्यांच्या आशीर्वादाने वासुदेव आनंदित आणि हर्षभरित झाले. हा जो आनंद त्यांनी अनुभवला त्याला मर्यादा नव्हती. त्यांना संत

एकनाथ महाराजांचे साक्षात दर्शन झाले होते आणि त्यांचे आशीर्वाद मिळाले होते. एकनाथ महाराजांनी स्वत: पुढे कोठे जावे याबाबत मार्गदर्शन केले. त्यामुळे वासुदेवामध्ये विश्वास निर्माण झाला - त्याला त्याच्या शोधात अयोध्येत यश मिळेल.

सकाळ झाली. त्याने ठरविले, की आता आपल्या मित्राचा निरोप घ्यावा. पैठणहून वेळ न घालवता ते निघाले. कारण येथील तपस्या पूर्ण झाली आहे. लवकरात लवकर अयोध्येला ते जातील तर ते श्रेयस्कर ठरेल.

ते उस्ताद अहमदच्या पानाच्या दुकानापर्यंत चालत गेले आणि अनौपचारिक रीतीने त्यांनी त्याला सांगितले,

''पैठणला येण्याचा त्याचा उद्देश साध्य झाला आहे आणि तो अयोध्येला आता जात आहे.''

उस्ताद गुलाम अहमद हा संवेदनशील, भावनाप्रधान आणि व्यवहारी माणूस होता. त्याला वासुदेव कोण आहे हे नंतर कळले. त्याचे लगेच हॉटेलात दुधाची व जिलेबीची ऑर्डर दिली. निरोपाची भेट म्हणून त्याने हे पदार्थ वासुदेवाला दिले.

हे पदार्थ वासुदेव घेत असताना गुलाम अहमदने विचारले,

''तुम्ही औरंगाबादला कसे जाणार?''

''पायी.'' वासुदेवाने उत्तर दिले.

नशिब चालून यावे तसे झाले. एक मोटार पानाच्या दुकानासमोर थांबली. ड्रायव्हरने पान मागितले. गाडीत दुसरे कोणीही नव्हते. ती गाडी तहशीलदाराची होती आणि ड्रायव्हर ती घेऊन औरंगाबादला जात होता. गुलाम अहमदने ड्रायव्हरला एका बाजूला घेऊन विनंती केली, की त्याच्या मित्राला, वासुदेवाला औरंगाबादला घेऊन जा. ड्रायव्हरने ते कबूल केले. अशा प्रकारे वासुदेव आणि उस्ताद गुलाम अहमद यांच्या गाठीभेटीची इथे ताटातूट झाली.

ड्रायव्हरने औरंगाबादला पोचल्यावर वासुदेवाला कासूपारक मोहल्ल्यात उतरवले.

औरंगाबादमधील जुन्या मित्राच्या मदतीने ते अयोध्येच्या प्रवासाची तयारी करीत होते. त्यांच्याजवळ पैसे नव्हते. पैसे उभारण्याचा एकच मार्ग त्यांना दिसत होता - तो म्हणजे हार्मोनियम-पॅरिस ट्यून असलेली विकणे. ती

शेठ मगनलाल यांचे घरी सुरक्षित रहावी म्हणून ठेवली होती.

खिशात तेरा रुपये. तेरा तारखेस वासुदेवाने अयोध्येच्या प्रवासाला सुरुवात केली. त्यांच्या बाबतीत तेरा आकड्याला महत्त्व आहे का? का तो केवळ योगायोग आहे? त्याने घर तेरा तारखेला, फक्त तेरा रुपये जवळ असताना सोडले होते.

त्यांच्या वळकटीत धोतरजोडी, दोन सदरे, कांबळी आणि लोटा होता. अयोध्येचे रेल्वे भाडे रु. ११ पडले. खिशात फक्त रु. दोन शिल्लक. ते प्रवासात व नंतर उपयोगी पडतील; पण अशा त्रुटीची त्यांना कधीच चिंता वाटली नाही.

॥ ॐ ॥



परमपूज्य गुरुजींची मुद्रा



परमपूज्य गुरुजींची मुद्रा

# ६
# अयोध्या येथील अनुष्ठान

वासुदेव फैजाबाद या रेल्वे स्टेशनवर अयोध्येला जाण्याकरिता उतरले. अयोध्येकरिता या ऐतिहासिक रेल्वे स्टेशनवर उतरावे लागते हे वासुदेवाला माहिती नव्हते. त्याच्या खिशात फक्त चार आणे म्हणजे सध्याचे पंचवीस पैसे होते. एक रिक्षाचालक त्याला जुन्या अयोध्यागावी दोन आण्यात (बारा पैसे) नेण्यास तयार झाला. उरलेल्या पैशात त्यांनी खाण्याकरिता चणे घेतले. संध्याकाळी रिक्षावाल्याने त्यांना त्या गावी रस्त्याचे चौकात उतरवले.

तो रस्त्याने चालत गेला. रस्त्याने जाणाऱ्याला शरयु नदीकडे-गावाचे बाहेरून जाणारा रस्ता विचारला. गावाबाहेर असलेल्या नदीच्या काठी रात्र घालवावी असा विचार त्यांनी केला.

माहिती मिळाल्यावर तो चालत गेला. गावाचे दोन्ही बाजूस त्याने दोन मोठी देवालये पाहिली. जरा पुढे गेल्यावर रस्त्याचे एका बाजूस एक देवालय होते. या देवळाचे दरवाजापाशी, जालना येथे पुजारी असलेले आणि वासुदेवाला ओळखणारे, नंदकिशोर उभे होते. दोघांनीही एकमेकांना एकाच वेळी पाहिले. त्यांना आश्चर्य वाटले. अनपेक्षितपणे भेट झाल्यामुळे अपरिमित आनंद झाला.

"पुजारीजी," वासुदेव म्हणाले.

"पंडितजी!" नंदकिशोरजींनी प्रत्युत्तर दिले अन् दोघेही धावत एकमेकांजवळ आले आणि त्यांनी आलिंगन दिले. वासुदेवाने अयोध्येला येण्याचा उद्देश नंदकिशोरला लगेच सांगितला. आपल्या मित्राची त्या रात्री सोय

करण्याच्या दृष्टीने तो लगेच विचार करू लागला.

पंडित नंदकिशोर हे अयोध्या येथे नेपाळी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मंदिराचे पुजारी होते. हे मंदिर नेपाळच्या राजघराण्याचे होते. त्यावेळच्या राजाची आजी तिच्या लवाजम्यासह तिथे त्यावेळी रहात होती. नियमाप्रमाणे कोणीही पुरुष, पुजारी सोडून त्या देवळाचे आवारात रात्री राहू शकत नसे. इथे सूचनेप्रमाणे आणि त्या वृद्ध राजमातेच्या आदेशानुसार सगळी व्यवस्था केली जात असे. पंडित नंदकिशोर यांनी वासुदेवाला वस्तुस्थिती सांगितली आणि दोघांनी ठरवले, की राजमातेला भेटून वासुदेवाला एक रात्र देवळात राहण्याची परवानगी द्यावी. त्यावर राजमातेने सूचना दिली, की मुख्य दरवाजाजवळील खोली पाहुण्या वासुदेवाला द्यावी, तसेच त्यांना स्वयंपाकघरातून अन्न द्यावे. राजमाताने नंदकिशोरला अशी सूचना दिली, की पाहुण्याला देवळाचे बाहेर पायऱ्यांजवळ उभे राहण्यास सकाळी सांगावे. त्यावेळी ती आरती करावयास येईल, त्यांना पाहील नि मग त्याच्याबद्दल निर्णय घेईल. त्यानंतर त्यांच्यासंबंधीचे पुढील आदेश देईल. हे ऐकून पंडित नंदकिशोरला आनंद झाला आणि वासुदेवाने अयोध्या येथील पहिली रात्र मोठ्या आनंदात घालविली.

दुसऱ्या दिवशी सकाळी वासुदेव देवळाचे पायऱ्यांजवळ मस्तक खाली करून, पायाकडे डोळे लावलेले, जुन्या पद्धतीच्या शिष्य रीतिरिवाजाप्रमाणे उभे राहिले. राजप्रमुखाकडून पाहणी होणार होती. थोड्याच वेळात राजमाता देवळात आली, त्याला पाहिले आणि तिला संतोष वाटला. *त्याच्यातील विनम्रता ओळखण्यास तिला वेळ लागला नाही. त्याच्या चेहऱ्यावरचे तेज एखाद्या तरुण योगी पुरुषासारखे होते.* नंतर तिने देवळात पुरुषाच्या वास्तव्यासंबंधीचा, राहण्यासंबंधीचा नियम वासुदेवाचे बाबतीत शिथिल करण्याची तयारी दाखविली. त्याप्रमाणे मुख्य दरवाजाच्या गेटजवळील खोलीत पंधरा दिवस राहण्याची परवानगी दिली, तसेच त्याचे जेवण राजघराण्याच्या स्वयंपाकघरातून येईल, असेही सांगितले. मधल्या काळात त्यांनी राहण्याची दुसरीकडे कोठेतरी व्यवस्था करावी, असे ठरले.

वासुदेवाने पंडित नंदकिशोरला येथे येण्याचा उद्देश सांगितला होता. त्याकरिता आपली स्वतःची खाजगी जागा असावी अशी इच्छा व्यक्त केली. तिथे दीर्घकाळ व्यत्यय न येता ध्यानधारणा करता यावी. नंदकिशोरने सर्वप्रकारे

जमेल ती मदत करण्याचे आश्वासन दिले. एका आठवड्यातच त्याला हवा तो एकांत जवळच्या व्यंकटेश मंदिरात मिळण्याची सोय झाली.

हे व्यंकटेश मंदिर पुरातन होते आणि पवित्र संस्थान मानले जात होते. त्याच्या देखभालीकरिता मोठी जहागिरी दिलेली होती. त्याचे येणारे उत्पन्न चांगले होते. इथले महंत, श्रीस्वामी रामप्रपन्नाचार्य, अनेक शाखांतील एक विद्वान म्हणून ओळखले जात होते. ते रामानुज पंथाचे कट्टर अनुयायी होते. त्यांचे वेदांवरील प्रभुत्व आणि टीका, तसेच वेदान्तशास्त्र आणि व्याकरण यावरील अधिकाराचा लौकिक हिंदुस्थानभर पसरला होता. ते वाराणसी येथील सुप्रसिद्ध व्याकरणालंकार पंडित शिवकुमारशास्त्री यांचे पट्टशिष्य होते.

पंडित नंदकिशोर श्रीस्वामी रामप्रपन्नाचार्य यांना भेटले. त्यांना वासुदेवाची माहिती सांगितली. अनुष्ठानाकरिता त्याला एकांतवासाची गरज आहे, त्याकरिता तशी जागा तो शोधत आहे. मदतीचे आश्वासन देण्यापूर्वी स्वामींना वासुदेवाला भेटावयाचे होते. ठरवलेल्या दिवशी त्यांची भेट झाली.

*वासुदेवाने स्वामींना आपला जीवनवृत्तांत सांगितला आणि आता कशाची इच्छा आहे, तेही स्पष्ट केले. तसेच संत एकनाथ महाराजांनी अयोध्येत जावयास सांगितले, हे पण नमूद केले. त्यांच्या उपासनेकरिता एकांतवास लाभल्यास त्याला आनंद होईल. त्या तरुण माणसाच्या निश्चयाने श्री स्वामी रामप्रपन्नाचार्य प्रभावित झाले. त्यांनी लगेच वरच्या मजल्यावर एक खोली दिली. वासुदेव कृतज्ञतेने ह्या खोलीत राहावयास आले.*

व्यंकटेश मंदिराचे व्यवस्थापक मंदिरात जे कोणी राहात असतील, त्यांची अन्नपाण्याची सोय करीत असत; परंतु सक्त नियम असा होता, की जे देवळातील कार्यक्रमास सकाळी-संध्याकाळी हजर राहतील, त्यांनाच अन्नदान मिळेल. या कार्यक्रमांना वेळ लागत असे. सुरुवातीला नवे पाहुणे - वासुदेव ह्या कार्यक्रमांना हजर रहात. पण नंतर त्यांच्या असे लक्षात आले, की ह्या कार्यक्रमांना हजर राहिल्यानंतर त्यांना फारच थोडा वेळ त्यांच्या स्वत:च्या उपासनेकरिता शिल्लक राहात होता. त्यांना कळून आले, की केवळ अन्नपोषणाकरिता राहिल्यास त्याची सुप्त इच्छाही तशीच राहून जाईल. त्याची दुसरी बाजूही तितकीच बरोबर होती. ह्या अन्नदानाने ते विचलित झाले. केवळ शरीराला अन्न पाहिजे म्हणून आणि सुखवस्तू जीवन हवे म्हणून तो इथे आला होता काय? नाही. तसे

नाही. ह्यापूर्वी अनेक वेळा अन्नाशिवाय कित्येक दिवस त्यांनी काढले होते. त्यांनी पुन्हा तसेच करावयाचे ठरवले. श्री स्वामी रामप्रपन्नाचार्य ह्यांना भेटून आपली अडचण त्यांना सांगावी आणि देवळातील हजेरीबाबत सूट मिळावी; पण तो दुसऱ्या प्रश्नाचा विचार करणार नव्हता.

देवळातील उपस्थिती आणि त्याचबरोबर मिळणारे अन्न ह्यामधून सूट मिळाल्यामुळे त्यांनी बराच वेळ ध्यानधारणेत घालवला. त्यांचा नित्यनेम असा होता - सकाळी शरयू नदीपर्यंत जाणे, आंघोळ इ. झाल्यावर आठ वाजण्याचे सुमारास खोलीत परत येणे. खोलीतील एकांतवासात ते आसन घालून दीर्घकाळ म्हणजे सहा ते आठ तास सलग ध्यानधारणा करीत. ध्यानधारणा दुपारी चारचे सुमारास संपे. मग ते थोडा वेळ स्वस्थ पडत त्यामुळे त्यांची गात्रे पूर्ववत कामे करू लागत.

*पण शरीराला निश्चित अशा आहाराची गरज होती. त्यांच्या मनात आले, पूर्वी काही वेळा ते झाडाच्या पाल्यावर राहिले होते. आता तसे का नको? त्यांनी पुजाऱ्याला विनंती केली, की तुळशीची पाने देवळात पुजेचे वेळी शाळिग्रामाला वाहिलेली असतात- ती पूजा झाल्यावर बाहेर ठेवावीत. ही पाने अन्न म्हणून ते ग्रहण करतील. पुजाऱ्याने तसे कबूल केले.*

*अन्न मिळण्याची अशी व्यवस्था केल्यावर ते ध्यानधारणेत दीर्घकाळ मग्न होऊन जात. ध्यानधारणेनंतर ते थोडा वेळ विश्रांती घेत. त्यामुळे रक्ताभिसरण आणि शरीराची हालचाल नीट होई. अशाचवेळी तुळशीची पाने ते चघळून खात आणि भरपूर पाणी पीत.*

अशा प्रकारे एक आठवडा झाला. देवळातील त्यांची अनुपस्थिती इतरांचे नजरेस आली. त्यामुळे देवळाच्या आवारात राहून तेथील धार्मिक उपचारात भाग न घेता, राहण्याचे प्रयोजन काय? असा प्रश्न इतर विचारू लागले. येथे राहणारा असे स्वातंत्र्य कसे घेतो आणि तेही बंडखोरी करून? सुरुवातीला होणारी ही कुजबूज लगेच तक्रारीच्या स्वरूपात महंत स्वामी रामप्रपन्नाचार्य यांच्या नजरेस आणली. आचार्यांना पूर्वी झालेले बोलणे आठवले. त्यांनी व्यवस्थापकाला वासुदेवाचे खोलीत जावयास आणि शांतपणे तिथे काय चालले आहे ते पहा असे सांगितले. व्यवस्थापकाने सांगितल्याप्रमाणे तसे केले. त्यांनी आचार्यांना सांगितले, की वासुदेव त्याच्या खोलीत दीर्घ ध्यानधारणेत आहे.

तिथे काही हालचाल होत नव्हती. त्याचे शरीर काष्ठवत झाल्यासारखे वाटत होते. ह्यावरून काय आहे ते समजावे. आचार्यांनी सर्वांना सांगितले, की त्याला कोणत्याही प्रकारे त्रास देऊ नका. ते स्वत: ह्याबाबतीत लक्ष घालतील आणि योग्य ती कृती करतील.

नंतर स्वामीजी एक दिवस स्वत:च तपासाकरिता आले. व्यवस्थापकाला वासुदेव जसे आढळले तसेच त्यांनाही ते दीर्घ ध्यानावस्थेत आढळले. काही मिनिटे त्यांनी त्यांना पाहिले. वारंवार स्वामीजींनी निरीक्षण केले. त्यावरून त्यांना कळून आले, की या ठिकाणी हा साधक अगदी वेगळ्या स्वरूपात आहे. स्वामीजींनी एका रात्री त्यांना बोलावले आणि दोघांत बराच वेळ चर्चा झाली. स्वामीजींना समजून घ्यावयाचे होते, की कोणत्या प्रकारची साधना ते करीत आहेत आणि त्यांचा अनुभव काय आहे? त्यावर वासुदेवाने त्याच्या स्वत:च्या साधनेविषयी तपशीलवार सांगितले आणि त्यातील आजपर्यंत आलेले अनुभवही कथन केले. खुद्द संत एकनाथ महाराज यांनीच अयोध्येला आपली इच्छा पूर्ण करण्याकरिता जावे, असे सांगितले. तो प्रसंगही त्यांनी वर्णन करून सांगितला. श्री स्वामी रामप्रपन्नाचार्य हे अगदी गंभीरपणे ऐकत होते. वासुदेवाचे हे आध्यात्मिक साधनेतील अनुभव भारावून टाकणारे होते.

*स्वामीजींनी त्यांना रामानुजपंथातील चांगल्या, सुरक्षित, गुप्त साधनेची त्यांच्या उपासनेकरिता माहिती दिली. ही अंतस्थ उपचारपद्धती फक्त लायक आणि ज्यांची दीर्घ उपासना झालेली आहे, अशांकरिता होती. स्वामीजींना वासुदेवापेक्षा कोणीही अधिक लायक माणूस आढळला नाही. स्वामीजींनी पाहिले की फक्त अन्नपाण्याचीच त्याची नीट सोय आहे. इतरही जरुरीच्या बाबींची सोय व्हावयास पाहिजे. स्वामीजींचा उदारपणा आणि मदतीचे आश्वासन मिळाले. वासुदेवाने त्याचे प्रयत्न अधिक जोरदारपणे-जोमाने सुरू केले. स्वामीजींनी उपासनेची जी रहस्ये सांगितली, ती अवलंबल्यानंतर त्याचे काही परिणाम दिसू लागले. त्यामुळे वासुदेव मोठ्या आनंदात जणु बुडून निघाले. ते अंतस्थ आवाज (शब्द) ऐकू लागले. फक्त देवाला माहिती असतील असे (शब्द) आवाज. मंत्र आणि गुप्त संकेत, उतारे-पवित्र ग्रंथांतील-त्यांना आठवू लागले. वासुदेवाने स्वामीजींना हेही अनुभव सांगितले.*

स्वामीजींना हा खराखुरा साक्षात्कार वाटत होता. कारण पुष्कळ शिष्यांनी

वर्षानुवर्षं साधना केली तरी असा अनुभव त्यांना मिळाला नव्हता. स्वामीजींना आश्चर्य वाटले. ते आनंदित झाले. *ह्या नव्या पाहुण्याने सत्य आणि रहस्याचा शोध घेतला तो त्यांचे इतर शिष्य घेऊ शकले नव्हते.*

स्वामी श्रीरामप्रपन्नाचार्यांना संतोष आणि समाधान वाटले. त्यांना अगदी योग्य, आध्यात्मिकतेची आस असलेला तरुण, त्यांचा वारस महंत म्हणून हवा होता. जर वासुदेव संन्यास घेऊन महंत होणार असतील तर स्वामीजी निवृत्त होऊन संन्यस्त वृत्तीने ध्यानधारणा आणि संपूर्ण उत्सर्जन करणार होते. स्वामीजींनी वेळ न घालवता वासुदेवाला आपली इच्छा सांगितली. ते हा स्वीकार करतील? स्वामीजींना होकार अपेक्षित होता; पण वासुदेव फारसे उत्साही नव्हते. तसेच ही काही पहिली मागणी नव्हती. मागील प्रकरणात अशा चालत आलेल्या मागण्यांचा उल्लेख आहे. त्यातून त्यांनी सुटका करून घेतली. वरील मागणीबाबत त्यांनी स्वामी रामप्रपन्नाचार्यांना सांगितले, की त्यांचे लग्न झाले आहे व त्यांना मुलगाही आहे. इथे एक गोष्ट सांगितली पाहिजे, की १९३६ सालच्या सुरुवातीला वासुदेवाला मुलगा झाला होता. वासुदेव विवाहित आहे म्हणून स्वामीजींना हरकत घेण्याचे कारण नव्हते. स्वामीजींनी सांगितले, की तो गृहस्थाश्रम सोडू शकतो आणि संन्यास घेऊ शकतो. बायको (पत्नी) आणि मुलाची देखभाल देवळाचे व्यवस्थापक करतील. कारण त्यांना सुमारे सात गावांच्या जहागिरीचे उत्पन्न होते. मुलाच्या शिक्षणाची, परदेशात जावयाचे असले तरी, तरतूद केली जाईल. वासुदेवाला याबाबत स्पष्ट सांगण्यात आले, की श्री स्वामी रामप्रपन्नाचार्य नकारात्मक उत्तर घेणार नाहीत. कारण, वासुदेवाला महंत आणि आपला वारसा म्हणून नेमण्यास उत्सुक झाले होते; पण वासुदेव होय म्हणणार नव्हता. वासुदेवाने पुन्हा सांगितले, की मला संन्यास घ्यायचा म्हणजे त्याच्या पत्नीची परवानगी पाहिजे. त्याचाच अर्थ तिनेही संन्यासी होण्यासारखे आहे. स्वामीजींची इच्छा त्यांनी पूर्ण केली नाही. डॉ. नंदलाल भारती, अकोला यांचीही परवानगी हवी होती. कारण एक प्रकारे ते त्यांचे गुरू होते.

आता श्री स्वामी रामप्रपन्नाचार्य एक गोष्ट करू शकत होते, ती म्हणजे वासुदेवाने पत्नीचा सल्ला घेऊन तिला जर वासुदेव संन्याशी झाले तर काय फायदा होईल, हे सांगावे. नंतर त्यांनी डॉ. नंदलाल भारतीची मान्यता घ्यावी. ह्याकरिता वासुदेवाने त्यांच्या गावी - कालुपुरास जाणे भाग होते.


वासुदेवाजवळ पैसे नव्हते, हे आपल्याला माहिती आहेच. नंदकिशोर पुजारीने खर्चाकरिता रु. पंचवीस दिले आणि शुभेच्छा व्यक्त केली.

वासुदेवाने परत आल्यावर आपल्या पत्नीला शांतपणे परिस्थिती समजून सांगितली. त्यांचे जीवन म्हणजे पत्नीचे व मुलांचे, वासुदेवाने संन्यास घेतल्यावर कसे होईल, ते सांगितले. त्यांनी ह्या प्रश्नाची दुसरीही बाजू स्पष्ट केली. जर ती त्यांना संन्यास घेण्यास संमती देणार नसली तर त्यांना काटकसरीचे जीवन, एकाकीपणाचे आणि तुटपुंजे जगावे लागेल. तिने त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले. ती त्यांना संन्यास घेऊन देण्यास तयार नव्हती. कारण ते तिचे सर्वस्व होते. तिचा सारा आनंद तिथेच होता. जीवनाचा साथीदार आणि कुटुंबप्रमुख म्हणून ती नरकयातना सहन करण्यास तयार होती; पण त्याच्याशिवाय ती स्वर्गीय सुख, महंताचे मोठेपण, त्याची समृद्धी इ. तुच्छ मानणारी होती.

तिच्या शब्दावर ती पतीच्या सहवासात अनुकूल-प्रतिकूल परिस्थितीत राहिली. एकाकीपणा आणि विस्कळितपणा बऱ्याचवेळा त्यांच्या जीवनात आला. अगदी तिचा १९७७ मध्ये शेवट होईपर्यंत आला; पण तिने कधीही एकही शब्द उद्वेगाचा वा असंतुष्टतेचा काढला नव्हता.

|| ॐ ||





परमपूज्य गुरुजींच्या मुद्रा

ॐ

# ७

# पवित्र संगमातील स्नान

संन्यास घेऊ नये हा प्रश्न एकदाचा आणि कायमचा सुटला. वासुदेवाने एकट्यानेच तिसऱ्यांदा घर सोडले. ह्यावेळीसुद्धा तो महाराष्ट्रातील अकोला शहरी प्रथम आला. त्याला महाराष्ट्राबद्दल विशेष आकर्षण होते. कारण महाराष्ट्रात संतांची परंपरा अखंडपणे चालू आहे. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत रामदास इ. थोर संतांनी आपल्या कार्याने फार मोठे अधिष्ठान निर्माण केले आहे. महाराष्ट्रात परत येण्याचे दुसरे कारण म्हणजे ते ह्या भागात यापूर्वी बरेच दिवस राहिले होते. येथील रहिवासी, मठ-संस्थांचे पुजारी त्यांच्या परिचयाचे झाले होते.

इथे येऊन त्यांना दुसरा एक प्रश्न सोडवावयाचा होता, तो म्हणजे पोटापाण्याचा उद्योग, चरितार्थ. त्यांनी गृहस्थाश्रमात आता रहावयाचे ठरवले होते. त्यामुळे कुटुंबाला आणणे हे पहिले काम. त्यालाही पुष्कळ उशीर झाला होता. या सर्वच कारणाने त्यांना महाराष्ट्र प्रांत हा इतर प्रांतांपेक्षा अधिक सोईस्कर वाटला. या संदर्भात वासुदेवांना अकोला येथील डॉ. नंदलाल भारतीचे आश्वासक शब्द आठवले. त्यांच्या घराची दारे वासुदेवांना सदा खुली होतीच. हे आश्वासन लक्षात ठेऊनच वासुदेव अकोल्याला पुन्हा आले.

मधल्या काळात महंत श्री स्वामी रामप्रपन्नाचार्य यांना वासुदेव अयोध्येस परत न आल्यामुळे काहीच कळले नव्हते, म्हणून त्यांनी वासुदेवाची पत्नी व डॉ. नंदलाल भारती यांना लिहिले, की त्यांनी वासुदेवाने त्यांचे वारस व्हावे

म्हणून त्याचे मन वळवून सहकार्य करावे. डॉ. भारती वासुदेवांना संन्यास घेऊ देणार नव्हते. त्यांची पत्नीही तयार नव्हती.

महंत श्री स्वामी रामप्रपन्नाचार्य यानंतर फार दिवस जगले नाहीत. सहा महिन्यानंतर तेही स्वर्गवासी झाले.

अकोल्याला वासुदेव परत आल्यावर तडक ते डॉ. नंदलाल भारती यांच्याकडे गेले. वासुदेव त्यांना स्वामीजी म्हणत. एका अर्थाने ते वासुदेवाचे गुरूच होते. डॉ. भारती यांना ह्या तरुणाबरोबर काही वर्षांपूर्वी झालेली पहिली भेट आठवली. प्राथमिक स्वरूपाची बोलणी झाल्यावर डॉ. भारतींनी सुचवले, की वासुदेवाने त्यांच्याकडेच राहावे आणि औषध-उपचाराचा अभ्यास करावा. त्याचा उपयोग त्यांना भावी जीवनात उपजीविकेकरिता होईल. हा प्रस्ताव वासुदेवाला एकदम पसंत पडला. कारण त्याची आता स्थिर जीवन जगण्याची तयारी होती.

डॉ. विनोदाने म्हणाले, ‘‘तुम्ही माझ्याजवळ राहिलात की तुम्हाला माझ्यातील त्रुटीही काढता येतील.’’

‘‘नाही, स्वामीजी नाही. अजिबात नाही. माझे तुमच्याशी जे नाते आहे, त्याला तुमच्यातील मर्यादा शोधण्याची परवानगी नाही.’’ वासुदेवाने ठासून नम्रपणे पण निर्धाराने सांगितले. अशाप्रकारे १९३७ मध्ये वासुदेव डॉ. भारतींच्या दवाखान्यात त्यांचे मदतनीस म्हणून रुजू झाले. त्याचबरोबर त्यांनी आयुर्वेदिक व होमिओपॅथीचा अभ्यासही सुरू केला.

डॉ. भारती हे आयुर्वेदाचार्य होते. त्यांची प्रॅक्टिसही उत्तम होती. त्यांच्या दवाखान्यात होमिओपॅथीचा विभाग होता. डॉ. झा-बंगाली होमिओपाथ हे सहाय्यक होते. अन्य चार कंपौंडर होते, ते डॉ. भारतींना दवाखान्यात मदत करीत. वासुदेवाने त्याचे काम सुरू केले, तसेच होमिओपॅथीच्या अभ्यासास दवाखान्यात सुरुवात केली. डॉ. झा रुग्णांना तपासताना ते बारकाईने निरीक्षण करीत, तक्रारींचे मनात टिपण करीत. रोगाची लक्षणे, त्यावर डॉक्टरांचे झालेले निदान, त्याकरिता दिलेली औषधे, त्याचा रुग्णावर झालेला परिणाम, सुधारणा इ. आपल्या फावल्या वेळात ते वैद्यकीय विषयावरची पुस्तके सुद्धा अभ्यासत, त्यांचे निरीक्षण आणि अभ्यास इतका होऊ लागला, की एका आठवड्यातच त्यांचा आत्मविश्वास - निदान करणे, नित्यनैमित्तिक रोगावर औषध देणे वाढू

लागले.

त्यांनी आपल्या ज्ञानाचा उपयोग बऱ्याच पेशंटवर करून त्यांना योग्य ते औषध देऊन पाठवले. त्या पेशंटना लवकर आराम मिळाला. तसे त्यांनी वासुदेवांना सांगितलेही. त्यांनाही पेशंट लवकर बरा झाला, याचा आनंद झाला. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास चांगला वाढला. दिवसामागून दिवस जात होते. बरेच पेशंट वासुदेवांचा सल्ला घेत होते. त्यामुळे डॉ. झा यांची लोकप्रियता पेशंटमधून कमी होत गेली. कारण 'छोटास्वामी' असे पेशंट वासुदेवांना प्रेमाने म्हणत. हेच खरे डॉक्टर. त्यांनी दिलेल्या औषधाने लवकर आराम मिळतो. डॉ. झांच्या लक्षात ही परिस्थिती यावयास वेळ लागला नाही. ते लवकरच दवाखाना सोडून गेले.

हे असे का घडले, याचा आढावा घेणे अवघड नव्हते. वासुदेवांनी पहिल्या दिवसापासूनच, अगदी मनापासून निष्ठापूर्वक औषधांचा अभ्यास केला. सखोल निरीक्षण केले. त्यांना प्राप्त झालेल्या आध्यात्मिक शक्तीमुळे सखोल दृष्टी लाभली. ते वरदानच ठरले. असे पुष्कळ प्रसंग आले, की त्यावेळी त्यांची गूढ विद्या रोगाचे निदान करण्याकरिता, त्यावर योग्य ते उपचार करण्याकरिता आणि त्यामुळे रोग्यांना लवकर बरे वाटण्यास उपयोगी पडली. त्यामुळे डॉ. भारतींच्या दवाखान्यात रुग्णांची गर्दी होऊ लागली. असाच एक प्रसंग नमूद करण्यासारखा आहे. हा प्रसंग डॉ. भारतींकडे सहा महिने राहिल्यानंतर घडला. एक दिवस डॉ. भारतींचा सल्ला घेण्याकरिता एक तरुण स्त्री रुग्ण आपल्याबरोबर मध्यम वयाच्या मोठ्या बहिणीला घेऊन दवाखान्यात आली. दवाखान्यात डॉ. भारती नव्हते. काही वेळ ते डॉ. भारतींकरिता थांबले; पण डॉक्टर आले नाहीत. ती वयस्कर स्त्री अस्वस्थ होऊ लागली. एका कंपौंडरने सांगितले, की तिला घाई असेल तर त्यांनी छोटास्वामींचा सल्ला घ्यावा. ते शेजारच्या खोलीत बसलेले आहेत. त्यावर ती वयस्कर स्त्री वासुदेवांकडे आली. तिने सांगितले, की ह्या तरुण मुलीला तपासा व औषध द्या. वासुदेव तितकेसे उत्सुक नव्हते. शक्यतो ते स्त्रीरुग्णांना टाळत असत. स्त्रियांपासून अलिप्त राहून ते प्रॅक्टिस करीत. अगदी बसमध्ये सुद्धा ते स्त्रियांच्याजवळ बसणे टाळीत असत. ही नाराजी पाहून ती तरुण मुलगी चिडली अन् म्हणाली,

"मग, तुम्ही इथे का बसलात? तुम्ही पहाण्याची वस्तू आहे का? तुम्ही

जर स्त्री रुग्णांना तपासणार नसलात तर येथून का जात नाही? रस्त्याच्या कडेला बसा आणि हजामतीचे दुकान काढा.''

तिने शेरा मारला. हा नुसता टोमणा नव्हता तर आव्हानही होते. ते लगेच त्या स्त्रीला तपासायला उठले. त्यांनी तिचा हात, तिची नाडी तपासावयास हातात घेतली. दुसऱ्या पद्धतीनेही पाहिले. काही वेळाने त्या मुलीची जन्मापासूनची ते त्या दिवसापर्यंतची स्थिती सांगितली. सर्व गुपिते मांडली. अर्ध्या तासात संपूर्ण तपासणी केली. त्यावर योग्य ती औषधे दिली.

ह्यानंतर त्या दोन स्त्रिया कधीच दवाखान्यात आल्या नाहीत. वासुदेवाला हेही माहिती नव्हते, की त्या दोघींनी वरील प्रकार डॉ. भारतींना सांगितला होता काय? जर त्यांनी तसे केले असते तर स्वामीजींनी त्यांना कधीच त्याबद्दल विचारले नसते. ह्या प्रकारानंतर सुमारे दोन वर्षांनी एके दिवशी त्यांना स्वामीजींबरोबर एका पेशंटला भेटावयास जायचे होते. ते टांग्यात बसले. त्या दोन स्त्रियांच्या घराजवळ स्वामीजींनी टांगा थांबविला. स्वामीजी घरात गेले. वासुदेव टांग्यातच बसून राहिले. त्या स्त्रियांशी बोलत असताना स्वामीजी सहजपणे म्हणाले, की धाकटे स्वामी टांग्यातच वाट पहात बसले आहेत. त्यापैकी वयस्कर स्त्रीने ते ऐकल्यावर ती एकदम बाहेर आली. वासुदेवाला हाताला धरून त्यांनी घरात आणले. त्यांना चांगल्या प्रकारची वागणूक दिली. त्यांची प्रतिष्ठा राखली.

काही काळ लोटल्यावर वासुदेवाने आयुर्वेदिक व होमिओपाथिक औषध पद्धतीमध्ये वरच्या दर्जाचे कौशल्य प्राप्त केलेले आढळून आले. दोन्ही पद्धतींचा विचार करून परिणामकारक औषधयोजना करीत. आपण वर पाहिले आहेच, की त्यांच्या हाताला चांगला गुण येत असे. गर्दी असली तरी औषधाकरिता रुग्ण त्यांच्याकडे येत असत. बऱ्याच वेळा मोठ्या स्वामींना टाळून त्यांना मान देत असत. बरेच रुग्ण त्यांचा सल्ला घेत असत. नियमित येणारे स्वामीजींचे जुने रुग्णसुद्धा छोटास्वामीजींकडून तपासून घेत.

वासुदेव स्वामींजींच्या निकटच्या मित्रपरिवारापासून अलिप्त रहात. त्यांना येणारी सदिच्छाभेटीची आग्रहाची निमंत्रणेसुद्धा ते नम्रतेने नाकारीत. त्यांनी काटेकोरपणे शिष्याने गुरूशी नाते कसे ठेवावे हे धोरण अवलंबले. योगासंबंधी डॉ. भारतींकडून शिकण्यासारखे काही नव्हते. प्रत्यक्षात योगसाधनेतील काही

चुकीच्या मार्गदर्शनामुळे त्यांना तीव्र मुखपीडा सहन करावी लागली. ह्या अभ्यासपद्धती त्यांना थांबवाव्या लागल्या.

तीन वर्षांच्या अगदी जवळच्या सहवासामुळे डॉ. भारतींना ह्या शिष्याचे जीवन आणि अध्यात्मातील प्रगती याबाबत सखोल अनुभव आला. त्याचाच परिणाम होऊन एक दिवस डॉ. भारतींनी वासुदेवाला सुचवले, की तुम्ही संन्यासी होऊन महंत व्हा आणि वाशी तालुक्यात रिसोड या गावाजवळील भड जहागिरीची देखभाल पहा. ह्या प्रस्तावाचा वासुदेवांवर काहीही परिणाम झाला नाही. त्याने नम्रतापूर्वक मात्र ठामपणे नकार दिला. पुढील काही दिवस वासुदेवांनी नेहेमीप्रमाणे औषधोपचार आणि अभ्यास डॉ. भारती स्वामीजींकडे चालू ठेवला. एके दिवशी डॉ. भारतींना त्यांच्या इष्टमित्रांनी सहज सुचवून पाहिले, की त्यांनी दवाखाना वासुदेवांचे स्वाधीन करावा. कारण त्याने रुग्णांत विश्वास निर्माण केला आहे आणि डॉ. भारतींनी निवृत्त होऊन संन्यासाचे जीवन-संन्यस्त वृत्तीने रहावे. या सूचनेवर डॉ. भारतींनी विचार केला. त्यांनाही वाटू लागले, की आपला परमशिष्य वैद्यकीय व्यवसाय स्वतःच करू शकेल आणि जीवनात स्थिर होईल, म्हणून डॉ. भारतींनी सल्ला दिला, की त्याने कोठेही जावे. योग्य त्या ठिकाणी स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय करावा. यानंतर थोड्याच दिवसांत वासुदेवांनी आपल्या गुरूचा (डॉ. भारती) निरोप घेतला आणि व्यापक स्तरावर विश्वसंचार सुरू केला.

पण येथून जाण्यापूर्वी त्यांना विशेष परिणामकारक अनुभव आला. तो पुढील भागात सांगितला आहे. डॉ. भारतींच्या दवाखान्यातून स्वतःच्या खोलीत परत आल्यावर वासुदेवाच्या मनावर निराशेचे सावट बसले. डॉ. भारतींचे शब्द "तुम्ही पुरेसे पात्र झाला आहात. तुम्ही जा. तुमचा व्यवसाय जिथे तुम्हाला आवडेल त्या ठिकाणी सुरू करा." या उद्गारामुळे अनेक प्रश्न त्यांच्या मनात निर्माण झाले. गेल्या तीन वर्षांत डॉ. भारती यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली, वासुदेवांनी आत्मविश्वास आणि लौकिक - निरनिराळ्या प्रकारचे रोगनिदान करण्यात आणि त्यावर उपचार करण्यात मिळविला. उमेदवारीचा तो काळ आता संपला.

आतापर्यंत डॉ. भारती वासुदेवांच्या गरजा भागवत होते आणि त्यामुळे त्यांना काळजी नव्हती. पण आता त्यांना मिळवावयास हवे होते. केवळ

स्वत:करिता नव्हे; तर पत्नी आणि दोन लहान मुलांकरिताही. आपल्या कुटुंबियांना राहावयास आणण्यास बराच उशीर झाला होता. आता ते पत्नी आणि मुले यांना विसरू शकत नव्हते.

आता काय करावे? जरी त्यांनी इतरत्र कोठे दवाखाना काढावयाचे ठरवले तरी त्यांच्याजवळ सुरुवातीला लागणाऱ्या खर्चाकरिता पैसे नव्हते. जवळच्या गावी बसने जाण्याकरितासुद्धा त्यांच्याजवळ पैसे नव्हते. जरी त्यांना कसाबसा दवाखाना काढण्यात यश आले, तरी त्यांचा दयाळू स्वभाव, गरिबांबाबत व खेडुतांबाबत असा होता, की त्यांना पुरेसा पैसा कुटुंबियांच्या कमीतकमी गरजा भागवण्यापुरता सुद्धा मिळाला नसता.

काळजी आणि नैराश्य यामुळे ते सगळ्या बाजूने त्रासून गेले होते. दु:ख अगदी खोलवर झाले. यापूर्वी त्यांनी कधीही असे दु:ख, मन:स्ताप अनुभवले नव्हते. आपल्या जीवनातील भूतकाळातील घटना - बालपणापासून ते आजपर्यंतच्या- त्यांच्या मनात गोंधळ करू लागल्या. त्यांना आपल्या आईचा प्रेमळ चेहेरा आठवला. तिचा ऐहिक जीवनातील शेवट आठवला. त्यावेळी ते फार तर तीन वर्षांचे असतील.

साऊथ अमेरिका, ब्रिटिश गियानातील जॉर्ज टाऊन शहर. पश्चिम किनाऱ्यावरील गोल्ड फींच भागातील आजोबांच्या घरातील गच्चीवर तो खेळत होता. वेळ दुपारची. त्याची आई मरणासन्न झाली होती. मृत्यू म्हणजे काय हे त्याला माहीत नव्हते. त्याला एवढेच आठवले, की मोठ्या उत्सुकतेने तो गच्चीवर पतंग उडवत असताना, त्याला घाईघाईने जिन्यावरून त्यांच्या आईच्या खोलीत अंथरुणाजवळ आणले. तिथे इतर नातेवाईक, मित्रपरिवार, शेजारी जमिनीवर बसले होते. तो दिवस ईस्टर रविवारचा होता. पवित्र ग्रंथांचे मोठ्याने वाचन चालू होते. त्याचे वडिलही तिथे होते. त्याला आईजवळ नेले, तेव्हा तिने पाहिल्यावर ती रडू लागली. तिची वेळ भरत आली होती. त्याला तिच्या तोंडात पाणी घालावयास सांगितले. त्याला आठवले, की त्याने चमच्याने पाणी तिच्या तोंडात घातले. ती थोडं पाणी प्याली. उरलेले तिच्या तोडाच्या एका बाजूने बाहेर आले. एका सेकंदातच ती गेली ! तिच्या डोळ्यात तरीही अश्रू होते. नंतर आईविना छोट्या वासुदेवाची अनेक वर्षे गेली. त्याच्या आध्यात्मिक ओढीमुळे तो इतरांपासून अलग होत असे. नंतर जॉर्जटाऊन येथून हिंदुस्थानकडे

येण्याची त्याला ओढ लागली. त्याच्या वडिलांनी, त्याच्या काकाला व आत्याला स्वत:ची बरीचशी इस्टेट आणि व्यापार हिंदुस्थानात येण्यापूर्वी दिला होता. त्या काकाने, आत्यानी किंवा आजोबांनी आणि इतर नातेवाईकांनी वासुदेवाबद्दलची चौकशी, त्याने ते ठिकाण सोडल्यापासून कधी केली नाही. हिंदुस्थानात आल्यावर काही वर्षांनी त्याचे वडील रामेश्वरजीही त्याला पोरके करून मरण पावले. त्यानंतर सुद्धा तेथील नातेवाईकांनी त्याच्यासंबंधी काहीच विचारपूस केली नाही. त्यांच्या वडिलांबरोबरचे सेवई येथील दिवस त्याला आठवले. त्याचे वडील त्याच्यावर क्रुद्ध आणि रुष्ट होत. त्याला हेही आठवले, की यावेळी त्याने बरोबरच्या मुलांबरोबर शाळेत जाण्याचा आग्रह केला, तेव्हा ते किती संतापले होते. त्याने आपल्या वडिलांना संस्कृत शिकावयास बनारसला पाठवा असे सांगितल्यावर त्याच्या कोवळ्या पाठीवर गुद्दे मारले. त्याऐवजी त्याला शेतात गाईगुरे, म्हशी यांच्या सहवासात वेळ घालवावा लागला. तो पंधरा वर्षांचा झाला, तेव्हा त्याचे वडीलही वारले.

नंतर अल्पकाळ तो कालुपुरा गावी त्याची आत्या-सुदानियाँ-जिने खरोखर त्याला माया लावली, तिथे होता. इथे त्याला एक कडवट अनुभव आला. त्याच्या नातेवाईकांच्या कुलगुरूकडून तो अस्पृश्य म्हणून गणला गेला होता. बरीच वर्षे भ्रमंती झाली होती. त्याचा चलच्चित्रपट त्याला आठवला. अगणित त्रास त्याने सहन केला होता; पण त्याला दैवी कृपा प्राप्त झाली होती आणि त्याची प्रचितीही येत होती. अजमेरच्या ख्वाजासाहेबांनी तर त्याला सोन्याचा तुकडा भेट म्हणून देऊ केला होता आणि जी इच्छा असेल ती पूर्ण करण्याची तयारी दाखवली होती, परंतु त्याने कशाचीही आणि कोणाचीही मेहेरबानी पत्करली नाही. त्याने सातत्याने आणि चिकाटीने दैवी कृपा प्राप्त व्हावी म्हणून कोणत्याही भौतिक सुखाची, साधनेची इच्छा धरली नाही.

तो वेद, उपनिषदे, श्रीमद्भागवत इ.मुळे प्रभावित झाला होता. दिव्य सत्याचा शोध, देवत्वाचे स्वरूप, श्रीकृष्णाने अर्जुनाला जो दिव्य उपदेश केला, त्यामुळे त्यांच्यात धैर्य आले होते. तो सुखी-समाधानी होता. तरीही ह्या दुःखद आणि नैराश्याने काळवंडून गेलेल्या क्षणी गीतेतील वचने त्याचे समाधान करू शकत नव्हती.

अशा प्रकारचे दु:खी, कष्टी जीवन जगण्यात कोणता ऐहिक हेतू आहे?

त्याचे विदीर्ण झालेले अंतःकरण उत्तर शोधीत होते. ''काही उपयोग नाही, अजिबात नाही'' - त्याला वाटले, कोणीतरी आपल्याला सांगत आहे. आत्महत्या करण्याचा विचारही मनात आला. दुःखी आणि नैराश्यपूर्ण जीवनाचा शेवट का करू नये? हे जीवन क्लेशकारक, कष्टमय. ह्या जीवनात एकाकीपणा आणि अपूर्णता आहे. पुन्हा पुन्हा होणाऱ्या ह्या गोष्टीचा शेवट हृदयात एकदाच वार करून कायमचा सुटेल. आपण फास लावून घ्यावा का? किंवा आपण विषप्राशन करावे का? निरनिराळ्या विषांचे ज्ञान त्याच्याजवळ पुष्कळच होते. झोपेच्या गोळ्यांचा डोस जास्त घेतल्यास त्याला काहीएक त्रास न होता शेवट होईल. नक्कीच ह्यापैकी कोणत्याही एका इलाजाने त्याची स्वतःची काळजी आणि दुःख दूर होईल.

त्याने जर आत्महत्त्या केली तर त्याच्या पत्नीची व मुलाची काय अवस्था होईल? ही आत्महत्त्या म्हणजे इच्छेविरुद्ध जीवनातून पळून जाणे, जीवनाला सामोरे जाण्यातील अकार्यक्षमता होय. धन मिळवणे आणि कुटुंबाचे पालनपोषण करणे याबाबत अकार्यक्षमता आल्यामुळेच दुःखद विचारांची ही मालिका आणि संताप त्याला अनावर होत होता. त्यामुळे तो आता स्वतःच्या बाबतीत अलिप्तता दाखवत होता. पण तो कोठल्याही ठरवलेल्या पद्धतीने आत्महत्त्या करणार नव्हता. त्याला माहीत होते, की योगसाधनेत 'रेचक-कुंभक' पद्धत आहे. इथे श्वास रोधला जातो. त्या रेचक प्रकारात आत्मज्ञानाचे आणि कुंडलिनी जागृतीचे (किंवा लेटंट सर्पंट) सामर्थ्य आहे. म्हणून त्याने अगदी विमनस्कपणे हा प्रयोग करावयाचे ठरवले. प्रथम त्याने श्वास घ्यावयाचा नाही, असे ठरवले. यामुळे मृत्यू आला तर- कारण, श्वास नाही म्हणजे मृत्यूच- मग ठीकच. पण याविरुद्ध झाल्यास कुंडलिनी जागृत झाली तर चांगलेच. प्रत्यक्षात त्यामुळे जीवनाचा हेतू साध्य होईल. म्हणून त्याने अखेर ठरवले, की रेचक-कुंभक प्रकार याच रात्री करून पहावा.

इथे एक गोष्ट सांगितली पाहिजे, की यापूर्वी ते नऊ वर्षांचे असताना त्यांना कुंडलिनी जागृतीचा अनुभव आला होता.

रात्र होऊ लागली. त्यांनी स्वतःला खोलीत बंदिस्त करून घेतले. खोलीच्या मध्यावर ते उभे राहिले. भिंतीवरील घड्याळाकडे पहात राहिले. प्राणायाम करण्याच्या पद्धतीप्रमाणे, त्यांनी हळूहळू श्वास बाहेर टाकण्यास सुरुवात

केली. एकदा फुफ्फुसातून श्वास बाहेर टाकण्याचे तंत्र त्यांना जमले. ते घड्याळासमोर पहात उभे राहिले होते. त्यांनी निश्चय केला, की श्वास घ्यावयाचा नाही. त्यांचे लक्ष दोन भुवयांमध्ये बरोबर केंद्रित झाले होते. सेकंदावरून मिनिट झाले. त्यांचे शरीर प्राणवायूशिवाय काम करेनासे झाले. याचा अर्थ आत गुदमरल्यासारखे होत होते; पण वासुदेवांनी इच्छाशक्तीच्या जोरावर श्वास बाहेर टाकला. तीन मिनिटे झाली. गळ्याशी प्राण आला, असे त्यांना वाटले. गुदमरल्यामुळे आपण गतप्राण होऊ असेही त्यांना वाटले. मृत्यूच शेवट करणार असेल तर करो. त्यांनी पक्का निश्चय केला, की कितीही किंमत द्यावी लागली तरी श्वास आत फुफ्फुसात घेणार नाही. काही सेकंदांनंतर काही क्षण कष्टाचे वाटले. तिडका मारल्यासारखे, मुंगी चावल्यासारखे त्याच्या पायाच्या अंगठ्याला होऊ लागले. तो अनुभव, त्या वेदना हळूहळू वर येऊ लागल्या. ही संवेदना त्यांच्या कंबरेपर्यंत आली आणि मेरुदंडाच्या खालच्या भागात शिरली. इथे त्यांना बुडबुडे आल्याची संवेदना झाली. ही वेदना विद्युतप्रवाहासारखी स्पॉयनल कॉर्डवर प्रभावित होऊन ग्रीवा भागापर्यंत पोचली. त्यांना वाटले, की आपण मरणार; पण त्या अनुभवानंतर त्यांनी प्रकाश पाहिला. त्याबरोबर शरीरातील संवेदना हरपल्या आणि शून्य अवस्था झाली. ते पायावर पडले. पुढे जमिनीवर शक्तिपात होऊन पडले, कारण त्याचे शरीर लाकडासारखे मृतवत झाले होते. त्याचबरोबर त्यांची चेतनाशक्ती जागृत चरमसीमेवर पोचली. या स्थितांचा त्यांना पूर्वी अनुभव आला नव्हता. ती इतकी सत्‌प्रकाशमान झाली, की त्यांची डिग्री किती हे त्यांना कळले नाही ! आता त्यांना कळून येऊ लागले, की आपण पूर्ण व्यापलो आहोत. स्वच्छ आणि सुंदर प्रकाशामुळे जणू हजारो सूर्य भोवती प्रकाशमान झाले आहेत. त्यांना कळू लागले, की आपण अमर्यादित प्रकाशाच्या सागरात बुडालो आहोत. त्यांना असेही आढळले, की आपण दिव्य प्रकाशाशी एकरूप झालो आहोत. इथे पूर्ण एकरूपता झालेली आहे. द्वैत आणि विविधता कोठेही नव्हती. तिथे प्रकाश पडल्यावर अंधार नाहीसा होतो, तसे झाले. त्यांचा आत्मा त्यांना त्या उदात्त आणि उच्चतम परमानंद अवस्थेत जो पाहील, त्यांना आश्चर्य वाटेल; पण त्या स्थितीचे शब्दात वर्णन करणे अवघड आहे. स्वर्गीय शांतता त्यांच्या मनावर पसरली. त्यांना ख्रिस्त जे म्हणत होता, ''माझी शांतता तुला देतो'' ह्या उद्‌गाराचा अर्थ समजला. दिव्य आणि अमर्यादित

प्रकाशात आपण अवगाहन करीत आहोत आणि ह्या दिव्य किंवा पवित्र संगमात तुलसीदासकृत रामायण, प्राचीन काळातील ऋषी आणि नंतरचे संत -ज्यांनी त्यांची स्तुती केली आणि गुणगान गायिले, ही खरी त्रिवेणी होय ! ही वस्तुस्थिती आहे, हे सत्य. त्याबद्दल शंका घेण्याचेच कारण नाही. अलाहाबाद येथील तीन नद्यांचा संगम चांगला आहे. ते पृथ्वीवरील प्रतिक म्हणता येईल. पण हे पवित्र ठिकाण आहे असे परस्परांनी (आपल्या हिताकरिता) ठरवले, मानले ! प्रत्यक्षात मात्र अज्ञानी धनलोलुप पंडे भोळ्याभाबड्या माणसांच्या धार्मिक भावनेचा बाजार करून आपल्या हेतूचा, तथाकथित पवित्र, प्रसार करीत राहिले

ह्या पार्श्वभूमीवर वासुदेवानी सगळ्या बंधनात राहून मुक्तीने खऱ्याखुऱ्या स्वतंत्रपणाचा अनुभव घेतला. तसेच स्वतःचा उद्धार कसा करावा, हा अनुभवही आला. त्यांना हे समजून आले की परमेश्वर सगळ्यात आहे, तसेच परमेश्वरात सगळे आहेत. ह्या वास्तवाचे ज्ञान करून देण्याकरिता तसेच त्याची प्रचिती देण्याकरिता निरनिराळ्या काळात दिव्य पुरुषांनी या पृथ्वीवर अवतार घेतले. ह्या परमानंदात ते (वासुदेव) सुमारे चार तास होते. ह्या अवस्थेला प्रत्यक्षात समाधी म्हणतात.

शारीरिक स्थितीचे भान न ठेवता, आपल्या भोवतीच्या जगाचा विसर पडून ते जिथे पडले तिथेच पडून राहिले ! ते दिव्य, उत्तेजित अवस्थेत होते. त्यावेळी त्यांच्या शरीरास आणि मनाला पुन्हा संवेदना होऊ लागल्या. नंतर त्या स्थिर झाल्या, त्यावेळी सकाळ झालेली होती. आता शंका-कुशंका-काळजीने त्याचे मन विचलित होणार नव्हते. त्यांना कळून आले, की आपल्याला दिव्य प्रकाशाचे संरक्षण मिळाले आहे. त्यामुळे सर्वप्रकारच्या काळज्या दूर झाल्या, दुःख हरपले ! सगळ्या वासना दूर झाल्या. मन स्वच्छ झाले. अंतःकरणाची शुद्धता झाली. ते नवजीवन पहात होते. ह्यानंतर ते त्या उदात्त प्रकाशात- त्या रात्रीचा अनुभव अजूनही त्याच्यावर खोलवर प्रभाव पाडून होता त्यात-ते बुडून गेले होते. सकाळी जेव्हा ते त्यांच्या खोलीतून बाहेर आले, तेव्हा त्यांच्यामध्ये एकदम बदल झालेला इतरांना आढळला. डॉ. भारतींचे कुटुंबियांना खुद्द, त्यांच्या चेहेऱ्यावर चैतन्याचा प्रभाव आणि वागण्यात ताजेपणा दिसून आला.

हे १९३९ सालचे अखेरीचे दिवस होते.

|| ॐ ||

ॐ

# ८
# तेल्हारा गावी दवाखाना

मागील प्रकरणात घडलेल्या प्रसंगानंतर, वासुदेवांनी आपल्या गुरूचा- डॉ. नंदलाल भारतींचा- निरोप घेतला आणि अकोला गाव सोडले. डॉ. भारतींनी त्यावेळी सदिच्छा व्यक्त केल्या आणि आशीर्वाद दिले. तसेच जेवण्यास पुरतील इतके पैसेही दिले.

वासुदेव अद्यापही त्या दिव्य प्रकाशाच्या सागरात बुडालेले असल्यामुळे त्यांना कशाचीही काळजी वाटली नाही.★

गरज भागविण्याची साधने किंवा उद्याची चिंता त्यांना बेचैन करत नव्हती. आकाशातील चंडोल पक्षासारखे मोकळे आणि अंतर्मुख होऊन गाणे गुणगुणत ते चालत गेले. पोटापाण्याचा प्रश्न सोडवावयाचा होता. त्यामुळे ते आपल्या कुटुंबियांचेही पालनपोषण करू शकणार होता.

अमरावती, चांदूरबझार, परतवाडा, अकोट या भागातून जात जात वासुदेव तेल्हारा येथे एका झाडाखाली बसले होते. झाडाखाली बसलेला हा पाहुणा उंचीने बेताचा, पण चांगली शरीरयष्टी असलेला, आकर्षक आणि प्रसन्न वाटणारा, येणाऱ्याजाणाऱ्यांचे लक्ष वेधणारा होता. श्री. नंदलाल तिवारी- एक दूधविक्रेता-ह्या पाहुण्याची चौकशी करण्याकरिता थांबला आणि तेल्हाराला येण्याचा उद्देश विचारला. ह्या अपरिचिताची माहिती मिळाल्यामुळे व त्याची

*★ 'तो मज गमले विभूति माझी, पसरत चालली विश्वामाजी' हा कवी केशवसुतांनी व्यक्त केलेला अनुभव वासुदेवांच्या स्वच्छंदी मनाशी सहज तपासून पाहता येईल.*

भ्रमती समजल्यामुळे त्या दूधविक्रेत्याने धर्मशाळेत त्याला राहण्याकरिता खोलीची व्यवस्था केली. अशा प्रकारे वासुदेव एक दिवस तेल्हारा येथील धर्मशाळेतील खोलीत व्यवस्थित राहू लागला. दिवस सरत होते. जवळच्या शाळेतील काही शिक्षक त्यांच्याकडे आले. पुढे ते वारंवार त्यांना भेटत असत. हळूहळू परिचितांचे वर्तुळ वाढू लागले.

हे १९४० साल होते. दिवसामागून दिवस जात होते. गणेशोत्सव जवळ आला होता. उत्सव चांगल्याप्रकारे साजरा करण्याची पूर्वतयारी गावात ठिकठिकाणी जोरात सुरू होती. गावातील प्रतिष्ठित सामान्य जनांशी मिसळून कार्यक्रम योजत होते व त्याला हजरही रहात होते. भजन, कीर्तन, वादविवाद, व्याख्याने आणि धार्मिक प्रवचने यांची योजना केली होती. त्यामुळे उत्सवाची सांगता चांगली होणार होती. वासुदेवसुद्धा त्यांच्या शिक्षकमित्रांबरोबर अशा कार्यक्रमाला जात होते. त्या दहा दिवसांतील उत्सवात एक दिवस रात्रीच्या कार्यक्रमास व्याख्याता मिळाला नव्हता. ह्या रात्री प्रवचनास वासुदेवांना बोलवावे, अशी सूचना त्याच्या एका शिक्षकमित्राने केली. हा शिक्षकमित्र तेथील जमीनदारही होता. ही सूचना इतर संबंधितांनी स्वीकारली आणि ते वासुदेवाकडे गेले. त्यांनी विनंती केली, की आजच्या कार्यक्रमास वासुदेवांनी व्याख्याता म्हणून यावे. ज्यांना वासुदेव माहीत होते, त्यांना त्यांच्या आध्यात्मिक साधनेची कल्पना होती आणि ज्यांना माहिती नव्हते त्यांच्यात कुतूहल होते, की नवीन स्वामीजी काय सांगू शकतील?

हो-नाही करता करता वासुदेव व्याख्यानास तयार झाले. ते गावाच्या ग्रंथालयाच्या दिवाणखान्यात आले. तिथे कार्यक्रम होणार होता. जरा वेळ त्यांना समजेना, की कोणत्या विषयावर आपण बोलावे? तो आयत्या वेळचा विषय होता. त्यांना असे नंतर सांगण्यात आले, की त्यांनी आपला विषय निवडावा व बोलावे. पण त्यांना एखाद्या विषयावर विचार करण्यास वेळ मिळाला नव्हता. त्यांनी व्याख्यात्याची जागा घेतली. सर्वत्र श्रोते बसले होते, तिथे त्यांची दृष्टी फिरली. त्यांचे डोळे श्रीगणेशावर केंद्रित झाले. त्याचा पोषाख सैन्यातील कॅप्टनसारखा होता आणि तो एअर क्राफ्टमध्ये बसण्याच्या तयारीत होता. श्रीगणेशाची नेहेमीपेक्षा वेगळी ठेवण - हत्तीची सोंड असलेली. त्यामुळे ते माणसाची शरीररचना या विषयावर बोलण्यास उद्युक्त झाले. त्यांनी सुरुवात

केली - ही माणसाची शरीररचना अत्यंत सुंदर आणि सुघटित (देखणी) आहे. मनुष्यशरीरप्राप्तीची लालसा देव आणि देवात्म्यांनाही आहे. कारण मनुष्याच्या शरीरात असे काही वैशिष्ट्य आहे, ज्यामुळे तो श्रेष्ठतम सिद्धी प्राप्त करू शकतो आणि त्याच्यातील ईश्वरी अंशाला जागृत करू शकतो. तो बोलतच राहिला.

वासुदेवांनी आपल्या स्वानुभवाद्वारे आपले विचार सोप्या व सर्वांना आत्मसात होतील अशा रीतीने सांगितले. शरीरक्रियाशास्त्र, शरीररचनाशास्त्र आणि चिकित्साशास्त्राच्या आपल्या अभ्यासामुळे योगाभ्यास कसा सुकर झाला, आपला तो तरल अनुभव सहज, सुंदर, रसाळ भाषेत त्यांनी व्यक्त केला.

''मनुष्याची ईर्षा करणारे जसे देव तसेच दानव.'' तो बोलतच होता. ''देवगणांना ईर्ष्या वाटत होती. कारण ईश्वराने त्यांची निर्मिती आपला सेवक म्हणून केली आहे आणि ह्याच रूपात अनंतकालपर्यंत ते राहणार आहेत. त्यांना मनुष्यशरीराची प्राप्ती कधीही होऊ शकणार नाही. दानवांना ईर्ष्या वाटत होती. कारण त्यांनी केलेल्या पापाची शिक्षा म्हणून अनंतकालपर्यंत त्यांना नरकवास भोगावा लागणार होता. दोघांनाही ह्या प्रारब्धातून मुक्तता नव्हती.'' त्यांनी स्पष्ट केले.

आपली नियती स्वत: निश्चित करण्याची, चहूबाजूच्या प्रकृतीवर आपले वर्चस्व प्रस्थापिण्याची योग्यता मनुष्याला बहाल करण्यात आली आहे. त्याला वाटेल तर तो पुण्य करेल, नाहीतर पाप. वाटलं तर सुख भोगेल नाहीतर दु:ख.

फक्त मनुष्यच मुक्ती किंवा मोक्ष मिळवू शकतो. परमानंदाची उंची केवळ तोच गाठू शकतो. शाश्वतात विलीन होऊ शकतो किंवा नरकातही जाऊ शकतो.'' त्याचे बोलणे प्रवाही होते. ''मनुष्य देव आणि दानव या दोघांपेक्षा श्रेष्ठ आहे. मनुष्याला मुक्तीचा मार्ग दाखविण्यासाठी वेळोवेळी दिव्यात्मा पृथ्वीवर अवतार घेत असतात.

माणसाच्या शरीरात खास अशी नाडीचक्रे असतात. त्यातच भरपूर शक्ती देण्याचे सामर्थ्य आहे. ही केंद्रे किंवा चक्रे जागृत किंवा सुप्तावस्थेत असतात. प्रत्येक केंद्र हे खास अशा शक्तीचा साठा असते किंवा सिद्धी (चमत्कार करण्याचे सामर्थ्य) असते. ह्या शिडीच्या पायऱ्या होत, की ज्याच्या सहाय्याने आपण सुखाकडे जातो. ही केंद्रे चेतवून उघडता येतात. त्याकरिता खास नियमित, सद्गुरूच्या मार्गदर्शनाखाली, योगध्यानतंत्र अवगत करून घ्यावे लागते. म्हणून

प्रत्येकाचे हे कर्तव्य आहे आणि अधिकारही - त्याने आत्मस्वरूपाचे ज्ञान, मार्ग समजून घ्यावा. स्वर्गीय परमानंद प्राप्त करून घ्यावा तसेच परब्रह्माशी एकरूप होण्याचा प्रयत्न करावा, त्यांनी ठासून सांगितले.

मानवात जर मानवता असेल तर तो मानव नाही देव आहे; पण जर मनुष्य स्वत:ला देव मानायला लागला तर मग तो मानव न राहता राक्षस बनेल.

वासुदेवाने निष्कर्ष काढला की देवांनाही फार दु:ख सहन करावे लागले तर ते वेदनेने व्याकुळ होतील. पण मानव मात्र सतत संकटाशी मुकाबला करीत आहे. जणू ईश्वर घेत असलेली परीक्षाच तो देत आहे !

श्रोत्यांमध्ये गावातील प्रतिष्ठित तसेच डॉक्टर, शिक्षक, वकील बसले होते. दीर्घकाळ चाललेले प्रवचन उत्स्फूर्त होते. वक्ता आणि श्रोता दोघेही तल्लीन झाले होते. श्रोत्यांवर त्याचा गहरी प्रभाव पडला. सर्वच मंडळी विलक्षण प्रभावित झाली. वास्तविक भाषणाचा विषय माणसाचे शरीर; पण त्याचा शेवट मात्र तत्त्वज्ञानावर आणि गूढ अशा संवादाने झाला. ह्या अपरिचित तरुण माणसाजवळ त्याचे वय पाहता पुष्कळ ज्ञानभांडार आहे, अनुभव आहे, कोषात दडलेले मोठे पांडित्य आहे, असे म्हणू.

व्याख्यान संपले. श्रोते निघून गेले. काही निवडक मागे राहिले. त्यांच्यापैकी डॉ. घैसास, श्री संत हेडमास्तर, श्री. मामा भाजेकर, श्री. श्रीधर गंगाधर धर्माधिकारी-जे बाबूराव या नावाने ओळखले जात-श्री. केशवराव तागडे, जमीनदार आणि श्री. माटेमास्तर या सद्गृहस्थांना ह्या तरुण व्याख्यात्याशी अधिक जवळीक हवी होती. डॉ. घैसासही विचारू लागले, की वासुदेवांना ॲनॉटमी-शरीरशास्त्र- जर इतके माहीत आहे, तर त्यांना औषधासंबंधीसुद्धा निश्चित ज्ञान असेल. वासुदेवांनी होकारात्मक मान हलवली. वासुदेवांनी त्यांना सांगितले, की त्यांनी वैद्यकीचा अभ्यास तीन वर्षे अकोला येथील प्रसिद्ध डॉ. नंदलाल भारती यांच्याकडे केला. या विधानाने डॉ. घैसास व इतरांना प्रश्न पडला, की त्यांच्या माहितीप्रमाणे वासुदेवांचा दवाखाना किंवा वैद्यकीय व्यवसाय तेल्हारामध्ये नाही. ते स्थानिक धर्मशाळेत आपला वेळ, उपजीविकेचे साधन नसताना घालवीत आहेत. हे ऐकून आश्चर्यचकित झालेल्या डॉ. घैसासांनी प्रश्न केला - ''मग तुमचा दवाखाना कुठे आहे? तुम्ही तेल्हारामध्ये कसे आलात?''

सत्य आता प्रगट होत होते. ''मला माझा दवाखाना काढावयाचा आहे. मी योग्य जागा शोधत आहे. तशी जागा शोधण्याकरिता मी इथे आलो आहे.'' वासुदेवाने खुलासा केला. ह्या प्रामाणिक विधानामुळे त्याची स्थिती स्पष्ट झाली. त्यामुळे डॉ. घैसास आणि इतर प्रभावित झाले. ''आपण तेल्हारामध्ये दवाखाना का काढीत नाही?'' त्यांनी विचारले; पण त्यांच्या लगेच लक्षात आले, की त्यांचे शब्द ''ते योग्य त्या जागेच्या शोधात आहेत.'' ह्याचाच अर्थ त्यांच्याजवळ दवाखाना काढण्याची साधनसामुग्री नाही. लगेच तिथेच वेळ न घालवता (उशीर होऊ न देता) त्यांनी पैशाची मदत करण्याची तत्परता दाखवली. जागेवरच रु. ३५/- वर्गणी जमली. श्री. माटेमास्तरांना औषधे इ. साहित्य विकत आणण्याकरिता अकोला येथे पाठविले. माटेमास्तर डॉ. भारती यांना अकोल्यास भेटले. त्यांच्याशी त्यांचे शिष्य वासुदेव यांच्याबद्दल बोलले. डॉ. भारतींनी आलमारी, काही पुस्तके आणि औषधे दिली. वासुदेवांना तेल्हारामधील नव्या मित्रांनी खोली भाड्याने घेऊन दिली. तिथे टेबल व खुर्ची ठेवली.

अशा प्रकारे १० ऑक्टोबर १९४८ च्या सकाळी - हा दिवस दसरा सणाचा होता - डॉ. वासुदेवांनी तेल्हारामधील लोकांकरिता स्वत:चा दवाखाना सुरू झालेला पाहिला. डॉ. नंदलाल भारती खास करून तेल्हारला या शुभदिवशी आले आणि त्यांनी दवाखान्याचे उद्घाटन केले.

यानंतर थोड्याच दिवसांनी वासुदेवांनी आपल्या पत्नीला व मुलांना आणले आणि रीतसर प्रापंचिकासारखे जीवन सुरू केले. पुढील वीस वर्षे तेल्हारा हेच त्यांचे निवासस्थान होते. या गावातील लोक त्यांच्यावर प्रेम करीत, त्यांना आदराने वागवीत आणि तेही नि:स्वार्थबुद्धीने त्यांची सेवा करत. ते नुसतेच शारीरिक व्याधीवर उपचार करीत नसत, तर त्यांच्यामध्ये आध्यात्मिक सुखसमाधानाचीही सोय पहात. आपण जसजसे पुढे जाऊ तसतसे आपल्याला बरेचसे प्रसंग तेल्हारा गावाशी संबंधित सांगता येतील.

वैद्यकीय व्यवसायामुळे त्यांचे स्थानिक लोकांशी संबंध वाढले. डॉ. घैसास आणि इतर जे इथे दवाखाना काढून देण्यास कारणीभूत झाले, ते वारंवार भेटत असत आणि आध्यात्मिक व इतर विषयांवर चर्चा करीत. डॉ. भाऊ भिडे, श्री. गोडबोले आणि आणखी काही थोडे वासुदेवाच्या मित्रवर्तुळात सामील झाले. अशा भेटीत जो विषय सुचला असेल, त्यावर चर्चा करीत. वासुदेवांजवळ

स्वत:चे असे खास या चर्चेत सांगण्यासारखे असे. ते जे काही अशा गोष्टीबद्दल सांगत होते, त्यामुळे उत्साह वाढत होता. जीवनाच्या निरनिराळ्या पैलूंवर तसेच समस्यांवर जो वाद-विवाद होत होता, त्याचे निरसन होत असे. साधू, हकीम, महंत, भिक्षू, धर्मात्मा तसेच सैतान यांच्या जीवनावर मोकळी चर्चा होई. स्वत:ला महात्मा संबोधून लोक कशाप्रकारे अज्ञानी, भोळ्या-भाबड्या लोकांना छळत असतात, या बाबीवर या महाशयांकडून घृणा व्यक्त होत असे. तथाकथित धर्मात्म्याच्या संदर्भात भारतीय जनतेची अंधश्रद्धा, धनसंपत्ती मिळवण्याच्या वृत्तीची हे लोक निंदा करीत. ही वृत्ती श्रीमंत-गरीब, सुशिक्षित-अशिक्षित अशा सगळ्या लोकांत सारखीच दिसून येते ! ह्या महाशयाचे असेही मत होते, की कोणतीही माहिती करून न घेता, सर्वसामान्य लोक श्रद्धा - चमत्कारांच्या वेडामुळे ह्या ढोंगी धर्मात्म्यांची वाढ होत आहे. यांचे चमत्कार म्हणजे हातचलाखी ! संमोहन, हलकी-फुलकी सिद्धी यांच्या प्रभावांपेक्षा अधिक काही नसते. हे असे - तसे अवतार मोठ्या चतुरपणे आपला प्रचार करून घेतात, तसेच त्याबरोबर सर्वसामान्यांना आपल्यापासून पद्धतशीरपणे दूर ठेवतात ! कारण ते स्वत: रहस्यमय वाटावे आणि त्यामुळे सर्वसामान्यांचे भरपूर शोषण करता यावे !

लोकांचा उत्साह किती ओसंडून जात असतो ! धंदेवाईक पण तथाकथित पवित्र लोकांच्या अफवेमुळे, चमत्कारामुळे, एक दिवस उघडकीस आला, ह्यावेळी तिथे चमत्कार करणारा मुलगा अंगुलबाबा. ओरिसातील अंगुल हे ठिकाण. तो तसा लहान होता. त्याची तथाकथित अद्‌भुत - अलौकिक शक्ती, चमत्कार करणारी वार्ता वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. निरनिराळ्या स्तरातील लोक समूहाने अंगुलबाबाकडे प्रार्थना करण्याकरिता व दर्शनासाठी जाऊ लागले. ऊठसूट देवता काही पृथ्वीवर अवतीर्ण होत नाहीत, कोणालाही पवित्र स्थानाचे दर्शन घेण्यापासून परावृत्तही करता येत नाही. तसेच कोणाला आध्यात्मिक वा वैयक्तिक फायदे त्यापासून मिळतील, म्हणून काही असहाय्य होऊन दर्शनाकरिता जातात, काही कुतूहलाने जातात तर इतर बरेचसे वैयक्तिक फायद्याकरिता जातात; पण कोणीही त्याची (वस्तुनिष्ठ) चौकशी करण्याचा प्रयत्न करीत नाही. कोणीही अशा देवर्षींच्या चमत्काराच्या शक्तीचा क्षणभर सुद्धा विचार करीत नाही. पुष्कळ लोक अंगुलकडे वेड्यासारखे धावून गेले ! एखाद्या दंतकथेत कोणी सांगितले

की, ''बैलाने वासराला जन्म दिला, तर ते पाहण्याकरिता, बरोबर वासराला बांधण्याकरिता दोर घेऊन पळत गेले !''

ह्या देवर्षीची प्रसिद्धी तेल्हारामध्ये पसरण्यास वेळ लागला नाही. तेल्हारमधील लोक इतरांपेक्षा काही वेगळे नव्हते. त्याला भेटण्यासाठी व दर्शन घेण्यासाठी जावयाचे म्हणून येथील लोकांनी एक गट तयार केला. ते बसने जाणार होते. डॉ. बाबा भिडे आणि श्री. महाजन ह्या गटाबरोबर जाणार होते.

डॉ. भिडे यांनी, हा गट अंगुल येथे जाण्यापूर्वी, आपला हेतू वासुदेवांना सांगितला. केवळ औत्सुक्यापोटी आम्ही जात आहोत, असे सांगितल्यावर वासुदेवाने प्रतिप्रश्न केला, की त्याकरिता जाण्याचा त्रास व पैसे कशाकरिता खर्च करता? तुम्ही तुमच्या घरात बसून त्याला पाहू शकाल.'' वासुदेवांचे हे विधान आश्चर्यकारकच होते. डॉ. भिडे यांची वाचाच जणू बंद झाली आणि ते वासुदेवांकडे पहातच राहिले. त्यांना वासुदेवांचे अमर्याद आध्यात्मिक ज्ञान आणि त्याची सिद्धी याबद्दल अंतर्बाह्य खात्री होती, म्हणून त्यांना वासुदेवांचे विधान अविश्वसनीय वाटले नाही. हे कसे घडणार होते? जर त्यांना पाहिजे असेल, तर अंगुलबाबांना त्याच ठिकाणी अंगुलला न जाता पाहू शकतात? आपले औत्सुक्य डॉ. भिडे लपवू शकले नाहीत.

''तेल्हारा न सोडता मी त्यांना कसा पाहू शकेन?''- डॉ. भिडे.

यावर वासुदेवांनी स्पष्ट केले, की विशिष्ट योगासन केले तर ते त्यांना पाहू शकतील. डॉ. भिडे यांना योगपद्धतीत असा काही भाग आहे, हे माहिती नव्हते. म्हणून या अपूर्व योगविद्येची माहिती व्हावी म्हणून त्यांनी पुढाकार घेतला. दुसऱ्या दिवशी डॉ. भिडे यांना 'दीक्षा' दिली आणि रोजच्या सरावाकरिता त्यांना त्यातीत तंत्र सांगितले. त्यांच्या पत्नीलाही त्यांनी मदत करावयास सांगितले. काही नियम पाळल्यास भोवतालचे वातावरण पवित्र राहील, असेही सांगितले.

अशा प्रकारे डॉ. भाऊ भिडे हे अध्यात्मातील गंभीरपणे मार्गदर्शन मिळवणारे वासुदेवांचे पहिले शिष्य झाले. ते साधेसुधे वासुदेव आता रजा घेत आहेत आणि त्यांच्याऐवजी 'वासुदेव गुरुजी' हे येत आहेत. येथून पुढे आपण त्यांना त्यांच्या पहिल्या नावाने न संबोधता त्यांना आदराने 'गुरुजी' म्हणू.

डॉ. भिडे सकाळी आणि संध्याकाळी ध्यानधारणा करू लागले. तिसऱ्याच

रात्री ध्यानधारणा चालू असताना डॉ. भिड्यांना दिसू लागले - एक काळा, रानटी, उपेक्षित आणि अनाकर्षक आकार असलेला मुलगा, हा दुसरा-तिसरा कोणी नसून हा ओरिसामधील चमत्कार करणारा मुलगा - अंगुलबाबा होता ! त्या व्यक्तिरेखेत काहीही आकर्षण नव्हते. प्रथमदर्शनच ओंगळवाणे होते !

दुसऱ्या दिवशी डॉ. भिडे लगेचच गुरुजींकडे गेले आणि त्यांनी आदल्या रात्री पाहिलेले दृश्य सविस्तर सांगितले. त्यावर गुरुजींनी खुलासा केला की, ''दिव्य माणसांची आकृती प्रकाशमान होते आणि त्यांच्याभोवती सोनेरी प्रकाशाचा प्रभाव असतो.'' म्हणूनच त्यांनी अंगुलबाबा काळा कोळशासारखा पाहिल्यामुळे - त्यापेक्षाही वाईट, ओंगळ, अनाकर्षक आकृतीत - ते त्यांचा स्वत:चा निष्कर्ष ह्या गंमतीदार मुलाबद्दल काढू शकत होते. ''एका आठवड्यातच बाबांचे तेजोवलय जाईल.'' गुरुजी म्हणाले, ''थांबा आणि पहा.''

वाफ जशी हवेत विरून जाते, तसा डॉ. भिडे यांचा अंगुलला जाऊन दर्शन घेण्याचा विचार नाहीसा झाला. गुरुजींचे देवदूतासारखे शब्द एका आठवड्यानंतर खरे ठरले. तेल्हाराला बातमी आली, की अंगुलबाबाला पोलिसांनी अटक केली आहे. अशाप्रकारे चमत्कार करणाऱ्या मुलाचे आश्चर्यचकित करणारे जीवन शेवटी फुसके ठरले.

(३)

डॉ. भिडे आणि त्यांचे कुटुंबियांना, अंगुलबाबांचे उदाहरणावरून कळून आले, की योगसाधनेद्वारा अभ्यास केल्यास त्यामध्ये शरीराला उपकारक अशी शक्ती प्राप्त होते; पण ही साधना मात्र योग्य ते मार्गदर्शन घेऊन करावयास पाहिजे.

सौ. भिडे तिसऱ्यांदा गरोदर होत्या आणि त्यांना पाचवा महिना होता. त्यांना पोटाखाली दुखू लागले. त्या हालचाल करू शकत नव्हत्या किंवा काही कामही.त्या वाकूनही काम करू शकत नव्हत्या. त्यांना थोडेसे हायसे वाटे, त्यावेळी त्या खाली बसत किंवा कोठेतरी उभ्या रहात. म्हणून त्या बराच वेळ स्टुलावर बसून वेळ घालवीत. ह्या अवस्थेत रात्रसुद्धा त्या घालवीत. त्रस्त झालेले डॉ. भिडे सर्वतोपरी जवळपास असलेला वैद्यकीय सल्ला घेत होते. मग त्यांनी तिला नागपूर येथील मेयो हॉस्पिटलचे डॉ. देशमुख - हे त्यांचे जवळचे मित्रही होते - त्यांचेकडे घेऊन गेले. अगदी बारकाईने तपासणी केल्यावर डॉ.

देशमुखांना कळून आले, की सौ. भिडे यांचा गर्भाशय मागच्या बाजूला सरकला आहे. डॉ. देशमुखांचा वैद्यकीय खास सल्ला असा होता, की त्यातील दोष ताबडतोब ऑपरेशन करून काढून टाकावा. नाहीतर ते आई आणि मूल या दोघांनाही हानी पोचवणारे ठरेल. आईला वाचवणे हे महत्त्वाचे होते. डॉ. भिडे यांनाही हा धोका वाटत होता. स्वत: डॉक्टर असल्यामुळे त्यांना माहीत होते, की याला ऑपरेशनशिवाय पर्याय नाही.

त्रस्त झालेले आणि अधीर असलेले डॉ. भिडे यांनी गुरुजींना वस्तुस्थिती सांगितली आणि सल्ला विचारला. गुरुजी स्वत: होमिओपाथीचे आणि आयुर्वेद पद्धतीने उपचार करणारे असल्यामुळे त्यांना प्रथम कळून घ्यावयाचे होते, की सौ. भिडे यांची सर्वसाधारण तब्येत कशी आहे आणि आता लगेच काही धोका आहे काय? त्यांनी नंतर विचारले, ''तुम्ही काही दिवस ऑपरेशन पुढे ढकलाल का? मला सात दिवसांचा अवधी द्या.'' यावर डॉ. भिडे यांनी सांगितले, की ''लगेच काही धोका नाही. फक्त प्रसूतीच्या वेळी त्रास वाटेल.'' हे सांगितल्यावर गुरुजींनी सौ. भिडे यांना विशिष्ट पद्धतीने ध्यान करण्यास सांगितले व ध्यान करताना बीजमंत्र म्हणावयास दिला. मनाची शक्ती नाभीवर केंद्रित करून तिने अशी कल्पना करावयाची, की देवी भगवती तिच्या मदतीस येत आहे आणि गर्भाशय हळूहळू पुढच्या बाजूला वळत आहे. डॉ. भिडे यांनी दररोज काय होत आहे हे प्रत्येक दिवशी कळवावयाचे. काळजी करण्यासारखे काहीही नव्हते. सगळे ठीक होईल असे गुरुजींनी आश्वासन दिले.

सौ. भिडे यांनी त्या पद्धतीने ध्यान करण्याचा सराव लगेच सुरू केला. गुरुजींच्या शब्दावर त्यांची गाढ श्रद्धा होती. पहिल्या दिवशी काही घडले नाही; पण दुसऱ्या रात्री तिला स्वप्न पडले - एक बेट, त्याभोवती पाणी. बेटाच्यामध्ये अशोकाचे झाड - त्याखाली बरीचशी लहान मुले - साधारण एक वर्षाची - खेळत होती. हे दृश्य आकर्षक होते, त्यामुळे ती आनंदित झाली. ती ह्या मुलांचा खेळ पहात होती. त्यापैकी एक सुंदर मुलगा तिच्याकडे ठुमकत ठुमकत येत होता आणि तो तिच्या मांडीवर येऊन बसला ! दुसऱ्या दिवशी सकाळी डॉ. भिडेंनी गुरुजींना हे स्वप्न सांगितले. गुरुजींनी यावर सांगितले की, आता सर्व ठीक होईल आणि सौ. भिडे योग्य वेळी मुलाला किंवा त्यांना धोका न होता प्रसृत होतील. तिसऱ्या रात्री सौ. भिडे यांना अधिक उत्तेजित - रोमांचकारी

अनुभव आला. त्यांनी पाहिले, की अंडाकृती प्रकाश गतिमान होत तिच्या पोटात प्रवेश करतो आहे आणि गर्भाच्या भोवती संरक्षणकवच तयार होत आहे. हे निळ्या रंगाचे प्रकाशवलय तिची प्रसूती होईपर्यंत तिथेच होते.

पंधरा दिवसांतच सौ. भिडे यांची प्रकृती ठीक झाली. त्या सहज हालचाल करू शकत होत्या. कामही करू शकत होत्या. त्यात कोणताही त्रास त्यांना होत नव्हता. तिच्या मुलाचे संरक्षण करणारा गोलाकार प्रकाश ती पहात होती, त्यामुळे ती आनंदी होती. दिवस भरल्यावर ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तो देखणा होता. त्याच्या शरीराचा रंग निळसर होता. हा अनपेक्षित रंग डॉ. भिडे यांना काळजीत टाकणारा वाटला. कारण डॉक्टर म्हणून त्यांना वाटत होते, की हा रंग एखाद्या रोगाचे लक्षण आहे आणि हा मुलगा फार दिवस जगणार नाही. ते या घटनेची इतकी काळजी करीत होते, की प्रसूतीनंतर आठ दिवस गेले तरी ते गुरुजींकडे गेले नाहीत किंवा त्याबद्दल त्यांना कळवलेही नाही.

आता वैद्यकीय पुस्तकांचा उपयोग त्यांची अडचण दूर करण्यास होणार नव्हता. त्यांनी पुस्तके दूर फेकून दिली आणि ते गुरुजींकडे त्वरेने गेले. त्यावर गुरुजींनी विनोद केला, ''हा आपल्या दोघांचा अनुभव नाही का? गरज सरो आणि वैद्य मरो... एकदा रोग बरा झाल्यावर काय?'' त्यांनी डॉ. भिडे यांना आश्वासन दिले, की ''निळा रंग हा अनपेक्षित, पण काळजी करण्यासारखे काही नाही. कोणत्याही रोगाचे किंवा दोषाचे ते लक्षण नव्हे. काही दिवसांनी तो रंग इतरांसारखा होईल.''

मुलाचे नाव काय ठेवावे हे गुरुजींवर सोपवले होते. त्यांनी ''मुकुंद'' नाव ठेवले. हा मुलगा आता डॉ. मुकुंद भिडे इएनटी स्पेशालिस्ट आहे.

॥ ॐ ॥

***(संत एकनाथद्वारा मार्गदर्शन प्रकरण ५)***

*श्रीज्ञानदेवे येऊनी स्वप्नात सांगितली मात मजलागी ॥*
*दिव्य तेज:पुंज मदनाचा पुतळा । परब्रह्म केवळ बोलतसे ॥*
*अजानवृक्षाची मुळी कंठासी लागली । येऊनी आनंदस्थळी काढ वेगी ॥*
*संदर्भ : एकनाथांचे लौकिक आणि पारमार्थिक व्यक्तिमत्त्व-संत एकनाथ दर्शन (संग्रह)*

# ९
# विठ्ठल येई घरा

१९१९ मध्ये हिंदुस्थानात आल्यावर लहानग्या वासुदेवाने प्रथम कोणती गोष्ट केली असेल, तर ती म्हणजे कालीमातेचे दर्शन घेतले. याचा वर उल्लेख आला आहे. आपण हेही मागे पाहिले आहे, की प्रसन्न झालेल्या कालीमातेने त्याच्यावर कृपा करून त्याला दृष्टांत दिला. त्यानंतर आपल्या खेडेगावी जाताना रामेश्वरजी आणि वासुदेव हे दोघेही अलाहाबादला थांबले आणि दोघांनी हिंदुस्थानातील तीन पवित्र नद्यांच्या संगमात - गंगा, यमुना आणि सरस्वती- स्नान केले. आपण असेही पाहिले आहे, की हे पवित्र त्रिवेणी संगमातील स्नान -ज्याचा महिमा मोठा आहे, ते सगळ्या अंतर्यामी बंधनातून मुक्ती देते, असे म्हणतात, परंतु वासुदेवाला याबद्दल काहीच विशेष वाटले नाही. त्याच्या अंत:करणाला आनंद होण्याऐवजी ह्या स्नानाने त्यांना शिसारीच आली. त्यामुळे सगळे धार्मिक उपचार व्यर्थ आहेत, असे त्यांना वाटले. येथून पुढे वासुदेवाने स्वत:च्या समाधानासाठी कोणतेही धार्मिक अनुष्ठान केले नाही ! दीर्घकाळ भ्रमंतीच्या दिवसांत, ते वारंवार देवळाच्या परिसरात राहात होते, तरीही ते आपल्या वरील विचाराशी प्रामाणिक राहिले. देवळातील कार्यक्रमाला ते हजर असत. तसेच काही वेळा ठिकठिकाणी देवळात प्रवचनेही करीत. परमेश्वराला संतुष्ट करण्याकरिता आणि त्यापासून फायदा मिळावा म्हणून त्यांनी हे केले नाही. प्राप्त परिस्थितीत आणि लोकांना आपल्या धार्मिक ग्रंथांची नीट समज यावी म्हणून ते वरील कामे करीत असत.

पण दिव्य प्रभावाखाली वावरणारी माणसे, हा आपला आहे असे समजून त्याला - वासुदेवाला भेटतात. अशा प्रकारच्या गाठीभेटी वासुदेवाचे बाबतीत त्याच्या बालपणापासून होत होत्या, हे नमूद केले आहे. अशी माणसे त्यांच्याकडे समक्ष येत - आजोबांच्या जॉर्जटाऊन येथील स्नानगृहामध्ये, तसेच नागपूर येथील एक असाच प्रसंग, कालीमातेने कलकत्ता आणि औरंगाबाद येथे दिलेले दर्शन, प्रभू श्रीरामचंद्र, सीतामाई, गुरुवसिष्ठ यांचे मंदसोर येथे घडलेले दर्शन, अजमेर येथील ख्वाजा मोईनउद्दीन चिस्ती, 'समान शील व्यसनेषु सख्यम्' या उक्तीनुसार नुसते केवळ वास्तव जगात नव्हे, तर आत्मिक स्तरावर सुद्धा अशा समविचारी व्यक्तीशी सख्य होत जाते. पण तिच्यातही सत्यांश आहे. फक्त प्राकृतिक जगात नव्हे तर आध्यात्मिक जगातसुद्धा.

असा एक प्रसंग आता पाहू. इ. स. १९५६ सालातली ही घटना. १९४० सालापासून पू. गुरुजी तेल्हारामध्ये वैद्यकीय व्यवसाय करीत होते. त्याचबरोबर ज्यांना औत्सुक्य आहे, अशांना ते अध्यात्मात मार्गदर्शन करीत होते. सूर्योदयापूर्वी सकाळी माँजींना (पू. गुरुजींच्या पत्नी, आदराने, प्रेमाने लोक त्यांना "माँजी" म्हणत) स्वप्न पडले - दोन माणसे - बेताची उंची आणि रंगाने ते जुळे असल्याचे भासे, त्यांच्याभोवती प्रकाशांचे वलय होते.

"तुम्ही कोण? आपण का आलात?" माँजीनी विचारले. त्या अनोळखी माणसाच्या भेटीने माँजींना आश्चर्य वाटले.

"आम्ही पंढरपूरचे आहोत. आम्ही पंडितजींना पंढरपुरास न्यावयास आलो आहोत." ते म्हणाले. (बरेच लोक गुरुजींना पंडितजी म्हणू लागले होते.) यावर तिने सांगितले,

"हो, हो. ते घरात नाहीत. ते पेशंटना तपासण्याकरिता बाहेर गेले आहेत."

"ठीक आहे. ते जेव्हा परत येतील, तेव्हा त्यांना आमचा निरोप द्या आणि त्यांना येत्या आषाढी एकादशीला पंढरपूरला यावयास सांगा." असे सांगून ते निघून गेले. माँजींना हे स्वप्न एकादशीच्या अगोदर दोन महिने पडले होते.

ते घरी परत आल्यावर तिने हे स्वप्न सांगितले. त्यांनी घटना ऐकली. एकादशीला अद्याप दोन महिने होते. त्यांना पुष्कळच वेळ होता. पंढरपूरला

जावे किंवा नाही, ते ह्याबाबत विचार करत असतानाच ही घटना ते संपूर्णपणे विसरले.

आषाढी एकादशीच्या दिवशी मात्र ते ह्या तथाकथित निमंत्रणाबद्दल पूर्णपणे विसरले. ह्या दिवशीसुद्धा त्यांचा नित्यक्रम सकाळी दवाखान्यात जावयाचे, दुपारी बाराचे सुमारास घरी यावयाचे, त्यांच्या नेहेमीच्या सवयीप्रमाणे ह्या दिवशीसुद्धा ते जेवणापूर्वी आंघोळीस गेले.

ते अंगावर पाणी घेऊ लागले, तोच त्यांना एक अनोळखी इसम बाहेरून येताना आणि सरळ स्नानगृहाकडे चालत येताना दिसला. तो मध्यम उंचीचा आणि साधारण सावळया रंगाचा. त्याच्या खांद्यावर घडी केलेले कांबळे, डोक्याला पागोटे गुंडाळलेले आणि हातात काठी होती. गुरुजी त्रासिक झाले आणि मागे सरकले. तो अनोळखी इसम सरळ घरात आला. त्याने काहीही संकोच न करता, भारतीय पद्धतीने गुरुजींना नमस्कार केला. ते पाहिल्यावर गुरुजींचा चिडखोरपणा नाहीसा झाला. ते शांतपणे म्हणाले, ''तुम्ही लोक मला मोकळे ठेवत नाही. अगदी मी आंघोळ करत असतानासुद्धा. पहा आता तुम्ही कसे ओले झाला आहात?''

''मी ह्याकरिताच आलो आहे'' तो अनोळखी इसम म्हणाला.

''हे असं का? ठीक. तर तुझे अंत:करणपूर्वक समाधान होऊ दे.'' गुरुजी म्हणाले. त्यांनी त्या अनोळखी इसमाचे अंगावर पाणी टाकले आणि दोघांनी मनसोक्त एकत्र स्नान केले.

गुरुजी आंघोळ केल्यावर जेवण घेत असत. त्यांनी वरील पाहुण्याला विचारले की, 'ते जेवणार का?' पाहुणा म्हणाला, ''होय.'' दुर्दैवाने एका माणसापुरते अन्न होते. गुरुजींनी ते पाहुण्याला वाढले आणि त्यांनी उपवास केला. काहीही घाई न करता हा कुतुहलजनक पाहुणा खाली बसला, व्यवस्थित जेवला. गुरुजी मोठ्या औत्सुक्याने त्याच्याकडे पहात राहिले. जेवण झाल्यावर त्यांनी दवाखान्यात जाण्याचे स्थगित केले.

जरा वेळाने पाहुणा म्हणाला, ''आपण मला आठ आणे देऊ शकाल का? मला पंढरपूरच्या विठोबाकरिता हार घ्यावयाचा आहे. पांडुरंगाला हार घातला की ते तुम्हाला कळून येईलच.''

ते ऐकल्यावर गुरुजींनी टेबलावर काही पैसे आहेत का म्हणून पाहिले.

सुदैवाने तिथे फक्त आठ आण्याचे नाणे होते.

"तुम्ही नशिबवान आहात. एवढेच आज घरात आहे." गुरुजी त्यांना पैसे देताना म्हणाले.

पाहुणा जाण्याकरिता उठला. गुरुजींच्या अतिथ्याबद्दल आणि पैसे दिल्याबद्दल आभार मानले आणि म्हणाला, "ठीक. हार श्री पंढरीनाथाला आजच घालू आणि तसे तुम्हाला कळेल. येतो, येतो."

उत्सुकता वाढवणारा हा पाहुणा नंतर रस्त्याने निघून गेला. तो पुढे जात आहे असे दिसले. सुमारे पंचवीस यार्ड गेल्यावर तो दिसेनासा झाला. नंतर गुरुजींना एकदम आठवण झाली, की हा आजचा दिवस आषाढी एकादशीचा. त्यांना आपल्या पत्नीला जे स्वप्न पडले, त्याचीही आठवण झाली. त्याप्रमाणे त्यांना पंढरपूरला बोलावले होते. नंतर त्यांच्या डोक्यात प्रकाश पडला, की हा अनोळखी इसम - पाहुणा दुसरा कोणी नसून तो प्रत्यक्ष श्री पंढरीनाथ - श्री विठ्ठलच स्वतः मानवी स्वरूपात आला. ते पंढरपूरला जावयाचे ही बाब विसरून गेले होते. स्वतःच पांडुरंगाने त्यांना भेटावयाचा विचार केला आणि तो भेटावयास आला.

तारखेप्रमाणे वरील प्रसंग हा १९५७ मधला. देव-देवता भक्तांना प्रसंगी भेटावयास येऊन त्यांच्या सहवासात वेळ कसा घालवतात, हा मुद्दा स्पष्ट करण्याकरिता वरील प्रसंग अगोदर सांगितला. आता आपण पुन्हा ४० सालात मागे जाऊ, गुरुजींचे दैनंदिन जीवन आणि त्यात आलेल्या अडीअडचणी पाहू.

सन १९४० च्या सुरुवातीला दुसरे महायुद्ध युरोपात जोरात सुरू होते. सामान्य माणूस ह्या युद्धामुळे फारसा विचलित झालेला नव्हता. पण आर्थिकदृष्ट्या सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा होता. आवश्यक धान्य - गहू, तांदूळ, तेल, साखर, तीळ कापड इ. बाजारात नाहीसे होऊ लागले. लबाडी करणारे व्यापारी काही कमी नव्हते. त्यांनी कमी असलेल्या वस्तू अधिक दुर्मिळ केल्या. त्या अधिक भाव घेऊन काळ्या बाजारात विकल्या.

सगळ्या वस्तूंचे भाव वाढले. गहू एका शेरास चार किंवा पाच रुपये असा विकला जात होता. रेशनच्या दुकानात लगेच उपलब्ध असलेले धान्य म्हणजे मिलो - अमेरिकेतून आणलेला, कोणाला आवडो न आवडो, सामान्य माणसाला तो घ्यावा लागत होता. गुरुजी त्यांच्या नेहेमीच्या सवयीप्रमाणे दैनंदिन

प्रापंचिक बाबीच्या कटकटीबाबत अलिप्त होते. त्यांना जे पैसे मिळत ते तिला देत व त्यातच घरखर्च तिने भागवावयाचा असे. तिनेसुद्धा अल्प उत्पन्नात चांगल्या प्रकारे प्रपंच चालवण्याचा प्रयत्न केला. गुरुजी पैसे घेण्याचे बाबतीत अगदीच उदासीन असत. पेशंटकडून पैसे घेण्याचे बाबतीत ते चालढकल करीत. त्यांची फी सर्वसाधारण होती आणि ते गरिबांना, गरजूंना औषधे फुकट देत असत. ह्या अशा आतिथ्यशीलपणामुळे त्यांच्या घरात आणखी काही लोक आले. त्यांनाही त्यांच्या बायकोला करून घालावे लागे. माँजींना हे श्रेय आहे. त्या कुरकुर न करता करत. गहू घरात बरेच दिवस पुरतील असे पाही. ती आणि मुले मिलोच्या भाकरी खाऊन रहात असत आणि ती गव्हाच्या पोळ्या गुरुजींकरिता ठेवीत असे. प्रत्यक्ष वस्तुस्थिती कळेपर्यंत ही बाब गुरुजींच्या लक्षात आली नाही.

पण एक दिवस केव्हा तरी काही संपणारच. गहू संपले, तिचे सारे प्रयत्न गहू मिळवण्याचेबाबत संपले. एक दिवस गुरुजी जेवावयास बसले. तिला मनस्वी त्रास होत होता, तरीही तिला मिलोच्या, रंगाने तांबड्या असलेल्या, चपात्या वाढाव्या लागल्या. त्यांनी पहिला घास घेतला; पण घशातून तो घास उतरेना. त्यांनी हा चमत्कारिक पदार्थ पाण्याचे घोटाबरोबर गिळण्याचा प्रयत्न केला; पण त्यांना तो गिळता आला नाही. त्यांनी तो थुंकून दिला. ताट बाजूला सारून ते उठले. आता त्यांना दु:खद बाब कळून आली, की बायको व मुले कसे करत असतील? ते स्वत: पूर्वी अशा प्रसंगांतून निभावून गेले होते. झाडाची पाने खाऊन ते राहिले, हेही त्यांना माहिती होते, की पोटाची भूक लपवता येत नाही. बायको आणि मुले यांनी शांतपणे सहन केल्यामुळे त्यांना आत्मक्लेश झाले. कुटुंबियांचे मनोधैर्य आणि तक्रार न करण्याची तयारी त्यामुळे परिस्थितीला सामोरे गेले. आता गुरुजींना कुटुंबियांच्या भवितव्याबद्दल अधिक चिंता वाटू लागली. ते रडू लागले. अश्रू गालावर ओघळले. एकीकडे बाजारातील वाढत्या किंमती आणि दुसरीकडे चांगल्या प्रकारचे धान्य मिळत नाही, म्हणून ते व्यथित झाले.

ते उठले. तडक खोलीत गेले. ही खोली दवाखाना म्हणून वापरली जात होती. माँजींना व त्यांना उपाशी रहावे लागले, याबाबत दु:खी होऊन त्या गप्प राहिल्या. काय करावे? त्यांचे मन विचार करू लागले. त्यांना कोणताही मार्ग

सापडत नव्हता. फक्त देवावर विश्वस ठेवणे ! दवाखान्यात त्यांनी चादर अंथरली आणि त्यावर ते पडून राहिले. 'योगक्षेमं वहाम्यहम्' भगवद्गीतेतील हे शब्द त्यांच्या मस्तकात दाटून आले. त्यांनी ध्यानधारणा सुरू केली. त्यांनी निश्चित ठरवले की अन्नाचा प्रश्न सुटेपर्यंत उठायचे नाही. सुमारे अर्ध्या तासानंतर त्यांची ध्यानधारणा भंग पावली. कोणीतरी नारायणराव असे म्हणून ज्याने नाव उच्चारले ते खोलीत आले. ते म्हणजे बद्रीदास पहाडिया - एक श्रीमंत शेतकरी आणि गुरुजींचे चाहते.

"काय चालले आहे?" शेठजींने विचारले.

"काही नाही, मी विश्रांती घेत आहे." गुरुजींनी उत्तर दिले. शेठ बद्रीदासांनी विनंती केली, "कृपया उठा. माझ्याबरोबर चला. काही महत्त्वाचे काम आहे."


गुरुजींची ध्यानधारणा भंग झालीच होती. ते उठले. बद्रीदासाबरोबर त्यांच्या घरी गेले.

बद्रीदासाने घरी आल्यावर त्यांना पेलाभर दूध दिले. तसेच एका बशीत फराळाकरिता गोड पदार्थ ठेवले. तो खाण्याचा आग्रहही शेटजीने केला. गुरुजी नाराज होते. कारण त्यांच्या डोळ्यासमोर भुकेलेली त्यांची बायको व मुले दिसू लागली. गोड पदाथाने आपले पोट भरावे आणि मुले उपाशी रहावी हे कसे? असा विचार त्यांच्या मनात आला. गुरुजींची नाराजी अन् चलबिचल पाहून बद्रीदासने आग्रहाने सांगितले, की त्यांच्यापुढे ठेवले आहे ते त्यांनी खावे. त्याने असे आश्वासन दिले, की त्यांच्या मुलांनाही खाण्याकरिता द्यावयास भरपूर आहे.


बद्रीदासाला समाधान वाटावे म्हणून ते दूध प्याले व मिठाईचा एक घास खाल्ला. अशाप्रकारे बद्रीदासाचे घरी दोन तास गेले. दोघेही ह्या नाही त्या गोष्टीवर बोलत होते. गुरुजी घरी परतले. बद्रीदास सोबत होते. गुरुजी त्यांच्या घरात पाय ठेवत नाहीत, तोच त्यांनी गव्हाचं पोतं - एक क्विंटल वजनाचं दाराजवळ भिंतीला टेकून ठेवलेलं पाहिलं. ही आश्चर्य वाटणारी घटना आणि स्वागत करणारं पोतं. थोड्याच वेळाने बद्रीदास पाडिया यांनी खुलासा केला आणि ते पोते घ्यावयास भाग पाडले. शेठजींनी आश्वासन दिले, की पुढील हंगामापर्यंत गहू नियमितपणे पाठवले जातील. ईश्वरी कृपा पुन्हा एकदा त्यांच्या

मदतीस आली. ''प्रथम देवाचे स्थान शोधा. त्याची कृपा प्राप्त करा, म्हणजे सगळ्या गोष्टी तुम्हाला मिळतील.'' या वचनाचे स्मरण त्यांना झाले.

॥ ॐ ॥



परमपूज्य गुरुजींची मुद्रा



परमपूज्य गुरुजींची मुद्रा

# १०
# मौंजीबंधन

गुरुजींच्या जीवनात असे असंख्य प्रसंग आले आहेत, की जिथे दैवी कृपा हातांत हात घालून व्यावहारिक किंवा दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडवण्यात मदत करणारी ठरली.

इथे असाच एक प्रसंग सांगतो. गुरुजींचा थोरला मुलगा बाबा नऊ वर्षांचा झाला. त्याचा उपनयनविधी करण्याचा विचार कुटुंबियांपुढे होता. मुंज किंवा उपनयनविधी हा एक पवित्र संस्कार प्रत्येक ब्राह्मण मुलावर केल्यावर त्याचे ब्रह्मचर्य सुरू होते. हा संस्कार ख्रिस्ती धर्मातील बाप्तिस्मासारखाच आहे. गुरुजींचा दुसरा मुलगा बच्चू हाही मुंज करण्याच्या वयात आला होता. खर्च वाचवण्याच्या दृष्टीने दोन वेगवेगळ्या मुंजी करण्याऐवजी दोन्ही एकत्र करण्याचे ठरवले. आईला वाटत होते, की हा पहिलाच समारंभ-उपनयनविधी आहे तर तो शक्यतो थाटामाटात करावा. पण एक प्रश्न होता, अशा कार्याकरिता पैसे कोठून येणार? गुरुजींच्याजवळ तशी शिल्लक नव्हती. गुरुजींची दररोजची कमाई ही कुटुंबियांच्या दैनंदिन गरजा आणि थोडेफार येणारे पाहुणे यांच्यापुरतीच होती. म्हणून रास्त खर्च मर्यादित ठेवून, निमंत्रण हे कुटुंबियाचे जेवढे निकटवर्ती असतील, त्यांनाच करावयाचे, असे ठरले.

पण अगदी निकटवर्ती कोण हे ठरवणे अवघड होते. कारण गुरुजींचे निकटवर्तीयांचे वर्तुळ मोठे होते. सरतेशेवटी गुरुजींचे व माँजींचे एकमत होऊन, असे ठरले की, साठ ते सत्तर कुटुंबियांना बोलवावे. तसे त्यांना समारंभाला निमंत्रण

द्यावे. अशा प्रकारे खर्चाचा आकडा काटकसर करूनही रुपये शंभर ठरला. ही रक्कमसुद्धा या कुटुंबाला जास्त होती; पण अधिक काटकसर अशक्य होती. तोंडी आमंत्रण देण्याची प्रथा होती. समारंभाचे निमंत्रण कुटुंबियांचा न्हावी देत असे. म्हणून अंबादास न्हावी याला निवडक कुटुंबियांना निमंत्रण देण्यास सांगितले. त्याने त्याप्रमाणे निमंत्रण दिले. त्याने ज्या ज्या घरी निमंत्रण दिले, त्यांनी सांगितले, की आम्ही सगळे समारंभास येऊ. गावात सगळीकडे वार्ता पसरली. पूर्वी कधी उत्साह दिसला नसेल असा उत्साह लोकांत वाढला. ज्यांना गुरुजींचा सज्जनपणा माहिती होता, जे त्यांना आदराने पंडितजी म्हणत, अश सर्वांनी-निमंत्रण असो वा नसो-समारंभास जावयाचे ठरवले. त्यांच्या कानावर हा सर्वत्र पसरलेला उत्साह घातला. उभयतांनी आता दैवावरच भार टाकला आणि तयारीला लागले. शंभर रुपये खर्च करावयाचा हे ठरवूनच.

समारंभाचा दिवस उजाडला. तो एक एप्रिलचा दिवस. कार्यक्रम सर्व सोहळ्यानिशी सुरू झाला. असंख्य कुटुंबे, लवाजम्यानिशी कार्यक्रमाकरिता आली. साठ-सत्तर कुटुंबे येणार तिथे सहाशे लोकांनी गर्दी केली. असे वाटले, की लोक आज एक एप्रिल म्हणून एप्रिलफूल तर करीत नाहीत ना? आदरणीय गुरुजींनी निमंत्रित न केल्यामध्ये गावातील प्रतिष्ठित व त्याचे कुटुंबियही होते. हे सगळे अनिमंत्रित गुरुजींच्या परिवारातील वातावरणात सहज मिसळून गेले, जसे दुधात पाणी ! तिथे कोणाला विसंगत असे काही वाटले नाही. योग्य व्यवस्था करण्यात तसेच जेवणाची तयारी करण्यास प्रत्येकाने काही न म्हणता हातभार लावला.

गर्दी पाहून माँजींही हरखून गेल्या. ह्या पाहुण्यांची व्यवस्था कशी करावी? कोणाला जेवण वा फराळ न करता कसे पाठवता येईल? केवळ पंचाहत्तर लोकांकरिता केलेले अन्न हे सहाशे लोकांना कसे पुरेल? माँजींजवळ काही द्रौपदीची थाळी किंवा अक्षयपात्र नव्हते. ती बिचारी काय करणार? हा प्रश्न तिच्या आवाक्याबाहेरचा होता. तिची असहाय्य अवस्था नव्याने जन्माला आलेल्या मुलासारखी झाली. डोळ्यात अश्रू होतेच. तिने आपली व्यथा नवऱ्याला सांगितली. त्यांनी शांतपणे ऐकून घेतले, त्यांनी स्वतःच परिस्थिती पाहिली आणि पत्नीला शांत राहण्याचा सल्ला दिला. ''थांबा आणि काय होते ते पहा - देवच मदतीला येईल.'' त्यांनी तिला आश्वासन दिले.

बारा वाजता सगळे धार्मिक विधी आटोपले. आलेले सगळे सुग्रास भोजन

घेण्याचे तयारीत होते. मंडपामध्ये जेवणाची व्यवस्था केली होती. पन्नासचा एक गट याप्रमाणे पंक्ती उठू लागल्या. अशा अनेक पंक्ती झाल्या. जेवणावळी उठणे आणि वाढणे अगदी सायंकाळपर्यंत चालू होते. समारंभाला आलेले सर्व पाहुणे (सुमारे सहाशे) जेवले आणि आपआपल्या घरी मोठ्या सुखासमाधानाने निघून गेले. फक्त पंचाहत्तर लोकांना पुरेल इतके शिजवलेले अन्न सहाशे लोकांना पुरवले गेले हे कसे? एक परमेश्वरच जाणो.

रात्री दहाचे सुमारास शेवटचे पाहुणे गेले, तेव्हा गुरुजी जेवावयास बसले. बरोबर होते पोलीस इन्स्पेक्टर महाजन आणि भैय्याजी पांडे. श्री. महाजन हे कार्यक्रमास सुरुवातीपासून हजर होते. त्यांचे औत्सुक्य न राहिल्यामुळे त्यांनी गुरुजींना बोलण्याची परवानगी मागितली.

''मी हा सगळा समारंभ सकाळपासून पहात होतो,'' श्री. महाजन म्हणाले, ''मी सद्गदित झालो आणि आश्चर्यचकित झालो. काहीही हातचे न ठेवता एवढा मोठा समुदाय - स्त्री, पुरुष, मुले सारख्याच उत्साहाने समारंभास आले. निमंत्रण असो की नसो - खेळाडूपणा, उत्साह आनंद त्यांनी दाखवला आणि पडेल ती कामे केली. अशा प्रकारचा श्रीमंताच्या घरातील समारंभ लोकांच्यामध्ये आकर्षण, उत्साह, कितीही पैसा खर्च केला तरी निर्माण करणार नाही, तसा उत्साह इथे दिसला. यावरून असे दिसते, की प्रत्येकाला तुमच्या हृदयात जागा आहे. तेल्हार हेच तुमचे घर आहे. नुसते तिथे राहण्याचे ठिकाणच आहे, असे नाही.'' अशी ही आपुलकीची प्रेमभावना व्यक्त झाल्यावर गुरुजींच्या भावना अनावर झाल्या. तेल्हारामधील लोकांनी दाखवलेला आदरभाव, यामुळे गुरुजींच्या डोळ्यातून अश्रू आले.

अजूनही ह्या गोड घटनेचा शेवट व्हावयाचा होता. दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुजी मगनलाल गडोदियांचे दुकानात समारंभास ज्या वस्तू, जिनसा, पदार्थ घेतले, त्याचे पैसे देण्यास गेले. मगनलाल स्वत: गुरुजींच्या कार्यक्रमास हजर होते आणि त्यांनी तिथे जे घडत होते, ते अगदी आपुलकीने पाहिले. त्यांना हे चांगले माहीत होते, की त्यांनी जे सामान दिले ते फक्त रु. शंभरचे होते. कल्पनेला कितीही ताण दिला, तरी कोणालाही असे वाटेल, की हे सामान फार तर शंभरएक लोकांना पुरेल ! मगनलालना वाटले की आपण हा जो सगळा समारंभ पहात होतो, हा चमत्कार नसून दैवी कृपाच आहे !

मगनलालचे मनात घडलेले अनेक प्रसंग येऊ लागले. त्यांना काही वेळा गंमतीने, साध्या व सरळ स्वभावाच्या पंडितजींशी बोलताना आपण फार स्वातंत्र्य घेतले असे वाटले. त्याचा असा दृढ समज होऊ लागला, की श्री पंडितजी हे गृहस्थ दैवी शक्ती आणि दैवी संरक्षण असलेले आहेत. श्रद्धाळू वृत्तीचे पण वरील प्रसंगाने चकित झालेले मगनलाल गुरुजींना म्हणाले, ''पंडितजी, मला सांगा, फक्त रु. १०० या मर्यादित रकमेत तुम्ही इतक्या लोकांना कसे मनसोक्त जेवावयास घातले?''

''मला माहीत नाही, कसे ते; पण कसे झाले ते तुम्ही पाहिले आहे.'' गुरुजींनी उत्तर दिले. ''माफ करा पंडितजी. मी असे गृहित धरून बोललो तर तिथे काही तरी दैवी चमत्कारिक घडले आणि म्हणूनच जे घडले ते तसे झाले नसते.'' तो किराणा मालाचा व्यापारी म्हणाला. ''जर देवाने भरभरून दिले तर मी तुमच्याकडून थोडासा माल दिल्याबद्दल पैसे घेताना मला संकोच वाटतो. मला तर असे वाटते, की तुमच्याकडून पैसे घेणे म्हणजे खुद्द परमेश्वराचा अपमान होय.'' मगनलालने पैसे घेण्याचे नाकारले. गुरुजींनी मात्र पैसे घ्यावेत म्हणून आग्रह केला. मालाची किंमत फक्त रु. १०० होती. त्यांनी काऊंटरवर रु. शंभर ठेवले अन् ते निघून गेले.

मगनलाल तसा गप्प बसला नाही. तोही दुकानातून बाहेर पडला. घरी गेला. त्यानीही काही योजले होते. त्याने गुरुजींनी काऊंटरवर ठेवलेले रु.१०० बरोबर घेतले आणि त्यांच्या घरी गेला. त्याने गुरुजींच्या पत्नीला -माँजींना- बोलावले, त्यांच्याशी बोलणे केले. त्याने ठरवले, की हे रुपये १०० गुरुजींच्या बायकोला-माँजींना मुंजीच्या निमित्ताने द्यावेत; पण हे सगळे गुरुजींना न सांगता करावयाचे होते.

वेळ न घालवता त्या व्यापाऱ्याची बायको ह्या योजलेल्या कामाकरिता बाहेर पडली. थोडा वेळ माँजींशी तिने गप्पागोष्टी केल्या. नंतर तिने माँजींना साडीचा पदर पसरावयास सांगितला. माँजी यामुळे थोड्या कोड्यात पडल्या. तिला हे काय आहे हे समजेना. विनंती केल्यावरून तिने तसे केले. त्यावर व्यापाऱ्याच्या बायकोने रुपये १०० त्यात ठेवले आणि माँजींना विनंती केली, की ही रक्कम मुंजीच्या सभारंभानिमित्त भेट म्हणून घ्यावी. त्यावर न बोलता ती परत घरी आली.

॥ ॐ ॥

ॐ

# ११

# मज़हरख़ान आणि तेजोगोल

तेल्हारामध्ये गुरुजींच्या निकटवर्तीयांपैकी एक गृहस्थ मजहरखान एका उर्दू शाळेत हेडमास्तर होते. ते प्रथम रुग्ण म्हणून आले. गुरुजींकडे डॉक्टर म्हणून ते वारंवार येत असत. त्यावेळी त्यांनी त्यांच्यातील आध्यात्मिक तेज ओळखले. मजहरखान स्वत:च आध्यात्मिक प्रवृत्तीचे असल्यामुळे दोघांमधील आध्यात्मिक सौहार्द हळूहळू वाढू लागले.

ज्या ज्या वेळी ते एखाद्या विषयावर चर्चा करीत, मग तो विषय जागतिक युद्ध, राजकारण, सामाजिक किंवा घरगुती घडामोडींचा किंवा दैनंदिन जीवनातील प्रश्न असो, त्याचा शेवट तत्त्वज्ञानाची टीप देऊन होत असे हे पाहून मजहरखान आश्चर्यचकित होई. तत्त्वज्ञानाचा संदर्भ बोलण्यात येत असल्यामुळे एके दिवशी न राहवून त्यांनी प्रश्न केला, "हे कसे काय? तुमच्या साऱ्या चर्चा तत्त्वज्ञानने अवगुंठित होतात?"

"ह्यापेक्षा वेगले काय असेल? प्रत्येकाची सुरुवात आणि शेवट हा जो जगन्नियंता परमेश्वर आहे, त्याचे ज्ञान ह्या तत्त्वज्ञानात आहे." त्यांनी उत्तर दिले.

मजहरखान गुरुजींच्या अधिक सानिध्यात आले. त्यांना जे प्रश्न सतावत होते, त्या बाबतीत ते गुरुजींकडून सहाय्य आणि आध्यात्मिक कूट प्रश्नांवर मार्गदर्शन घेत असत. मजहरखानला त्याचा पवित्र कुराण ग्रंथ चांगला माहीत होता. त्यांनी हे नमूद केले आहे, की ज्या तात्त्विक विचारांवर गुरुजी स्वत:च्या अनुभवाने भर देत आहेत, त्या गोष्टीचे साम्य त्यांच्या पवित्र ग्रंथातही आहे.

एक दिवस मजहरखान आपल्या खोलीत साफसफाई करीत असताना त्यांना धुळीत पडलेले एक पुस्तक सापडले. त्यांनी हे पुस्तक कधी पाहिले किंवा केव्हा वाचले होते, हे त्यांना आठवत नव्हते. त्यांनी पुस्तकावरची धूळ झाडली. विशेष वेळ न घालवता त्यांनी मजकूर पहाण्यास पाने उलटली. त्यांना आश्चर्य वाटले. ते पुस्तक म्हणजे सूफी पंथातील संतांच्या चरित्राची सूची फारसी भाषेत होती. त्यांचे औत्सुक्य वाढले. त्यांनी ते पुस्तक जितके जलद वाचता येईल तितके वाचून काढले. त्यांच्या लगेच लक्षात आले की सूफी पंथातील संतांचे अनुभव व तत्त्वज्ञान एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला गुरुजींचे म्हणणे यांत साम्य आहे. विशेषतः त्यांनी "नूर"चे स्पष्टीकरण म्हणजे दैवी प्रकाश दिलेले, यामुळे ते फारच उत्तेजित झाले.

मज़हरखानचे मते गुरुजी हे फार वरच्या पातळीवरचे (आध्यात्मिक साधनेतील अधिकारी) आहेत. मोठ्या आदराने खान त्या दिवशी गुरुजींकडे गेले. त्यांनी बरोबर पुस्तक नेले होते. पुन्हा चर्चाही तात्त्विक स्वरूपावर झाली. खान भारावून गेले. त्यांनी गुरुजींना आध्यात्मातील अधिक उपासना सांगावी म्हणून मार्गदर्शन करण्यास सांगितले. गुरुजींनी तसे मार्गदर्शन करीन व योग्य वेळी मदत करीन, असे आश्वासन दिले. येथपासून पुढे मज़हरखान आपला मोकळा वेळ गुरुजींच्या सहवासात घालवीत असत. कालांतराने खानला अधिक खोलवर विचार केल्यावर कळून येऊ लागले, की गुरुजींचे उर्दू भाषेवर केवढे प्रभुत्व आहे ! तसेच पवित्र कुराण ग्रंथाचे ज्ञानही आहे. गुरुजींचे प्रभुत्व - कुराण शरीफ व सूफी पंथातील कठीण उताऱ्यांचे अर्थ लावणे, त्यांची पृथक्करण करण्याची साधी पद्धती-स्वतःच्या अनुभवातून उदाहरणे देत, स्वैर असा उपदेश करतात. त्याचा मजहरखानला समजण्यास आणि त्याचे धर्माचरण करण्यास अधिक चांगल्या प्रकारे उपयोग झाला.

काही दिवसांनी सूफी पंथाच्या पुस्तकावर चर्चा सुरू झाली. गुरुजींना एक विशिष्ट दृष्टी, जी यापूर्वी आली नव्हती, ती आली. तिच्यातील नाविन्य वैशिष्ट्यपूर्ण होते. एका रात्री, गुरुजी त्यांच्या खोलीत सोफ्यावर बसले असताना एकाएकी ध्यानमग्न झाले. थोड्या वेळाने त्या अवस्थेत असताना तेजाचा एक झोत (प्रकाशझोत) त्यांच्या भुवयांच्यामध्ये आला. काही वेळात हा उजेड गोलाकार झाला आणि ह्या गोलाकारात कुराण शरीफची पानेच्या पाने दिसू

लागली. चमत्कारिक गुंतागुंतीचा त्यातील गर्भित अर्थ आणि अन्वय समजू लागला.

दुसऱ्या दिवशी मजहरखान पुन्हा गुरुजींना भेटले. कुराण शरीफचा अभ्यास करीत असताना काही शंका उद्भवल्या होत्या. त्याचा खुलासा करून घेण्याकरिता ते आले होते. मज़हरखान खाली बसले. गुरुजी, मजहरखान ज्याची चर्चा करावयास आले होते, त्यावरच बोलू लागले आणि त्याचेच स्पष्टीकरण करू लागले. ते बसून लक्षपूर्वक ऐकत होते. त्यांना हे समजले नाही, पण आश्चर्य मात्र वाटले, की गुरुजींनी आपण ज्या विषयाबाबत स्पष्टीकरण विचारणार आहोत, तीच बाब त्यांनी चर्चेला कशी घेतली? स्पष्टीकरण - खुलासा झाल्यावर, आनंदित झालेले खान घरी गेले. त्यांची अशी समज झाली, की हा एक योगायोगाचा भाग आहे, की गुरुजी आपण प्रश्न उपस्थित करण्यापूर्वीच त्यावर बोलत होते.

मज़हरखान दुसऱ्या दिवशी काही कडव्यांचे (अयाना) स्पष्टीकरण घ्यावयास आले. त्यादिवशी सुद्धा मि. खाननी त्यांचा प्रश्न उपस्थित करण्यापूर्वीच गुरुजी बोलू लागले आणि उतारा समजावून देऊ लागले. अशाप्रकारे एक आठवडा गेला. मि. खानांच्या शंकाकुशंका उपस्थित न होताच सगळ्या दूर झाल्या. आश्चर्य आणि विस्मयाने ते भारावून गेले. ही सारी घटना म्हणजे योगायोग असे म्हणता येणार नाही. त्यांचे औत्सुक्य अधिक वाढले. त्यांनी गुरुजींना ह्याचे रहस्य विचारले. गुरुजींनी त्यांना असलेल्या दृष्टीचे स्मरण केले आणि गूढमार्गाने त्यांना अज्ञाताचे ज्ञान कसे मिळाले ते सांगितले. हे ऐकून खान आश्चर्यचकित झाले. सद्गदित् झाले. त्यांना धर्मातील रहस्याचा-ज्ञानाचा बोध करून घ्यावा, असे तीव्रतेने वाटले. त्यांची अधीरता गुरुजींना भावली. त्यांनी दुसऱ्या दिवशी त्यांना दीक्षा दिली.

सकाळ झाली. मजहरखानने सगळा बंदोबस्त केला आणि रहस्य समजून घेण्यास ते गुरुजींसमोर गुडघे पाठीकडे दुमडून आदराने, विनम्रपणे, अधीरतेने बसले. गुरुजींनी त्यांना काही गूढ पद्धती-पवित्र इस्लाम ग्रंथ कुराणावर आधारलेल्या- सांगितल्या. तसेच गुरुजींनी ध्यानधारणेचे तंत्र कसे अवलंबावे यांबाबतही तपशीलवार सूचना दिल्या.

मजहरखान हा पहिला मुस्लिम, ज्याने आध्यात्मिक मार्गदर्शन आणि

संस्कार गुरुजींकडून घेतले. त्यामुळे ते पहिले मुस्लिम शिष्य ठरले. ह्यानंतर इतर काही मुस्लिम गुरुजींचे शिष्य झाले.

संस्कार झाल्यावर एक दिवस मजहरखान ध्यानमग्न बसले. एक मोठा तेजाचा (प्रकाशाचा) गोळा त्यांना दिसला. त्याच्यातून सौम्य प्रसन्न किरणे त्याच्याभोवती पडली होती. तो गोळा जोरात हलला. त्याच्या मुखातून गेला, नंतर त्याच्या गळ्यातून खाली गेला. त्याचे सर्व शरीर पारदर्शक झाले. त्यामुळे शरीरातील क्रिया दिसू लागली. त्याने हृदयाचे स्पंदन पाहिले. फुफ्फुसाची उघडझाप पाहिली. श्वास घेण्याची क्रिया पाहिली आणि इतर सर्व. जणू ते स्वर्गीय सुख आणि आनंदाचे साम्राज्यात गेले आहेत. हा अनुभव उत्तेजित करणारा आणि वृद्धिंगत करणारा होता. इतके ते त्यात गढून गेले होते. हा आनंद उदात्त, शब्दातीत होता, त्यामुळे त्यांना पूर्वस्थितीवर येणे नको होते. त्यांना आवडो अगर न आवडो, ध्यानधारणेची वेळ संपत आली असताना त्यांच्या मनाला भोवतालच्या जगाची जाणीव होऊ लागली.

हे सांगावयास पाहिजे, की योगाचा अभ्यास करणारा आपल्या मनात ध्यान करण्याची वेळ निश्चित करतो आणि ती वेळ संपत आली की ध्यानधारणा आपोआप थांबते.

ध्यानधारणा संपली, ते गुरुजींकडे त्वरेने गेले आणि त्यांना कृतज्ञतेने भारावलेल्या स्थितीत नुकताच आलेला दिव्य अनुभव त्यांना सांगितला.

ध्यानधारणेत मज़हरखानची जसजशी प्रगती होत गेली, तसतसे अनेक अनुभव त्यांना आले. गुरुजींच्या आध्यात्मिक मोठेपणाची जाणीव झाल्यावर, त्यांनी गुरुजींना कुराण शरीफाचे सोप्या भाषेत भाषांतर करावयाची विनंती केली. त्यामुळे सामान्य माणसाला त्यातील सखोल ज्ञान, सत्य सहजपणे कळेल.

हे गुरुजी, हा चालता-बोलता संत अकबर बादशहाचे वेळी असता तर एक नवा धर्म वाढला असता. द्वेष, मत्सर आणि एकमेकांची ससेहोलपट करणे थांबले असते. या नव्या धर्माने एकमेकांचे प्रेम आणि आदर वाढला असता, इतर धर्मियांमधील विविध पंथांतील कलह पाहिल्यामुळे मजहरखानला हे तंतोतंत पटले.

॥ ॐ ॥

ॐ

# १२

# वृंदावन

प्रत्येकालाच कोणीतरी आपल्यावर प्रेम करावे, आपुलकी दाखवावी, तसे बोलावे असे वाटते. आपण सर्व थोड्याफार प्रमाणात मोठेपणा, प्रसिद्धी मिळावी म्हणून अहंकार, अभिमान आणि आत्मविश्वासाने वागतो. एका मर्यादेपर्यंत हा मनुष्यस्वभाव आहे. वैचित्र्य, वैशिष्ट्य म्हणनू ते चुकीचे म्हणता येणार नाही. पण इथे काही संतवृत्तीची माणसे आहेत. त्यांनी अहंकारावर मात केली आहे आणि ते अशा एका अवस्थेला आले आहेत, की अहंकार तिथे शिल्लक रहात नाही. आध्यात्माच्या प्रभावाखाली वावरणाऱ्या अशा माणसांना लोकप्रियतेची, कौतुकाची इच्छा नसते.

अशाच माणसांबद्दल ख्रिस्त म्हणाला, "तुम्ही या जगात जरी रहात असला तरी या जगात नाहीत."

श्रीकृष्णाच्या म्हणण्याप्रमाणे ते कमलपत्रासारखे, जे पाण्यात वाढतात, पण ज्यावर दवबिंदू ठरत नाही.

अशा काही पवित्र माणसांना बाजूला ठेवल्यास, आपण इतर सगळे मात्र प्रसिद्धीच्या झोतात असतो. हा प्रसिद्धीचा दोष म्हणजे संपत्ती, गुणगौरव, खरे-खोटे किंवा शारीरिक व मानसिक बळ. आपण सगळेच आपल्या सामाजिक संबंधात आपले महत्त्व उघडपणे किंवा अप्रत्यक्षपणे दाखविण्याची एकही संधी सोडत नाही. त्यामुळे आमच्यातील श्रेष्ठत्व, मोठेपणा दुसऱ्याने जाणून घ्यावा, म्हणून प्रयत्नशील असतो. ही सवय, पद्धत कोणते अंतरिक समाधान देते? हे

आम्हाला सांगता येत नाही; पण एवढे सांगता येईल, की त्याने आम्हाला समाधान मिळते, मोठेपणाची भावना, गर्व होतो. मग तो क्षणिकही असतो.

अशा प्रकारचे काही लोक होते, त्यांनी गुरुजींशी जवळीक केली. ते त्यांच्या सान्निध्यात आले. त्यांना आध्यात्मातील काही हवे होते असे नाही; पण त्यांना आपली गुरुजींसारख्या आध्यात्मातील श्रेष्ठ लोकांशी जवळीक आहे, हे प्रौढपणे सांगावयाची संधी हवी होती. तिथे असे काही लोक होते, की त्यांना त्यांचे ज्ञान, गुण मोठेपणाचा प्रभाव दाखवावयाचा होता.

तेल्हारागावी गुरुजींच्या अगदी निकटवर्तीयांपैकी एक श्री. श्रीधर गंगाधर धर्माधिकारी होते. त्यांना प्रेमाने आदराने बाबुराव म्हणत. ते नगरपालिकेचे सेक्रेटरी आणि सॅनिटरी इन्स्पेक्टर म्हणूनही काम पहात होते. ते गुरुजींच्या सान्निध्यात असत. त्यांना गुरुजींच्या आध्यात्मिक साधनेबद्दल आणि योग-सामर्थ्याबद्दल चांगली माहिती होती. ते आपल्या मित्रांना, नातेवाईकांना गुरुजींच्या आध्यात्मिक प्रभावाबद्दल मोठ्या अभिमानाने सांगत. गुरुजींच्या आध्यात्मिक व अतिमानुष शक्तीबद्दल त्यांनी स्वतः पुष्कळ वैयक्तिक अनुभव घेतला होता. यासंबंधी एक-दोन प्रसंग पुढे पाहू. श्री. धर्माधिकारी व त्यांचे कुटुंबीय यांना तेल्हारा, अमरावती आणि इतर ठिकाणी लाभलेल्या कौटुंबिक स्वास्थ्याचे श्रेय ते गुरुजींना देतात. स्वतः श्री. धर्माधिकारी यांनी हे अनुभव स्पष्टपणे सांगितले आहेत.

इ. स. १९५८ मधला प्रसंग. श्री. धर्माधिकारी यांची नेमणूक खामगावला झाली होती. हे गाव तेल्हारापेक्षा तुलनेने मोठे होते. इथे मुलांच्या उच्च शिक्षणाकरिता कॉलेज होते, म्हणून त्यांनी खटपट करून खामगावला बदली करून घेतली. इथे बाबूराव गुरुजींबद्दल मोठ्या अभिमानाने त्यांच्या मित्रांजवळ -श्री. मधुकरराव देशपांडे -बोलत असत. श्री. देशपांडे हे साखरखेडा (फत्तेखर्डा) येथील सधन शेतकरी होते.

गुरुजी बाबुरावांकडे खामगावला नेहेमी जात आणि राहात असत. श्री. मधुकररावांनी - त्यांना सगळे मधुकाका म्हणत - बाबुरावांकडून गुरुजींशी परिचय करून घेतला. वारंवार भेटी झाल्यावर, श्री. मधुकाकांनी गुरुजींना त्यांच्या गावी - फत्तेखर्डा येथे येण्याची विनंती केली. त्यांनी त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती पहावी असा हेतू. गुरुजी विनम्रपणे निमंत्रण प्रत्येकवेळी नाकारीत

होते. एकदा पुन्हा अशीच विनंती मधुकाकांनी केल्यावर गुरुजी म्हणाले, "ठीक. मधुकरराव फत्तेखर्ड्याला मी येण्याचा हेतू काय? तुमच्या कुटुंबियांना आध्यात्मिक मार्गदर्शन व मदत नको असेल तर? तुमची नुसती भेट घ्यायची असेल तर तो हेतू साध्य झाला आहेच. मी तुम्हाला निक्षून सांगतो, की तुम्ही ज्यावेळी खामगावला याल त्यावेळी मी तुम्हाला इथे चोवीस तासाचे आत भेटेन आणि जर मी चुकलो तर फत्तेखर्ड्याला येईन." ह्या आश्वासनामुळे श्री. मधुकाकांचे चेहेऱ्यावर मिस्किल हास्य आले. कारण त्यांना खात्री होती, की आता ते गुरुजींना केव्हाही पेचात टाकतील आणि त्यांना आपल्या गावी स्वत:चे समाधानासाठी घेऊन जातील. बाबुराव तिथेच होते. या आश्वासनामुळे त्यांनाही जरा आश्चर्य वाटले.

मधुकाका हे वारंवार खामगावला येत असत. बाबुरावांना पूर्वसूचना देऊन ते येत-जात. त्यांना असे वाटले, की आपण गुरुजींना शब्दात सहज पकडू. त्यांना आपल्याला यश सहज मिळेल असे वाटले. कारण हे पंडितजी तेल्हारामध्ये राहणार. म्हणजे खामगावपासून पस्तीस मैल दूर. त्यांना हे खामगावला येणार आहेत हे कसे कळणार? म्हणजे पंडितजींना खामगावला रहावे लागेल. मधुकाकांचा विचार लक्षात घेऊन, गुरुजींनी त्यांचे आश्वासनाचा पुनरूच्चार केला. "तुम्ही खामगावला आल्यापासून चोवीस तासात मी तुम्हाला इथे दिसेन. अशाप्रकारे मी भेटावयास चुकलो, तर मी तुमच्या गावी निश्चित येईन."

दुसऱ्यांदा पुन्हा आश्वासन दिल्यावर मधुकाका आनंदित झाले. कारण त्यांना खात्री होती, पंडितजींनी जर शब्द पाळला नाही तर त्यांना ते शब्दांत पकडू शकतील. मग त्यांना ते गावी नेतील. त्यांना दाखवतील की ते कोण, कसे आहेत? तसेच फत्तेखर्डा गावही कसे आहे? या डावाने उत्तेजित होऊन मधुकाकांनी गुरुजींचे आश्वासन स्वीकारले आणि ते आपल्या गावी गेले.

दुसऱ्याच दिवशी ते खामगावला परत आले. त्यांना वाटले, की पंडितजी तेल्हाराला परत गेले आहेत. पण आश्चर्याची गोष्ट, त्यांना पंडितजी बाबुरावांकडे खामगावला दिसले. ते पुन्हा आपल्या गावी गेले. तिसऱ्या दिवशी त्यांनी खामगावला धावती भेट दिली. त्यावेळीही त्यांना गुरुजी तिथेच दिसले. त्यानंतर ज्या ज्या वेळी मधुकाका खामगावला येत, तेव्हा त्यांना गुरुजी न चुकता

बाबुराव धर्माधिकारी यांच्या घरी सापडत.

चार महिने होऊन गेले. एके दिवशी मधुकाका नागपुरात होते. त्यांच्या परतीच्या प्रवासात घरी जाताना त्यांना वाटले, की पंडितजींना पकडावे, म्हणून ते खामगावला आले. मधुकाका बाबुरावांकडे जेव्हा आले, तेव्हा गुरुजी तिथे नव्हते. त्यांना आनंद झाला व ते उत्तेजित झाले. कारण ह्यावेळी तरी त्यांनी गुरुजींना निश्चित माघार घ्यावयास लावली असती. आता ते त्यांच्या तावडीत सापडले.

पण त्यांचा हा आनंद क्षणिक होता. ह्यावेळी गुरुजी तेल्हारामध्ये त्यांच्या दवाखान्यात होते. त्यांनी मधुकाकाचे रूप त्यांच्या डोळ्यांसमोर उभे राहिलेले दवाखान्यात पाहिले. त्याचा अर्थ त्यांना उमगला. लगेच ते खामगावला निघाले. ते बसस्टँडवर आले, तोच खामगावला बस निघत होती. दोन तासातच ते खामगावला आले. संध्याकाळी गुरुजी बाबुरावांच्या घरी होते. मधुकाकांना आश्चर्यच वाटले. त्यांना प्रामाणिकपणे मान्य करावे लागले, की हे पंडितजी नुसते पोंगा पंडित नाहीत. यावर "मला वाटत नाही, की मी तुम्हाला फत्तेखड्र्याला नेऊ शकेन. फक्त तुम्ही तुमचे इच्छेने येण्याचे ठरवले तर शक्यता !" एवढेच मधुकाका बोलले.

"तुम्हाला पंडितजी कोण व कसे आहेत हे कळले नाही.आम्ही त्यांच्या इतक्या जवळ बरेच दिवस आहोत, तरीही त्यांच्या ज्ञानाची खोली समजू शकलो नाही. त्यांना आपल्या प्रश्नाचे बाबतीत अधिक त्रास न देण्यातच शहाणपणा आहे."

बाबुरावांनी शांतपणे समजावले. हे कसे घडले? ज्या ज्या वेळी मधुकाका खामगावला येण्याचे ठरवीत, त्या त्या वेळी गुरुजींना ते अगोदर कसे समजे? गुरुजींनी सांगितले, की प्रत्येक वेळी मधुकाका खामगावला जाण्याची योजना करीत, त्या त्या वेळी त्यांची प्रतिमा त्यांच्यापुढे येई. त्यावेळी ते खामगावला जात. त्यामुळे मधुकाकांना ते भेटू शकत. ह्यावरून आता हे स्पष्ट होईल, की प्रथम माणसाने अहंकारावर मात केली पाहिजे. मग त्याला ब्रह्मांडातील, ध्वनिलहरींच्या साह्याने लोक-परलोक यामधील घडामोडींचे ज्ञान होईल. म्हणजे त्याच्याकडून याबाबत लपवलेले - दडलेले काही राहात नाही.

शेठ हनुमानदास मल्ल, तेल्हारा, हे गुरुजींकडे वारंवार येत असत. गुरुजींची

तत्त्वज्ञानावरील व आध्यात्मावरील चर्चा त्यांनी अनुभवली होती. हनुमानदासालाही अध्यात्माची गोडी होती, म्हणून त्यांनी वृंदावन येथील गुरूकडून दीक्षा घेतली होती. एक दिवस चर्चेच्या ओघात हनुमानदास मल्ल यांनी आपल्या गुरूच्या आध्यात्मिक श्रेष्ठत्वाचा उल्लेख गुरुजींसमोर केला. "वृंदावन येथे तेच एक सत्पुरुष आहेत", असे हनुमानदास म्हणाले. त्यांना ह्या गुरुजींना घेऊन वृंदावनला त्यांच्या गुरूच्या दर्शनाकरिता जावेसे वाटले. ह्यावर गुरुजींनी उत्तर दिले, की माझे वृंदावन येथे जाणे हे कोण, कोणाला, कसे आकर्षित करतो, ह्यावर अवलंबून आहे.

ह्या चर्चेनंतर एक आठवड्याने एका रात्री गुरुजी ध्यानधारणा करीत त्यांच्या खोलीत बसले होते. त्यांनी सत्तर वर्षांचे एक दारात पाहिले. ते हळूहळू गुरुजींकडे येत होते. मध्यम उंची, खांदे पुढे आलेले, भुवया उंचावलेल्या आणि गाल ओघळलेले, केस पांढरे. ते धोतर नेसले होते. वर मात्र अंगात काहीही नव्हते. फक्त जानवे होते. पायाची बोटे वळलेली आणि विचित्र होती.

त्यांच्या शरीरातून उजेडाचा झोत येत नव्हता किंवा त्यांच्या भोवताली प्रकाश दिसत नव्हता. हे दृश्य शुक्रवारी रात्री दिसले.

पुढच्याच रविवारी सायंकाळी गुरुजींची हनुमानदासाशी भेट झाली. ते निरनिराळ्या विषयांवर गप्पा मारीत शेठ हनुमानदासाच्या घराच्या एका खोलीसमोर बसले. वेळ अंदाजे रात्री आठची. गप्पांच्या ओघात गुरुजींनी हनुमानदासाला त्यांच्या वृंदावन येथील गुरुजींचे दर्शन झाल्याचे सांगितले. हनुमानदासाचा विश्वास बसेना. गुरुजींनी मग तपशीलवार वर्णन केले. खात्री करून घेण्याच्या दृष्टीने हनुमानदासांनी हे वृद्ध गुरुजी कसे चालले होते, असे विचारले. त्यावर गुरुजींनी सांगितले, की हा वृद्ध माणूस बदक जसे ह्या बाजूने त्या बाजूने जाते, तसे ते गेले. त्यांनी पुढे सांगितले, की पायावरील कातडी सिल्कसारखी होती. त्यांच्या टाचा उंच आणि मुडपलेल्या, त्यांचे तळवे वेल्व्हवेटसारखे मऊ आणि पायात काही घातलेले नव्हते. हे ऐकून हा मनुष्य म्हणजे वृंदावन येथील आपले गुरू होत, याबद्दल त्यांची खात्री झाली.

हनुमानदासांनी वेळ न घालवता, तेल्हारामधील पंडितजी (गुरुजी) आणि त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराबद्दल आपल्या गुरूला कळवले. काही दिवसांनी त्यांना वृंदावन येथील गुरूकडून उत्तर आले, की तेल्हारा येथील पंडितजी हे

आध्यात्मिक उच्च दर्जा असलेले मोठे सद्गृहस्थ आहेत आणि हनुमानदासाने त्यांना आदराने गुरू म्हणून वागवावे. त्यांनी अगदी जवळ असल्यामुळे एकही संधी त्यांच्या आध्यात्मिक अनुभवाची सोडू नये.

हनुमानदासाचे वृंदावन येथे घर होते आणि बऱ्याच वेळ त्यांना ह्या गुरुजींना वृंदावन येथे घेऊन जावे व काही दिवस रहावे, असे वाटले; पण गुरुजींना मात्र ह्या वेळेस जावेसे वाटले नाही.

१९५९ मधील दिवाळी. त्या अगोदर सुमारे पंधरा दिवस ध्यानमग्न गुरुजींनी वृंदावन येथे भेट दिली. शेठ हनुमानदास मल्ल यांचे घर पहावयाचे म्हणून ते यमुना नदीच्या वाळवंटात आले. त्याच्या पलीकडे गेले आणि मुख्य रस्त्यावर आले. मुख्य रस्त्यावरून थोडेसे अंतर चालून गेल्यावर त्यांनी उजवीकडील बोळात प्रवेश केला. ह्या बोळातून काहीसे अंतर चालल्यावर, गुरुजींना कळून आले, की ह्या रस्त्याचा शेवट पिंपळाचे झाडाजवळ झाला आहे. तिथेच हनुमानदासाचे घर होते. मात्र घराला कुलूप लावलेले आढळले.

राधा हे नाव उच्चारले की हिंदुस्थानातील लोकांचे मनात एक चित्र उभे राहते. राधा आणि श्रीकृष्ण यांच्यामधील उदात्त प्रेम आणि त्यांच्या लीला. प्रेमाचे सुप्त रूप तिच्या स्वरूपात आहे. भक्तीच्या उत्कटतेचे ते प्रतिक आहे. तिचे श्रीकृष्णावरील प्रेम, त्यातील आर्तता आणि व्यथा. त्याच्या अनुपस्थितीत तिला भोगावे लागलेले दु:ख, सहन कराव्या लागलेल्या वेदना, मानसिक क्लेश, ती नृत्य करून कृष्ण दिसला की कशी हर्षभरित होई ह्या सगळ्या गोष्टी-कथा अविस्मरणीय झाल्या आहेत. गोपीमध्ये ती पहिली आणि पहिलीच. तिच्याशिवाय गोपालाचे (कृष्णाचे) अस्तित्वच मानता येणार नाही. राधेच्या तोडीची दुसरी कुणी श्रीकृष्णाकरिता नाही. भक्तिमार्गावरील ती शेवटची. (जशी सौंदर्याबाबत हेलन ऑफ ट्रॉय') देवाची भक्ती खरीखुरी कशी करावी हे ती दाखवते. तिचे नुसते नाव उच्चारले, की उदात्त आणि भक्तिपूर्ण विचार हिंदू मनात जागृत होतो. तिच्या शुद्ध प्रेमाची नुसती आठवण अनेक भक्तांना उच्च समाधान आणि स्वर्गीय आनंद देते. मग तिच्या कृपाकटाक्षाने कोणाला काही प्राप्त झाले तर? किंवा तिच्या अस्तित्वाने आणि लीलेने एखाद्यावर कृपा झाली तर?

आमच्या गुरुजींना एकदाच नाही, तर तीनदा तिचे दर्शन झाले- प्रत्येक

वेळी अधिक सुंदर, अधिक सुखद आणि आंतरिक समाधान देणारे. गुरुजी जरी गृहस्थाश्रमीचे दगदगीचे (धकाधकीचे) जीवन जगत होते - अवतीभोवतीचे प्रश्न, एकीकडे मिळवणे आणि खर्चाची दुसरीकडे काळजी, तरी ते अंतर्यामी या गर्दीच्या कोलाहलापासून दूर होते. खरे सांगायचे म्हणजे ते ह्या जगात होते, तरी ते ह्या जगातले नव्हते. ते त्यांच्यापैकी नव्हते. ज्यांना डोळे आहेत पण ते पाहू शकत नाहीत, कान आहेत पण ऐकू शकत नाहीत. पण ज्यांना डोळे आहेत, त्यांनी जगातील फक्त गोंधळाची स्थितीच पाहिली नाही, तर या मोहमयी संसारातील सत्य आणि वास्तवही त्यांनी पाहिले आहे. त्यांनी काननी अलौकिक संगीत ऐकले होते. ते संगीत त्यांच्या आत्म्याचे अन्नच होते !

आता पुन्हा कथेकडे. १९५९ मधली दीपावली. शब्दशः अर्थ म्हणजे दिव्यांची रांग. हिंदुस्थानातील दीपावलीचा सण. उत्तर हिंदुस्थानात मोठ्या आनंदाने साजरा होतो. ह्या उत्सवापाठीमागे दोन मुख्य कथा आहेत - एक म्हणजे प्रभू रामचंद्र-जानकी (सीता) लक्ष्मणासह घेऊन अयोध्या नगरीत चौदा वर्षांच्या वनवासानंतर येतो. अयोध्या नगरीतील लोक - प्रजाजन मोठ्या उत्साहाने आपल्या राजाचे दिवे लावून स्वागत करतात. दुसरी कथा - दीपावलीच्या रात्री लक्ष्मी - संपत्तीचे व समृद्धीचे प्रतीक-ही सर्वत्र संचार करते आणि लोकांकडे जाते. ज्या घरात तिचे स्वागत होते, ती तिथे राहते आणि संतुष्ट होते. आनंद आणि समृद्धी आणते. म्हणून या उत्सवाचे दिवशी श्रीमंत, गरीब, लहानथोर आणि इतर एकमेकांचे घर स्वच्छ करणे, रंगवणे, सुशोभित करण्यात दंग असतात. तेलाचे दिवे रात्रभर जळत ठेवले जातात. नाहीतर कदाचित चंचल लक्ष्मी घराला मुकेल.

ह्या रात्री गुरुजी ध्यानस्थ बसले होते. त्यावेळी त्यांनी त्यांच्यासमोर गोलाकार आकाराचा दिवा- सुमारे सहा फूट जमिनीपासून उंच असलेला- पाहिला. थोड्याच वेळात साऱ्या खोलीत उजेड पसरला. वातावरण आल्हाददायक व प्रसन्न झाले. दिव्याच्या गोलाकारात अगदी हळुवारपणे एक स्त्रीरूप दिसले, भोवतालच्या उजेडापेक्षाही ते तेजस्वी असे होते. तिचे सौंदर्य आणि शोभा अवर्णनीय. ती राधाच होती. तिचे लांब निळे-काळे केस मोकळे सोडलेले होते. ते जमिनीला लागलेले होते. तिचा रंग केशरी अन् पोषाख पांढरा होता. तिच्या डोळ्यांतून शांतता, संतोष (समाधान) आणि प्रेम स्रवत

होते, असे दिसले. गुरुजींनी सर्वत्र प्रेममय वातावरण अनुभवले, त्यामुळे ते अवाक् होऊन बसले. थोड्या वेळाने हे दृश्य नाहीसे झाले, तरीही गुरुजी त्याच प्रेममय वातावरणात गढून गेलेले होते.

दीपावली. अमावास्येचे दिवशी सकाळ होताच, गुरुजी हनुमानदासाचे घरी भेटावयास गेले. तिथे त्यांचे चांगले स्वागत झाले. त्यांना माडीवर एका दालनात नेले. गुरुजी तिथे व्यवस्थित बसले आहेत, हे पाहिल्यावर हनुमानदास दूध आणि फराळाचे पदार्थ आणावयास बाहेर गेले. गुरुजी आत एकटेच होते. त्यांची थोड्याच वेळात समाधी लागली. ज्यावेळी हनुमानदास दूध व फराळाचे पदार्थ घेऊन परत आले, तेव्हा त्याला गुरुजी अंगावर हाताने हवा घेत आहेत, असे दिसले. ते शांतपणे घरात उभे राहिले. हा प्रसंग ते औत्सुक्याने पहात होते. गुरुजी पूर्ववत अवस्थेप्रत आल्यावर हनुमानदास म्हणाले, "आपण काय करीत होता?"

यावर गुरुजी शांतपणे म्हणाले, " मी यमुना नदीत- वाळवंटात स्नान करीत होतो." असे सांगून त्यांनी त्या वातावरणाचे संपूर्ण वर्णन केले. हनुमानदासाच्या लक्षात आले, की गुरुजी वृंदावनाच्या परिसराचे वर्णन करीत आहेत. ह्या दिवशीचे रात्रीच गुरुजींना राधेचे दर्शन झाले, हे वर नमूद केले आहेच. अशा ठिकाणी भेट देण्याची गुरुजींची सवय होती. जिथे देवीचे वास्तव्य असे, तिच्या दर्शनातून त्यांच्यावर कृपा होत असे. राधेने त्यांना दर्शन दिले म्हणून त्यांना वृंदावनाला जावेसे वाटले. अशा ठिकाणी जाण्याची संधीही त्यांना लगेच आली.

दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुजींनी हनुमानदासाला आदल्या रात्री राधेचे दर्शन झाल्याचे सांगितले, म्हणून हनुमानदासाने गुरुजींना वृंदावनला आपल्या बरोबर यावे म्हणून आग्रह केला. त्याच दिवशी सायंकाळी हनुमानदास व गुरुजी वृंदावनला जावयास निघाले. रेल्वेगाडीने भुसावळमार्गे ते वृंदावन येथे दुसऱ्या दिवशी आले.

वृंदावन येथे हनुमानदासानी गुरुजींची राहण्याची व्यवस्था एका घरात, जे त्यांनी विकत घेतले होते, तिथे केली. रात्री गुरुजींना बराच वेळ झोप आली नाही. त्यांचे मन राधेचे दर्शन झालेल्या आठवणींनी व त्या पवित्र परिसरासंबंधी असलेल्या विविध कथांनी भारलेले होते. उत्तररात्री शांतता पसरली असताना,

त्यांना झोप लागली. तोच एक चमत्कारिक दृश्य दिसू लागले. एक मोठे बंद पाकिट त्यांच्यासमोर आले. ते आपोआप उघडले. त्यातून तीन कागदपत्रे बाहेर आली. एकदम कागद उघडला गेला. गुरुजींच्या समोर वाचता येईल असा तो धरला गेला. गुरुजींचे वाचन झाल्यावर ह्या कागदपत्रांची घडी झाली आणि पाकिटात घातली गेली. नंतर नजरेसमोर हनुमानदासाचे तेल्हारा येथील घर आले. एका खोलीत पाच लोखंडी पेट्या होत्या, त्यापैकी तिसऱ्या पेटीत हे पाकिट कागदपत्रासह आत गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुजींनी हनुमानदासाला सांगितले, ''वृंदावन येथील त्यांचे घरास अजून दोन भागीदार आहेत.'' हे ऐकून हनुमानदास आश्चर्यचकित झाले. त्यांनी मग विचारले, ''हे कसे कळले?'' गुरुजींनी मग रात्री जे दृश्य पाहिले, ते सांगितले. तसेच खरेदीपत्र हे हनुमानदासाचे तेल्हारा येथील घरात लोखंडी पेटीत व्यवस्थित आहे, असे सांगितले. हे ऐकून हनुमानदास अवाक् होऊन उभे राहिले.

फराळ झाल्यावर गुरुजी व हनुमानदास, हनुमानदासाचे गुरूच्या आश्रमग्रामी जावयास निघाले. त्यांचे पूज्य गुरू आंघोळीकरिता यमुना नदीवर गेले होते, म्हणून दोघेही वाट पहात बसले. भिंतीवर बरेच फोटोग्राफ लावलेले होते. वेळ जावा म्हणून दोघेही फोटो-चित्रे पहात राहिले. एक चित्र पहात असताना ते थांबले. हनुमानदासाला गुरुजींनी सांगितले की, ह्यांना मी तेल्हारामध्ये दृश्य स्वरूपात पाहिले. हनुमानदासाने यावर खुलासा केला, की हे चित्र त्यांच्या गुरूचे आहे. ते वृंदावनमध्ये टोपीकुंजचे महंत म्हणून ओळखले जात. ते नदीवरून परत आल्यावर गुरुजींची ओळख करून देण्यात आली.

पुढील काही दिवस टोपीकुंजच्या महंतांनी वृंदावन येथील बऱ्याचशा गूढ जागा दाखविल्या; पण आश्चर्याची बाब ही, की प्रत्येक जागा पहात असताना ते त्यावर ऐतिहासिकदृष्ट्या माहिती सांगत. तसेच त्यापाठीमागे असलेल्या कथा- जणू पुस्तकाचे पान वाचावे, अशा पद्धतीने ते सांगत होते. एक दिवस महंतांनी गुरुजींना एका समाधिस्थळी नेले. ह्या ठिकाणी दोन प्रसिद्ध पुरुष - हे महंतांचे गुरू-ह्यांना पुरले होते. त्यांनी गुरुजींना विचारले, की यापैकी तुम्ही कोणाला पाहिले आहे का? गुरुजींनी लगेच उत्तर दिले, की ह्यापैकी एक थडगे रिकामे आहे आणि दुसऱ्यात एक तरुण माणूस समाधिवस्थेत आहे. तो सुदृढ

बांध्याचा, गहू वर्ण असलेला, त्याचे लांब काळे केस आणि तो पद्मासन घालून बसलेला आहे. हे ऐकून महंत आश्चर्यचकित झाले. ते म्हणाले, की समाधिवस्थेतील माणूस हेच त्यांचे गुरू होत. त्यांनी हेही कबूल केले, की येथे पू. गुरुजी (पंडित) तेल्हारा, यांच्या दर्जाचा माणूस त्याने आतापर्यंत वृंदावन येथे पाहिला नाही.

सगळे पुन्हा आश्रमात आले. महंतांनी त्यांच्या पुजाऱ्याला सांगितले, की पू. गुरुजींना जे लागेल ते जेव्हा ते मागतील तेव्हा द्यावे.

काही दिवसांतच, तेल्हारामधील या गृहथाश्रमी माणसाने-म्हणजे पू. गुरुजींनी साधनेच्या विविध अवस्थांसंबंधी वृंदावन येथील रहिवासी - आध्यात्मिक जिज्ञासूंवर चांगला प्रभाव पाडला. त्यापैकी काहींना चांगले आकर्षण वाटू लागले. त्यांच्यापैकी एक प्रतापचंद्र चांडक - टोपीकुंजचे महंत यांचा शिष्य होता- ह्या तरुणाला पू. गुरुजींच्या आध्यात्मिक सामर्थ्याचे आकर्षण वाटले म्हणून अशा सत्पुरुषांच्या सान्निध्यात जितका वेळ घालवता येईल तितका घालवावा, म्हणून त्यांनी त्यांचे गुरु महंत यांची तशी परवानगी घेतली आणि त्याप्रमाणे ते गुरुजींबरोबर वेळ घालवू लागले.

अशा प्रकारे हनुमानदास व गुरुजी वृंदावनला आल्यापासून सुमारे एक आठवडा गेला. एका रात्री, सारे वृंदावनगाव शांत, निद्रिस्त झाले असताना पू. गुरुजी नेहेमीप्रमाणे ध्यानस्थ बसले होते. त्यांच्या डोळ्यासमोर एक दृश्य उभे राहिले - एक सुंदर टेकडी चंद्रप्रकाशाने झाकलेली आहे.त्या टेकडीवर त्यांनी एक भव्य राजवाडा लखलखत असलेला पाहिला. ते टेकडी चढून वर गेले आणि राजवाड्याकडे जाऊ लागले. जात असताना त्यांना सुखद संवेदना होत होत्या. प्रवेशद्वाराजवळ आल्यावर त्यांची नजर एका पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेल्या केशरी रंगाच्या तरुणीवर पडली. तिचे लांबसडक निळे-काळे केस तिच्या पाठीवर सोडलेले होते. तिच्या उजव्या हातात हिरा बसवलेला कंगवा होता. असे दिसत होते, की तिने जणू काही तिचा अर्धाअधिक साजशृंगार पूर्ण केला होता. ही तरुण सौंदर्यवती दुसरी कोणी नसून ती राधाच-श्रीकृष्णाची भक्त, जिचे दर्शन तेल्हारामध्येही झालेले होते. गुरुजी ह्या अवस्थेत थांबले - पवित्र कृपाकटाक्ष टाकलेल्या दिव्य देवतेचे दर्शन ते अनुभवीत होते. काही वेळ गुरुजी व राधा एकमेकांकडे पहात राहिले. या मधल्या वेळात सुमारे आठ-दहा

सख्या राधेच्या राजवाड्याच्या बाहेर आल्या. त्या राधेच्या सख्या-मैत्रिणी होत्या. त्या जराशा रुष्ट झालेल्या दिसल्या. कारण राधा जरा घाईघाईनेच आपला साजशृंगार अर्धवट ठेवून बाहेर आली होती. एका अनोळखी व्यक्तीच्या सहवासात आपली राधा आहे, हे पाहिल्यावर त्या अधिक आश्चर्यचकित झाल्या.

"ही व्यक्ती कोण आहे?" त्यांनी उत्सुकतेने विचारले. यावर उत्तर देताना राधाजीने गुरुजींचा हात तिच्या हातात घेतला आणि म्हणाली, "तो आपल्यापैकीच एक आहे. मी इथे त्याला पहाण्याकरिता आले. आता मी त्याला भेटले आहे, तो आपल्याबरोबर राहील." नंतर ते राजवाड्यात गेले. यानंतर सारे दृश्य नाहीसे झाले. गुरुजींची उर्वरित रात्र झोपेशिवाय गेली. ते राधेच्या स्वरूपाशी एकरूप झाले होते आणि स्वत:ला संपूर्ण विसरून गेले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी गुरुजींनी ही सगळी घटना महंत, प्रतापचंद्र चांडक आणि हनुमानदास यांना सांगितली. तसेच त्यांनी बरसाना या गावी जिथे राधा तिच्या जीवनात भूलोकी राहिली होती, तिथे जाण्याची इच्छा प्रगट केली. गुरुजींच्या वरील अनुभवामुळे सगळेच प्रभावित झाले आणि त्यांनी दुसऱ्या दिवशी बरसाना गावी जावयाचे ठरविले. काही खासगी कामामुळे ते लगेच त्याच दिवशी जाऊ शकले नाहीत.

प्रतापचंद्र चांडक हे हनुमानदास मल्ल यांचे मामा होते. ते मध्यप्रदेशातील रायपूर आणि बिलासपूर या गावाच्या मध्ये असलेल्या भाटापारा या गावचे रहिवासी होते.

गुरुजींना बरसाना येथे जाण्याकरिता चोवीस तास सुद्धा जरा उशिरच वाटत होता. आयुष्यात प्रथमच इतकी अस्वस्थता ते अनुभवीत होते. त्यांना ह्या स्वप्नाची अगदी ताजी आठवण होत होती. पुढचे चोवीस तास त्यांनी मोठ्या मुश्किलीने कसेबसे घालवले.

दुसरा दिवस उजाडला. त्यांचे प्रस्थान काही कारणाने लांबले. ह्या उशीरा निघण्यामुळे कदाचित आपण बरसाना येथे आरती आणि प्रसादाकरिता वेळेवर जाऊ का, याविषयी त्यांना काळजी वाटली. थोड्याच वेळाने गुरुजी, हनुमानदास व प्रतापचंद्र यांच्याबरोबर बसमध्ये बसले. बरसाना येथे बस वेळेवर जाईल असे ड्रायव्हरने त्यांना सांगितले. बरसाना येथे पोचावयास सुमारे एक

मैल अंतर राहिले असेल, तो बस नादुरुस्त झाली. यामुळे गुरुजी नाराज झाले. कारण आरतीची वेळ जवळ येत होती; त्यांना तिथे जावयास उशीर होत होता.

ड्रायव्हर गाडीतून खाली उतरला आणि इंजिनात कुठे बिघाड आहे का ते पाहू लागला. लगेच गुरुजींनी त्याला सांगितले, "कॉर्बोरेटरमध्ये पेट्रोल येत नाही, ते कुठेतरी ब्लॉक झाले आहे. तुमच्याजवळ हवेचा पंप आहे, तो घ्या आणि त्याने कॉर्बोरेटर साफ करा." ड्रायव्हरने तसे केले. बस सुरू झाली आणि ही सर्व मंडळी त्यांच्या नियोजित ठिकाणी वेळेवर पोचली.

गुरुजी बसमधून उतरले. अवतीभोवतीचे वातावरण त्यांनी अनुभवलेल्या दृश्याशी तंतोतंत जुळणारे होते. ती टेकडी आणि राजवाडा तिथे होता. ते पाहताच त्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू उभे राहिले आणि ते अश्रू डोळ्यांतून खाली वाहू लागले. त्यांच्या भावना इतक्या अनावर झाल्या होत्या, की त्यांना पायऱ्या चढण्याकरिता पाय उचलणेही अशक्य होत होते. हनुमानदास आणि प्रतापचंद्र चांडक यांनी त्यांना मदत केली. त्यामुळे ते वर येऊ शकले. ते कठड्याला धरून एका पवित्र देवळासमोर उभे राहिले. यावेळी त्यांच्या अंगावरचे कपडे डोळ्यातून सततच्या वाहणाऱ्या या अश्रूंमुळे ओले झाले होते.

देवळात पूजा चालली होती. देवी राधेस राजभोग चालू होता आणि मंगल वातावरणात आरती झालेली होती. पूजा झाल्यावर, देवळातच राहणाऱ्या पाच-सहा मुली गुरुजींकडे आल्या. त्यांनी गुरुजींना काही भेट द्यावी म्हणून आग्रह केला. भेट घेतल्याशिवाय त्या त्यांना जाऊ देणार नव्हत्या. गुरुजींजवळ पैसे नव्हते. ते दाखविण्याकरिता त्यांनी आपला हात खिशात घातला; पण आश्चर्याची गोष्ट, त्यांना एक रुपयाची नोट त्यांच्या फाऊंटन पेनला गुंडाळली गेलेली आढळली. लगेच त्यांनी ती देऊन मोड घेतली आणि ती नाणी सर्व दिशांना फेकली. लगेच त्या मुली ती नाणी गोळा करण्याकरिता धावल्या- जशा चिमण्या धान्य टिपण्याकरिता धावतात तशाच. नंतर त्या हसत त्यांना सोडून निघून गेल्या.

देवळातील मुख्य उपाध्याय नंतर बाहेर आले आणि त्यांनी गुरुजींना आणि त्यांच्याबरोबर आलेल्या मित्रांना प्रसाद दिला. प्रसाद घेऊन ही मंडळी टेकडीवरून खाली आली आणि प्रतापचंद्र चांडक यांच्या स्नेह्याच्या भेटीस गेली. त्यांच्याच घरी त्यांनी प्रसाद खाल्ला. अद्यापही गुरुजींच्या डोळ्यांतून अश्रू

येत होते आणि त्यांचे कपडे पूर्ण भिजले होते. प्रसाद खाल्ल्यावरच डोळ्यांतून अश्रू येणे थांबले. इथे त्यांनी ती रात्र घालवली. दुसऱ्या दिवशी ते वृंदावनला परत गेले. जाताना त्यांनी गोवर्धन येथेही भेट दिली.

वृंदावनला परत आल्यावर, प्रतापचंद्र हे इतके भारावून गेले, की त्यांनी गुरुजींपुढे स्वच्छ कबूल केले - गेली बारा वर्षे मी माझ्या गुरूच्या-महंत टोपीकुंज यांच्याजवळचा शिष्य म्हणून त्यांच्या सान्निध्यात घालवली; पण मी आध्यात्मातील उपासनेत प्रगती केली किंवा तसा अनुभव एकदासुद्धा आला नाही. आपला वेळ व्यर्थ गेला असे त्यांना वाटले. त्यांनी गुरुजींना विनंती केली की, इथून पुढे तुम्ही मला मदत करा, मार्गदर्शन करा. गुरुजींना दिसून आले, की (खात्री झाली की) प्रतापचंद्राची इच्छा ही प्रामाणिक आहे, ते एक इच्छुक आणि लायक भक्त आहेत. त्यांनी त्यांना मदत करण्याचे कबूल केले. फक्त अट एकच, की त्यांचे सध्याचे गुरू महंत यांचेशी असलेले संबंध बिघडू नयेत. गुरुजींनी त्यांना विशिष्ट पद्धतीने ध्यान करावयास शिकविले. त्याचा योग्य तो परिणाम झाला. दोन दिवसांत त्यांना त्याची प्रचिती आली. चवथ्या दिवशी त्यांना त्यांच्या इच्छेप्रमाणे राधेचे दर्शन झाले. ह्या अनुभूतीचा इतका काही परिणाम प्रतापचंद्रांवर झाला, की त्यांना त्यांचे उर्वरित सगळे जीवन गुरुजींबरोबर घालवावेसे वाटू लागले. परंतु गुरुजी अशा काही गोष्टीस सहज परवानगी देणार नव्हते. त्यांनी आग्रहाने सांगितले, की प्रतापचंद्रांनी महंतांना सोडू नये. पूर्वीसारखीच त्यांची सेवा करावी. मात्र त्यांनी नव्या पद्धतीने जे त्यांना आता शिकविले त्याप्रमाणे ध्यानधारणा चालू ठेवावी.

गुरुजींच्या नावाचा बोलबाला वृंदावन येथे सर्वत्र होऊ लागला. त्यामुळे बरेच साधक त्यांच्याभोवती गर्दी करू लागले. त्यांचे नाव संस्कृत महाविद्यालयाचे परिसरात पोचले. त्याचे प्रमुख हे महंत, टोपीकुंज यांचे गुरुबंधूच होते. या महाविद्यालयाचे काही विद्यार्थी गुरुजींकडे आले आणि त्यांनी त्यांची मदत व मार्गदर्शन मागितले. त्यांना त्यांच्याबरोबर नित्य काही वेळ घालवावा म्हणून परवानगी हवी होती. मात्र गुरुजींनी या विचारापासून त्यांना परावृत्त केले. कारण ते गृहस्थाश्रमी होते, त्यांचा कोठेही आश्रम नाही, देऊळ नाही किंवा संस्थासुद्धा. तसेच मदत देण्यासही त्यांच्यापाशी काही नव्हते. समजा, जर ते त्यांच्याकडे आले तर ते त्यांची राहण्याची कशी व कोठे व्यवस्था करतील? हे इच्छुक

विद्यार्थी उत्तर देण्यास तयार होते. ते म्हणाले की, "जिथे तुम्ही राहता तिथे- जरी ते झाडाखाली राहिले, तरी त्यांची तेथे राहण्याची तयारी होती. गुरुजींनी आणखी एक आक्षेप घेतला. त्यांच्या वडिलांची - मालकांची तशी मुभा - परवानगी आहे का? त्यांनी विचारले. त्यावर त्यांनी लगेच प्रतिप्रश्न केला, "परमेश्वराचा शोध घ्यावयाचा असल्यास अशा परवानगीची गरज आहे का?"

गुरुजींनी वस्तुस्थिती जाणली. त्यांचे वृंदावन येथील वास्तव्य जरा लांबले, तर त्यांचे महंतांशी असलेले चांगले संबंध बिघडतील, म्हणून चांगल्या विचाराने त्यांनी वृंदावनहून निघावयाचे ठरवले. हनुमानदासाबरोबर गुरुजी तेल्हाराला परत आले. त्यांनी सुमारे पंधरा दिवस येथे घालवले. ह्या सर्व दिवसांत त्यांनी एक मिनिटही झोप घेतली नाही. कारण ते सर्ववेळ भावसमाधी अवस्थेत होते.

॥ ॐ ॥

## *मनुष्यप्रकृतीच्या आणि मनुष्यव्यवहाराच्या वैचित्र्याचे यथार्थ वर्णन*

*श्रीकृष्ण म्हणतात, "अर्जुना, दैवी संपत्तीला अनुसरून ज्याचा जन्म झालेला आहे, त्याच्या ठिकाणी निर्भयता असते. अंत:करण निर्मळ असून त्याला आत्मज्ञानाविषयी निष्ठा वाटते. दान, इंद्रियसंयम, यज्ञ वेदाध्ययन, तपश्चर्या, तरलता, अहिंसा, सत्य, क्रोधाचा अभाव, औदार्य, शांती, दुष्टपणाचा अभाव, भूतदया, विषयांच्या ठिकाणी अनासक्ति, मृदुता, लज्जा, चपलतेचा अभाव, तेज, क्षमा शुचिता, निष्कपटपणा, अहंमन्यतेचा अभाव इ. सद्गुण त्याच्या ठिकाणी वास करतात.*

*आसुरी संपत्तीला अनुसरून जन्म पावलेल्या मनुष्यामध्ये दांभिकपणा, दर्प, अभिमान, क्रोध, निष्ठुरता, अज्ञान इ. अवगुण दिसून येतात.*

*दैवी संपत् मोक्षाला कारण होते तर असुरी संपद् बंधनाला कारण होते. या लोकी दैवी आणि आसुरी अशा दोन भूतसृष्टी आहेत." हे जाणून घेणे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.*

# १३

# तेल्हारा : संगीत आणि ज्योतिष

यापूर्वी आपण पाहिले आहे, की गुरुजींना संगीताची आवड होती. चांगले गाणे म्हटले, वाद्य चांगले वाजवले की त्यांना मनस्वी आनंद होत असे. रामलीला कंपनीत असताना, त्यांचा संबंध काही संगीतकारांशी आला होता. नंतर त्यांना संगीताचे प्राथमिक धडे पंडित भागवतबुवा, पैठण यांनी दिले. त्याचा उपयोग गुरुजींनी रामायणावरील प्रवचनप्रसंगी चांगल्या प्रकारे केला. त्यानंतर मात्र त्यांनी संगीताचे पद्धतशीर अध्ययन करण्याचा गंभीरपणे प्रयत्न पुन्हा केला नाही किंवा त्यांना तशी संधी चालून आली नाही.

मागे १९४५ च्या सुमारास एक प्रसंग घडला आणि त्यातूनच त्यांनी संगीताचे अध्ययन करण्याचे मनावर घतले. तेल्हारामधील नागरिकांना गणपती उत्सव ही एक सामाजिक उपक्रमाची चांगली संधी असे. प्रत्येकजण या उत्सवात चांगले काही करण्याचा प्रयत्न करी. त्यांच्या ह्या उत्सवात विद्वान माणसांची भाषणे, चर्चा, भजन, कीर्तन आणि शास्त्रीय व सुगम संगीताचे कार्यक्रम होत. १९४६ सालच्या उत्सवात असे झाले, की अकोल्यातील एक प्रसिद्ध स्थानिक गायक श्री. सकळकाळे यांना हिंदुस्थानी शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम सादर करण्यास बोलावले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी, आदल्या दिवशीचा कार्यक्रम झाल्यावर, गायक श्री. सकळकाळे यांना श्री. बाबुराव धर्माधिकारी यांनी चहापानास बोलावले होते. इतर निमंत्रितांत डॉ. भिडे, श्री. संत, ॲड. तायडे आणि गुरुजी होते. सर्वांनीच कार्यक्रम चांगला झाल्याचे सांगितले आणि

श्री. सकळकाळे यांनी तो उत्तम प्रकारे सादर केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. आभाराबद्दल सौजन्यपूर्ण कृतज्ञता व्यक्त करण्याऐवजी गायकाने कृतघ्नपणे अभिप्राय दिला, की येथील श्रोतृवर्गाला चांगल्या संगीताची जाण नाही. हे ऐकून बाबुराव व इतरांना अगदी चमत्कारिक वाटले; पण ते यावर काही म्हणाले नाहीत.

ही अप्रस्तुत टीका गुरुजींना जरा खटकली. कारण या अपमानाचा रोख तेल्हारा येथील सर्व श्रोत्यांवर होता. गुरुजींनी श्री. सकळकाळे यांचे निदर्शनास आणून दिले, की ते स्वत: गृहित धरून होते, की तेल्हारामधील प्रत्येक नागरिक हा खेडवळ आणि उदासीन होता. श्रोत्यांमध्ये कोण कसा होता? श्रोत्यांचा एवढ्या थोड्या अवधीत आणि गर्दीत ते कसा अंदाज घेऊ शकले? पण गुरुजींनी श्री. सकळकाळे यांना आश्वासन दिले, की ते पुढील गणपती उत्सवात येथे येतील तेव्हा ते तेल्हारामध्ये असतील किंवा नसतील पण कोणी तरी त्यांच्याशी संगीताच्या जाणकारीत बरोबरी करील.

श्री. सकळकाळे यांना हा टोमणा उमगला नाही. या आव्हानाने नक्कीच त्यांचा अहंकार थोडासा हेलावला. या चर्चेत आणखी काही भर न पडता ते शांतपणे तेल्हाराहून गेले.

गुरुजींनी गर्विष्ठ गायकाला योग्य ती जागा दाखवली, यामुळे श्री. धर्माधिकारी आणि इतरांना आनंद झाला. त्यात गुरुजींनी आपला स्वाभिमान प्रगट केला आणि तेल्हारकरांची प्रतिष्ठा राखली.

या प्रसंगाच्या निमित्ताने, गुरुजी यापुढे शास्त्रीय संगीत शिकण्याची संधी पहात होते. कारण, त्यांना अकोल्यातील वरील गायकास दिलेले वचन सिद्ध करून दाखवावयाचे होते. तशी संधी येण्यास फार दिवस लागले नाहीत. लवकरच श्री. भागवतबुवा पंढरपूरकर-गायक आणि हार्मोनियम वादक -ज्यांचा स्थानिक लौकिक मोठा होता, ते तेल्हारा येथे आले. त्यांचा मुक्काम त्यांचे एक शिष्य शेठ मणीलाल शहा यांचेकडे होता. ते आले त्याच रात्री वाद्यवादनाचा कार्यक्रम योजला होता. गुरुजी ह्या कार्यक्रमास हजर होते. श्री. पंढरपूरकरांचे शास्त्रीय संगीतावरील व वाद्यवादनावरील प्रभुत्वाने गुरुजी भारावून गेले. दुसऱ्या दिवशी गुरुजी त्यांच्याकडे गेले आणि त्यांचेकडे त्यांनी शास्त्रीय संगीत शिकण्याची इच्छा व्यक्त केली. गुरुजींच्या संगीत जानकारीची प्राथमिक चाचणी घेतल्यावर

त्यांनी त्यांना विद्यार्थी म्हणून घ्यावयाचे ठरवले. श्री. पंढरपूरकरांनी गुरुजींच्या घरी येऊन काही दिवस संगीताचे धडे द्यावयास सुरुवात केली.

प्रत्येक दिवशी संगीताचा धडा फक्त तीन मिनिटे चाले. या वेळात मास्तर काही विशिष्ट रागांचे आरोह सांगत. दिवसातील उरलेल्या वेळात शिष्याने जे शिकवले, त्याचा सराव करावयाचा. गुरुजींना संगीताचे ज्ञान ही उपजत देणगी होतीच. तसेच त्यांच्याठायी समजून घेण्याचे लक्षणीय कसब होते. ते जे शिकवत त्याचे तंतोतंत प्रत्यंतर देण्याचे सामर्थ्य गुरुजींजवळ होते. तरीही एक विद्यार्थी म्हणून गुरुजी तासन्‌तास बसत आणि जे धडे दिले, त्याचा सराव करीत. एका वर्षातच ह्या सततच्या सरावाने त्यांच्यात पुष्कळ आत्मविश्वास आला. त्यामुळे श्रोत्यांपुढे कार्यक्रम सादर करण्याची तयारी झाली. पुढच्या वर्षी गणपती उत्सव आला, तेव्हा ते श्री. सकळकाळे यांना भेटावयास तयार होते. ह्यावेळीही तेल्हारात त्यांचा कार्यक्रम होता. श्री. सकळकाळे यांच्या गायनानंतर गुरुजींचे गाणे झाले आणि अशाप्रकारे त्यांनी परतफेड केली. वस्तुस्थिती अशी होती, की तेल्हारामधील सामान्य श्रोते इतके काही उदासीन नव्हते.

यानंतर गुरुजींनी आणि इतरांनीसुद्धा मदत केल्यामुळे श्री. पंढरपूरकरांनी तेल्हारा येथे संगीत शिकविण्याकरिता संगीत विद्यालयाची स्थापना केली.

गुरुजींनी संगीताचा अभ्यास १९४७ ते ४९ अशी तीन वर्षे श्री. पंढरपूरकर यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली केला. ह्या काळात गुरुजींनी काही निवडक मर्यादित रागांच्या अभ्यासावर भर दिला. तीन वर्षांत फक्त ती तीन राग. त्यांच्या सवयीप्रमाणे ते प्रत्येक रागाचा सखोल विचार करीत, समजून घेत, त्यापाठीमागे असलेला तत्त्वविचार, त्याची घडण आणि त्याच्या आविष्कारातील विविधता, ह्या सरावामुळे त्यांना संगीत उपासनेतील सखोलपणा वाढवता आला, आंतरिक संगीत जे ऐकले नव्हते, त्याच्याशी संवाद साधता आला. त्यांची योगसाधना आणि आध्यात्मिक साधना संगीताशी जुळली गेली. त्याची सत्यता कीटस्‌च्या उद्‌गारांशी ''ऐकलेले सूर मधुर आहेत पण न ऐकलेले अधिक मधुर !'' जुळते.

त्यांची अशी धारणा होती, की संगीताला त्याचे एक थेरॅपटिक मूल्य आहे. त्याचा पडताळा प्रत्यक्ष पाहण्याची त्यांना लवकरच संधी प्राप्त झाली. त्यांचे मित्र आणि शिष्य डॉ. भिडे यांना एकदा तीव्र डोकेदुखी सुरू झाली.

त्यांच्या स्वत:च्या औषधाने किंवा त्यांच्या डॉक्टरमित्रांनी दिलेल्या औषधाने ती थांबली नाही. डोकेदुखी न थांबल्यामुळे त्यांना दोन दिवस त्रास सहन करावा लागला. तिसऱ्या दिवशी गुरुजी डॉ. भिड्यांच्याकडे गेले, त्यावेळी त्यांची भेट झाली. डॉ. भिड्यांना डोकेदुखी असह्य होत होती, ती थांबण्याकरिता औषध मागितले. यावर गुरुजी म्हणाले, की मी एक नेहेमीच्या रूढ औषधपद्धतीपेक्षा वेगळा इलाज करतो. डॉ. भिडे कोणत्याही गोष्टीस तयार होते. गुरुजींनी भिडे यांना शेजारच्या खोलीत नेले. तिथे संगीताची वाद्ये ठेवलेली होती. वाद्यसंगीत हा डॉ. भिडे यांचा छंद होता.

गुरुजींनी डॉ. भिडे यांच्या कंपौंडरला- श्री. पुंडलिक इंगोले हा उत्तम तबलावादक होता त्याला- बोलावले. तबल्यावर त्यांनी एक ताल वाजवण्यास सांगितला. गुरुजी स्वत: हार्मोनियम वाजवण्यास बसले. त्यावर एक विलंबित लयीचा शांतिदायक राग वाजवू लागले. एक-दोन मिनिटांतच डॉ. भिडे यांची डोकेदुखी कमी होत होत थांबलीही. जादू झाल्यासारखे डॉ. भिड्यांना वाटले. नवचैतन्याचा अनुभव त्यांना आला. आपल्या गुरुजींबद्दल कृतज्ञतेची भावना त्यांच्या मनात दाटून आली.

गुरुजींच्या मतानुसार डोकेदुखीच्या काळात आपल्या शरीरातील नाडीकोष अत्याधिक सक्रीय होतात. मंद संगीतामुळे ही सक्रीयता शांत होते, मानसिक तणाव क्रमश: दूर होतो व डोकेदुखी हळूहळू कमी होते. डॉ.भिड्यांवरील ह्या उपचारामुळे वरील विचाराला पुष्टी मिळाली.

गुरुजींचा शैक्षणिक अभ्यास हा कवी शेक्सपिअरइतका होता. शेक्सपिअरप्रमाणेच गुरुजीसुद्धा शिकले; पण त्यांनी जे ज्ञान मिळविले ते प्रत्यक्ष दैनंदिन जीवन जगून. वरील कवीप्रमाणेच गुरुजींचे ज्ञान अनेक क्षेत्रांशी संबंधित होते. जे त्यांच्या सान्निध्यात आले, त्यांना त्यांच्या सखोल ज्ञानाचे आणि अनुभवांचे आश्चर्य वाटे. त्यांना ॲस्ट्रॉलॉजीचेसुद्धा चांगले ज्ञान होते. संगीताप्रमाणेच ते गंभीरपणे ॲस्ट्रॉलॉजीचा अभ्यास करण्यास उद्युक्त झाले. तेल्हारामध्ये राहू लागल्यानंतर (१९४४-४५) त्यांच्या मनामध्ये हा विषय शिकण्यासंबंधी तीव्र इच्छा उत्पन्न झाली, त्यामुळे त्यांना या विषयातील पंडित लोकांची मते पडताळून पाहता येतील, म्हणून गुरुजींनी काही ॲस्ट्रॉलॉजरकडे जाऊन प्राथमिक धडे घेण्याचे ठरवले. त्यांच्या सुदैवाने तिथे त्यांच्या घरासमोर

श्री. काटे, सब-रजिस्ट्रार (रेव्हेन्यु) राहात होते. ते ज्योतिषशास्त्रात निपुण होते. ज्योतिषविषयक भरपूर माहिती, तपशील आणि आकडेमोड त्यांची तोंडपाठ असे. त्यामुळे 'ज्योतिषशास्त्रातील रेडीरेकनर' असेच सर्वजण गंमतीने त्यांना म्हणत.

एक दिवस गुरुजींनी त्यांची गाठ घेतली आणि विनंती केली, की या शास्त्रातले काही प्राथमिक धडे शिकवावेत. श्री. काटे यांना गुरुजींचे म्हणणे तितकेसे पसंत पडले नाही. त्यावर ते कुत्सितपणे म्हणाले, "ॲस्ट्रॉलॉजीचा अभ्यास हा काही होमिओपॅथीइतका सोपा नाही, की चार-सहा बाटल्या एकत्र केल्या की अभ्यास झाला." यावर एकही प्रतिशब्द न उच्चारता गुरुजी शांतपणे दवाखान्यात परत आले. श्री. काटे यांचे अपमानास्पद , अप्रस्तुत शब्द त्यांच्या जावयाने ऐकले. ते पंचगौहान या गावी शिक्षक होते. त्यांना गुरुजी चांगले माहिती होते. त्यामुळे ह्या तरुणाला वाईट वाटले. ज्या पद्धतीने त्यांच्या सासऱ्यांनी ह्या पू. पंडिताला वागवले, ते त्यांचे शेजारीच होते. नंतर त्यांनी त्यांच्या सासऱ्याला सांगितले, की हे पंडितजी बाहेर साधे-सरळ दिसत असले, तरी ते आतून वेगळे आहेत. त्यांच्यावर ईश्वरी कृपा आहे म्हणून त्यांना अपमानास्पद वागवणे बरोबर नाही. दुसऱ्याच दिवशी श्री. काटे गुरुजींच्या घरी गेले. त्यांना ज्योतिष शिकविण्याची तयारी दाखवली, तसेच त्यांनी ज्योतिषशास्त्रावरील प्राथमिक चार पुस्तके विकत घेण्यास सांगितले. गुरुजींनी ती पुस्तके आणली. अशा प्रकारे त्यांनी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास सुरू केला व त्यावर चांगले प्रभुत्व मिळविले. त्यांनी व्यापारी ज्योतिषाचा अभ्यासही केला. याचा उपयोग बऱ्याचवेळा उद्योग-धंद्यातील लोकांना त्यांचे व्यवहार करताना फायद्याचा झाला.

॥ ॐ ॥

माझा मऱ्हाटाची बोल कौतुके । परि अमृतातेही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके मेळविन ॥ — **ज्ञानेश्वरी**

●●●

*प. पू. गुरुजींचे चरित्र मूळ इंग्रजीमध्ये आहे. त्याचा अनुवाद हिंदी, संस्कृत आणि आता मराठीत झाला आहे.*

ॐ

# १४
# संगीतकलेची सेवा

१९६० सालच्या सुरुवातीस गुरुजींनी आपला वैद्यकीय व्यवसाय बंद करण्याचे ठरवले. तेल्हारा गावाचा निरोप घ्यावा आणि दुसरीकडे सोईस्कर ठिकाणी जावे. निर्णय घेणे तितकेसे सोपे नव्हते; पण त्याला तसे कारणही होते. सुमारे वीस वर्षे या ठिकाणी त्यांनी घालविली होती. तेल्हारा येथील रहिवासी त्यांच्यावर प्रेम करीत होते. त्यांना आदराने वागवत होते. तसेच गुरुजीही त्यांच्याशी प्रेमळपणे वागत. त्यांची सेवाही करीत. तेल्हारामधील गुरुजींचे जीवन अनेक घटनांनी सुखद झाले होते, हे आपण पाहिलेच आहे. हे गाव नुसते त्यांचे निवासाचे ठिकाण नव्हते. सबइन्स्पेक्टर महाजन यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे, "ते त्यांचे खरे घर होते." पण अशा सुस्थितीत केव्हातरी बदल होण्याची वेळ येते.

तेल्हारामधून बाहेर पडावयाची मुख्यत: दोन कारणे होती. पहिले म्हणजे त्यांची मुले मोठी झाली होती आणि हे गाव लहान असल्यामुळे इथे उद्योग-व्यवसायाची संधी फारशी नव्हती. नाव घेण्यासारखी औद्योगिक अशी काहीही यंत्रणा येथे नव्हती आणि दुसरे कारण म्हणजे होमिओपॅथीची चांगली प्रॅक्टिस करून नाव मिळवले तरी आर्थिकदृष्ट्या हा व्यवसाय फारसा श्रेय देणारा ठरला नाही. पैसे मिळविण्याचे दृष्टीने ते फारच भोळे होते. त्यामुळे व्यावसायिक यशाबरोबर आर्थिक लाभ त्यांना मिळाला नाही. ते गरीब रोग्यांना फुकट औषधे देत, तसेच त्यांची खाण्यापिण्याची सोय करीत. अशा स्थितीत त्यांची बँक-

शिल्लक काहीच नसणार, याबाबत आश्चर्य वाटू नये. अशा परिस्थितीत त्यांना दुसरा पर्याय नव्हता. एखादे सोईस्कर गाव पहावे, तेथे त्यांच्या मुलांना बऱ्यापैकी नोकरी-व्यवसाय मिळेल आणि त्या आधारे मुले नीट राहू लागतील. तेल्हाराहून कुटुंबियांना हलवण्यापूर्वी त्यांना सोईस्कर ठिकाणाची पहाणी करावी लागली. काही दिवसांनी मोठ्या मुलाकरिता त्यांनी तात्पुरता उद्योग निवडला. बाबांनी कुटुंबियांच्या उदरनिर्वाहाकरिता काही सोय केली आणि एक दिवस नव्या वाटेच्या शोधात तेल्हारागाव सोडले.

ते कलकत्त्याला आपल्या एका शिष्याकडे - महावीर प्रसाद शर्माकडे आले. ते कलकत्ता येथे बेलधारिया येथे नोकरी करीत आणि सालखिया भागात रहात होते. गुरुजी महावीर प्रसादकडे काही दिवस राहिले. जवळपासची ठिकाणे पाहिली. कलकत्त्याहून महावीर प्रसादने गुरुजींना कटक (ओरिसा) येथे नेले. महावीर प्रसाद यांचे इथे नातेवाईक होते. सुमारे पंधरा दिवस त्यांनी शेठ भालू यांचेकडे काढले. नंतर ते भालगावमार्गे बनपूर येथे गेले. तेथे महावीर प्रसादांचे परिचित होते. त्यापैकीच डॉ. मदनलाल, वैजिनाथ गुप्ता आणि त्यांचे बंधू हरिराम होते. ह्या सर्वांनीच जगन्नाथपुरीला दर्शनाकरिता आणि प्रेक्षणीय स्थळे पाहण्याकरिता जावयाचे ठरविले. जगन्नाथपुरी येथे तीन दिवस घालवल्यावर ते बनपूर येथे परत आले.

बैजिनाथ गुप्ता हे नागपूर विद्यापीठाचे पदवीधर होते. त्यांना योगविद्येची आवड होती. महावीर प्रसाद यांना हे माहित होते, म्हणून त्यांनी गुरुजींची योग विषयातली प्रगती त्यांना सांगितली. बैजिनाथ हे सिनकिल होते. त्यांनी प्रांजळपणे सांगितले, "हिंदुस्थानातील तथाकथित योगी-ज्यांची संख्या फार मोठी आहे, ते खऱ्या अर्थाने योगी नाहीतच ! ते साधे छद्मि कपटी योगी आहेत." ते खऱ्या योग्याकडून मार्गदर्शन मिळविण्याच्या प्रयत्नात पूर्ण निराश झाले होते. योगासंबंधी अशी टीका गुरुजींनी ऐकून घेतली; पण ह्या तरुणाची योगशास्त्र जाणून घेण्याची तीव्र इच्छा पाहून ते प्रसन्न झाले. त्यांनी सौम्यपणे त्यांना सांगितले, "काही कपटी योगी असले तरी काही खरे योगी आहेतच. असे लोक थोडे आहेत. याचाच अर्थ खरेखुरे इच्छुक-योगाकरिता अपार कष्ट घेणारेही थोडेच आहेत. गुरुजी स्वतःच पुढाकार घेऊन त्यांना योग शिकविण्यास तयार होते. फक्त बैजिनाथ यांची प्रामाणिकपणे शिकण्याची व प्रत्यक्षात सराव करण्याची तयारी

पाहिजे. बैजिनाथ शिकण्यास व प्रत्यक्षात योगसाधना करण्यात तयार होतेच. एका सोईस्कर दिवशी, गुरुजींनी त्यांना योगासारख्या गूढ साधनेत गुंतवले आणि एका विशिष्ट पद्धतीने एका ठराविक वेळेला दररोज ध्यानधारणा करण्याचे मार्गदर्शन केले.

ह्या दिवसापासून बैजिनाथने योगसाधना नित्य सुरू केली. थोड्याच दिवसांनी त्यांना कळून आले, की काहीशा गूढ शक्तीचा अंमल त्यांच्यावर होत आहे. त्यांनी मार्गदर्शनही होत आहे. काही दिवसांनी स्पॉयनल कॉर्डच्या खालून त्यांना काहीशा संवेदना होत आहेत, असे वाटू लागले. ह्या संवेदना हळूहळू स्पॉयनल कॉर्डमधून वर येऊन मानेजवळ स्थिर होत आहेत. यालाच योगशास्त्रात विशुद्धी चक्र असे म्हणतात आणि तेथून त्या वर जातात. थोड्याच अवधीत बैजिनाथ हे या विषयाबाबत ज्ञानी झाले.

बैजिनाथ यांचे उदाहरण समोर ठेवून त्यांचे बंधू हरिराम व हरिरामची पत्नी यांनी गुरुजींची भेट घेऊन त्यांच्याकडून दीक्षा घेतली. नंतर बैजिनाथ आणि इतरांना गुरुजींबरोबर वृंदावनला जावयाचे हाते. अशा प्रकारे वृंदावन येथे गुरुजी दुसऱ्यांदा गेले. आता सुमारे दोन महिने झाले होते. गुरुजी तेल्हारा सोडून चांगली जागा रहावयास पहात होते. आतापर्यंत त्यांनी जेवढ्या जागांना भेटी दिल्या, त्या त्यांना फारशा आकर्षित करू शकल्या नाहीत. आता अजून हिंडून पहावे, असे त्यांना वाटले; म्हणून बनपूर सोडून भिलाईमार्गे त्यांनी घरी परत यावयाचे ठरवले. याच वेळी भिलाई येथे कारखाना उभारला जात होता. त्यामुळे विविध प्रकारच्या लोकांना तेथे नोकऱ्या मिळण्याची खात्री होती.

भिलाई येथील श्री. काशीराम अगरवाल यांनी त्यांचे स्वागत केले. ते तेल्हाराचेच. गुरुजींशी त्यांचा चांगला परिचय होता. त्यांच्याजवळ गुरुजी काही दिवस राहिले. त्यावेळी त्यांनी तेल्हारा सोडून दुसरीकडे जाण्याची आपली इच्छा प्रगट केली. यावर काशीराम यांनी सुचवले, की गुरुजींनी नागपूरला जावे, काशीरामच्या सासऱ्यांची, एस. के. गुप्ता यांची गाठ घ्यावी. ते गुरुजींना स्थायिक होण्याच्या दृष्टीने निश्चित मदत करतील. गुरुजींना ही सूचना पसंत पडली. ते नागपूरला एस. के. गुप्ता यांना भेटावयास निघाले.

श्री. एस. के. गुप्ता, नागपूर येथील एक वजनदार गृहस्थ, येथील आर्यसमाजाचे सेक्रेटरी होते. गुरुजींची जुनी ओळख होतीच. शिवाय गुप्ताजी

त्यांचे एकेकाळचे पेशंट होते. गुप्ताजींचा व त्यांचा संबंध कसा आला ती घटनाही मनोरंजक आहे. १९४९ मध्ये गुरुजी तेल्हारा येथे होमिओपॅथी प्रॅक्टिस करीत होते. अकोल्याचे डॉ. नंदलाल भारती यांच्याकडे वैद्यकीचा अभ्यास करीत असताना गुरुजींनी आयुर्वेद चिकित्सा पद्धतीतही चांगले प्रभुत्व मिळविले होते, हे सर्वांना माहीत होते. त्यामुळे तेल्हारा येथील काही सद्गृहस्थांनी गुरुजींना सांगितले, की त्यांनी आयुर्वेद व युनानी रजिस्ट्रेशन बोर्डकडे नोंदणी करून आयुर्वेदाची प्रॅक्टिस करावी. ह्या बोर्डाची कचेरी सेक्रेटरिएट बिल्डिंगमध्ये होती. १९४९ मध्ये एके दिवशी गुरुजी नोंदणी करून घेण्याकरिता नागपूरला आले.

नागपूरला आल्यावर श्री. श्रीराम आगरवाल (तेल्हारा येथील रहिवासी) आणि श्री. एस. के. गुप्ता यांचे नातेवाईक (गुप्तांच्या पुतणीचे पती) गुरुजींना घेऊन श्री. गुप्ता यांचेकडे गेले. रजिस्ट्रेशन होण्यास उशीर लागू नये म्हणून त्यांची मदत घ्यावी असा उद्देश. ह्यावेळी गुप्ता हे आजारी असल्यामुळे निजून होते. ते मेयो हॉस्पिटलमधील तज्ञ डॉक्टरांचे आणि नागपूर येथील काही प्रसिद्ध खाजगी व्यावसायिकांचे देखरेखीखाली अॅलोपाथीचा उपचार घेत होते. गुप्ताजींचा आजार हा संग्रहणी स्वरूपाचा होता आणि त्यावर ते डॉक्टरांकडून इलाज करून घेत होते. श्री. श्रीराम आगरवाल हे गुरुजींची ओळख करून देण्याकरिता त्यांना आजाऱ्याच्या खोलीत घेऊन गेले. ह्यावेळी गुप्ताजींचे वैयक्तिक एक-दोन डॉक्टरही तिथे हजर होते. गुरुजींना हे आयुर्वेदिक प्रॅक्टिस करण्याकरिता रजिस्ट्रेशन हवे आहे, असा गुप्ताजींना परिचय करून दिला.यावर गुप्ताजींना वाटले, की ते आयुर्वेदिक उपचार करण्यास इथे आले आहेत. गुरुजींच्या ज्ञानाची परीक्षा घेण्याची ही संधी आहे, असे गुप्ताजींना वाटले. तिथे अॅलोपथीचे इतर डॉक्टर होते, त्यांनाही तसेच वाटले. त्यांनी गुरुजींना लगेच विचारले, ''गुप्ताजींच्या रोगाचे निदान करून तुम्ही त्यांना बरे कराल का?'' गुरुजींनी तसा प्रयत्न करण्याचे कबूल केले. श्री. गुप्तांना वरचेवर पातळ शौचास होत होते. गुरुजींनी त्यांना तपासले. त्यात त्यांच्या निदर्शनास आले, की पालेभाज्यांचे काही भाग त्यात आहेत. ह्यावर गुरुजींनी त्यांना सांगितले, की हा त्यांचा आजार संग्रहणीचा नसून तो तीव्र डायरिया-अतिसार (हगवण) आहे. गुरुजींनी औषधे लिहून दिली, त्यानुसार औषधे तयार करावयाची होती. सीताबर्डी येथील गिरधरलाल

शर्मा यांनी ही औषधे आणून तयार करण्याची जबाबदारी घेतली. थोड्याच दिवसांत श्री. गुप्ताजी संपूर्ण बरे झाले. अशाप्रकारे गुप्ताजींवर गुरुजींचा प्रभाव पडल्यामुळे, गुरुजींना रजिस्ट्रेशन त्वरित मिळण्यास मदत झाली. उपकृत झालेल्या गुप्ता यांनी गुरुजींना आणखी एक आश्वासन दिले, तुम्ही गृहस्थाश्रमातून म्हणजे सांसारिक जबाबदारीतून निवृत्त झाल्यावर मला भेटा. मी तुमच्याकरिता होमिओपाथीचा दवाखाना नागपूरमध्ये काढीन.

आता गुरुजी गृहस्थाश्रमातून मोकळे होणार होते. भिलाई येथील काशीराम आगरवाल यांनी गुरुजींना सुचवले, की यापूर्वी त्यांनी जे सांगितले होते, त्याची आठवण करून देण्यास हरकत नाही. या दृष्टीने गुरुजी नागपूरला आले होते. परंतु ह्यावेळी दुर्दैवाने गुप्ताजींनी पूर्वीचा दिलेला शब्द - दवाखाना काढून देण्यासंबंधी-खरा करण्यास आपली असमर्थता दाखवली. परंतु त्यांनी दुसरा एक प्रस्ताव विचारार्थ ठेवला, तो असा - दुर्ग (मध्य प्रदेश) येथील तुळाराम आर्य कन्या महाविद्यालयात एका सहाय्यक गायक शिक्षकाची जागा आहे. ती ते घेत असतील तर गुप्ता त्यांना मदत करण्यास तयार होते. जर नेमणूक झाली तर गुरुजी ही स्वीकारण्यास तयार होते.

अशाप्रकारे जेव्हा महाविद्यालय उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर १९६० साली पुन्हा सुरू झाले, त्यावेळी गायक-शिक्षक या नव्या भूमिकेत ते आले. स्वामी दिव्यानंद सरस्वती, (आर्य समाजाचे) याबाबत त्यांचे आभार मानावयास पाहिजेत. अशा प्रकारे दुर्ग येथे गुरुजींच्या जीवनाचा नवा अध्याय सुरू झाला. इथे ते सुमारे चौदा वर्षे होते.

सहाय्यक गायक-शिक्षक म्हणून गुरुजींना आर्य तुळाराम कन्या महाविद्यालयात अवघा द. म. रु. ६२ पगार मिळत होता. कौटुंबिक घरखर्च चालवण्याचे दृष्टीने ही रक्कम अगदीच अपुरी होती. इथे योग्य संधी मिळाल्यास आपण एक संगीत विद्यालय काढावे अशी कल्पना त्यांना सुचली. त्यावर ते गंभीरपणे विचार करू लागले.

दुर्गमधील ह्या दिवसांतच गुरुजींचा संबंध श्री. चंद्रिकाप्रसाद पांडे (दुर्ग जिल्ह्यातील सर्वोदय चळवळीतील प्रमुख) ह्यांच्याशी आला. हे दिवस आचार्य विनोदा भावे यांच्या सर्वोदय चळवळीचे व पदयात्रा चळवळीचे म्हणून साऱ्या देशभर गाजत होते. गुरुजींचे अजून एक परिचित श्री. नारायणभाई सबजीवाला

होते. ह्या दोघांनाही गुरुजींना संगीत विद्यालय काढण्याची इच्छा आहे, हे माहीत होते. त्यांनी गुरुजींना प्रोत्साहन दिले. ह्या दोन सद्गृहस्थांच्या मदतीने गुरुजींना दुर्ग येथील महात्मा गांधी हायर सेकंडरी स्कूलच्या इमारतीत एक खोली फेब्रु. १९६१ मध्ये मिळाली.

अशा प्रकारे गुरुजींनी स्वत:चे संगीत विद्यालय दुर्ग येथे सुरू केले. काही दिवसांनी गुरुजींनी आपल्या कुटुंबियांना तेल्हारामधून दुर्ग येथे (म. प्र.) हलवले. त्यांचे कुटुंबीय इथे येण्यापूर्वी गुरुजी, संगीत विद्यालय काढण्याच्या सुरुवातीच्या काळात श्री. राजेंद्र सुंदर गुप्ता-सायन्स शिक्षक, यांचेकडे जेवत असत. रात्रीचे जेवण रात्री आठ वाजता घेण्याची त्यांची सवय होती. नंतर ते शाळेत परत येत व संगीताचे दुसरे सत्र घेत. त्यांच्या विद्यार्थ्यांपैकी गजानन सोनी, चित्रनाथ मिश्रा, चंद्रप्रकाश आगरवाल आणि देवराम अकोटकर ह्यांचा एक गट तयार झाला होता. तो गुरुजींच्या अधिक जवळ येण्याची काही एका परिस्थितीत वेळ जुळून आली. त्यामुळे त्यांना हे गायन-शिक्षक इतर शिक्षकांपेक्षा कसे वेगळे, कसे सखोल शिकवतात, हे कळून आले.

हा एक सार्वत्रिक अनुभव आहे. विद्यार्थी हे शिक्षकांबद्दल थट्टेने बोलतात, त्यांच्यावर टीका करतात, त्यांच्या वागण्याची, बोलण्याची नक्कल करतात, त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीचे विडंबन करतात. ह्या बाबतीत गुरुजींचे संगीताचे विद्यार्थीही अपवाद नव्हते. ते सुद्धा त्यांची थट्टा करीत, त्यांच्या पाठीमागे टीका करीत, त्यावेळी ते बहुधा जेवावयास गेलेले असत. गुरुजी जेवून परत आल्यावर न चुकता ते विद्यार्थ्यांना गुरुजींच्या गैरहजेरीत चेष्टा, मस्करी किंवा टीका केली असेल त्याला उत्तर देत. सुरुवातीला विद्यार्थ्यांना हा एक केवळ योगायोग आहे, असे वाटले; पण प्रत्येक वेळी गुरुजी त्यांच्या टीकेला, चेष्टेला प्रत्युत्तर देत. त्यामुळे त्यांना वाटू लागले, की यात नुसता योगायोगाचा भाग नाही तर वेगळे काही आहे. एके दिवशी त्यांनी अगदी मोकळेपणाने विचारले, की तुम्हाला आम्ही तुमच्या गैरहजेरीत जे बोलते ते कसे कळते? गुरुजींनीही अगदी मोकळेपणाने त्यांची टीका त्यांना कशी कळते, ते सांगितले. आता मात्र विद्यार्थी त्यांच्याकडे वेगळ्या दृष्टीने-आदरयुक्त भीतीने पाहू लागले. काही दिवसांनी त्यांना योगपद्धती शिकून घेण्याची इच्छा वाटू लागली. नंतर त्यांनी गुरुजींना विनंती केली, की त्यांनी दीक्षा द्यावी. त्यांना

योगातील गूढ बाबींसंबंधी मार्गदर्शन करावे. त्यांचा प्रामाणिकपणा पाहून गुरुजींनी सूक्ष्म मार्गावरून कठीण ठिकाण म्हणजे अंतिम सत्याकडे कसे जावे, याची दीक्षा दिली. काही काळ लोटल्यावर गुरुजींच्या संगीत विद्यालयाने प्रगती केली. नवीन विद्यार्थी संगीत शिकण्यास येत होते. काही केवळ छंद आणि आपला वेळ मजेत जावा, म्हणून संगीताकडे वळत, काही मात्र संगीताची परीक्षा उत्तीर्ण होण्याकरिता येत होते. गुरुजींचे हे संगीत विद्यालय पदवीपर्यंतचे शिक्षण देत होते आणि ते महाविद्यालय म्हणून ओळखले जात असे. विद्यालयातील वाढत्या विद्यार्थ्यांच्या संख्येबरोबर आध्यात्मिक मार्गदर्शन घेणाऱ्यांचीही संख्या वाढू लागली.

अध्यात्माचे मार्गदर्शन गुरुजींकडून मिळावे, म्हणून काही वाट पहात. याबाबतचे गुरुजींना अगोदरच ज्ञान होत असे. अशी बरीच उदाहरणे आहेत. त्यापैकी योग्य वेळी काही शिष्य झाले. इथे एक उदाहरण नमूद करीत आहोत, ते आपल्या दृष्टीने महत्त्वाचे आणि गुरुजींच्या संगीत विद्यालयाशी संबंधित आहे म्हणून. दुर्ग येथे येण्यापूर्वी सुमारे पंचवीस वर्षे अगोदर, गुरुजींना एक विशिष्ट दृष्टी प्राप्त झालेली होती. त्यावेळी ते चिरंतनाचा शोध घेण्याकरिता भटकंती करीत होते. आता महाराष्ट्रात, पण पूर्वी दक्षिण हैद्राबादेत असलेल्या नांदेड जिल्ह्यात मदनूर गावी ते हिंडत येत होते. ह्या ठिकाणच्या वास्तव्यात त्यांना आलेले अनुभव आपण मागे पाहिले आहेत. मदनूर गावी ते आपली साधना देवळात एकांतात करीत असताना त्यांना आकाशात दिव्य प्रकाश दिसला. ह्या प्रकाशझोतात त्यांना एक बालिका दिसली. ती काळसर रंगाची पण मोहक दिसत होती. एका सेकंदातच ते दृश्य नाहीसे झाले. पुढील काही दिवस हे दृश्य पुन: पुन्हा दिसत होते, त्यामुळे या बालिकेच्या चेहऱ्याचा प्रभाव त्यांच्या मनावर खोलवर पडला.

सुमारे तीन वर्षांनंतर दुर्ग येथील गुरुजींच्या संगीत विद्यालयातील एक विद्यार्थिनी, कु. कृष्णा गुप्ता, एक शिक्षिका आणि नंतर प्राचार्य, शासकीय मुलींचे उच्च माध्यमिक विद्यालय, डोंगरघड, दुर्ग, तिच्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच गुरुजींना तीस वर्षांपूर्वी मदनूर येथे लहान बालिकेचे जे दृश्य दिसले त्याची आठवण झाली. दोन्हीही चेहरे सारखे दिसत होते. त्यांनी तिला त्या दृश्यासंबंधी सांगितले.

कु. गुप्ताला पहिल्यापासूनच योगविद्येत विशेष रस होता. गुरुजींशी परिचय होण्यापूर्वीपासून त्या योगसाधना करीत होत्या. आता गुरुजींच्या संगीत विद्यालयातील विद्यार्थिनी या नात्याने ती आध्यात्मिक आणि यौगिक जीवनाचा अधिक परिचय करून घेऊ लागली. ती आश्चर्यचकित झाली. तिची आध्यात्मिक प्रेरणा पूर्णत्वास नेण्यास संगीताचे गुरूकडून प्रयत्न होत आहेत. तिला आध्यात्मिक मार्गदर्शन करणाऱ्या गुरूकडून प्रार्थनेद्वारा मदत होईल, असे मार्गदर्शन होण्यापूर्वी तिने काही दिवस उपवास केला. शेवटी तिला आतून एक आवाज ऐकू आला. तो आवाज होता स्वामी विवेकानंदांचा. त्यांचीच ती शिष्या होती. तो आवाज असा होता - ''मी तोच आहे. त्यांचे आशीर्वाद घे.'' तिला आता सर्व गोष्टी स्पष्ट झाल्या होत्या. कुठलीही शंका उरली नव्हती. दुसऱ्याच दिवशी ती गुरुजींकडे गेली, आपला हा अनुभव सांगितला आणि लवकरात लवकर दीक्षा मागितली.

तिला दीक्षा दिली, तेव्हापासून ती त्या मार्गात चांगली प्रगती करू लागली. गुरुजींची अशी इच्छा होती, की तिने इतर स्त्रियांना या मार्गात मार्गदर्शन करावे.

या सुमारास दुर्ग येथील विनायक शंकर दुबे गुरुजींच्या सान्निध्यात आले. ते गुरुजींच्या अध्यात्मसाधनेने प्रभावित झाल्यामुळे त्यांच्याकडून दीक्षा घेण्याची त्यांना इच्छा होती. ते स्वत: गूढ आध्यात्मिक मार्गात गेले होते, तेव्हापासून ते चांगली प्रगती करून होते. त्यात त्यांना पुष्कळ अनुभव आले.

दुर्ग येथे गुरुजींच्या सान्निध्यात ज्या काही व्यक्ती आल्या, त्यामध्ये श्री. के. के. द्विवेदी (निवृत्त), त्यावेळी ते दुर्ग येथे ए. डी. एम. होते, याचा उल्लेख करावयास पाहिजे. एक शिफारसपत्र मिळविण्याकरिता गुरुजींची त्यांच्याशी एकदा भेट झाली होती. ह्या प्रासंगिक भेटीतच द्विवेदी प्रभावित झाले. आपली मैत्री वाढवू लागले. कारण द्विवेदी हे सुद्धा संगीताचे दर्दी होते. तेव्हापासून ते पुष्कळच एकमेकांचे संपर्कात येऊ लागले. श्री. द्विवेदींची नंतर बालाघाट येथे बदली झाली. गुरुजी आपला वेळ घालवण्याकरिता तेथे जात असत.

गुरुजी जसे संगीत विद्यालयाचे व्यवस्थापन व सांसारिक जबाबदारी पार पाडीत होते, त्याचबरोबर अध्यात्मसाधनेतील इच्छुकांनाही ते मार्गदर्शन करीत होते. ते सातत्याने योगमार्गातील विस्तृत क्षेत्रात प्रभुत्व मिळवणे, आपला अनुभव वाढवणे तसेच ते ज्यांना त्यांच्याकडून प्रत्यक्ष मदत हवी, अशा गरजूंना

व इच्छुकांना मदत करीत. काही दिवसांतच त्यांना कळून आले की, "परमानंद अवस्थेत" उच्च अनुभव देणारी स्थिती - जसे कमलपुष्प पाण्यात पण ते त्यापासून दूर, अलिप्त, त्याप्रमाणे ते जगातील कोलाहलापासून अलिप्त झाले आहेत.

ह्या काळात गुरुजींना नमूद करण्यासारखा एक अनुभव आला, तो त्यांच्या पूर्वीच्या समृद्ध अनुभवात भर घालणारा होता. दुर्ग स्टेशनजवळील दीपकनगर परिसरात गाण्याचा एक कार्यक्रम योजला होता. प. पू. गुरुजींनाही या कार्यक्रमास बोलावले होते. गुरुजी गाण्याचे भोक्ते. मोठ्या उत्साहाने ते कार्यक्रमास गेले. सुमारे तासभर त्यांनी संगीत श्रवण केले. नंतर त्यांना वाटू लागले, एखादी गूढ तीव्र संवेदना किंवा लहरी ॲनल कॅनालमधून निघून हळूहळू त्या स्पायनल कॉलमच्या मध्यावर येत आहेत. गुरुजींना असे पूर्वी अनुभव आले होते. काय घडत आहे, हे त्यांना कळून आले. ते उठले. यजमानाची परवानगी घेतली आणि लगेच घरी जावयास निघाले. त्यांना लवकर घरी जाणे भाग होते म्हणून ते भरभर चालू लागले. जणू ते पळतच होते म्हणा ना. घरापासून ते थोड्याच अंतरावर होते. तोच त्यांच्या पायापासून टाचेपर्यंत आणि कोपरापासून हातापर्यंत शारीरिक संवेदना नाहीशा झाल्या, जणू मृतवत् झाल्या. सगळी शक्ती एकवटून ते कसेबसे घरी आले.

घाईघाईने त्यांनी हातपाय धुतले आणि ते अंथरुणावर बसले. आता त्यांना संवेदना टाचेपासून निघून वर जोरात येत आहेत, असे वाटू लागले. त्यांनी मेरुदंडात प्रवेश केला. मेरुदंडामध्ये आणि दोन्ही बाजूस जोराने संवेदना होऊ लागल्या. बेडूक जसा उडी मारतो, तशा त्या येत होत्या. मानेच्या खालपर्यंत उडत होत्या. त्यांचे कुटुंबीय भोवताली गोळा होऊन हा प्रसंग अनुभवीत होते. त्यांनी आपल्या थोरल्या मुलाला - बाबाला सांगितले, की मानेपासून खाली पाठीपर्यंत चोळ, म्हणजे ह्या संवेदना कमी होतील. बाबाने चोळण्यास सुरुवात करताच संवेदना खाली उतरू लागल्या; परंतु त्याच संवेदना खाली आल्यावर पुन्हा वर येऊ लागल्या. पुष्कळ वेळा चोळले; पण त्या वरच जात होत्या. जणू नवी शक्ती आली होती. यामुळे थकवा आला. त्यांनी बाबाला चोळण्याचे काम थांबवावयास सांगितले. त्या संवेदना जिथे जाणार असतील, तिथपर्यंत जाऊ द्याव्यात, असा विचार केला. त्यांनी कुटुंबियांना सावधानतेचा इशारा दिला,

की जे घडले त्याबाबत विशेष काही वाटून घेऊ नका. जर ते बेशुद्ध झाले, तर पाठीवर निजवणे आणि त्यावर चादर टाकणे. थोड्या थोड्या वेळाने चमच्यातून त्यांना पाणी द्यावयास सांगितले आणि उरलेल्या वेळात जोपर्यंत ते निजलेले असतील, तोपर्यंत त्यांना काही त्रास होऊ द्यावयाचा नाही. काळजी करण्याचे काही कारण नाही, असे खात्रीपूर्वक त्यांनी सर्वांना सांगितले. सगळे ठीक होईल. योग्य वेळ येताच ते पूर्वावस्थेत येतील.

अशा सूचना देऊन गुरुजी अंथरुणावर पाठीवर पडून राहिले. थोड्याच क्षणात ते उच्च अनुभूतीच्या वातावरणात गेले. त्यांना कळून येत होते, अवतीभोवती काय होत आहे, त्यांची गात्रे थंड होती आणि संवेदना स्वैर होत्या. जे होत आहे त्याची त्यांना जाण होती; पण एक तटस्थ साक्षीदार म्हणून. त्यात त्यांचा कृतिशील सहभाग नव्हता. त्याच्या बाबतीत कालक्रमण, जो आपण अनुभवतो, तो शून्यवत होता. अजूनही वेळ भरली नव्हती. ते या विश्वाच्या मर्यादेच्या बाहेर वावरत होते. अशा प्रकारे उच्च अनुभूतीच्या स्तरावर ज्याला खरी समाधी म्हणतात, त्या सर्वोच्च आनंदात, शांत अवस्थेत, अंतिम सत्याचे ठायी ते पूर्ण तीन दिवस होते.

मधल्या वेळात त्यांचे कुटुंबियांना काळजी वाटत होती म्हणून त्यांनी डॉक्टरांना बोलावून आणले. त्यांनी गुरुजींना तपासून सांगितले, की त्यांच्या दृष्टीने त्यांना काहीही आजार नाही, म्हणून कोणत्याही उपचाराची गरज नाही. विशेष काही करण्याजोगे नाही. हे ऐकून गुरुजींचे कुटुंबीय त्यांनी केलेल्या सूचनेनुसार स्वस्थ बसून राहिले.

तीन दिवसांनंतर गुरुजी पूर्वावस्थेत आले. नेहेमीसारखी शारीरिक हालचाल करू लागले. तरीही मनाने ते परमतत्त्वाशी संबंधित होते. हे परमतत्त्व सगळ्यांच्याच बाबतीत आदि आणि अंत असते.

'पाण्याच्या लाटा आणि वेळ कोणाकरिता थांबत नाही', अशी म्हण आहे. दुर्ग येथील गुरुजींच्या वास्तव्याला दहा वर्षे होऊन गेली होती. मध्यंतरीच्या काळात त्यांच्या मुलांना आर्थिकदृष्ट्या उद्योग-व्यवसाय मिळाला. त्यांचे विवाह झाले आणि कालांतराने ते स्थिरावले. यामुळे कुटुंबियांच्या चरितार्थाकरिता मिळवणे या जबाबदारीतून गुरुजी मोकळे झाले. आता संगीत विद्यालयाशी असलेले संबंध सोडावेत, असे विचार त्यांच्या मनात येऊ लागले. विद्यालयात

अधिक वेळ घालवणे त्यांना अडचणीचे होऊ लागले. कारण त्यांचे शरीर संगीताच्या सुरावटीने आणि वाद्यांच्या सुमधुर आवाजामुळे संवेदनशील झाले होते. जर ते त्याच वातावरणात, (संगीत-वाद्यांच्या सान्निध्यात) राहिले, तर तीव्र संवेदना कंपन पावतील आणि निरनिराळ्या नाड्या उत्तेजित होतील. हे कंपन गुदभागातून मेरुदंडातून वर जाईल आणि मेंदूच्या कवचापर्यंत गेल्यामुळे (प्रान्तस्था) त्यांना समाधी लागेल.

ह्या काळात श्री. के. के. द्विवेदी, डे. कलेक्टर हे निवृत्त होऊन बिलासपूर येथे स्थायिक झाले. ॲडव्होकेट म्हणून ते प्रॅक्टिस करू लागले. द्विवेदींच्या विनंतीवरून गुरुजी बिलासपूर येथे आले आणि काही दिवस तिथे राहिले. याच दिवसांत बिलासपूरच्या गव्हर्नमेंट ट्रेझरीतील एक कारकून-लक्ष्मीप्रसाद मिश्रा हे गुरुजींच्या संपर्कात आले. श्री. मिश्रा हे हटयोग करीत असत. त्यांना गुरुजींकडून 'चैतन्ययोग' संबंधी मार्गदर्शन हवे होते. गुरुजी 'चैतन्ययोग' अनुसरीत होते आणि शिकवीतही असत. गुरुजींनी मिश्रांना दीक्षा दिली. ते बिलासपूरमधील त्यांचे पहिले शिष्य झाले. येथील गुरुजींचे दुसरे शिष्य श्री. नर्मदाप्रसाद द्विवेदी - अकाऊंटंट, फॉरेस्ट खाते, हे होते.

ह्यानंतर श्री. हरिश्चंद्र त्रिपाठी हे -फॉरेस्ट खात्यातील सुपरिंटेंडेंट या हुद्द्यावर काम करणारे-त्यांच्या संपर्कात आले. गुरुजींशी त्यांचा परिचय लक्ष्मीप्रसाद मिश्रांनी करून दिला. त्यामुळे श्री. त्रिपाठी प्रभावित झाले; पण त्यांना दीक्षा देण्याची घटना काही दिवसांनी एका वेगळ्या प्रसंगाने घडून आली.

श्री. के. के. द्विवेदी यांजकडे काही दिवस राहिल्यावर, गुरुजी दुर्गला परत आले. हरीशचंद्र त्रिपाठी व लक्ष्मीप्रसाद मिश्रा यांना दुर्गला जाण्याचा योग एक दिवस आला. ते गुरुजींच्या घरी दर्शनास गेले - त्रिपाठी त्यांचे चाहते, तर मिश्रा हे शिष्य. ह्या भेटीत त्रिपाठीजींनी दीक्षेचे स्वरूप आध्यात्मिक साक्षात्कारात व्हावे, अशी इच्छा प्रकट केली. गुरुजींनी त्यांची विनंती फारशी गंभीरपणे घेतली नाही. त्रिपाठी तसा वारंवार आग्रह करीत होते. त्यांनी अगदी निर्धार केला. त्यांनी गुरुजींना निक्षून सांगितले, की तसा अनुभव आणि तोही गुरुजींच्या कृपेने घेतल्याशिवाय गुरुजींच्या घरातून जाणार नाही. आपली विनंती मान्य होईपर्यंत, ते धरणे धरून किंवा घेराव घालून बसणार होते. शेवटी गुरुजींनी त्यांना विचारले की, ''पूजा करीत असताना आणि ध्यानधारणा करताना तुमची

बैठक कशी असते?'' त्रिपाठी विशिष्ट बैठक घालून गुरुजींना त्यांची पद्धत दाखवावयास बसले. त्यांनी डोळे मिटले व शांत बसले. काही मिनिटांनी त्रिपाठींनी डोळे उघडले. त्यांनी गुरुजींना सांगितले, की इतके दिवस ते दररोज जे करत होते ते सर्वस्वी व्यर्थ गेले. त्याचा कोणत्याही प्रकारे आतापर्यंत चांगला प्रयत्न करूनही आध्यात्मिक अनुभव आला नाही. गुरुजी त्रिपाठींना तसा अनुभव मिळेल म्हणून आशीर्वाद देतील का? त्यांनी पुन्हा विनविले. त्याशिवाय ते गुरुजींचे घर सोडणार नाहीत. हा निर्धार पुन्हा सांगितला. गुरुजी मिनिटभर शांत राहिले. मग मात्र त्रिपाठींच्या सतत होणाऱ्या विनंतीचा त्यांनी स्वीकार केला. ''ठीक आहे, लक्ष द्या. अशी बैठक घाला.'' गुरुजींनी सांगितले व तसे करून दाखवले. त्याप्रमाणे त्रिपाठी बसले. गुरुजींनी त्यांच्या पाठीवर हात ठेवला आणि म्हणाले, ''ठीक आहे.''

एका सेकंदातच त्रिपाठींना संवेदना होऊ लागल्या. मागील भागातील मध्यावरून ह्या संवेदना सुरू होऊन वर येत आहेत, असे वाटू लागले. त्यांची अस्तित्वाची आपल्या अवतीभोवती काही असल्याची जाणीव गेली. ऐहिकासंबंधी आणि अस्तित्वाबाबत त्यांचे भान हरपले. पण एका वेगळ्याच वातावरणात ते सुमारे वीस मिनिटे राहिले. मग गुरुजींनी पाठीवरून हात फिरवला. ''ठीक आहे, आता खाली या.'' त्रिपाठींना जाणीव झाली. ते पूर्वावस्थेत आले. गुरुजींनी त्रिपाठींना विचारले, ''काय? अनुभव आला का? आला असल्यास कोणता?'' आनंदित झालेले त्रिपाठी म्हणाले, की त्यांनी सोन्याचे चक्र पाहिले. ''ठीक, आता त्या सुवर्णाच्या चक्रावर ते दिसेपर्यंत ध्यान करावयास शिका आणि त्याच स्थितीत स्थिर रहा-आपली पुन्हा भेट होईपर्यंत.'' असा गुरुजींनी सल्ला दिला.

त्रिपाठींनी असा गूढ अनुभव पूर्वी कधी घेतलेला नव्हता किंवा त्याची प्रचीतीही आलेली नव्हती. ते जे काही आतापर्यंत आध्यात्मिक उपासना म्हणून करत होते, ती नि:शब्द आणि नि:शुल्क होती. आता त्यांना नवीन मार्ग सापडला होता. त्यामुळे त्यांना अंतर्यामी समाधान लाभणार होते, ते नव्याने प्राप्त झाले. ज्यांनी हा अनुभव मिळवून दिला, त्या गुरूबद्दल कृतज्ञता कशी व्यक्त करावी? उत्तम मार्ग म्हणजे गुरूला शरण जावे आणि त्यांच्याकडून तिथल्यातिथे दीक्षा घ्यावी. त्रिपाठींनी तसेच ठरवले. आता गुरुजींनीही मार्गदर्शन करण्याची तयारी

दाखविली. त्यानुसार त्रिपाठींना दीक्षा दिली. त्रिपाठी आणि लक्ष्मीप्रसाद मिश्रा यांनी गुरुजींबरोबर भोजन केले. नंतर ते बिलासपूरला, गुरूचा शोध लागल्याच्या मोठ्या आनंदाने, समाधानाने परत आले.

गुरुजी बिलासपूरला परत आले. ह्या सुमारास रामकृष्ण मिशनची एक शाखा बिलासपूरमध्ये उघडावयाची होती. रामकृष्ण सेवा समितीचे एक प्रमुख श्री. के. के. द्विवेदी यांना गुरुजींनी या आश्रमाचे प्रमुख व्हावे, असे वाटत होते. त्यामुळे गुरुजींचे आध्यात्मिक ज्ञान व अनुभव यांचे शेकडो इच्छुकांना मार्गदर्शन मिळेल, असे द्विवेदींना वाटले; परंतु त्यांची ती इच्छा फलद्रुप झाली नाही. कारण आश्रमप्रमुख हा रामकृष्ण मिशनच्या नियमाप्रमाणे कुटुंबवत्सल असता कामा नये, तो संन्यासीच हवा. गुरुजींचीसुद्धा स्वत:ला अशा जबाबदारीत अडकवून घेण्याची इच्छा नव्हती. गुरुजींनी या प्रसंगी आध्यात्म या गुंतागुंतीच्या दुर्बोध अशा विषयावर प्रवचन केले. संन्यासी आणि इतर उपस्थित श्रोते त्यामुळे प्रभावित झाले.


ह्या उपस्थितांत श्री. लक्ष्मणराव देशपांडे, कॉन्ट्रॅक्टरचा व्यवसाय करणारे होते. ते सुद्धा गुरुजींच्या प्रवचनाने प्रभावित झाले. एक महिन्यानंतर, श्री. देशपांडे गुरुजींना, श्री. काळे, डि. सेशनजज्ज बिलासपूर यांचे घरी भेटले. श्री. काळे यांनी गुरुजी व देशपांडे यांना जेवावयास बोलावले. बोलण्याचे ओघात श्री. देशपांडे यांनी गुरुजींना विचारले, ''समाधीचे सुख काय?'' ह्यावर गुरुजींनी प्रश्न केला, ''समाधिसुख म्हणजे काय हे पाहिजे की त्याची व्याख्या समजून घ्यावयाची आहे?'' श्री. देशपांडे यांना दोन्हीही गोष्टी पाहिजे होत्या, गुरुजींनी यावर त्यांना विचारले, ''त्यांना दीक्षा ही सिद्ध गुरूंनी दिली आहे का?'' या प्रश्नाला नकारात्मक उत्तर मिळाले. म्हणून गुरुजींनी सल्ला दिला की ''तुम्ही प्रथम तुम्हाला पसंत असलेल्या गुरूकडून दीक्षा घ्या. समाधिसुख हे तुम्हाला अशी दीक्षा मिळाल्यावरच कळेल.''

सुमारे महिनाभर श्री. देशपांडे हे गुरुजींकडे जात होते; पण ते दीक्षा घेत नव्हते. अखेर त्यांची समाधीसुख जाणून घेण्याची इच्छा तीव्र झाली. त्यांनी गुरुजींना दीक्षा देण्याची विनंती केली आणि गुरुजींनी तशी तयारी दाखवली.

श्री. देशपांडे यांना दीक्षा दिली. दीक्षा देत असतानाच त्यांना समाधी-सुखाचा अनुभव येत होता. हाच अनुभव मिळावा अशी त्यांची दीर्घकाळ

इच्छा होती. त्यांना ध्यानधारणा कशी करावी याची रूपरेखा दिली. त्याप्रमाणे ते उत्साहाने ध्यानधारणा करू लागले. तेव्हापासून त्यांना साधनेत सामान्यांपेक्षा वेगळा अनुभव येऊ लागला. त्यानंतर काही वर्षांनी अध्यात्मातील ''परमहंस'' स्थितीत ते राहू लागले. या संदर्भात त्यांचे अनुभव पुष्कळ आहेत, ते इतरत्र दिले आहेत.

॥ ॐ ॥




**शरीररचना आणि शरीरक्रिया**

ॐ

१५

# परजनहिताय परिभ्रमण

मागील प्रकरणात आपल्याला दिसून आले आहे, की गुरुजींना दिवसेंदिवस संगीत महाविद्यालयात शिकवणे व ऐकणे अवघड होऊ लागले. त्यामुळे शरीराच्या शिरा ह्या उत्तेजित होत. त्यामुळे ते गाढ तंद्री - एक प्रकारच्या समाधी अवस्थेत जात. अशा अवस्था वारंवार होऊ लागल्या, म्हणून गुरुजींनी महाविद्यालयाशी असलेले संबंध तोडण्याचे ठरवले. कारण महाविद्यालयाला त्यांचा काहीही उपयोग होणार नव्हता. अखेर त्यांनी स्वत: १९६१ साली स्थापन केलेल्या संस्थेशी १९७१-७२ साली संबंध तोडले.

ह्या सुमारास माँजींनी मुलांजवळ राहण्याचे ठरवले. मुलेही आता मोठी होऊन विवाहित झाली होती. उद्योग-व्यवसाय करीत होती. त्यांनाही मुलेबाळे झाली होती. अशा रीतीने पितृत्वाच्या भूमिकेत ते आले होते. त्यामुळे गुरुजींनी पुन्हा भ्रमंती करण्याचे ठरवले. आता मात्र त्यांचा मार्ग हा ज्ञानोपासकाचा एक विद्यार्थी म्हणून नव्हता, तर ते आता या मार्गातील एक (ज्ञानप्रसारकाचा) सिद्ध पुरुष म्हणून हे ज्ञान, जे त्यांनी अपार कष्टांनी मिळवले होते, ते इतरांना द्यावे. आता हे ज्ञान घेण्यास जे कोणी उत्सुकतेने त्यांच्याकडे येतील, त्यांस देण्यास तयार होते.

गुरुजी पुन्हा काही दिवसांकरिता के. के. द्विवेदी यांच्या निमंत्रणावरून बिलासपूरला आले. द्विवेदी हे सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर ॲडव्होकेट म्हणून प्रॅक्टिस करीत होते, त्यामुळे गुरुजी दिवसभर एकटेच असत. त्यांनी ह्या

एकांताचा चांगला उपयोग व्हावा म्हणून संगीताच्या सामर्थ्याचा उपयोग सहजतेने समाधी लावण्याकडे करावयाचे योजले. त्यांचा पूर्वीचा अनुभव जमेस होताच. संगीतात नुसते दुखणे बरे करण्याची शक्ती तर आहेच, पण अतिश्रम, अविश्रांत मनाला सुखावण्याचे सामर्थ्य आहे. त्यांचा स्वत:चा अनुभव तसा होता. 'गाण्याने श्रम वाटतात, परि हेही नसे थोडके' कै. केशवसुत यांचा हा काव्याविष्कार या संदर्भात लक्षात घेता येईल. आवाजाच्या अनुरोधाने आपण 'ॐ' या बीजमंत्रापर्यंत जाऊ शकतो. यापुढची अवस्था म्हणजे त्या सर्वशक्तिमान परमेश्वराची गाठभेट !

एकदा द्विवेदी कोर्टात गेले असताना, गुरुजी हार्मोनियम घेऊन बसले. श्री. द्विवेदी हे सुद्धा संगीताचे भोक्ते होते. त्यांच्याजवळ स्वत:ची विविध वाद्ये होती. योगाकरिता आसन घालतात, तसे बसल्यावर ते हार्मोनियम वाजवीत आणि गात असत. गुरुजींना जाण होती, की योगाकरिता विशिष्ट अशी बैठक घेतली तर ती योगाचे दृष्टीने सोईची होते. थोड्याच वेळात त्यांना कळून आले, की त्यांचे शरीर हळूहळू हलके होऊ लागले. आपण अगदी पिसासारखे हलके झालो आहोत, असे वाटू लागले. त्यामुळे कदाचित हवेतही जाऊ. याचवेळी त्यांना जेवावयाचे बोलावणे आले. त्यामुळे जो नवा अनुभव त्यांना मिळण्याची शक्यता होती, त्यात अडथळा आला.

दुसऱ्या दिवशीही त्यांनी हार्मोनियम काढला आणि आदल्या दिवशी ज्या पद्धतीने ते वाजवत होते, तसा वाजवू लागले. काही वेळाने त्यांना आल्हाददायक संवेदना होऊ लागल्या. खालपासून त्या स्पॉयनल कॉलमच्या मध्यभागातून जाऊ लागल्या. ह्या संवेदना स्पष्ट अशा स्पॉयनल कॉलमपाशी चार-पाच ठिकाणी होत्या. पुढे त्या (सेरेब्रम) प्रान्तस्थापर्यंत आल्या. त्यामुळे त्यांच्या शरीराचा तोल जाऊ लागला. ह्या दिवशीही जेवणाचे आमंत्रण आल्यामुळे पुढील अनुभवावर पाणी पडले.

वरील अनुभवामुळे गुरुजी उत्तेजित झाले. तिसऱ्या दिवशी पुन्हा संगीताच्या प्रयोगाकडे वळाले. जेमतेम अर्धा तास झाला असेल, तीच अनुभूती मेरुदंडाच्या खालील भागापासून निर्माण होऊन प्रान्तस्थेपर्यंत पोहोचली. त्यामुळे शरीराचे संतुलन संपले. एक दिव्य ज्योती त्यांच्या डाव्या-उजव्या बाजूला प्रकाशित होऊ लागली. ते समाधिस्थ झाले. त्यांना वाटू लागले, की आपण

विदेह होऊन पारलौकिक जीवनात पोचलो आहोत. अपार शांती आणि परमानंदाच्या सागरात ते डोलू लागले. काही तासांनी ते नेहेमीच्या सामान्यस्थितीत आले !

ह्या दिवसापासून गुरुजींचा बाह्य जगाशी संबंध तुटला. आता त्यांना हार्मोनियमची किंवा संगीतश्रवणाची गरज नव्हती. त्यामुळे ते पारलौकिक परमानंदात सहज जात होते. त्यांची गात्रे शिथिल झाली, काष्ठवत संवेदनाहीन झाली. ते उभे राहू शकत नव्हते किंवा कोणाचा आधार घेतल्याशिवाय चालू शकत नव्हते. त्यांची भूक नाहीशी झाली होती. अन्नाची चवही गेली. खाणेपिणे मोठे अवघड होऊ लागले. तेजस्वी सागरात आपण जणू विलीन झालो आहोत, असे त्यांना वाटू लागले. काही वेळाने तो प्रकाश लुप्त झाला. एक मोठी पोकळी त्यांना जाणवू लागली. पुन: प्रकाश प्रकटला. ऊन-सावलीसारखा प्रकाश आणि पोकळी ह्यांचा खेळ चालू होता. अशी अवस्था पुन: पुन्हा दिसू लागली. जरी त्यांचे शरीर संवेदनाहीन झाले होते, तरी ते मात्र पूर्णत: चैतन्यमय होते. ह्याच अवस्थेत ते काही काळ राहिले. तो प्रकाश पुन्हा लुप्त झाला होता. आता ते अशा अलौकिक स्थितीत पोहोचले, की जी ह्या प्रकाशाच्या पलीकडे होती.

इथे थोडे विषयांतर वावगे होणार नाही. सर्वच प्रमुख धर्मांमध्ये ईश्वराचे प्रत्यक्ष रूप प्रकाशाच्या रूपात अभिव्यक्त झाले आहे. तेच परमेश्वराचे दृश्य स्वरूप आहे. ख्रिश्चनांचे पवित्र बायबल असेच सांगते - आरंभी परमेश्वराने स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण केली. पृथ्वीला सुरुवातीला काही आकार व स्वरूप नव्हते. चहूकडे गडद अंधार होता. ती पोकळीने व्याप्त होती. ईश्वरात्मा जलस्तरांतून वर आला. निर्मितीला सुरुवात करतेवेळी तो प्रथम म्हणाला, ''प्रकाश पसरू द्या.'' असे म्हणताच सर्व पृथ्वी प्रकाशमय झाली. नव्या विधानात (न्यू टेस्टामेंटस्) आपण वाचतो की ईसा लोकांना सांगत आहे —

''मी प्रकाश आहे. मीच जीवन आणि मीच मार्ग आहे. मला नाकारून कोणीही परमपिता परमात्म्यापर्यंत पोहोचू शकणार नाही.''

इस्लाम सांगतो, की दयाळू अल्लाह 'तेज' आहे. आपल्यातील थोडेसे तेज 'मोहम्मद'ला देऊन त्याची निर्मिती केली आहे आणि ह्या नूरानेच संपूर्ण जग निर्माण झाले आहे.

हिंदू धर्मग्रंथाप्रमाणेही एक ''ज्योतिर्मय प्रकाशपुंज'' आहे. हा

प्रकाशपुंजच परब्रह्म आहे. हिंदू जेव्हा प्रात:काळी सूर्याची पूजा करतात, तेव्हा सूर्याला ते ईश्वराचे प्रतीक मानतात. ईश्वर स्वत: प्रकाश आहे.

पारशी धर्मीय अग्निपूजक आहेत. ते पण अग्नीला प्रकाश आणि पवित्रतेचे प्रतीक मानतात. पारशी धर्माचे संस्थापक 'झरतृष्ट्र' त्यांच्या आधीही अग्निपूजा अस्तित्वात होती.पारशांसाठी अग्नि 'अहूदा माज्दाचे' प्रतीक आहे.

आदिमानव आणि धर्म पण सूर्याला ईश्वर मानत. मेक्सिकोनिवासी तर सूर्याला भोग चढविण्यासाठी नरबली देत होते. भोजनाअभावी सूर्याची शक्ती कमी न होवो, हीच त्यामागची भावना.

सर्व धर्मांच्या शिकवणीचा जर आपण तर्कसंगत विचार केला, तर आपण ह्या निष्कर्षापर्यंत पोहोचतो, की प्रकाशच तो मूळ पदार्थ आहे, ज्यामुळे ह्या सृष्टीची रचना झाली. मग हा प्रकाश सूक्ष्म असू दे किंवा जटिल असू दे. ह्याचाच अर्थ असा आहे, की ईश्वर किंवा परमशक्ती प्रकाश नाही तर प्रकाशापलीकडे आणखी काहीतरी (वेगळे विश्व) आहे. गुरुजी ह्या प्रकाशापलीकडच्या विश्वात विलीन झाले होते. उपनिषदामध्ये ह्या वेगळ्या विश्वाविषयी लिहिले आहे.

**यतो वा इमानी भूतानी जायन्ते**
**येन जातानी जीवन्ती**
**यत् प्रयत्नी भिक्षायन्ती**
**तद् विदि विजिन्यशंवा तद्ब्रह्म ।**

ते आणखी काहीतरीच समजून घ्यायला पाहिजे. ज्यामुळे सर्व सजीव-निर्जीव वस्तूंचे अस्तित्व आहे. ज्यामुळे जीवनाची उत्पत्ती होते आणि नाशही होतो. त्यालाच आपण 'ब्रह्म' म्हणतो. केवळ हेच जाणणे महत्त्वाचे आहे. गुरुजी संपूर्ण सात दिवस समाधिस्थ होते. ह्या ऐहिक, लौकिक जगात परत येण्यास त्यांना इतका अवधी लागला, ह्यात काही आश्चर्य नाही. त्या अत्युच्च पवित्र परमानंदाच्या स्थितीत गेल्यानंतर जेव्हा ते परत ह्या ऐहिक जगतात परतले, तेव्हा त्यांना हे जग अत्यंत अपवित्र, कुरुप आणि नीरस वाटायला लागले.

□

पूर्वावस्थेत आल्यावर गुरुजींना आठवण करून दिली, की त्यांनी रामकृष्ण

सेवा समितीच्या एका सभासदाचे घरी चर्चेला जावयाचे निमंत्रण स्वीकारले आहे; परंतु तशी चर्चा करणे सद्य:स्थितीत मानसिकदृष्ट्या त्यांना अशक्य होते. श्री. द्विवेदींचे द्वितीय चिरंजीव गिरीश कुमार (एम. एस. सी. पी. एच. डी.) यांच्याकडून तार केली आणि हरिश्चंद्र त्रिपाठी यांना शहडोल येथे पत्र पाठवले. श्री. त्रिपाठी हे नोकरीनिमित्त शहडोल येथे होते. ते बिलासपूरला आले. त्यांनी गुरुजींना आपल्याबरोबर शहडोल येथे नेले.

यापूर्वी गुरुजींनी रामकृष्ण सेवा समितीच्या मेळाव्यासमोर एक प्रवचन दिले होते, त्यांचा सभासदांवर चांगला प्रभाव पडला होता. म्हणून गुरुजींनी पुन्हा योग आणि अध्यात्म या विषयावर बोलावे असे त्यांना वाटत होते. श्री. द्विवेदी हे समितीचे प्रमुख सदस्य होते. गुरुजींनी रामकृष्ण मिशन आश्रमाचे प्रमुख व्हावे, असा त्यांचा प्रयत्न होता. यावेळी बिलासपूरला आश्रमाची शाखा निघणार होती; परंतु मिशनचे नियमानुसार गृहस्थाश्रमी माणूस आश्रमातील संन्यासाचा प्रमुख होऊ शकत नव्हता. गुरुजींनाही संस्थेचे जोखडात अडकून घ्यावयाचे नव्हते.

गुरुजी शहडोल येथे सुद्धा ट्रान्स अवस्थेत (गाढ तंद्री) पंधरा दिवस होते. त्रिपाठींनी त्यांच्यावर सतत रात्रंदिवस लक्ष ठेवले. त्यांची देखभाल केली. त्रिपाठींना दिवसा ऑफिसला जावे लागे. त्यावेळी त्यांनी रामसमझ पांडे यांना देखरेख करावयास सांगितले होते. एकदा गुरुजी पांडे यांचे घरी कॉटवर पडून होते. त्यावेळी पांडे जमिनीवर पडून पुस्तक वाचीत होते. प्रकाशाचा मोठा गोळा एकदम त्यांच्या दृष्टीस पडला. जरा वेळाने तो नाहीसा झाला.

शहडोल गावी गुरुजी त्रिपाठींकडे तीन आठवडे होते. हे तीन आठवडे त्यांना तीव्र क्लेश देणारे होते. त्यांना कपाळाच्या मध्यभागी तीव्र उष्णता वाटू लागली. एखाद्या बंदुकीच्या गोळीसारखी तीक्ष्ण वस्तू त्यांच्या कवटीच्या हाडावर आतून टोचत आहे. तीव्र उष्ण/ताप आणि संवेदना यामुळे होणारा त्रास इतका होता, की त्या कवटीच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न करीत आहेत काय? असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे त्यांची अशी भावना झाली, की त्यांच्या डोक्याच्या आता ठिकऱ्या ठिकऱ्या होतील काय? ह्या संवेदना सतत रात्रभर होत होत्या. सुमारे तीन तास खंड न पडता हे घडत होते. कोणत्याही औषधाचा उपयोग झाला नाही. मात्र थोडासा परिणाम एका उपचाराने झाला. गुरुजींनी आपले

डोके पाण्याच्या टॅपखाली धरले अन् डोक्यावरून पाणी सतत पडू दिले. अशा प्रकारचा त्रास पूर्वी बिलासपूरला झाला होता. त्यावेळी गुरुजींनी डोक्यावरून पाणी घेण्याचा प्रयोग केला होता. शहडोल येथेही त्यांनी तोच प्रयोग केला. पाण्याच्या हौदाची सोय सर्वत्र नसते. म्हणून ते एका मोठ्या भांड्यात पाणी ठेवत. म्हणजे ते डोक्यावर ज्यावेळी घ्यावेसे वाटेल, त्यावेळी घेऊ शकत होते.

ह्या संवेदना जावयास काही दिवस लागले. नंतर गुरुजी शरीराची नीट हालचाल करू लागले. तरीही अंगाभोवती फिरताना त्यांना बराचसा त्रास होत होता. त्यांनी आपल्या मुलाला दुर्ग येथून बोलावून घेतले. तो शहडोल येथे आल्यावर गुरुजी त्याच्याबरोबर माँजीच्या आजोळच्या खेडेगावी - अलाहाबाद जिल्ह्यातील खेतरपालिया येथे गेले. ह्यावेळी माँजी तिथे रहात होत्या. दोन आठवडे ते तिथे राहिले. नंतर माँजी आणि मुलांबरोबर ते परत गेले. दुर्ग येथेसुद्धा गुरुजी ट्रान्स (समाधिस्थिती) अवस्थेत होते. त्यानंतर सुमारे आठ महिने सामान्यस्थितीत यावयास लागले.

शहडोल येथे असताना काही साधकांनी, इच्छुकांनी गुरुजींकडून मार्गदर्शन घेतले. काहींनी दीक्षा घेतली. यामध्ये एक जानकीप्रसाद मिश्र, प्राचार्य, उच्च माध्यमिक शाळा, (सध्या ते निवृत्त होऊन होमिओपॅथीचा दवाखाना चालवीत आहेत.) तसेच श्री. हरनारायण दुबे, हेडमास्तर, माध्यमिक शाळा आणि श्री. भैय्यालाल तिवारी, शिक्षणखात्यातील सुरुवातीचे लेखनिक आणि आता दुय्यम शिक्षणाधिकारी होते.

इतर ठिकाणी गुरुजींचा शिष्यपरिवार जसा वाढत होता, तसाच शहडोल येथेही हळूहळू वाढून स्थिर होत होता. ह्या शिष्यांपैकी ज्यांनी आध्यात्मिक साधनेत थोड्याच अवधीत यश मिळवले, त्यात श्री. गुरुप्रसाद पांडे जे एका हायस्कूलमध्ये ते अध्यापक होते, त्यांना दीक्षा एका नाट्यपूर्ण पद्धतीने मिळाली. ती घटना नंतर पाहू.

१९७४ साली उन्हाळ्यात गुरुजी पुन्हा बिलासपूरला श्री. द्विवेदी यांचेकडे काही दिवसांकरिता आले. ह्यावेळी श्री. रामखिलवान मिश्रा श्री. द्विवेदी यांचे मित्र, व्यवसायाने ते पब्लिक प्रॉसिक्युटर होते, हे गुरुजींच्या संपर्कात आले. गुरुजींच्या आध्यात्मिक साधनेने तेही प्रभावित झाले. त्यांनी गुरुजींना आपल्या घरी काही दिवस राहण्याचे आमंत्रण दिले. गुरुजींची तयारी असल्यास

श्री. द्विवेदींची काही हरकत नव्हती. यावर श्री. द्विवेदी म्हणाले, की आम्ही अगदी जवळचे मित्र आहोत. आमची घरं स्वतंत्र नाहीत. एकच आहेत. फक्त दोन दरवाजे वेगळे आहेत. गुरुजींनी आमंत्रण स्वीकारले. शहडोलवरून परत आल्यावर गुरुजींनी राहाण्यास येण्याचे कबूल केले. कारण श्री. हर्षचंद्र त्रिपाठी त्यांना शहडोलला न्यावयास आले होते, म्हणून गुरुजी त्यांच्याबरोबर गेले.

तेथून परत आल्यावर गुरुजींनी त्यांचा मुक्काम श्रीराम खिलवान मिश्रा यांचेकडे ठेवला. येथील त्यांच्या वास्तव्यात एक प्रसंग घडून आला. त्यावरून गुरुजींचे आध्यात्मिक सामर्थ्य तसेच भावी घटनांसंबंधी त्यांना होणारे ज्ञान याचा प्रत्यय येतो.

श्री. मिश्रांची मुलगी पहिल्या बाळंतपणाकरिता माहेरी आली होती. तिला प्रसूतिवेदना होऊ लागल्यामुळे सरकारी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. तिची आई तिच्या सोबत हॉस्पिटलमध्ये राहिली. बराच वेळ झाला. त्या मुलीला तीव्र वेदना होत होत्या; पण प्रसूति होण्याची लक्षणे दिसेनात. जसजसा वेळ जात होता, रात्रभर तिला वेदना होत होत्या. (अशा अवस्थेत तिने रात्र काढली) आई-वडील काळजी करू लागले. चिंताग्रस्त झाले. दुसऱ्या दिवशी डॉ. (कु.) यमुना काळे, स्त्री-प्रसूतिशास्त्रज्ञ, एक निष्णात डॉक्टर, स्वभावानेही प्रेमळ, ह्यांचा सल्ला घेतला. त्यांनी अजून काही वेळ थांबावयास सांगितले. त्यानंतर जर प्रसूति सहजपणे झाली नाही तर सिझरिन करावयाचे का, याचा विचार करू. काही तास झाले. त्या मुलीला वेदना होत होत्या, पण प्रसूति झाली नाही. अगदी अधिरतेने आई-वडील वेळ मोजत होतेच.

दुपारी दोन वाजता मिश्रांना हॉस्पिटलमध्ये सिझरिन करण्याकरिता केस पेपरवर सही करावयास बोलावले. चार वाजता श्री. मिश्रा हॉस्पिटलमधून घरी परत आले. ते चिंताग्रस्त अन् त्यांचा चेहरा उतरलेला दिसत होता. गुरुजींनी काय केस आहे म्हणून विचारले, की ज्यामुळे मिश्राजी दुःखी झाले होते. मिश्रांनी सगळी केस आणि डॉक्टरांचा अभिप्राय सांगितला. गुरुजींनी मिश्रांची समजूत घातली. ते म्हणाले, मला अंतर्यामी कळून आले आहे, की (संदेश आला की) एक वाजता मूल होईल आणि तशी काळजी करण्याचे कारण नाही. गुरुजींनी मिश्रांना हॉस्पिटलमध्ये परत जावयास सांगितले. जर त्या मुलीची स्थिती ठीक असेल तर सिझरिन करू नये, अशी विनंती करावी असे गुरुजींनी

सुचवले. आता दुपारचे चार वाजून गेले होते. गुरुजींनी एक वाजता सांगितले, याचा अर्थ रात्री एक वाजता?

मिश्रा हॉस्पिटलमध्ये लगेच गेले. त्यांनी गुरुजींचा निरोप त्यांच्या बायकोला, मुलीला व डॉक्टरांना सांगितला. डॉक्टरांनी मुलीची स्थिती पाहिली. सिझरिन आता करू नये आणि एकपर्यंत थांबावयाचे ठरवले.

ह्या दिवसांत गुरुजी श्री. काळे यांचे घरी दुपारच्या चहाकरिता जात असत. त्यांच्याबरोबर त्यांचे शिष्य श्री. लक्ष्मणराव देशपांडेही असत. वरील दिवशीही गुरुजी श्री. देशपांडे यांच्यासह श्री. काळे यांचे घरी गेले होते. चहा घेत असताना सहज गप्पांच्या ओघात चाइल्ड किंवा मूल असा शब्द उच्चारल्यावर नेमका अर्थबोध मुलगा की मुलगी होतो का? श्री. देशपांडे आणि श्री. काळे यांनी सांगितले, की चाइल्ड (मूल) हे सर्वनाम असल्यामुळे त्याचा अर्थ मुलगा किंवा मुलगी असा होतो. मिश्रांच्या घरी परत आल्यावर गुरुजींनी चर्चेचा भाग सांगितला. ते म्हणाले, की होणारे मूल हे मुलगा किंवा मुलगी असेल. कारण गुरुजींना जो संदेश (आतून) मिळाला होता, त्यात चाइल्ड हा शब्द होता.

इकडे हॉस्पिटलमध्ये संबंधित प्रत्येकजण वेळ केव्हा येईल, याची तीव्रतेने वाट पहात होता. एकची वेळ दिली होती. मध्यरात्री मुलीच्या वेदना थांबल्या याचा अर्थ, कोणत्याही क्षणी ती प्रसूत होईल. एक वाजायला पंधरा मिनिटे राहिली असताना मूल होण्याच्या कळा बाळंतिणीला होऊ लागल्या, त्यामुळे तिला प्रसूतिच्या खोलीत नेले. बरोबर एक वाजता ती ठीकपणे प्रसूत होऊन तिला मुलगी झाली.

ह्या घटनेने श्री. मिश्रा व डॉक्टरांना आश्चर्य वाटले आणि दोघेही प्रभावित झाले. मिश्रांना फार मोठे उपकार झाले, असे वाटले. त्यांनी गुरुजींचे आभार मानले.

ह्या सुमारास बिलासपूरमधील आणखी काही मंडळींनी गुरुजींची भेट घेतली, तसेच त्यांच्याकडून दीक्षामंत्र घेतला. ह्या मंडळींपैकी एक डॉ. देवरस, आयुर्वेदाचे डॉक्टर आणि स्वातंत्र्यसैनिक, तसेच त्यांचे कुटुंबीय होते. याशिवाय बाळाप्रसाद त्रिपाठी, रघुनाथ कुमठकर यांची कुटुंबीय, बाळासाहेब देशपांडे, डॉ. गिरीश पांडे आणि मिस सुधा व्यास इ. होते.

डॉ. गिरीश पांडे हे विद्यार्थीदशेपासूनच गुरुजींच्या संपर्कात होते. त्यावेळी गुरुजी हे दुर्ग येथे संगीत महाविद्यालय चालवीत होते. डॉ. पांडे हे त्या सुमारास दुर्ग येथे वारंवार जात. तेथे त्यांची थोरली बहीण व मेव्हणे रहात होते. गुरुजींना ही मंडळी परिचित होती. डॉ. पांडेंच्या धाकट्या बहिणीला ते संगीत शिकवीत असत. अशा या भेटीतून डॉ. पांडे गुरुजींच्या संपर्कात आले. त्यांना गुरुजींच्या आध्यात्मिक साधनेबद्दल (सामर्थ्याबद्दल) आकर्षण वाटले. त्यामुळे त्यांनी दीक्षा मागितली, पण गुरुजींनी तत्परता दाखविली नाही. तरी मेडिकलचा अभ्यास पुरा केल्यावर दीक्षा देण्याचे कबूल केले. डॉ. पांडे यांनी १९७४ मध्ये दीक्षा घेतली. तेव्हापासून त्यांनी आध्यात्मिक साधनेत लक्षणीय प्रगती केली. त्यामुळे गुरुजींनी त्यांना अधिकृतपणे दीक्षा देणे, शिष्यांना मार्गदर्शन करणे इ. गोष्टींची परवानगी दिली. आता त्यांनीही बरेच शिष्य केले आहेत.

गुरुजी श्री. रामखिलवान मिश्रा यांचेकडे रहात असताना श्री. यादव अमृतराव गोवर्धन, ॲडव्होकेट, टिळकनगर, बिलासपूर हे भेटावयास आले. त्यांना पहाताच गुरुजी म्हणाले, ''तुम्हाला पाठवले आहे म्हणजे तुम्ही स्वत:हून आलेले नाहीत. कोणीतरी तुम्हाला उद्युक्त केले म्हणून तुम्ही आलात.'' श्री. मिश्रा व श्री. गोवर्धन या दोघांनाही याबाबत आश्चर्य वाटले.

वस्तुस्थिती अशी होती, की (श्री. गोवर्धन यांनीच नंतर उघड केली) श्री. गोवर्धन हे काही वर्षांपूर्वी पत्राद्वारा आध्यात्मिक साधनेचे धडे एका शिष्याकडून (सुप्रसिद्ध रमणमहर्षि अरुणाचलम, तामिळनाडू) घेत होते. अरुणाचलम येथील महंत यांनी इहलोकीची यात्रा संपवून समाधी घेण्याचे ठरवले. म्हणून त्यांनी पत्राने श्री. गोवर्धन यांना कळवले, की पुढील मार्गदर्शनाची जरुरी लागली तर श्री. वासुदेव तिवारी, बेमेतरा, दुर्ग जिल्हा, यांचेकडून घ्यावी. गुरुजींच्या नंबर दोनच्या मुलाचे रेडिओचे दुकान बेमेतरा येथे होते. गुरुजी तेव्हा तिथे जाऊन राहात असत. गोवर्धनांना पत्र आल्यामुळे ते गुरुजींकडे आले. पण गुरुजींनी अभिप्राय दिला, की त्यांना 'कोणीतरी पाठवले.' परंतु गुरुजी आणि श्री. मिश्रा ह्या दोघांनाही गोवर्धनाच्या ह्या पूर्वघटनेची माहिती नव्हती. गुरुजींच्या ह्या पूर्वज्ञान सामर्थ्याने हे दोघेही विस्मयचकित झाले !

बिलासपूरहून गुरुजी रायगड या गावी (मध्यप्रदेश-उत्तरपूर्व) ओरिसाच्या हद्दीपाशी गेले. इथे त्यांचे शिष्य श्री. नर्मदा प्रसाद द्विवेदी यांची नेमणूक झालेली

होती. ज्यावेळी गुरुजी द्विवेदींच्या घरी गेले, तेव्हा त्यांना दिसून आले, की द्विवेदींची मुलगी ही आजारी असून ती अंथरुणावर पडून आहे. तिची प्रकृती गंभीर आहे. तिला टायफाइड झाला आहे. तिचा ताप बराच वाढला होता. तत्परतेने औषधोपचार केल्याने - अँटिबायोटिक्सचे अधिक पॉवरचे डोस दिल्यामुळे तिचा ताप १०४ वरून ९४ झाला. तिचे शरीर थंड पडले. द्विवेदींना तीव्र काळजी वाटत होती. त्यांना दु:खही होत होते. विधूर असल्यामुळे त्यांना होणारा मानसिक त्रास, त्यात कोणीही भागिदार होणार नव्हते. गुरुजींना मुलीच्या प्रकृतीची स्थिती सांगितली. त्यावर त्यांनी कॉफी करून एक कपभर देण्यास सांगितले. घरात कॉफी नव्हती. मग गुरुजींनी चहा करून आणावयास सांगितला. द्विवेदींनी लगेच चहा केला. एक कप गुरुजींकरिता व एक कप मुलीला दिला. गुरुजींनी तिला चहा पिण्यास मदत केली. आश्चर्य म्हणजे मुलगी चहा पिऊ लागली तसे तिचे टेंपरेचर वाढू लागले. थोड्याच वेळात ते नॉर्मलला आले. त्या मुलीला आणि तिच्या वडिलांना आश्चर्य वाटले. त्यांनी सुटकेचा सुस्कारा सोडला.

गुरुजी श्री. द्विवेदींकडे रायगड या गावी थोडे दिवस राहिले. एके दिवशी त्यांना धोक्याची सूचना काही विपरित घडेल अशी झाली. कोणी तरी शहडोल येथे आध्यात्मिक मार्गदर्शनाकरिता उत्सुकतेने वाट पहात आहे, अशी सूचना लागोपाठ चार दिवस होत होती. हा नोव्हेंबर महिना होता. गुरुजींनी शहडोल येथे जाण्याचे ठरवले. गुरुजी बिलासपूरला आले. राम बिलवान मिश्रा यांचेकडे रात्र घालवली. दुसऱ्या दिवशी गुरुजींनी श्री. द्विवेदींबरोबर जेवण घेतले. सायंकाळी ते लक्ष्मीप्रसाद मिश्रा यांचेबरोबर शहडोल येथे जावयास निघाले. तिथे आल्यावर त्यांचे स्वागत हरनारायण दुबे यांनी केले आणि त्यांना आपल्या घरी नेले.

दुसऱ्या दिवशी सायंकाळी शहडोल येथे बरेचसे शिष्य, श्री. दुबे यांचे घरी गुरुजींना अभिवादन करण्यास आणि त्यांचा उपदेश ऐकण्यास जमले. ह्या परिवारात श्री. गुरुप्रसाद पांडे, हायस्कूल शिक्षक, हे अजून शिष्य झाले नव्हते, हा तरुण गुरुजींच्या दर्शनास व त्यांच्याकडून काही उपदेश ऐकण्यास उत्सुक होता. तो एका कोपऱ्यात पाठीमागे बसला होता. गुरुजी जे काही सांगत होते, ते तो शांतपणे ऐकत होता. तो गुरुजींचे दर्शन घेत असताना गुरुजींनी त्याला

ओळखले. ह्या तरुणाला काही मार्गदर्शन करावयाचे आहे, हे त्यांना रायगड येथे सुचले होते म्हणून ते शहडोल येथे आले.

समोर जमलेल्या लोकांना गुरुजींनी आध्यात्मिक विषयावर सांगितले, आणि चर्चा झाल्यावर जमलेले लोक परतू लागले. कारण आता रात्र होऊ लागली होती. परंतु गुरुप्रसाद पांडे बसूनच राहिले. परत जाण्यात त्यांना स्वारस्य नव्हते. सगळेजण निघून गेल्यावर, त्यांनी गुरुजींना प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. गुरुजीसुद्धा ह्या तरुणाशी बोलण्यास उत्सुक होते, म्हणून त्यांनी श्री. पांडे याला लगेच प्रश्न विचारण्यास सांगितले. गुरुप्रसादने प्रामाणिकपणे आणि शांतपणे प्रश्न विचारला, "गुरुजी, मी स्वत:ला कसा समजून घेऊ?" असा क्वचितच प्रश्न (यापूर्वी) विचारला गेला असेल. असाच प्रश्न जिझस क्राईस्टला सुमारे हजार वर्षांपूर्वी एका श्रीमंत तरुणाने विचारला होता, "हे प्रभू! मी कोणते सत्कृत्य करू, की त्यामुळे मला आत्मिक सुख मिळेल?" असा प्रश्न खरोखरच क्वचित विचारणारा असतो. इतिहासात असा प्रश्न धीटपणे विचारणारे थोडेच आढळतात आणि त्याहीपेक्षा अगदी थोडे पोंटीयस पायलेटसारखे एखाद्याला तहान लागावी, तसे थांबले आहेत. श्री. पांडे यांच्या ह्या प्रश्नामुळे गुरुजी प्रभावित झाले. गुरुजींनी त्याला नाव विचारले. मी "गुरुप्रसाद" उत्तर आले. "तू खरोखर गुरुप्रसाद आहेस," गुरुजी म्हणाले. "उद्या संध्याकाळी ये. मला जर उत्तर मिळाले आणि तुला जर ते सांगू शकलो, तर जरूर उत्तर देईन. जर तसे जमले नाही तर नाही असे समज."

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी गुरुप्रसाद मोठ्या उत्सुकतेने गुरुजींकडे आला. तो उत्तराची अपेक्षा करीत होता.

बरेच वर्षं ते स्वत:ला हाच प्रश्न विचारीत -

"मला स्वत:ला मी कसे ओळखू?"

पण या प्रश्नाचे उत्तर उद्याप मिळाले नव्हते. गुरु आणि परमेश्वराचे उपासक पुष्कळ आहेत; पण त्यांनी त्याचे समाधान केले नव्हते. तो पायलेट या शोध घेणाऱ्यासारखा थांबला, उत्तराकरिता प्रार्थना करू लागला. ह्या सायंकाळी त्याला उत्तर मिळेल याची खात्री होती. थोड्या वेळाने गुरुजींना अंतर्यामी उत्तर मिळाले. ज्यावेळी गुरुप्रसाद आले, त्यावेळी गुरुजींजवळ उत्तर तयार होते. गुरुप्रसादला त्यांनी दीक्षा दिली. विशिष्ट पद्धतीने 'ध्यान' करण्यास सांगितले.

त्यामुळे त्याला स्वस्वरूपाची ओळख होणार होती.

तशी ही वस्तुस्थिती दैवीबाब, संकेत. जशी उत्सुकता दाखवली जाते, (हे खरे आहे की ते?) सर्वशक्तिमान दयाळू परमात्मा गरजवंतांना आणि इच्छुकांना मदत करतो. जे प्रामाणिकपणे अंत:करणापासून त्यासाठी प्रयत्न करतात, हे एक कटू सत्य आहे. फार कमी लोक हे जाणतात. ईश्वराची प्राप्ती सद्‌गुरूही करून देऊ शकतो. तो आपल्याला दीक्षा देईल, मार्गदर्शन करेल व आध्यात्ममार्ग दाखवेल. हा सरळ मार्ग आहे. छोटा. दिव्य जीवनापर्यंत घेऊन जाणारा. दरवाजा एकदम सरळ आहे. पण छोटा. त्याला पार करणे अवघड आहे, पण लक्ष्यापर्यंत जाणारा हाच सर्वांत छोटा मार्ग आहे. जसे गुरुप्रसादच्याबाबत वर घडले आहे तसे. त्याच्या बाबतीत सुद्धा असे दृश्य लागोपाठ चार दिवस दिसले. गुरुजींचे दर्शन हेच त्याला पुढे नेणारे आणि छोट्या मार्गातून मार्गदर्शन करणारे होते. त्या चार दिवसांत गुरुजी रायगड येथे होते; पण त्यांना शहडोलाला येऊन गुरुप्रसादला सहाय्य करावयाचे होते. गुरू-शिष्य संबंध एरवी एका शिष्याने दुसऱ्याचा गुरूशी परिचय घडवून आणण्यात होतो. पण परमेश्वरसुद्धा मानवी स्वरूपात नसला तरी त्याच्या परीने उत्सुक असलेल्यांना मार्ग दाखवतो. दक्षिणेकडील सुप्रसिद्ध रमणमहर्षि, रामकृष्ण परमहंस आणि आमचे गुरुजी - ज्यांचे हे चरित्र आहे, त्या सर्वांबाबत असे घडले आहे.

दीक्षा ही गहन आणि गूढ अशा पद्धतीने स्पर्श करून किंवा सद्‌गुरूंच्या उपस्थितीत किंवा साधकाकडे कटाक्ष टाकूनही घेता येते. अशी घटना रामकृष्ण परमहंसांकडून प्रसिद्ध नाग महाशय यांचेबाबत दीक्षा दिल्यावर घडली. उत्सुकाला स्वप्न किंवा दर्शन देऊनही गुरू किंवा देवपुरुष दीक्षा देऊ शकतात.

दीक्षा देण्याचे पाच प्रकार किंवा पद्धती आहेत हे वाचून एखाद्याला आश्चर्य वाटेल (किंवा मजेशीर वाटेल) हे प्रकार असे -

१) कूर्मदीक्षा म्हणजे कासवपद्धती. असे म्हणतात, की कासवाची आई त्याच्या पिलांना भरवीत नाही. ती स्वत: अन्न घेते आणि तिचे पोटभर खाऊन झाले की तिला वाटते, की आपल्या पिलांनीही अन्न खाल्ले आहे, पोटभर घेतले आहे आणि ते समाधानी आहेत. ह्या पद्धतीने सद्‌गुरु शिष्याला विचार ग्रहण करावयास लावून दीक्षा देतात.

२) स्पर्शदीक्षा म्हणजे स्पर्श करून अनुग्रह.

३) नुसत्या कटाक्षाने अनुग्रह.

४) मंत्र देऊन अनुग्रह किंवा दीक्षा

५) स्वप्नदीक्षा

आता परत गुरुप्रसादाचे विषयाकडे वळू.

गुरुप्रसादने गुरुजींनी सांगितलेल्या पद्धतीने ध्यानधारणा मोठ्या उत्साहाने सुरू केली आणि काही दिवसांनी त्याला आत्मानुभूति, ज्याची ते वाट पहात होते, ती झाली. त्याच्या साधनेत अशी अवस्था आली, की ते समाधी अवस्थेत गढून जात. यालाच परमहंस अवस्था असे म्हणतात.

मागे सांगितल्याप्रमाणे गुरुजींचा हरनारायण दुबे यांचेकडे मुक्काम होता. श्रीमती दुबे या हृदयरोगाने आजारी होत्या. त्यांना गुरुजींना भेटून दर्शन घेण्याची तीव्र इच्छा होती; परंतु श्री. दुबे यांनी आपल्या पत्नीला सांगितले, की गुरुजी हे ब्रह्मचारी आहेत, त्यांना स्त्रियांनी भेटलेले आवडत नाही. तसेच स्त्रियांनी पायाला स्पर्श केलेला चालत नाही. यामुळे गुरुजींचे दर्शन घेऊन त्यांच्याशी बोलणे राहिलेच. त्यांना गुरुजींचे दर्शन घेण्याची इच्छा दाबून ठेवावी लागली.

ह्या सुमारास श्रीमती दुबे यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे त्या अंथरुणावर काही दिवस पडून होत्या. डॉक्टर नित्य येत आणि त्यांच्यावर उपचार करीत. काही दिवसांनी त्यांना बरे वाटू लागले आणि त्या घरकामही करू लागल्या. असेच एक दिवस त्यांचे पती गुरुजींचेजवळ बसले असताना त्या आल्या आणि जवळच्या दाराच्या पाठीमागे येऊन उभ्या राहिल्या, म्हणजे गुरुजींच्या दृष्टीस त्या पडणार नाहीत. मोठ्या उत्सुकतेने त्यांनी गुरुजींचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली.

"हां ठीक. तुम्ही दर्शन घेऊ शकता, का नाही?" त्या गुरुजीपुढे आल्या. नमस्कार केला. त्यांनी सांगितले, की गुरुजी इथे आल्यापासून त्या दर्शन घेण्यास उत्सुक होत्या; पण त्यांना त्यांची इच्छा तशीच दाबून ठेवावी लागली. कारण त्यांच्या पतीने सांगितले होते, की गुरुजी ब्रह्मचारी आहेत आणि त्यांना स्त्रियांनी भेटलेले आवडत नाही. तसेच ते त्यांच्या पायाला स्पर्श करू देत नाहीत. हे ऐकून गुरुजींना हसू आले, (करमणूक झाली). त्यांनी शांतपणे सांगितले, मी ब्रह्मचारी नाही. मी गृहस्थाश्रमी असून मला पत्नी व मुले आहेत. मी स्त्रियांबद्दल अनुदार नाही. मी जर समाजात वावरत आहे, तर मी स्त्रियांचे दर्शन कसे टाळू

शकतो? हे ऐकून श्रीमती दुबे आनंदित झाल्या. त्यांच्या आजारामुळे गुरुजींची जी गैरसोय होईल, ती दूर करण्याचा स्वतः प्रयत्न करीन, असे त्यांनी सांगितले.

काही दिवसांनी श्रीमती दुबे यांना पुन्हा हृदयविकाराचा झटका आला. त्यांच्या डॉक्टरांनी उपचार केले. ह्यावेळी गुरुजींनी त्यांच्या दुखण्याचे कारण विचारले. कारण त्यांना माहीत नव्हते. त्यांना काय आजार होता? गुरुजींना वस्तुस्थिती कळल्यावर गुरुजींनी श्रीमती दुबे यांना सप्तशतीचे अनुष्ठान करण्यास सांगितले. तसेच त्यांना मंत्र दिला. हा मंत्र दिवसा आणि रात्री अगदी शांतपणे म्हणावयाचा होता. एकादशीला उपवास करावयाचा. अनुष्ठान चालू असताना त्यांनी एकटे झोपावयाचे. त्यांनी अगदी निष्ठेने अनुष्ठान सुरू केले. गुरुजींनी दिलेल्या सूचनांचे कसोशीने पालन केले. तीन एकादशा पार पडल्यावर त्यांना लख्ख प्रकाश दिसला. त्या प्रकाशातून एक कमलपुष्प त्यांच्याकडे येत आहे, ते हवेत तरंगत आहे, त्यांच्या उजव्या हातावर विसावले आहे. एकाएकी काही जादू घडावी असे घडले. त्यांचे सर्व दुःख, हृदयविकाराचा त्रास नाहीसा झाला. तेव्हापासून त्यांना हृदयविकाराचा झटका झाला नाही.

आता गुरुजी मध्यप्रदेश व महाराष्ट्रात सर्वत्र संचार करू लागले. ह्या प्रांतात ठिकठिकाणी त्यांचे शिष्य होते. महाराष्ट्रात त्यांचा नागपूर येथे शिष्य-परिवार व चाहते होते. ह्या परिवारापैकी एक श्री. पांडे, रिटायर्ड एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर, यांचा उल्लेख करणे प्राप्त आहे. ह्यांनी फोन करून पुण्यातील एका सत्पुरुषाकडून अनुग्रह घेतला होता. हे सत्पुरुष आता हयात नाहीत. ते फोनवरून दुसऱ्या लोकांना अनुग्रह देत असत. तसाच अनुग्रह श्री. पांडे यांनी फोनवरून घेतला होता. त्यानुसार ते आपल्या साधनेत हळूहळू प्रगती करू लागले; पण त्यांना पुढे शारीरिकदृष्ट्या अडचण येऊ लागली. डॉक्टरही त्यावर काही उपाय करू शकत नव्हते. मानसिक त्रास तीव्र झाल्यावर ते गुरुजींकडे आले. गुरुजींचे सहाय्य आणि आशीर्वाद मागितला. त्यावर गुरुजींनी अनुग्रह केला. थोड्याच वेळाने त्यांच्यातील दोष नाहीसे झाले. त्यामुळे त्यांच्या आध्यात्मिक साधनेत ते प्रगती करू लागले. नागपूरहून गुरुजी वर्ध्यास आले. इथेही त्यांचे शिष्य होते. येथून पुढे ते अमरावती, अकोला इ. ठिकाणी-जिथे पूर्वी ते राहिले होते; वावरले होते, तिथे आले. जिथे जिथे ते गेले, तिथे थोडेच पण प्रामाणिक इच्छुक त्यांची भेट घेत. आध्यात्मातील साधनेकरिता भेटत. गुरुजी अत्यंत

उदारपणे दीक्षा देत आणि चैतन्ययोगाचे मार्गदर्शन करीत.

१९७५ च्या मध्यात देशात आणिबाणी पुकारली गेली. जे राजकीय कार्यकर्ते शासनास अडचणीचे वाटत होते, त्यांना देशातील निरनिराळ्या तुरुंगांत डांबण्यास आले. अशा राजकीय स्थानबद्धांत वर्धा येथील ॲडव्होकेट श्री. वसंत विठ्ठल ताकवले हे होते. त्यांना नाशिकच्या तुरुंगात ठेवले होते. ते एक क्रियाशील व धडाडीचे कार्यकर्ते होते. तसेच ते योग आणि आध्यात्माच्या साधनेत प्रथितयश मिळवलेले साधक होते. आध्यात्माची त्यांची गोडी पाहून त्यांच्या एका मित्राने त्यांना गुरुजींबद्दल आणि त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराबद्दल सांगितले. ह्या माहितीमुळे श्री. तकवाले यांच्या मनात अशा पूज्य व्यक्तीला भेटून दीक्षा घेण्याची तीव्र इच्छा उत्पन्न झाली. ऑगस्ट १९७६ मध्ये त्यांची कन्या आजारी पडली म्हणून त्यांची पॅरोलवर सुटका झाली. ह्या अवधीत ते गुरुजींकडे अमरावतीला आले. ह्या पहिल्यावहिल्या भेटीतच श्री. तकवाले यांना अनुग्रह देण्यात आला.

ह्यामुळे श्री. तकवाले यांचे जीवन कसे सर्वस्वी बदलून गेले आहे, तो अनुभव त्यांनी इतरत्र सांगितला आहे.

दिवसामागून दिवस जात होते. वर्धा येथील बरेच लोक गुरुजींकडे मदतीकरिता आणि मार्गदर्शनाकरिता येत असत. आता तर वर्धा हे स्थान शिष्यमंडळींचे महत्त्वाचे केंद्र झाले आहे. सगळ्यांचीच नावे उद्धृत करणे शक्य नाही आणि तशी जरुरीही नाही.

जून १९७७ मध्ये माँजी अगदी शांतपणे स्वर्गवासी झाल्या. त्यांच्या जाण्याने गुरुजींच्या ऐहिक जीवनातील महत्त्वाचा एक धागा निसटला. तेव्हापासून गुरुजींनी त्यांचा दौरा द्रुतगतीने, आपल्या शिष्यगणांना आध्यात्मिक संदेश देण्याकरिता देशातील विविध भागांत सुरू केला. पठाणकोट, जम्मू, मिरत, डेहराडून इथे ते गेले. शिवाय मध्यप्रदेश, महाराष्ट्र या भागातही. ह्या पुस्तकाचा लेखकही असाच भाग्यवान. सप्टेंबर १९७७ मध्ये गुरुजींशी त्यांची गाठभेट होऊन त्यांस दीक्षा मिळाली. तेव्हापासून प्रस्तुत लेखकाला भौतिक, मानसिक व आध्यात्मिक समाधान सतत लाभत आहे. यापूर्वी त्यांनी ते कधीही अनुभवले नव्हते.

यापूर्वी ईश्वरी संकेतामुळे किंवा कृपेमुळे अध्यात्म्याच्या वाटेवरून जाताना

सद्गुरूंकडून साह्य कसे होते, हे पाहिले. अशा प्रकारचे अजून एक उदाहरण देता येईल. हा प्रसंग १९७९ च्या उन्हाळ्यात घडला. यावेळी गुरुजी बालोद (दुर्ग जिल्ह्यात) येथे श्री. डी. एस. आर. राय, एस. डी. ओ. (सिव्हिल) हेही शिष्यच होते. त्यांचेकडे मुक्कामास होते. इथे असताना एका स्त्रीचा चेहरा सतत चार दिवस दिसत होता. गुरुजींना नंतर कळून आले, की ही आध्यात्मातील मार्गदर्शनाची त्यांच्याकडून वाट पहात आहे. तसा गुरुजींना आदेशही मिळाला होता. काही दिवसांनी गुरुजी रायपूर (म. प्र.) येथे एका कार्यक्रमाकरिता गेले होते. इतर निमंत्रितांत, एक स्त्री (डॉ.) श्रीमती सयीदा शिंदे, एम. डी. रीडर, फॉर्मॅकॉलॉजी, पंडित जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेज, रायपूर ह्या होत्या. त्या काश्मिरी मुसलमान होत्या. तिला पाहिल्याबरोबर गुरुजींना बालोद येथे स्त्रीचा जो चेहरा पाहिला, त्याची आठवण झाली. ती आणि तिचे पती डॉ. व्ही. ए. शिंदे, प्रोफेसर आणि ॲनॉटॉमी विभागाचे प्रमुख, पंडित जवाहरलाल नेहरू मेमोरियल मेडिकल कॉलेज, रायपूर हे दोघेही गुरुजींच्या आध्यात्मिक सामर्थ्याने घडलेल्या व्यक्तिमत्त्वाने आकर्षित झाले. त्यांना त्यांच्याशी परिचय करून घ्यावासा वाटला. थोडाही वेळ वाया न घालवता, त्यांनी आपल्याला मार्गदर्शन व्हावे अशी इच्छा प्रदर्शित्त केली. गेली सुमारे दहा वर्षे ते निरनिराळ्या प्रकारच्या योगमुद्रा आणि आसने करीत होते, तसेच आध्यात्मावरील प्रवचने आणि प्रात्यक्षिकांना ते रायपूर येथे हजर राहात; पण त्याचा काहीही उपयोग झाला नव्हता.

त्या उभयतांच्या इच्छेचा स्वीकार करून गुरुजींनी त्यांना दुसऱ्या दिवशी अनुग्रह दिला. तो दिवस ६ जून १९७९ होता. ह्या दांपत्याने अनुग्रह घेतल्यापासून थोड्याच दिवसांत त्यांच्या साधनेत चांगली प्रगती झाली. त्यांचे या संबंधीचे प्रत्यक्ष अनुभव इतरत्र वाचावयास मिळतील.

॥ ॐ ॥

*केल्याने देशाटन, शहाणपण वाढते.*
*तर केल्याने भाषांतर ज्ञानवृद्धी होते. अनुभवसंपन्नता वाढते.*

# १६
# परमोत्कर्ष

६ जुलै १९८२, आषाढ महिना, गुरुपौर्णिमेला अगदी सकाळी वर्धा येथील काही लोकांनी पू. गुरुजींकडून दीक्षामंत्र घेतला. या दिवशी विशेष आयोजन केले होते. श्री सद्गुरूंच्या पूजेच्या निमित्ताने दूरदूरहून अनेक स्त्री-पुरुष, मुले-मुली एकत्र आले होते. श्री. पू. गुरुजी, श्री बाबा तकवाले यांच्याबरोबर सभामंडपात आले. सर्व उपस्थितांनी मोठ्या उत्साहाने आणि श्रद्धेने पू. गुरुजींच्या चरणाला स्पर्श केला आणि आपापल्या जागेवर स्थानापन्न झाले. गुरुपूजनाचा सोहळा तीन तास अखंड चालला होता.

वरील उल्लेख एका विशिष्ट कारणाने केला आहे. या वातावणाचा परिणाम झाल्यामुळे पू. गुरुजींच्या संपूर्ण शरीरात एका विशेष शक्तीचा संचार झाला. यामुळे त्यांचे शरीर जड होऊ लागले. पूजनाचा सोहळा झाल्यावर श्री गुरुजी मोठ्या कष्टाने भोजनाची व्यवस्था जिथे होती, त्याठिकाणी पोचले. अशा स्थितीतही भोजनाचा कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. नंतर पू. गुरुजींनी सगळ्यांचा निरोप घेतला आणि ते ॲड. तकवले यांचे घरी गेले.

दुसऱ्या दिवशी-७ जुलै १९८२ रोजी पू. गुरुजी शरीराच्या त्याच जड अवस्थेत होते ! ते अशोक धर्माधिकारी यांच्याबरोबर अमरावतीस गेले. इथे सुद्धा शरीरात हा जो शक्तिसंचार झाला होता, त्यामुळे त्यांची स्थिती सामान्य अशी नव्हती !

८ जुलै. सकाळी सात-आठचे सुमारास पू. गुरुजी आणि श्री. अशोक

धर्माधिकारी बोलत बसले होते. गुरुपूजनाच्या कार्यक्रमासंबंधीची चर्चा करीत होते. अकस्मात् पू. गुरुजींना संपूर्ण शरीर शिथिल होऊन संज्ञाहीन अनुभव येऊ लागला. त्यांच्या डोक्यात सहज विचार आला, कदाचित हा पक्षाघात तर नसेल? त्यांनी आपले हात-पाय हालवण्याचा प्रयत्न केला. तसे करणे त्यांना जमले. यामुळे असे कळून आले, हा काही पक्षाघात नसून दुसरे काही असावे! गुरुजींना ही आपली स्थिती श्री. अशोक धर्माधिकारी यांना स्पष्ट सांगावी असे वाटले. त्यामुळे त्यांना उगीचच काळजी वाटू नये. परंतु त्यांच्या तोंडातून एकही शब्द न येता फक्त ध्वनीच उमटला ! नंतर लगेच शरीरातील सगळी शक्ती एकवटून त्यांच्या मस्तकात प्रवेश करून तेथे स्थिर झाली. पू. गुरुजींची ही स्थिती पाहून जवळच बसलेले श्री. धर्माधिकारी आश्चर्यचकित झाले. ते अवाक् होऊन त्यांच्याकडे पाहू लागले. सुमारे दहा मिनिटे झाल्यावर गुरुजींची स्थिती हळूहळू सामान्य होऊ लागली. तेव्हा श्री. अशोक धर्माधिकारी म्हणाले, 'गुरुजी! आपण इथे नव्हता. कारण आपले डोके लटकले होते हे पाहून मी विचार करू लागलो.' यानंतर पू. गुरुजी आपला दिनक्रम नेहेमीसारखा करू लागले. दुसरा दिवसही तसाच नेहेमीसारखा गेला; पण पू. गुरुजी आपल्या शरीराची अवस्था हलकी असताना एका विचित्र आनंदसागरात बुडाले होते.

दि. १० जुलै रोजी सकाळी पू. गुरुजी आपल्या आसनावर बसले होते. अचानक त्यांना जाणवू लागले, की दिव्याच्या ज्योती फडफड करीत आहेत. पाहता पाहता ह्या दिव्याच्या ज्योतींनी एका स्थिर ज्योतीचे रूप घेतले. ही सुवर्णमय ज्योत पू. गुरुजींच्या चारी बाजूला अशा प्रकारे फिरत होती, की त्यांना आपल्या अस्तित्वाची जाणीव होत नव्हती. ते ह्या दिव्य ज्योतीच्या सौंदर्याच्या आकर्षणात मग्न झाले होते. सुमारे तीन मिनिटे ही स्थिती होती. नंतर हळूहळू ही ज्योत लुप्त होत गेली. सामान्य स्थितीत आल्यावरसुद्धा दीड-दोन मिनिटांपर्यंत त्यांच्या दृष्टीला काहीच दिसत नव्हते. असे वाटू लागले, की डोळ्याची नजर गेली आहे काय? परंतु काही वेळानंतर त्यांना हळूहळू दिसू लागले. त्यांना हा अनुभव थोड्या थोड्या वेळाने पुन: पुन्हा येत होता.

दि. १३ जुलै रोजी अमरावतीहून निरोप घेऊन पू. गुरुजी वर्ध्याला आले. वर्ध्याहून मेरठला जाताना सुद्धा त्यांच्या मस्तकात अद्‌भुत शक्तीचा संचार होत होता. हरिद्वार स्टेशनवर पोचल्यावर ते पुन्हा त्या दिव्य ज्योतीच्या

(प्रकाशात) जी त्यांच्या चहूबाजूला पसरली होती, त्यात पुन्हा गढून गेले आणि डोळ्याला काही दिसणे बंद झाले ! त्यांच्याबरोबर आलेले श्री. प्रभाकर पांडे आणि ॲड. तकवाले त्यावेळी फार अचंबित झाले. त्यावेळी त्यांनी चहाचा पेला त्यांच्यासमोर धरला होता; पण गुरुजी त्यावेळी तो पेला पाहू शकले नाहीत. ते दोघेही पू. गुरुजी लवकरच सामान्य स्थितीत येतील, याची वाट पहात होते. थोड्या वेळाने पू. गुरुजींची शारीरिक स्थिती सामान्य-नेहेमीच्यासारखी झाली. परंतु दृष्टी मात्र पूर्ववत होण्यास थोडा वेळ लागला.

आपला प्रवास पूर्ण करून ते पुन्हा तीन ऑगस्टला वर्ध्याला परत आले. दिवस आनंदात जात होते. कृष्णजन्माष्टमीचा दिवस होता. नेहेमीच्या उत्साहात हा उत्सव साजरा होत होता. वातावरणातील संगीत धुंद करीत होते. संगीताच्या ध्वनिलहरींच्या कंपनाने पू. गुरुजी प्रभावित होत होते. पुन्हा त्यांच्या शरीरातील शक्ती एकवटून त्यांच्या मस्तकात शिरली ! परंतु त्यांना मूर्च्छा आली नाही. भोवतालचे त्यांना समजत होते. मस्तकाचे आणि शरीराचे संतुलन बिघडत होते. त्यामुळे शरीर त्यांच्या नियंत्रणात रहात नव्हते. सुमारे एक आठवडा ही स्थिती राहिली. त्यांना जेवणाची सुद्धा वासना होत नव्हती. तसेच झोपही येत नव्हती. बोलावेसे वाटत होते, पण ते बोलू शकत नव्हते ! हळूहळू शरीराचे संतुलन पूर्ववत होत होते. परंतु चालताना त्यांचा तोल जात होता.

गणेशोत्सवाचे दिवस होते. वातावरणात संगीताचा प्रभाव सर्वत्र होता. गुरुजींना त्यापासून दूर ठेवावे म्हणून ॲड तकवाले यांनी २२ ऑगस्ट रोजी त्यांना श्री. कुटेमाटे यांच्याबरोबर रायपूर येथे डॉ. पंधेर यांचेकडे पोचते केले. पू. गुरुजी इथे तीन-चार दिवस होते. अशा स्थितीत डॉ. गिरीश यांनी मुंगेलीला डॉ. सुधा पांडे यांच्याकडे त्यांना पोचते केले. एक दिवस इथे (मुंगेली) साधना या विषयावर चर्चा होत असताना गुरुजींना पुन्हा वरील अनुभूती होऊ लागली. त्यामुळे त्यांचे शरीर जड झाले आणि ते कदाचित् पडतील असे वाटले. त्यामुळे चर्चा मध्येच थांबवून त्यांना परत जावे लागले. पायाला एक-दोन झटके आले. लगेच मस्तकाचे व शरीराचे संतुलनाचे भान राहिले नाही. पू. गुरुजी पूर्णपणे दिव्य ज्योतीच्या प्रकाशात सापडले ! डॉ. सुधा आणि डॉ. भानु गुप्ता पू. गुरुजींच्या पायाचे तळवे सुमारे वीस मिनिटे चोळत राहिले. याचा परिणाम होऊन ते पुन्हा हळूहळू पूर्वस्थितीत (सामान्य) आले. मुंगेलीहून बिलासपूर,

शहडोल करीत ते रिवा येथे आले. इथे त्यांनी डॉ. शिदे यांच्या परिवाराला अनुग्रह दिला. परंतु इथे सुद्धा त्यांना त्या आनंदाच्या भरात पूर्ण सामान्य स्थिती प्राप्त करण्यास सुमारे दोन महिने लागले. ते आता नियमाने नेहेमीच्या स्वाभाविक स्थितीत खाणे-पिणे, नित्याची झोप घेऊ लागले.

## परमोत्कर्ष

आता आपण ह्या चरित्रकथेच्या शेवटाकडे येत आहोत. संत श्री वासुदेव रामेश्वर तिवारी यांच्या आध्यात्मिक साधनेचा प्रवास त्यांच्या जॉर्ज टाऊन, साऊथ अमेरिका ते रायपूर (म. प्र.) पर्यंत पाहिला. ते ७२ वर्षांचे झाले. अजूनही त्यांची तब्येत चांगली आहे. त्यांची उंची मध्यम, दिसायला गौरवर्णीय. अधूनमधून त्यांना संधिवाताचा त्रास होतो. आता दिसायलाही कमी लागले आहे. ह्या बाबी सोडल्या, तर ते एखाद्या तंतुवाद्यासारखे सुसंवादी आहेत. आध्यात्मिक मार्गदर्शनाकरिता जे त्यांच्याकडे येतात, त्यांना ते मार्गदर्शन करतात. ते वारंवार ठिकठिकाणी जातात. शिष्यांना मदत करतात. तशी त्यांच्याकडून मदत घेणाऱ्यांची संख्या हळूहळू पण निश्चितपणे वाढत आहे.

पू. गुरुजी हे चमत्कारिक बाबा नाहीत. (चमत्कारिक गोष्टी करून दाखविणारे) किंवा सुगंधी वस्तू, घड्याळे हवेतून काढून देऊन साधकांची करमणूक करणारे नाहीत. त्यांच्या मते सगळ्यात मोठा चमत्कार कोणता, तर स्वत:ची ओळख (आत्मानुभूति) करून घेणे होय. एवढीच बाब चमत्कार म्हणून मानता येईल. त्याची अपेक्षा करणे उचित, योग्य आणि त्याकरिता कष्ट घेणे आवश्यक. तथाकथित सत्पुरुषांनी केलेले चमत्कार हे काही वेळा हातचलाखीचा भाग असतो. काही वेळा सिद्धीचेही फळ असते. असे फळ हे साधना करीत असताना इच्छुकाला मिळते; पण त्यात वेळ घालवण्यात अर्थ नसतो. ह्या सिद्धी वस्तुत: अडथळे किंवा प्रलोभाने मुद्दाम इच्छुकांच्या मार्गात परमेश्वराने उत्पन्न केलेल्या असतात, जेणेकरून त्यांचे लक्ष विचलित होईल, तसेच इच्छुकांचे खरेपण प्रगट होईल. ते भ्रम निर्माण करतात. खऱ्या अर्थाने ही प्राप्ती नाही. ते बीज नाही; पण वाळलेली पाने आणि फांद्या आहेत. ह्या सिद्धी इच्छुकाला त्याच्या आध्यात्मिक वाटचालीकडे नेण्यास असमर्थ तर आहेतच, पण त्या वाटचालीत दुष्टपणे अडथळा आणून त्याने केलेल्या प्रगतीसच खो घालणारे किंवा खाली आणणारे ठरतात. म्हणून ह्या सिद्धी कटाक्षाने टाळल्या

पाहिजेत, जसा आपण त्रासदायक प्लेगसारखा रोग टाळतो तसा. ह्या इच्छुकांच्या दृष्टीने निरुपयोगी तर आहेतच; पण त्या सरळसरळ धोकादायक आहेत, म्हणून त्यांच्यापासून सर्वार्थाने दूर राहणे हे योग्यच. एकदा का परमेश्वराची खात्री झाली, की हा इछूक चाळवला जात नाही (मोहवश होत नाही) तिकडे पाठ फिरवतो, आपल्या सत्याच्या शोधार्थ, अंतिम सत्याकरिता, तेव्हाच गुप्तपणे ठेवलेले रहस्य प्रगट होईल. परमेश्वराचे राज्य मोकळे होईल.

पू. गुरुजींचे दोन आश्रम आहेत. ते कोणत्याही एका ठिकाणी फार दिवस राहत नाहीत. एखादा स्वत:चा विशिष्ट संप्रदाय उभा करून इतर सत्पुरुष करतात, तसा मार्ग यावर त्यांचा विश्वास नाही. त्यांच्या शिष्यमंडळीत मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, शीख आहेत. त्यांना ते मार्गदर्शन, त्यांच्या त्यांच्या धर्मातील शिकवणुकीनुसार करतात. त्यांचा कोणताही विशिष्ट विचाराचा किंवा तत्त्वज्ञान सांगणारा संप्रदाय नाही की त्यामध्ये त्यांनी स्वत:ची विचारसरणी स्वतंत्रपणे मांडली आहे. त्यांचे सारे तत्त्वज्ञान हे जगातील प्रस्थापित पवित्र धर्मातून वेद, वेदांत, उपनिषद, श्रीमद्भागवत, पवित्र बायबल, कुराण यातून आले आहे. त्यांच्या मते सगळे धर्म एकच सत्य शिकवतात, ते म्हणजे परमेश्वर माणसाला निर्माण करतो. त्या मानवाने पृथ्वीवरील जीवनात त्या परमेश्वराला जाणून घेऊन त्याच्या उपासनेतूनच त्याच्यापर्यंत पोचण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते आत्मानुभूतीतून (स्वत:चा शोध घेऊन) शक्य आहे. हिंदुस्थानातील ऋषिमुनींनी ते शिकवले आहे. किंवा परित्याग हे ख्रिश्चन धर्माने सांगितले आहे. दोन्ही पद्धती एकच गोष्ट शिकवतात आणि एकाच अंतिम सत्याकडे नेतात.

गुरुजींना प्रसिद्धी आवडत नाही. तसेच लवाजमा असलेल्या घोळक्यात वावरायला किंवा प्रसिद्ध अशा वृत्तपत्रात, मासिकात झळकून येण्याची त्यांना गरज वाटत नाही. त्यांच्याजवळ देण्यास, मुबलक, आकर्षक आणि सहजतेने विकल्या जाणाऱ्या गोष्टी नाहीत. एखाद्या गिऱ्हाईकाचा शोध घ्यावा तसे ते आपल्या शिष्याच्या शोधार्थ फिरत नाहीत. जे जाहीरपणे व्याख्यानास किंवा प्रवचनास जात नाहीत, ज्यांनी परमेश्वराचे वैभव पाहिले आहे, त्यांना डोळ्यांना दिसते; पण तोंडाने त्याचे वर्णन - वैभवाचा प्रभाव आणि परमेश्वराचे मोठेपण - त्यांच्या दृष्टीने जे आत्मसात केले ते वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात, त्यांचे सामर्थ्य तोकडे पडते, म्हणून ते शांत अन् मौन स्वीकारतात. गुरुजींनी

हे सामर्थ्य फार पूर्वी मिळवले. ज्याकरिता ते जन्माला आले, परब्रह्माचे संदर्भात स्वत:ची ओळख करून घेतली, त्याच्या प्राप्तीतच ते समाधानी आणि तृप्त झाले आहेत. ते स्वत:ला अवर्णनीय प्रकाशाच्या समुद्रात बुडवून घेतात. तिथे आनंद, समाधान, पूर्ण तृप्ती, निरिच्छ भाषा काहीही नको असे समाधान प्राप्त होते. अर्थात इतर मनुष्यप्राण्यांप्रमाणे त्यांना शारीरिक गरजा आहेत; पण त्याकरिता ते कोणाकडेही मागणी करीत नाहीत. शिष्याकडून अशा गोष्टी मुबलक पुरवल्या जातात. हेही लक्षात घेतले पाहिजे की ते अधिकृत फिजिशियन, होमिओपॅथिक प्रॅक्टिस आणि आयुर्वेदिक पद्धतीची औषधे देणारे, तसेच उत्तम ज्योतिषी आहेत. या ज्ञानावर ते त्यांची उपजीविका करू शकतात.

गुरुजींना हा उर्वरित काळ इच्छुकांना मदत करण्यात, मार्गदर्शन करण्यात घालवावयाचा आहे. कारण, जे अंधारात चाचपडत आहेत, त्यांना मार्गदर्शनाची, मदतीजी गरज आहे, त्यांच्याजवळ भौतिक साधन-संपत्ती देण्यास नाही किंवा सट्टा खेळण्याकरिता ते आकडेही देत नाहीत. जर एखाद्याला तसा अनुभव येत असेल तर ती वेगली बाब म्हणता येईल. आध्यात्मिक साधना चालू असताना काहींना तसा अनुभव आला आहे. गुरुजींनी वारंवार पुन: पुन्हा सांगितले आहे, ज्याकरिता ते प्रयत्नशील असतात, ज्यावेळी या जगाचा निरोप घेण्याची त्यांना वेळ येईल, त्यावेळी एक मुक्त जीव त्यांच्यात कोणत्याही चांगल्या-वाईट गोष्टींचा, गुण-दुर्गुणांचा संस्कार किंवा वृत्ती राहणार नाही, की ज्यामुळे त्यांना या जगात पुन्हा जन्म-पुनर्जन्म घ्यावा लागेल! हे जग खऱ्या अर्थाने अश्रूंनी भरलेले आहे. मग ते टाळावे. परत येणे आणि पुन्हा दु:खपूर्ण, कष्टमय जीवन जगावे? म्हणून त्यांना गुरुजींना आपल्या इतक्या वर्षांच्या तपस्येचे फलित द्यावेसे वाटते. म्हणजे ते मुक्त मनाने जाऊ शकतील. म्हणून त्याला आध्यात्मिक उद्बोधन हवे, त्याचे ते स्वागत करतात.

गुरुजींची शिकवण किंवा तत्त्वज्ञान वेळोवेळी त्यांनी शिष्यमंडळींना जे सांगितले, ते ह्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात दिले आहे. जर मला त्यांच्या शिकवणुकीचे सार एका वाक्यात सांगावयाचे झाले, तर मी पवित्र ग्रंथातील एक वाक्य उद्धृत करीन ''तू थांब, तू स्वत:ची ओळख करून घे!'' हे एकच वाक्य सर्व प्रेषितांनी, संतांनी, महंतांनी, अवतारी पुरुषांनी शिकवले आहे. शेकडो ग्रंथ लिहिले आहेत. सर्वत्र संचार करून आजपर्यंत प्रवचने दिली आहेत. ह्या

वाक्यात प्रसंगाने, बायबलमधील सूत्र हाती येते. परमेश्वराच्या कृपेने वरदान लाभते. हे वाक्य तसे अगदी साधे वाटेल; पण स्वत: ते समजून घेणे, त्याकरिता दीर्घ उपासना, खडतर तपस्या, सर्वशक्तीनिशी करणे म्हणजे त्याकरिता त्याग करणे आलेच - म्हणजे स्वत:ला त्याग करावा लागतो.

त्याचबरोबर परमेश्वराची कृपा असावी लागते, तशीच सद्गुरूंचीही. ज्यांना सद्गुरु लाभला, ज्यांनी खडतर मार्गावरून ज्याण्याकरिता मार्गदर्शन केले, मार्ग खडतर-अरुंद तरीपण अंतिम सुखाकडे जाताना प्रवेश मात्र सरळ होतो. कारण अशांवर परमेश्वराच्या कृपेचा आणि आशीर्वादाचा वर्षाव होत असतो. त्यांना स्वर्गस्थ सुखाचा अक्षय आनंद ह्या जगात राहून मिळतो.

असा अक्षय सुखाचा आनंद मिळवून प. पू. श्री गुरुजी मुंगेली (बिलासपूर, म. प्र.) येथे शनिवार दि. १४ मार्च १९९८ रोजी पहाटे ब्रह्मलीन झाले ! ते ९० वर्षांचे होते. मुंगेलीपासून दोन कि. मी. दूर शिवपुरी येथे नियोजित स्थळी, रविवार दि. १५ रोजी दुपारी हजारो लोकांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आला. याप्रसंगी स्थानिक भक्तगण लोकांव्यतिरिक्त मुंबई, पुणे, नागपूर, वर्धा, अमरावती, ग्वाल्हेर, भोपाळ, रायपूर, बिलासपूर इ. ठिकाणांहून आलेले त्यांचे शेकडो अनुग्रहित शिष्य उपस्थित होते. या स्थानावर त्यांचे साजेसे समाधी-स्मारक बांधण्याचा संकल्प याप्रसंगी करण्यात आला.

त्यांचे निर्वाण होण्याअगोदर एक-दोन दिवसांपूर्वी त्यांनी सर्व भक्तगणांना प्रसाद-जेवण देण्याचा मनोदय व्यक्त केला होता. लगेच उपस्थित शिष्यमंडळींनी तशी व्यवस्था करून सर्वांना संतुष्ट केले !

प. पू. श्री गुरुजींचा जन्म दि. २३ जुलै १९०८ रोजी अमेरिकेत-ब्रिटिश गियानामधील जॉर्ज टाऊन येथे, तिवारी या हिंदू ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव वासुदेव. सिद्ध योगाची आध्यात्मिक देणगी त्यांना जन्मत: लाभली होती. त्यांना पुढील प्रगतीसाठी वयाच्या ११ व्या वर्षी वडिलांना भारतात आणावे लागले. साधनेच्या काळात भारतातील निरनिराळ्या ठिकाणी अनेक देवतांचे व प्राचीन संतांचे त्यांना दर्शन झाले. गृहस्थाश्रमात देखील त्यांच्या प्रगतीचा वेग मंदावला नाही. संस्कृत, संगीत, ज्योतिष, आयुर्वेद, होमिओपॅथी इ. अनेक विषयांत ते निष्णात होते. कोणत्याही शिक्षणसंस्थेत जाऊन त्यांना

औपचारिक शिक्षण मिळाले नव्हते.

संगीत व होमिओपॅथी यांच्या साह्याने बराच काळ त्यांनी आपल्या कुटुंबाचा निर्वाह केला. होमिओपॅथीचे कुशल चिकित्सक म्हणून १९४० ते १९६० या काळात विदर्भातील तेल्हारा येथे त्यांचे वास्तव्य होते. त्यानंतर मात्र ते मुंगेली येथे स्थाईक झाले होते. प. पू. श्री गुरुजींना स्वयंभूपणे लाभलेले सिद्धयोगाचे गुरुपद हे धर्म-पंथ-संप्रदाय-निरपेक्ष होते. त्यामुळ हिंदू, मुसलमान, खिश्चन, शिख, बौद्ध इ. सर्व धर्म-पंथांचे स्त्री-पुरुष त्यांचे अनुग्रहित आहेत. गुरुजींकडून त्या त्या लोकांना त्यांच्या त्यांच्या धर्म-पंथानुसार साधना मिळून त्यांची आध्यात्मिक प्रगती होत असे, हे विशेष.

त्यांचा जीवनवृत्तांत आणि कार्य यांची नोंद मोठ्या आत्मीयतेने प्रा. ए. के. कुरियन या खिश्चन शिष्याने लिहिलेल्या 'ए डिप इन टू डिव्हाइन कॉन्फ्ल्युएन्स' या इंग्रजी चरित्रात घेतलेली आढळून येते. त्यांच्या लोकोत्तरत्वाची साक्ष सहज पटते. या चरित्राचा 'दिव्याम्बु-निमज्जन' या नावाने हिंदी अनुवाद डॉ. आशा श्रीवास्तव यांनी प्रसिद्ध केला आहे. या दोन्ही चरित्राच्या आधारे प. पू. श्री गुरुजींच्या आज्ञेने मराठी अनुवाद मुंगेलीचे (बिलासपूर, म. प्र.) 'प. पू. वासुदेव रामेश्वर तिवारी गुरुजी-साधना आणि दिव्य अनुभूति' या नावाने श्री. द. य. पतकी, पुणे, हे २८ जुलै १९९९ रोजी गुरुपौर्णिमेला प्रसिद्ध करीत आहोत. सांगावयास आनंद वाटतो की संस्कृतमध्येही या चरित्राचा अनुवाद झालेला आहे.

प. पू. श्री गुरुजी आपल्या दूरदूरच्या शिष्यांसाठी वर्षातून किमान एकदा अनेक शहरांना भेटी देत. त्यामुळे सर्वत्र असलेल्या शेकडो साधकांची सतत प्रगती होत असे. दरवर्षी नवीन ठिकाणी आयोजित होणाऱ्या या महोत्सवाला त्यांचे हजारो अनुग्रहित आवर्जून उपस्थित राहात असत. अविश्रांत परिश्रम आणि वाढते वयोमान यामुळे काही वर्षांपासून त्यांच्या शरीरात अनेक असाध्य व्याधींनी घर केले होते. गेली दोन वर्षे मुंगेलीला आपल्या 'वासुदेव योगाश्रम' या निवासस्थानी ते रुग्णशय्येवर होते. तरी पण अखेरच्या क्षणापर्यंत त्यांची वाणी आणि आध्यात्मिक तेज यत्किंचितही क्षीण झाले नव्हते. फाल्गुन वद्य प्रतिपदेच्या पहाटे, अखेरीस 'ॐ'काराचा तीनदा उच्चार करूनच हा महायोगी स्व-स्वरूपात विलीन झाला.

॥ ॐ ॥

# ॐ दर्शन (तात्त्विक विचार)

ह्या सृष्टीत मनुष्य हा असा एकच प्राणी आहे, की ज्याला सृष्टीचा बोध घेता येतो. इतर प्राणी हे पूर्व सुकृत भोगण्यासाठीच केवळ जन्माला आलेले असतात. माणसाच्या बुद्धीचा जसा विकास होत गेला, तसा तो "मी कोण?" याचा विचार करू लागला. "कम्ल्व", "को हम्"चा पुकार प्राचीन काळापासून मनुष्य करत आला आहे. या "मी"चा शोधच सर्व दर्शनांच्या मुळाशी आहे. भिन्न भिन्न आचार्यांनी आपआपल्या मतानुसार, आपल्या अनुभवाच्या आधारावर आपआपले सिद्धांत जगासमोर ठेवले. ते सिद्धांत म्हणजेच अंतिम सत्य आहे, असे मानणारे अनुयायी आजही आहेत. हे सर्व सिद्धांत म्हणजे त्या त्या आचार्यांच्या मते "मी कोण?" ह्या प्रश्नाची उत्तरेच होती. वेदांत हे "को हम्" चे उत्तर आहे आणि ते सनातन आहे. सनातन म्हणजे जे सदैव नूतन असते ते. कोणताही शास्त्रीय विचार हा वेदांतविरोधी असू शकत नाही किंवा दुसऱ्या अर्थाने असे म्हणता येईल, की वेदांत इतका विशाल आहे, की वेदांतर्गत जो जो नवीन विचार निर्माण होतो, तोच शास्त्रीय विचार म्हणून मान्यता पावतो.

वेद म्हणजे ज्ञान. ज्ञानाची मर्यादा काय? तर जे जाणण्याला योग्य आहे ते जाणण्यापर्यंत ज्ञानाची मर्यादा. ही मर्यादा जेथे संपते तेथे "वेदांत" असतो. त्या ठिकाणी जाणण्यायोग्य असं काहीही शिल्लक राहात नाही. किंवा असं म्हणता येईल, की जे जाणले असता आणखी जाणण्यायोग्य असं दुसरं काही शिल्लक राहत नाही, ते म्हणेज "वेदांत". त्याचेच वर्णन गीतेत खालीलप्रमाणे

केले आहे -

**कवि पुराणमनु शासितारम् अणुरणीयां समनु स्मरेद्यः ।**
**सर्वस्य धातारमचिंत्यरुपमादिव्य वर्णं तमसः परस्तात ॥**

(गीता-अ. ८-९)

संपूर्ण जगाला (जग म्हणजे निर्मिती = ज, लय = ग) मृत्यू धारणा करणारे 'ब्रह्म' Super Cosmic Brahma हा वेदांचा प्रतिपाद्य विषय आहे. ब्रह्म स्वसंवेद्य आत्मरूप आहे व ते साध्य करून घेण्यासाठी साधक जन्मोजन्मी साधना करीत असतात. हेच सर्वांचे ''गन्तव्य'' आहे. हेच सृष्टीचे मूळ आहे. हेच शुद्ध अस्तित्व म्हणजे To Be आहे. ह्यामध्ये इच्छा - स्फुरण निर्माण झाले म्हणजे जीव अस्तित्वात येतो. हीच 'मूळ प्रकृति', 'परा प्रकृति', 'मूळ माया' पिंडांत तुर्यावस्थेत असते. या अवस्थेत साधकाला प्रकृति व पुरुष यांचे ज्ञान होते. या अवस्थेचे 'अर्धनारी नटेश्वर' हे प्रतीक किंवा देवता आहे.

या सर्व गोष्टींचा साधकांना अनुभव येत राहतो. तत्त्वज्ञान म्हणजे ब्रह्मस्वरूपाचे-आत्मस्वरूपाचे ज्ञान. 'तत्' हा त्या अविनाशी परब्रह्माचा वाचक शब्द आहे. 'तत्' याचे ज्ञान म्हणजे 'तत्त्वज्ञान'. म्हणून तत्त्वज्ञान हा वादविवादाचा किंवा तर्काचा विषय बनू शकत नाही. तत्त्वज्ञान म्हणजे जीवनधारणा असून, प्रत्यक्ष अनुभूति आहे.

ज्याला स्वत:ला जाणण्याची इच्छा होते, तो मोठा भाग्यशाली म्हटला पाहिजे. मनुष्य जितके व्यवहार करतो, त्यापैकी किती त्याच्या स्वत:साठी असतात व किती दुसऱ्यांसाठी असतात? त्यातही स्वत:च स्वत:ला समजून घेण्यासाठी स्वत:च्याच उद्धारासाठी किती असतात? शांत चित्ताने याचा विचार केला असता असे दिसून येईल, की माणसाच्या दैनंदिन व्यवहारात ''स्वत:साठी'' असं काही नसतंच. जवळजवळ सर्वच व्यवहार दुसऱ्यासाठीच असतात आणि याचा आपल्या मनात कधी विचारदेखील येत नाही. गंमतीचा भाग असा, की या दुसऱ्यांसाठी असणाऱ्या व्यवहारात स्वत:च तो केंद्रस्थानी असतो आणि ह्याचे कर्तृत्व तो स्वत:कडेच घेतो. हे सर्व व्यवहार 'मी' व 'माझे' याने भारलेले असतात. हीच आसक्ती होय आणि तीच सर्व दु:खाचे मूळ आहे. आपण स्वत: काही करण्यावर आणि न करण्यावर सृष्टीतील घडामोडी अवलंबून असत नाहीत. घटना तर घडत असतातच आणि त्याचा परिणाम म्हणून स्वत:ला सुख

किंवा दु:ख होते. ज्या परिणामांमुळे काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर इ. षड्रिपू तृप्त होतात, त्याला "सुख" म्हणतात व जे परिणाम याच्या विरुद्ध असतात, त्याला "दु:ख" म्हणतात. जर दु:ख नष्ट करावयाचे असेल तर दोनच मार्ग दिसतात. एक, ज्या घटना दु:खदायी असतात, त्या घटना घडूच न देणं किंवा आपल्या मनावर ज्यांचा परिणाम होतो, ते मन परिणाम-शून्यवत् स्थितीत ठेवणे. कालचक्राला थांबविणे किंवा अप्रिय घटना घडूच न देणे या गोष्टी मानवाच्या हातात नाहीत. मग आपले ग्रहणकेंद्र कार्यक्षम ठेवणे हीच गोष्ट शिल्लक राहिली. या ग्रहणकेंद्रालाच दर्शनशास्त्रात अंत:करण असे म्हणतात. मन, बुद्धी, चित्त व अहंकार या चारही बाबी अंत:करणात येतात. या चार वृत्तींना संतुलित ठेवणे हे योगाभ्यासाद्वारेच शक्य आहे, असे सर्व ऋषिमुनी सांगतात आणि अनेक साधकांचाही तोच अनुभव आहे.

"योग" या शब्दाने अनेक भ्रममूलक कल्पना मनात येतात, असा सर्वसामान्य अनुभव आहे. आज योगाचा जेवढा प्रचार झालेला दिसतो, तेवढा इतिहासकाळात कधी झालेला आढळतो? ज्यास ऋषिमुनींनी "अनेक जन्म संसिद्धि" म्हणून संबोधले, काही महिने योग्य प्रशिक्षणानंतर हे साध्य होऊ शकते. भिन्न भिन्न शारीरिक आसनांच्या व्यायामपद्धतीलाही "योग" म्हणून संबोधले जाते. योगाचा प्रचार करताना व्याधी निवारणापासून विशिष्ट मानसिक स्थिती प्राप्त करण्यापर्यंतच्या अवस्थांचा विचार केला जातो. कधी कधी योगांमुळे अतींद्रिय, अतिमानवी, अद्भुत शक्ती प्राप्त करण्याचे साधन म्हणूनही योगाचा विचार व प्रचार केला जातो. हवेत उडणे, पाण्यावर चालणे, दुसऱ्याच्या मनातले जाणणे, जेव्हा इच्छा होईल तेव्हा सोने किंवा पैसे निर्माण करणे, केवळ स्पर्शाने रुग्णांचे आजार बरे करणे अशा बऱ्याच आश्चर्यकारक गोष्टींचे प्रदर्शन केले जाते. वास्तविक अशा अनाकलनीय गोष्टींशी साधकाचा काय संबंध? अशा गोष्टी प्राप्त होण्यासाठी साधना केली जाते काय? साधकाचे ध्येय काय असते? चमत्कारिक किंवा अतींद्रिय शक्ती प्राप्त होण्यासाठी जे कोणी योगाभ्यास करण्याची इच्छा करीत असतील, त्यांनी हजार वेळा विचार केला पाहिजे. योगाभ्यासात ज्या "हेय" म्हणून मानल्या गेलेल्या गोष्टी आहेत, त्याच "साध्य" म्हणून मानणारे जे कोणी असतील त्यांच्याबाबत अधिक न बोललेले बरे.

जो खऱ्या अर्थाने "मुक्त" होऊ इच्छितो, संसारातून सुटण्याची इच्छा

करतो, स्वत:ला जाणण्याची इच्छा बाळगून असतो, त्याच्यासाठी योगमार्ग आहे. चमत्कारांचे प्रदर्शन करण्यासाठी, सिद्धींच्या मागे लागण्यासाठी नाही.

मानवी देह म्हणजे एक स्वयंपूर्ण प्रयोगशाळा आहे. या विराट सृष्टीची प्रतिकृती आहे. जे विराट सृष्टीत आहे ते सर्व मानवी देहात आहे. म्हणून घरात बसूनही ह्या देहरूपी प्रयोगशाळेत प्रयोग सुरू करता येतात.

योगाभ्यासाचा संबंध अंत:करणाशी असल्याने साधकाची वेषभूषा किंवा आश्रम याला काहीही महत्त्व नाही. नुसते ''काषाय'' वस्त्र पांघरून अंत:करणातील ''काषाय'' वृत्ती बाहेर निघेल याची काय शाश्वती? मी तर असे म्हणेन, की योगाभ्यास हा सांसारिक धर्मास अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय गृहस्थधर्म अपूर्ण राहील. चारही आश्रमात गृहस्थाश्रम श्रेष्ठ आहे. समाजाचा तो कणा आहे. खऱ्या अर्थाने माणसाचे ते परीक्षाकेंद्र आहे. त्यात राहून व आपल्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडून आत्मोन्नतीच्या मार्गाने प्रवास करणे आणि या जगात स्वत:ला कार्यरत ठेवणे जरुरीचे आहे. तत्त्वज्ञान हा नुसता ग्रंथाचा विषय नाही, तर तो जीवनधर्म आहे किंवा तत्त्वज्ञान म्हणजे जीवनच होय. ते नुसते वाचण्यासाठी नाही तर त्याप्रमाणे जगण्यासाठी आहे. तत्त्वज्ञानाच्या मार्गावर चालता चालता साधकाला अशी अवस्था प्राप्त होते, की प्रत्यक्ष जीवनव्यवहारात जे सोडावयास पाहिजे, ज्याचा त्याग करावयास पाहिजे, ते टाकले जाते व जे मिळवावयास पाहिजे ते प्राप्त होते. साधक स्वत:हून काहीच करत नाही. त्याचे ''कर्तृत्व'' जणू नष्ट होते. तो केवळ निमित्तमात्र होतो. कार्य झाले काय किंवा न झाले काय, त्याचा कसलाच संबंध त्याच्यापाशी जोडला जात नाही. ह्यालाच आपले ग्रहणकेंद्र किंवा अंत:करण सुस्थितीत ठेवणे, असे म्हणतात.

अनेकांच्या मनात योगाविषयी काही चमत्कारिक कल्पना असतात. ते योग म्हणजे हठयोग असे मानतात. ते असेही म्हणतात, की योगामुळे भक्ती सरळपणे, सुलभपणे करता येते. योग आणि भक्ती यांना भिन्न समजणे योग्य नाही. पण साधकांना मात्र विरुद्ध अनुभव येतात, भक्ती भावनाप्रधान असते. जे साधक सगुणोपासना करतात, ते आपल्या उपास्यदैवताची भक्तीच करीत असतात. भक्ती म्हणजे सेवा. जोपर्यंत उपासक आणि उपास्य दैवत भिन्न आहेत, त्यांच्यात द्वैत आहे, तोपर्यंत भक्ती आहे. वास्तविक यास विभक्ती म्हणणेच योग्य होईल. कारण भक्त हा स्वत:ला उपास्य दैवतापासून भिन्न

समजत असतो. जेव्हा भक्त असे जाणतो, की मी ज्याची भक्ती करतो, तो मीच आहे, दुसरा कोणी नाही, तेव्हाच तो खरा म्हणजे भक्त होतो. तोपर्यंत तो ''विभक्त''च राहतो.

योगाचा अर्थ मीलन किंवा जोडणे असाही होतो. हे जोडले जाणे कुणाशी? मीलन कुणाशी होणे? तर हे मीलन आपले आपल्याशींच होणे म्हणजे योग. आज आपला स्वत:चा स्वत:पासूनच वियोग झाला आहे. आम्ही फक्त विचारांचे दास झालो आहोत. आपल्यावर विचारांचेच नियंत्रण आहे. म्हणून विचारांपासून आपली स्वत:ची मुक्तता करून घेऊन खऱ्या अर्थाने स्वतंत्र होणे, हाच खरे म्हणजे योगाचा उद्देश आहे आणि तोच भक्तीचाही उद्देश आहे. आपल्या स्वरूपाचे अनुसंधान करीत राहणे, हाच योगाचा किंवा भक्तीचा मूलमंत्र आहे.

**''स्व स्वरूपानुसंधानम् भक्तिरित्य भिधीयते ।''**

श्रीरामदास स्वामींनी म्हणून ठेवले आहे की,

**सदा स्वरूपसंधान । हेंचि भक्ति हेंचि ज्ञान ।**

योग आणि भक्ती यांत अंतर असलेच तर ते फक्त माध्यमाचे. भक्तीत भावनेचे माध्यम असते, तर योगात - मग तो राजयोग असो, ज्ञानयोग असो, बुद्धियोग असो किंवा सहजयोग असो - बुद्धी हे माध्यम असते. मार्ग कोणताही असो किंवा माध्यम कोणतेही असो, ध्येय एकच - ते म्हणजे आत्मज्ञान.

आता एक गोष्ट मात्र खरी, की ज्ञानप्राप्तीची इच्छा करणाऱ्यांची संख्या थोडी असते. बहुसंख्य लोक ऐहिक वासनांची पूर्ती करण्यातच जीवनाची इतिकर्तव्यता मानणारे असतात आणि त्यासाठी अनेक देव, देवी, देवतांचे सहाय्य घेण्यापासून ते साधू, महात्मा, बाबा किंवा फकीर यांचे सहाय्य घेण्यापर्यंत सर्व भलेबुरे मार्ग अवलंबिले जातात. वासनांच्या जाळ्यात अडकलेल्या मानवाच्या हे लक्षात येत नाही, की आहार, निद्रा, भय आणि मैथुन या चार मूल प्रवृत्तींच्याच सर्व वासना या उपशाखा आहेत. या प्रवृत्ती सर्व जीवमात्रात समान आहेत; पण माणसाची विशेषत: कोणत्याही गोष्टीचे ज्ञान प्राप्त करण्यात आहे.

**आहार निद्रा भय मैथुनंच । सामान्य मे तत् पशुभिर्नराणा ॥**
**ज्ञानं हि तेषामधिको विशेषो । ज्ञानेन हीना पशुभिर्समाना ॥**

सर्व प्राणिमात्रांत कमी-जास्त बुद्धी असते, परंतु माणसाची बुद्धी पूर्ण विकसित असते. जीवन-मरण, यश-अपयश, आदि द्वंद्वांचा बोध होणे व त्यातून मार्ग काढणे या गोष्टी माणसाला शक्य आहेत. वासनांची पूर्ती कधीही होणे शक्य नाही, हे माणसाला समजते. वासनांचे मृगजळ ''आणखी पुढे, आणखी पुढे'' करीत माणसाला खेचत असते, तेव्हाच त्याला दुसऱ्या बाजूचाही विचार सुचतो आणि हाच क्षण महत्त्वाचा असतो. ह्याच क्षणी स्वत:ला सावरणारा स्वत:ला ''कस्त्वं को हं'' असा प्रश्न करू शकतो. जो अशा प्रकारे विचार करू शकतो व जो स्वत:ला जाणण्याच्या मार्गावर पाऊल ठेवतो त्याला नि:शंक मनाने या मार्गाची वाटचाल करणे आवश्यक आहे. ''शुभस्य शीघ्रम्'' असे सुभाषित आहे. आत्मज्ञानाच्या मार्गाशिवाय अन्य कोणता शुभमार्ग असू शकेल? हा मार्ग सर्व शुभमार्गांचा मुकुटमणि आहे. ज्याक्षणी या मार्गावर मानवाची वाटचाल सुरू होईल, तो क्षण अत्यंत पवित्र म्हणूनच गणला जाईल. म्हणून या मार्गावर वाटचाल करणे सुरू करू या.

॥ ॐ ॥

*प. पू. गुरुजींच्या तात्त्विक विचारांत कुंडलिनी जागृतीची माहिती आली आहे. या संदर्भात जिज्ञासूंकरिता अधिक माहिती देत आहे :*

***कुंडलिनी :*** *शरीरातील मूलाधार चक्राच्या ठिकाणी कुंडलिनी नावाची प्राणशक्ती सुप्तावस्थेत असते व योग, भक्ती इत्यादीमुळे ती जागृत होऊन सुषुम्नेतून सहस्रदलाकडे जाऊ लागते. त्यावेळी योग्यांना अतींद्रिय ज्ञानाचे अनुभव मिळतात. सिद्धी प्राप्त होतात. कुंडलिनी अनाहत चक्राच्या पुढे गेल्यावर तिला मारुत हे नाव देतात आणि ती प्राणशक्ती जेव्हा सहस्रदलात पोहोचून परमात्मरूपात विलीन होते, तेव्हा योगी ब्रह्मात विलीन होतो. सुप्तावस्थेत असताना कुंडलिनी साडेतीन वेढे देऊन खाली तोंड करून निजलेल्या नागिणीप्रमाणे असते. कुंकवाने न्हालेले नागिणीचे पिल्लू असे जागृत कुंडलिनीचे वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे. (कुंडलिनीचे साडेतीन वेढे म्हणजे ॐ'काराच्या साडेतीन मात्रा, असेही कोणी म्हणतात.)*

- **स्वामी स्वरूपानंद,** *अभंग ज्ञानेश्वरी*

# शरीररचना आणि योग

आत्मस्वरूपाचे ज्ञान होणे हा पुरुषार्थ होय. श्रेय होय. ह्या श्रेयाचे ज्ञान व अनुभव मानवी देहधारणेच्या काळातच होऊ शकते. हरेक प्रकारचे ज्ञान, स्मृती, चेतना इत्यादी मनुष्याच्या नाड्यांच्या ठिकाणी असते आणि ह्या नाडीसंस्थांचे कार्य उत्तमातल्या उत्तम संगणक यंत्रापेक्षाही अधिक उत्तमरीतीने होत असते. जे परमतत्त्व आहे, ते आपला आभास किंव अनुभव ह्या नाडीसंस्थेद्वारेच सुलभतेने करून देते. म्हणून ह्या नाडीसंस्थांचा परिचय आधुनिक शरीरशास्त्रानुसार करून घेणे आवश्यक आहे. या प्रकरणात शेवटी नाडीसंस्थेचा योगचक्रांशी तुलनात्मक आलेख दिला आहे. त्यामुळे आसन व ध्यान ह्या यौगिक क्रियांचा चांगला परिचय होईल. ज्यांना हा भाग कंटाळवाणा वाटेल किंवा समजणार नाही, त्यांनी हे प्रकरण सोडून पुढील भाग वाचला तरी चालेल. त्यामुळे मूळ विषयात अंतर पडण्याचा संभव नाही.

नाडीसंस्थांचे कार्य केंद्रीय नाडीसंस्थेच्या माध्यमातून होत असते. केंद्रीय नाडीसंस्थेचे मस्तक, मज्जारज्जू आणि सुषुम्ना नाडी (परिधार्य परिसरीय नाडी) हे प्रमुख भाग आहेत व ते दैहिक (somatic) किंवा स्वयंचलित (automatic) नाड्यांनी बनले आहेत. मस्तकाचे उपविभाग असे आहेत. १) अग्रमस्तक, २) मध्यमस्तक, ३) पृष्ठमस्तक. (या तीन मुख्य भागांचे उपविभाग खालीलप्रमाणे -

**१) अग्रमस्तक (Forebrain)** - टेलेन्स फॉलोन (Telencephalon)

हा भाग मोठ्या मस्तिष्काच्या दोन्ही अर्धगोलाकार भागांचा बनलेला आहे. यात पार्श्वनिलय (laternal ventricle) चा समावेश आहे.

**२) आंतर अग्रमस्तिष्क (Diencephalon)** - डायसेफेलॉन हा भाग चेतक (thalamus) अध:श्वेतक (hypothalamus) व पश्चचेतक (metathalamus) आणि पिनियल ग्रंथीसह अधिचेतक (epithalamus) यांचा बनलेला असतो. यातील गुप्त भागाला तिसरा निलय (third ventricle) असे म्हणतात.

**३) मध्यमस्तिष्क** - यात अनुमस्तिष्क (cerebellum) सेतुबंध (pons) आणि अंतस्था (medulla) या भागांचा समावेश आहे. यातील गुप्त भागाला चौथा निलय (Fourth Ventricle) म्हणतात. तळातील मेडलुलाचा मज्जारज्जूशी संबंध असतो.

स्नायूंशी संबंधित असणाऱ्या दैहिक बहिर्गामी संवेदना (From the surface of the skin) त्वचेच्या मार्गाने येतात. त्याचप्रमाणे उतक किंवा प्रगाही संवेदना स्नायू, स्नायुबंध अस्थि किंवा अस्थिजोडातून प्राप्त होतात. काही ३१ प्रकारच्या संवेदना सुषम्ना नाडी तंतूमध्ये किंवा कपालनाडी तंतूमध्ये प्रवाहित होतात. या सर्व संवेदना मज्जारज्जूत प्रविष्ट होणाऱ्या, परीघीय नाडी तंतूभोवती असणाऱ्या (from muscles, tendons, bones and joints) नाडीकोषातील गंडस्थानातून किंवा नाडीसमूहाच्यामार्गे कंबरेजवळच्या भागात असणाऱ्या सुषुम्ना नाडीत प्रवेश करतात. मज्जारज्जूचा शेवटचा भाग कंबरेच्या खाली असणाऱ्या ''कोनस मेडुतेरिस'' नावाच्या पातळ पडद्यापाशी असतो. याच भागात अंतिम निलय किंवा कुंडलिनीचे निवासस्थान असते. मस्तिष्कात निर्माण होणाऱ्या संवेदना कपाळाच्या भागातील त्रिवेणी नाडी संस्थांतून- ज्याला ''ट्रायजेमिनल'' म्हणतात- मेंदूच्या भागाकडे प्रवाहित होतात. प्रवाही संवेदनांचा एक भाग सुषुम्ना नाडीच्या मार्गाने लहान मेंदूकडे पुढील नाडीसमूहाच्या तंतुसमूहामार्गे लहान मेंदूत प्रविष्ट होतो, यामुळे शरीराची स्थिती नियंत्रित होते. उर्वरित संवेदना तीन किंवा दोन नाडीकोषातून प्रवाहित होतात. या संवेदना दोन स्थानी कार्यरत राहतात. त्यानंतर हीच संवेदना, जेथून इंटर्नल कॅपसूल, करोना रेडियेटाच्या मार्गाने शेवटी मस्तिष्काच्या कायिक संवेदीमार्गात प्रविष्ट होते. प्रमस्तिष्कात (cerebrum) नाडीकोषातून निर्माण झालेले सहा अतिसूक्ष्म स्तर

असतात. संवेदीउद्दीपन दाणेदार स्वर (granular layer) ज्यास प्रकृतीचे प्राथमिक स्तर जाणवतात- कोषात प्रवेश करतात. हा दाणेदार स्तर संवेदी प्रांतात पूर्ण विकसित अवस्थेत असतो. संपूर्ण शरीरातील संवेदना ह्या दाणेदार स्तरात पोहोचतात. येथून संवेदनांचा स्रोत भिन्न भिन्न नाडीसंयोजकातून पार होऊन निरनिराळ्या ठिकाणी वाटला जातो. (जसे प्रांतस्थानातील मनाचा संवेदी भाग, प्रेरक भाग आणि अन्य भाग). मनाच्या संवेदी भागात पोहोचल्यावर संवेदनांचे विश्लेषण, परिवर्तन आणि संग्रहणाचे कार्य होते. प्रमस्तिष्कातील प्रेरक प्रांतस्थातून- नाडीतंतूच्या समूहातून संवेदना मज्जारज्जूत पोहोचते. या भागातील प्रेरक नाड्यांच्याद्वारे मांसपेशींचे सामूहिक किंवा विशिष्ट प्रकारचे आकुंचन होते. याप्रमाणे ऐहिक किंवा दैहिक नाडीसंस्थांचे दोन मार्ग आहेत. एक संवेदी अभिवादी पथ तर दुसरा प्रेरक अपवादी पथ. दैहिक नाडीसंस्थांचा भाग मनुष्याच्या अंकित असतो.

दैहिक नाडीसंस्थेच्या बरोबर आणखी एक नाडीसंस्था असते. तिला (visceral involuntary किंवा involuntary) अनिच्छावर्ती किंवा स्वयंचलित नाडीसंस्था (automatic nervous) म्हणतात. ही सामान्यपणे माणसाच्या इच्छेप्रमाणे काम करीत नाही. ह्या नाडीचे दोन भाग असतात. अनुकंपी नाडी संस्थेला (sympathetic) वक्षकटि नाडीसंस्था (thoracolumber) असे म्हणतात. कारण ह्या नाडीसंस्थेच्या कक्षेत मज्जारज्जूचे सर्व बारा भाग तसेच सुषुम्ना नाडीचे काही भाग येतात. या नाडीच्या काही ग्रंथी वक्ष (thorax) पोट (abdomen) व श्रेणी आणि ग्रीवा या भागातही असतात. (ग्रीवेच्या) खालील बाजूस डाव्या व उजव्या बाजूकडील संवेदना नाड्या असून अनुमिकेच्या (coceyx) समोर आणि एकमेकात गुंतलेल्या अशा अवस्थेत एकाच ग्रंथीच्या स्वरूपात असतात. वरच्या बाजूकडील संवेदना नाड्या कपाळाच्या भागात क्रेरोटिड व करसिका नाड्यांच्या बरोबर प्रवेश करतात. ह्या ग्रंथींचे कार्य संघर्षाच्या परिस्थितीत अथवा पळण्याच्या परिस्थितीत शरीराला साहाय्य करण्याचे असते.

अनिच्छावर्ती नाडीसंस्थेच्या दुसऱ्या भागात परानुकंपी (parasympathetic) किंवा कपात-सेक्रल (craniosacral) भाग असेही म्हणतात. (कारण या नाडीसंस्थेत चार कपाळाच्या नाड्या, तीन डोळ्यासंबंधीच्या नाड्या, सात चेहऱ्यासंबंधित नाड्या, जिभेसंबंधी नाड्या,

तसेच वेगसतंत्राच्या नाड्यांचा समावेश होतो. सेक्रभीधारकात सुषुम्ना नाडीचे एक टोकही असते. दहावी क्रपालासंबंधी नाडी हा परानुकंपी नाड्यांचा एक महत्त्वाचा भाग आहे. याचे केंद्र चौथ्या भागातील तळात सुषुम्नेच्या डोक्याच्या ठिकाणी येते. याच्या नाड्या हृदय, फुफ्फुस, अन्ननलिका, आमांशय, पक्वाशय, अनुप्रस्थ, बृद्धांत या भागाच्या दोन तृतियांश भागाशी संबंधित असतात. परानुकंपीतंत्र नाडीच्या चार उपनाड्या डेकि व ग्रीना भागात असतात. त्याचप्रमाणे बहुतांश ग्रंथी वेगसतंत्र नाडीच्या संबंधित राहतात. परानुकंपी तंत्र जीवनासाठी अनिवार्य आहे. कारण ह्या तंत्राचे श्वसनक्रिया व रक्ताभिसरण यावर नियंत्रण असते.

अनुकंपी तसेच परानुकंपी प्रणालीत अभिवाही आणि अपवाही घटक असतात. ज्यांचे हृदय फेफडे, पचन, उत्सर्जन आणि जनन कार्यावर नियंत्रण असते. अधश्चेतक अनिच्छावर्ती नाडी संस्थानच्या अनुकंपी व परानुकंपी दोन्हीच्या तंत्राकरिता गंडिका प्रमुख आहे. अधश्चेतकचे पुढचा (पश्य) व मागच्या (पार्श्व) भाग अनुकंपी तंत्रावर नियंत्रण (शासित) ठेवते. दुसऱ्या बाजूला अधश्चेतकचा पुढचा (अग्र) व मधला (मध्य) भाग परानुकंपी तंत्राशी संबंधित असतो.

मस्तकांचे तिसरे निलय - तल पार्श्वभागी स्थित असल्यामुळे अधश्चेतकाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. रहस्यमय पीनियल ग्रंथी तिसऱ्या निलयाचे आत स्थिर असून तिथेच ती खुलते आहे. साहित्यात पीनियल ग्रंथीला रहस्यमय म्हटले आहे. कारण ऋषिमुनींच्या मते तिसरा किंवा अंतनेत्रच किंवा आत्मा यांचे निवासस्थान ह्या भागात असते. वैज्ञानिकांच्या मते ही केवळ एक अवशेषांग आहे. परंतु प्रत्यक्षात या ग्रंथीने पाश्चात्य-वैज्ञानिकांचे लक्ष आकर्षित केले आहे. बरेच शोध कार्य झाले आहे. थोडेफार ग्रंथ लेखनही झाले आहे. या लेखनातून निरनिराळ्या कार्यावर प्रकाश पडतो, तसेच अधश्चेतकचा जवळचा संबंध व संयोजनही स्पष्ट होते. प्रत्यक्षात तिसरे निलयाच्या जवळपास नाडीसंस्थानच्या शिखरावर अधश्चेतक पीनियल युग्मचे अद्वितीय महत्त्व राहते.

ध्यानामुळे जे ऐहिक लाभ होतात (उदा. रक्तदाब कमी होणे, हृदयाची गती मंदावणे, गूढ शांतता भासणे) त्याचा मस्तिस्काच्या खालच्या बाजूला नाडी ग्रंथाशी संबंध असतो. पीनियल ग्रंथी आपल्या हार्मोन्सद्वारा यौनांगोवर

प्रभाव पाडून यौन प्रक्रिया नियंत्रित करते. अधश्चेतक, रेखित पिंड (corps striatum) च्या मदतीने मस्तकांच्या ललाटभागी संबंध प्रस्थापित करते. त्याला अव्यक्त लक्षण क्षेत्र (silent area) म्हणतात. तरीही अनिच्छावर्ती नाडी संस्थान संबंध प्रान्तस्थामधील स्थिती स्पष्ट होत नाही. परंतु लिम्बिक व प्रान्तस्थाच्या दुसऱ्या भागात अनिच्छावर्ती नाडी संस्थानच्या कार्याशी संबंधित प्रतिक्रिया दिसून येते. त्यावरून प्रान्तस्थाच्या अनिच्छावर्ती संस्थानशी संबंध आहे हे कळते. "C' आकाराचे पुच्छक केंद्र (caudate nucleus) पार्श्वनिलयाच्या दीवाराशी स्थित असते. रेखित पिंड, लेन्साभ केंद्र (lentiform nucleus) पुच्छ केंद्राशी मिळालेले असते. पुच्छक केंद्राची निम्न आवृत्तीची विद्युत प्रेरणा - रासायनिक प्रेरणा झाल्यामुळे प्रान्तस्थाची कार्यगतीचे अवरोधन होते, तसेच संबंधित प्रतिक्रियाचेही अवरोधन होत असते. जालीय रचना (reticula formation) भुले द्रव्य (grey matter) तसेच श्वेत द्रव्य (white matter) याचे एक जाल (रसायन) होते, जे मस्तकाच्या स्तंभात (brain stem) पसरलेले असते. तसेच ते चेतकाच्या अविशिष्ट केंद्रांपर्यंत जात असते. ह्याचे शरीरक्रियेत विशेष महत्त्व आहे. ही बहुतंत्रीय कोशीय तसेच बहु अंतर्ग्रंथनीय (polysynaptic) तंत्र नाडी संस्थानच्या काही भागात प्रमुख कार्यात सहभागी होते, तसेच प्रान्तस्था अन्य सहायक केंद्र परिभ्रमण, श्वसन आणि पाचन प्रणालीशी संबंधित असते. रेटिक्युलर तंत्र जागरण प्रतिक्रियाशी उत्तरदायी आहे, तसेच प्रांतस्थाला सचेतन करते. ही अवस्था सुप्तावस्थेतून जागृतावस्थेत परिवर्तन होताना समान स्थितीत असते. रेटिक्युलर फॉरमेशन ''चैतन्य'' स्तरावर तयार होऊन, ध्यानावर केंद्रित करणे, विभेदीकरण करणे, त्याचप्रमाणे अबोधनाशी संबंधित रहाणे. सामान्यत: बारावी जोडी कपाल तंत्रिकाशी वर्णित आहे पण तेरावी जोडी म्हणजे नरवाई टरमिनेलिससुद्धा एक अस्पष्ट अमाइलिनावृत्त तंत्रिका होते. ही भृकटीच्या जवळ नासिकेच्या आत टोकापासून आरंभ करते. पाठीमागच्या बाजूला चालनवित पट्टिकाचा cribri form plate) भेद करून कपाल गुहात प्रवेश करते. हे तंत्रिका पटीय क्षेत्र (septal area) जवळच असलेल्या मस्तिकाशी जोडले आहे. ह्याचे तंतु अधश्चेतकापर्यंत पोचले गेले आहेत. काही लोक ह्याला अनुकंपी तंत्राचा अग्रवर्ती विस्तार मानतात. ह्या तांत्रिकाच्या माध्यमातून अनिच्छावर्ती नाडी संस्थान, भृकुटी म्हणजे त्रिकुटयीशी साम्य स्थापित करते जे विशेष महत्त्वपूर्

आहे. भृकुटीचे दोन भुवयांमध्ये स्थान आहे. ज्यावर योगीपुरुष ध्यान केंद्रित करून आज्ञाचक्रांवर स्थिर होतात. भृकुटी - पीनियल ग्रंथी एकाच सम अवस्थेत स्थित असते.

मस्तिष्काला निलय तंत्र आणि मस्तिष्क मेरु तरल (ventricular system of brain and cerebrospinal flnid) प्रमस्तकातील अर्धगोलाकार भागांतून स्थित दोन्ही पार्श्वनिलय अंतरानिलय रंध्र (interventricular foramen) च्या द्वारा तिसरे निलय (third ventricie) संबंधित होते. तसेच मध्य मस्तिकांचे द्वारा (aqneduct of midbrain) पश्चमस्तिष्काच्या चवथ्या निलयाच्या गृहिकेशी जोडले आहे.

चवथा निलय खालच्या बाजूला मेरूरज्जूच्या पतली केंद्रीय नलिकाशी (central canel) सरळ संबंधित रहातो. मेरुरज्जुची ही केंद्रिय नलिका आपल्या खालच्या डोळ्यावर अंतिम निलय (teraminal ventricle) याची निर्मिती होते. तसेच मेरु अन्त्य सूत्र (filam terminale) अनुप्रिकाच्या पहिल्या भागापर्यंत (खंड) जाऊन त्याच्याशी जोडली जाते. पार्श्व, तिसरे व चौथे निलयची कोराईठ जालिका (choroid plexus) रुधिरभिसरणातून मस्तकातील मेरु-तरल निर्माण करते. हे तरल निलय तंत्राने तयार होऊन मस्तिष्काचे मेरु तरल चौथे निलयाचे शिखरात स्थित दोन पार्श्व आणि एक मध्य रंध्रांशी जोडून अबजालतानिका अवकाशात (subarachroid space) प्रवेश करते. हे अवकाश मस्तिष्कात चारी बाजूनी स्थित असते. येथून मस्तिष्क तरल पुनः रुधिरात ऊर्ध्व-अग्रपश्च शिरानाल (superior sagittal sinus) मध्ये स्थित अवजाल तानिका कनिकामध्ये (subarachnoid granulations) मिळून जाते.

## अंतस्त्रावी ग्रंथी

अंतस्त्रावी ग्रंथी म्हणजे नलिकाविहित ग्रंथी शरीरांतर्गत विभिन्न हार्मोन उत्पन्न करतात व त्यायोगे शरीरांतर्गत विभिन्न कार्यात संतुलन राखतात व त्यायोगे जैविक संघटनेचा विकास साधतात. अशा अंतस्त्रावी ग्रंथी म्हणजे पीयुष ग्रंथी, पीनियल ग्रंथी, थॉयराइड, पॅराथॉयरईड, सुप्ररिनल, लैंगरहेन्स तसेच जननग्रंथीतील अंतस्त्रावी कोष. यापैकी कोणतीही ग्रंथी स्वतंत्रपणे कार्य करणारी नाही. तथापि त्या सर्वांचा एकमेकींशी घनिष्ठ संबंध असतो व त्या एकमेकींना नियंत्रित करतात. योगशास्त्रात ज्या चक्रांचा उल्लेख किंवा संदर्भ

येतो, त्यांच्याशी या ग्रंथींचा संबंध असतो. जेव्हा कुंडलिनी मणिपूर चक्रात प्रवेश करते तेव्हा ती सोलर किंवा कोलिॲक्स प्लेक्ससच्या सहाय्याने उत्तेजित होते व एड्रेनलिन ग्रंथींमध्ये स्राव उत्पन्न करते, त्यामुळे शरीराच्या तपमानात व हृदयाच्या ठोक्यात वाढ होते. जेव्हा ही शक्ती आणखी वर जाते, त्यावेळी पीयुषग्रंथीचे उत्तेजन होते व त्यामुळे विभिन्न चयापचय क्रिया होतात. उदा. रक्तात ग्लुकोजचे प्रमाण वाढते किंवा प्रोलेक्टिन, इस्ट्रोजेनचा स्राव उत्पन्न होतो, ज्यामुळे छाती जड होते व किंचित वेदना होतात. अधःश्वेतक स्तरावर ही कुंडलिनीशक्ती तपमान केंद्राचे नियंत्रण करते. त्यामुळे शरीराच्या तपमानात घट किंवा वाढ होते. साधकास साधनेच्या कालात विभिन्न अवस्थेत जे अनुभव येतात, ते वरीलप्रमाणे असतात.

## प्रमस्तिष्क प्रांतस्था

मस्तिष्काच्या पुढील भागात (म्हणजे कपाळाच्या ठिकाणी) ज्या सूक्ष्म किंवा अतिसूक्ष्म नाड्या किंवा ग्रंथी असतात, त्या ध्यानसाधनेसाठी महत्त्वपूर्ण असतात. ध्यानसाधनेच्या प्रारंभिक अवस्थेत एकाग्रतेमुळे किंवा एकाग्रतेच्या साहाय्याने मानसिक विचारांना शांत करण्याचे प्रयत्न केले जातात. ध्यानाच्या अवस्थेत मस्तिष्कातून एल्फा मस्तिष्क लहरी उठत असतात, त्या शरीर व मनाला शांतीपूर्ण अवस्थेत ठेवतात. एन्ड्रोनलीन स्रावांना विरोध करून, अनेक आधुनिक रोगांना प्रतिकार करण्याच्या स्थितीत असतात. कपाळाच्या ह्या भागात श्रवण, वाणी, दृष्टी, इंद्रिय संवेदना इ. अनेक प्रेरक कार्यात्मक केंद्रे असतात. या भागातील अव्यक्त लक्षणक्षेत्र आत्मिक साधनेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

ह्या प्रकरणात योगसाधनेतील गूढता व रहस्यपूर्ण क्रियांचे वैज्ञानिक दृष्टीने विश्लेषण होऊ शकेल एवढ्याच भागांचे स्पष्टीकरण केले आहे. आपले सर्व संवेदी अंग केवळ बाह्य संवेदनांचे ग्रहण करण्याच्या दृष्टीनेच विकसित झाली आहेत. तसेच जन्मापासूनच आपण केवळ बाह्य वस्तूंचे दर्शन घेण्याच्या सवयीचे झालो आहोत, आंतरिक साक्षात्कार करून घेण्यासाठी नाही. आपल्या अंतःकरणात खोलवर शिरण्याचा एकमेव मार्ग म्हणजे एकाग्रता साधणे व त्यायोगे मनाला बहिर्मुख होऊ न देणे. अंतःकरणात मन, बुद्धी, चित्त व अहंकार या मनाच्या सर्व अवस्थांचा समावेश असतो. या आंतरिक उपकरणांच्याद्वारेच योगसाधना अंतःकरणासंबंधी अन्वेषण करू शकते. हे कार्य म्हणजे स्वतःच

स्वत:चे अध्ययन करण्यासारखे आहे. फक्त अंत:करणाचे द्वार कसे उघडावयाचे एवढेच जाणणे महत्त्वाचे आहे. प्रयत्नाने खऱ्याखुऱ्या साधकासाठी एक दार उघडले जाईल व त्यास ह्या विश्वाच्या संसारातील तिळा दिसू शकतील. मस्तकात चांगले विचार जिरवून मनुष्य आत्म्याचा व परमात्म्याचा साक्षात्कार करून घेऊ शकतो.

## मेरुदंड आणि योग

मेरुदंड हा योगसाधनेतील अनिवार्य व महत्त्वपूर्ण भाग आहे. मेरुदंड लवचिक असणे हा चिरस्थायी यौवनाचा मूळ स्रोत आहे. मेरुदंड निर्दोष व स्वस्थ असल्यामुळे अनेक लाभ प्राप्त होतात.

## योगचक्र किंवा नाडीसंस्था

योगचक्रे मुख्यत: सात आहेत व ती मेरुदंडावर खालून वर अशी विस्तारित आहेत. ही चक्रे स्वतंत्रपणे आपली कार्ये करीत असतात. या चक्रांतून ज्या क्रिया होतात, त्यांचे नियंत्रण करण्यासाठी एक विशेष शक्ती प्रत्येक चक्रात असते. मेरुदंडाचे पाच भाग पाच योगचक्रांशी संबंधित असतात.

**१) मूलाधार :** यात कुंडलिनी शक्तीचे वास्तव्य असते. हे सर्वांत खालचे चक्र असल्याने त्याला मूलाधार म्हटले आहे.

**२) स्वाधिष्ठान :** मूलाधार चक्राच्या थोडे वर असलेले हे चक्र, शरीराच्या अंतर्भागातील वाहिन्यांशी जोडलेले असते.

**३) मणीपूर :** कंबरेच्या भागात जिथे मेरुरज्जूचा प्रांत संपतो, तिथे असते व त्याच्या खाली नाभीचे स्थान असते.

**४) अनाहत :** याचा हृदयाशी संबंध असतो व ते मेरुदंडाच्या वरच्या भागात / छातीत असते.

**५) विशुद्ध :** गळ्याचा भाग, श्वासनलिका यांच्याशी संबंधित असते. ह्या चक्राचे नियंत्रण पाठीमागच्या भागातील मेंदूच्या तळाच्या भागातून जिथून श्वासोच्छ्वास व रक्ताभिसरण केंद्राचे नियंत्रण केले जाते, त्या ठिकाणी असते. ध्यानावस्थेत श्वासाचा अवरोध होऊन मृत्यूची जाणीव साधकाला होऊ शकते. कधी कधी सहसंवेदनाशील नाड्यांचे उद्दीपन होऊन घूर्णा, अतिसार किंवा ओकाऱ्या यांचाही अनुभव येतो.


**६) आज्ञाचक्र :** या चक्रास तृतीयनेत्र, अंतर्नेत्र, गुरुचक्र किंवा शिवनेत्र

असेही म्हणतात. या चक्राचे स्थान कपाळाच्या भागात पिनिअल ग्रंथीच्या थोडे वर असते. ही पिनिअल ग्रंथी दोन्ही भुवयांच्या मध्यभागी, ज्यास भृकुटी किंवा त्रिकुटी असेही म्हणतात, समांतर स्थानावर असते. आज्ञाचक्राचे महत्त्व असे, की सर्व आध्यात्मिक अनुभव याच स्थानावरून साधकाला येतात. या चक्राच्या माध्यमातूनच सद्गुरू आपल्या शिष्यांशी संपर्क स्थापित करतात.

**७) सहस्रार चक्र (बिंदूचक्र) :** हे सर्वोच्च चक्र असून त्यास हजार पाकळ्या असतात अशी समजूत आहे. हे योगाभ्यासाने जागृत होऊन कुंडलिनीशक्ती या चक्रात प्रवेश करते व साधकास सर्व तऱ्हेचे आध्यात्मिक अनुभव प्राप्त करून देते.

प्राचीन साहित्यात व तंत्रविज्ञानात अनेक नाड्यांचे वर्णन आहे, परंतु शरीररचनेशी किंवा क्रियायोगतंत्राशी त्यांचा यथातथ्य संबंध स्थापित करणे अशक्य आहे. तसेच ते हितकारकही नाही. ह्या चक्रांना किंवा नाडीग्रंथींना एक

## सात चक्रांची माहिती



आत्मिक आधार आहे. प्राचीन ऋषिमुनींना ह्या नाडीग्रंथीतून सूक्ष्म प्राणशक्तीचे वहन होत असल्याचे जाणवले असेल. अनेक नाडीग्रंथींपैकी फक्त तीनच नाड्या, इडा, पिंगला व सुषुम्ना, अत्यंत महत्त्वाच्या आहेत. इडा (किंवा चंद्रनाडी डाव्या नासिकेतून व पिंगला नाडी (किंवा सूर्य) उजव्या नासिकेतून प्रवाहित होत असते. तिसरी सुषुम्ना ही अत्यंत महत्त्वाची असून ती पाठीच्या भागातून मूलाधार चक्रातून निघून सहस्त्रारचक्राच्या दिशेने खालून वर प्रवाहित होत असते व मार्गावरील सर्व चक्रांना स्पर्श करून वाहत असते. सुषुम्ना नाडीच्या अंतर्भागातही आणखी तीन नाड्या असून त्यांना वज्रा, चिमणी व ब्रह्मनाडी असे म्हणतात. मूलाधार ते स्वाधिष्ठान चक्रापर्यंत पृथ्वीतत्त्व, स्वाधिष्ठान ते मणीपूर चक्रापर्यंत जलतत्त्व, मणीपूरपासून अनाहतचक्रापर्यंत अग्नितत्त्व, अनाहत चक्रापासून विशुद्ध चक्रापर्यंत वायुतत्त्व आणि विशुद्ध तत्त्वापासून आज्ञाचक्रापर्यंत आकाशतत्त्व अशी पाच तत्त्वे सुषुम्नाशी संबंधित आहेत. ह्या पाचही तत्त्वांच्या मागे परमतत्त्व आहे. योगी ध्यानयोगाद्वारे मूलाधारापासून वर चढत क्रमाक्रमाने या तत्त्वांवर विजय मिळवून किंवा नियंत्रण स्थापित करून आकाशतत्त्वात स्थिर होतात. योग्यांच्या मते हे आकाशतत्त्व अत्यंत गूढ असे आहे. हे तत्त्व ब्रह्मांडातील सर्व अणूरेणूंत वास करून असते. जोपर्यंत मनुष्य इच्छा, वासना इत्यादी भौतिक गोष्टींत रममाण असतो, तोपर्यंत ह्या ब्रह्मतत्त्वाची त्याला जाणीव नसते. परंतु साधक मनुष्य ऋषिमुनींच्या मार्गदर्शनानुसार ह्या आकाशतत्त्वात जेव्हा स्थिर हातो, तेव्हा त्याला परमशांतीचा अनुभव येतो. ह्या अवस्थेत असीम मौन असून त्या मौनावस्थेतच साधकास अकस्मात गुप्त रहस्याचे ज्ञान प्राप्त होते.

## कुंडलिनी

**कुंडल्येव भवेच्छक्तिः ततः संचालयेत् बुधा**
**तस्थाने भूवर्मध्ये सरस्वत्यादि चालनम् ॥**

॥ उपनिषद ॥

"जी कुंडलिनी शक्ती प्रसुप्तावस्थेत असते, तिचे भृकुटिमध्ये ध्यान करून, ती जागृत करून सुषुम्ना नाडीत तिचा संचार करावा."

कुंडलिनी म्हणजे कुंडलाच्या स्वरूपात प्रसुप्त असणारी दिव्य शक्ती. ती प्रत्येक माणसात असते. ही स्थितिशील कुंडलिनी महान ब्रह्मांडशक्तीचे विशेष प्रतिक आहे. तांत्रिक विज्ञानात ही चार नावाने ओळखली जाते. कुंडलिनी,

ब्रह्म, शक्ती आणि सत्पुरुष हिला विद्युल्लता असेही म्हणतात.

कुंडलिनीचे आसन म्हणजे एक कंद. मलद्वाराच्या वर दोन अंगुळे आणि गुप्तांगाच्या मुळाच्या मागे दोन अंगुले खाली मूलाधार चक्राच्या ठिकाणी हा कंद असतो. ही सर्वशक्तिमान अशी कुंडलिनी सर्पासारखी साडेतीन वेटोळ्यात स्थित असते. यामुळे सर जॉन वुडरॅक या साधकाने तिला सर्पशक्ती (serpent power) या नावाने संबोधिले आहे.

यापूर्वी ज्या चक्रांचा उल्लेख केला आहे, ती चक्रे परोपकारी आध्यात्मिक गुरूच्या मार्गदर्शनाने व नियमित प्रबल योगसाधनेद्वारा शुद्ध होतात, त्यावेळी श्वास सरळपणे सुषुम्ना नाडीत प्रविष्ट होतो आणि ज्यावेळी श्वास सुषुम्ना नाडीतून वाहावयास लागतो, त्यावेळी मन स्थिर होते आणि हृदयक्रिया व श्वासोच्छ्वास क्रिया स्तब्ध झाल्याचा अनुभव येतो. वास्तविक ही एक गूढ क्रिया असून, जागृत कुंडलिनी प्राणशक्तीसह उठून, आपले मूळ स्थान सोडून, सुषुम्ना नाडीत प्रवेश करते व तीतून अग्रेसर होत मणिपूरचक्रात प्रवेश करते. (मणिपूर चक्रापासून मज्जारज्जूचा प्रारंभ होतो) कुंडलिनीच्या जागृतीची अभिव्यक्ती या चक्रावर प्रकर्षाने जाणवते. (त्यामुळेही काहीजण मणिपूर चक्रालाही कुंडलिनीचे अधिष्ठान मानतात.)

मूलाधार, स्वाधिष्ठान आणि मणिपूर ही खालची तीन चक्रे तामस विकाराशी संबंधित असतात. ही तामसी प्रवृत्ती विनाशकारी असल्याने तिच्यापासून मुक्त होण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे.

अनाहत आणि विशुद्ध चक्रे प्रतिष्ठा आणि सन्मानाशी निगडित असतात. या ठिकाणी राजस आणि रजोगुण (अधीरता, अस्थिरता) किंवा आसुरी आणि दैवी गुणांची संमिश्र अवस्था असते.

आज्ञाचक्र सत्त्वगुणाशी (आकर्षण आणि स्थिरता) प्रकर्षाने वास करीत असल्याने ते चक्र प्रभावित झाल्यास शांतीवस्था प्राप्त होते.


एकाग्रता आणि ध्यानाच्या वेळी कुंडलिनी सुषुम्ना नाडीतून वाहात जाऊन केंद्रीय नाडीतून वर किंवा खाली जाऊन, विभिन्न केंद्रात प्रवेश करते व त्याचे संकेत भ्रूमध्यात ज्या संवेदना होतात, त्याद्वारे मिळतात. कुंडलिनीची जागृतावस्था पाच प्रकाराने जाणवते. १) पक्षांच्या कूजनासारखे आवाज, २) बेडकासारख्या उड्या, ३) पक्ष्यांच्या पंख फडफडण्याचे आवाज, ४) सर्पासारख्या

वेड्यावाकड्या वळणांचे भास, ५) वानरांसारख्या उड्या मारण्याचे आवाज. ज्योत, विद्युल्लता, चंद्रप्रकाश किंवा सूर्यप्रकाशासारखे प्रकाश, किंवा शरीरात धडकनाची अनुभूती असेही अनुभव कुंडलिनी जागृतीमुळे येतात. काही साधकांना सोन्यासारखे पिवळे सर्प किंवा कमळपाकळ्यांच्या उमलण्याचेही भास होतात. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे, की सर्वच साधकांना एकाच तऱ्हेचे अनुभव येतील असे नाही. प्रत्येकाला वेगवेगळे अनुभव येतील; पण असे अनुभव येणे म्हणजे साधनेच्या मार्गावरील प्रगतीचे काही टप्पेच असतात. अंतिम साध्य चौथ्या अनाहत चक्रापासून सहाव्या आज्ञाचक्रापर्यंतच्या प्रवासात कुंडलिनी दृढ स्थापित किंवा स्थिर झाल्यानंतर प्राप्त होते. ज्यावेळी इडा, पिंगला आणि सुषुम्ना नाड्यांचा भ्रूमध्यात मिलाप होऊन आत्मज्योतीचे दर्शन होते, तेव्हा यालाच त्रिवेणी संगम म्हणतात.

ज्या साधकाला शरीरांतर्गतच, सद्गुरूंच्या मार्गदर्शनानुसार भृकुटीमध्ये इडा, पिंगला आणि सुषुम्नेच्या आध्यात्मिक त्रिवेणी संगमाचा लाभ होतो, अशा सिद्ध आणि ज्ञानी पुरुषाला गंगा, यमुना आणि पुष्कर नद्यांतील संज्ञानाचे काय महत्त्व?

|| ॐ ||

*निरनिराळ्या योगचक्रांची स्थिती*



# आसन आणि ध्यान

ध्यानधारणेसाठी आसनाची नितांत आवश्यकता आहे. ध्यानासाठी खालील चार आसने अनुकूल आहेत, असे सांगितले जाते. सिद्धासन, पद्मासन, सुखासन व स्वस्तिकासन. वर सांगितलेल्या चार आसनांपैकी कुठलेही एक सुस्थिर व सुखदायक असे आसन निवडावे. अशा निवडलेल्या आसनात दीर्घकाळ बसता आले पाहिजे. आसन ग्रहण करण्यापूर्वी शांत, पवित्र किंवा शुद्ध (स्वच्छ) निर्विघ्न अशा ठिकाणी सतरंजी किंवा धाबळी चार पदरी करून (चार घड्या घालून) अंथरावी. ही जागा समतल असावी. उंच-सखल असू नये. त्या ठिकाणी डास, पिसवा वगैरे नसावेत. डास असल्यास मच्छरदाणीचा उपयोग करण्यास हरकत नाही. ध्यानासाठी सर्वोत्तम वेळ म्हणजे ब्राह्ममुहूर्त. अर्थात् पहाटेची तीन ते सहा वाजेपर्यंतची वेळ. अशा वेळी आजूबाजूचे वातावरण अनुकूल असते व तसे पोट मोकळे असते. ही वेळ सोडून दुसऱ्या वेळी आसन करायचे, ध्यानधारणा करायची म्हणजे अनेक अडचणी येतात व पोट मोकळे न राहिल्यामुळे ध्यानात लक्ष लागत नाही. म्हणूनच ब्राह्ममुहूर्त ही महत्त्वाची वेळ मानली गेली आहे. नाहीतर केव्हाही ध्यानधारणा करता आली असती, आसनावर निश्चल बसून पाठ, मान व डोके एका रेषेत धरून, निश्चल होऊन इकडेतिकडे न पाहता स्वतःच्या नासाग्री (नाकाच्या शेंड्यावर) दृष्टी लावून, मन शांत व निर्भय ठेवून व मनाचे पूर्ण संयमन करून ध्यानमग्न व्हावे. आसन ग्रहण करतेवेळी किंचित् पुढे वाकून पुन्हा सरळ बसावे. या क्रियेत गुदा किंवा गुदद्वार जमिनीच्या

वर उचलले जाते व पुन्हा सरळ (पाठ सरळ) झाल्यावर ते एका त्रिकोणावर स्थिर होते. हा त्रिकोण आसनाला आधार असणाऱ्या अस्थी (हाड) गंडकी व कंद यांनी बनतो. काहीजणांच्या (लोकांच्या) मते मनाच्या खालील बाजूस असलेल्या स्तरा(थर)ला कंद म्हणतात. कंद या त्रिकोणाचा शीर्षबिंदू होय. वर सांगितलेल्या पद्धतीने आसनस्थ झाल्यानंतर हा (कंद) खाली (खालच्या बाजूला) जमिनीकडे दाबला जातो.

सिद्धासनात टाचेचा दाब या ठिकाणी पडतो.

वर सांगितल्याप्रमाणे ध्यानासाठी निवडलेल्या आसनात पाठ (कणा) मान व डोके एका सरळ रेषेत ठेवणे अत्यावश्यक आहे. दोन्ही हात पायांच्या मध्ये तळवे वर करून ठेवावेत. डाव्या हाताच्या तळव्यावर उजव्या हाताचा तळवा ठेवावा. खांदे किंचित् मागे न्यावेत, छातीचा भाग पुढे आणावा व मूलबंधा (एक योगासन) बरोबरच किंचित् उडियानबंध (एक योगासन) करण्याने कुंडलिनीशक्ती जागृत करण्यास मदत होते. अशा प्रकारे दृढ (पक्के) आसन ग्रहण करून डोळे बंद करावेत व त्याच अवस्थेत भृकुटीच्या मध्यावर लक्ष केंद्रित करून आपल्या सद्गुरूंच्या आदेशाप्रमाणे किंवा सद्गुरूंनी दिलेल्या मंत्राचा जप करावा. अशा या अभ्यासामुळे हळूहळू पाय व शरीराचा भाग बधिर होऊ लागतो. कारण या भागात रक्ताभिसरणाची गती मंद होते. याचा प्रभाव शरीराच्या वरील भागात जाणवू लागतो. शरीर हलके होते आहे असे वाटते. अशा आसनात स्थिर झाल्यावर अंतर्बाह्य संवेदना शिथिल होत जातात. बाह्यसंवेदना बधिर होत गेल्याने नाडीच्याद्वारे मेंदूकडे जाणाऱ्या उद्दीपनक्रिया बंद होतात. यामुळे शरीराच्या संबंधित भागातील क्रिया बंद होतात. शरीर अचल किंवा स्थिर होते. परंतु मेंदूतील विचार-श्रृंखला चालूच राहाते, कारण पारतंत्रिकांचे काम चालूच असते. मनाच्या वृत्ती चंचल असतात आणि मन कधीही विचारांपासून मुक्त नसते. म्हणजे विचारचक्र चालूच असते. मनाची ही चंचलता एकाग्रतेला बाधक असते. मेंदूतील ही चंचलता मेंदूच्या पेशीत निरंतर चालू असलेल्या प्रक्रियेचा परिणाम होय. ही विचारधारा (श्रृंखला) साधकाला ध्यान-धारणेसाठी हवी असलेली एकाग्रता प्राप्त करण्यात अडचणी निर्माण करते. ही एकाग्रता प्राप्त करणे सहजासहजी शक्य नसते. कारण ध्यानधारणा करतेवेळी सुप्त किंवा दबलेले संस्कार मेंदूच्या खालील भागातून वर येत राहतात. ध्यानाच्या

वेळी साधक गुरूने सांगितलेल्या ध्येयावर आपले मन केंद्रित करण्याचा प्रयत्न करीत असतो किंवा एका विचारावरच आपले मन स्थिर करू पाहतो व तिथे दुसरे विचार येऊ नयेत, असा त्याचा प्रयत्न असतो; परंतु प्रारंभी त्याला हे शक्य होत नाही, म्हणून तो अस्वस्थ होतो. अशा अडचणींमुळे निराश होता कामा नये. कारण सतत प्रयत्न केल्यास ध्यानाची ती अवस्था परिपक्व होऊ शकते व सद्‌गुरूंच्या आज्ञेमुळे व कृपेमुळे मनाची अनियंत्रित चंचलता दूर होते. एक वेळ अशी येते, की मेंदूतील पेशींची क्रिया देखील शिथिल होते. अशा वेळी साधकाने 'उपदृष्टा' किंवा साक्षी बनून विचार-लहरींचे आंदोलन पहात राहिले पाहिजे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट - एकाचे (विचाराचे) दबणे किंवा अदृश्य होणे व दुसऱ्याचे (विचाराचे) सामोरे येणे हे पाहणे. जोपर्यंत विचारांच्या आवागमनाचा क्रम चालू असतो, तोपर्यंत त्या विचारांची पार्श्वभूमी काय आहे, हे जाणून घेणे अवघड व अशक्य असते. जेव्हा ध्यानाला आपल्या स्वस्वरूपी केंद्रित केले जाते, तेव्हाच त्याचे ज्ञान होऊ शकते.

ध्यानधारणेने किंवा ध्यानयोगाने मनाचे कार्य-व्यापार समजून घेण्यास मदत होते. एकूण इंद्रिये अकरा - पाच ज्ञानेंद्रिये (कान, स्पर्श, चक्षु, जीभ व नाक) पाच कर्मेंद्रिये (हात, पाय, वाणी, गुदा व उपस्थ) व अकरावे मन. मनाला इंद्रियांचा राजा म्हटले जाते. मनाचे कार्य अगदी क्रमबद्ध असते. मन, बुद्धी व अहंकार यांची आधारशीला किंवा आधारभूमी चित्त होय. चित्त हे चित्रपटाच्या पडद्याप्रमाणे आहे. मनात येणाऱ्या (उमटणाऱ्या) व नाहीशा होणाऱ्या विचारांची गती वेगवान असते. जरी एका वेळी मनात एकच विचार असतो, तरी त्या तीव्र गतीमुळे माणसाला असे वाटते, की त्याच्या मेंदूत एकाच वेळी विचारांची गर्दी झाली आहे. या वास्तवाचे ज्ञान जेव्हा एका विचाराच्या आगमनाने दुसरे विचार मागे राहतात, तेव्हा होते. याच सिद्धांताच्या आधारे चित्रपटातील चित्रांच्या रिळांची गती जादा असते आणि त्यामुळे चित्रांमध्ये एक क्रम व सामंजस्य असते; परंतु पडद्यावर एकच चित्र दिसत असते. चित्रपटात पडद्यावर चित्रे पाहात असताना त्या चित्रांच्या पार्श्वभूमीचा बोध होत नाही. त्याचप्रमाणे मनात विचार-लहरींचे आंदोलन चालू असताना त्या विचारांच्या मागे काय आहे, हे समजच नाही. मनाचे कार्य क्रमबद्ध रीतीने होत असते, त्यामुळे एका वेळी एकच विचार किंवा एकच विषय ते ग्रहण करू शकते. जेव्हा

एक विचार भूतकाळात जातो, तेव्हा लगेचच त्याची जागा दुसरा विचार घेतो. नवीन विचारांचे येणे व पुन्हा जाणे-हा क्रम निरंतर चालू असतो. मनाच्या या अवस्थेची तुलना माकडाच्या स्वभावाशी करता येईल. स्थिर आसन व ध्यानाच्या परिपक्व अवस्थेमुळे मनाच्या या चंचल वृत्ती (पणा) वर आपोआप बंधन येते, म्हणजेच मन सर्व विचारांपासून मुक्त होते. या अवस्थेत मन एकाच विचारावर टिकून राहते. आणि यालाच मनाची एकाग्रता म्हणतात. अशा एकाग्रतेच्या अवस्थेत एकच महत्त्वाचा विचार वारंवार क्रमबद्ध रूपाने सतत लुप्त होतो व प्रकट होतो. दुसरा विचार तेथे येतच नाही, त्याची जागा घेत नाही. ही एकाग्रता किंवा एकतानता म्हणजे लक्षण-समाधी होय. या अवस्थेत मेंदूच्या पेशीत एकच लक्ष्य किंवा साध्य टिकून राहते. येथे शरीरात होणाऱ्या घडामोडी संपतात.

आता ध्यानावस्थेत मनात होणाऱ्या घडामोडींचा विचार करू. चित्ताला अन्य विषयांपासून दूर करून त्याला एका नियोजित विषयात गुंतवणे म्हणजेच धारणा. ही धारणा सतत एका स्थितीत आहे, त्या स्वरूपात जेव्हा स्थिर होते किंवा अशा प्रकारची वृत्ती सातत्याने निर्माण होते, तेव्हा तिला ध्यान म्हणतात. हे ध्यान जेव्हा बाह्य उपाधींपासून मुक्त होऊन म्हणजे बाह्य गुण-दोषांपासून दूर होऊन केवळ मुख्य ध्येय किंवा प्रयोजनावर प्रकाश टाकते किंवा प्रयोजनाकडे घेऊन जाते तेव्हा त्याला समाधी म्हणतात. अर्थात् बुद्धी जेव्हा ध्येयात समाहित (एकरूप) होते, तेव्हा त्या अवस्थेला समाधी म्हणतात. ध्यान, धारणा व समाधी ह्या तिन्ही गोष्टी जेव्हा एकत्र येतात, तेव्हा त्याला संयम म्हणतात. 'त्रयमेकत्र संयम:' आणि बुद्धीच्या सूक्ष्मतेची परिसीमा म्हणजे साक्षात्कार.

आपण अंतर्मुख का होऊ शकत नाही? एककोषीय जीवापासून बहुकोषीय प्राणी व मानवी शरीराची उत्पत्ती व विकास यांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते, की सर्वप्रथम संवेदनावाहक नाडीव्यवस्था तसेच ज्ञानेंद्रियांचा विकास बहिर्मुखी झाला. या नाड्यांचे प्रमुख काम म्हणजे बाह्य जगाच्या संवेदना ग्रहण करून शरीराला सतत बाहेरील वातावरणाशी अनुकूल-क्रियाशील बनवणे. जसजसा विकास होत गेला, तसतशा या नाडीव्यवस्थे (रचने) मधील पेशी बाहेरील स्तरांमध्ये प्रवेश करू लागल्या. कारण नाडीव्यवस्था बाहेर असल्यामुळे तिला धोका पोचण्याची शक्यता होती. ही नाडीव्यवस्था (संस्था) मेरुदंड (मणका) व कपालगुहा (डोक्यात) यात स्थिर होऊन राहिली. हे केंद्रीकरण

झाल्यानंतर ही व्यवस्था (संस्था) बाह्य संवेदनांचे ग्रहण करण्याचे प्रमुख काम करू लागली. कारण आमच्या सर्व नाड्या व त्यातील तंतू बाह्य संवेदना पकडण्यासाठीच आहेत. आपण जन्मतःच बाह्य जगाच्या विषयात रमलेलो असतो. बाह्य जगाचे आकर्षण इतके जबरदस्त असते, की मनुष्य पूर्णपणे त्याच्या प्रभावाखालीच राहतो. (पूर्णपणे त्याच्या आहारी जातो) नाडीतंत्राचा विकास जर पाहिला तर आपल्याला असे दिसून येते, की याची निर्मिती अंतस्तराच्या स्वरूपात होते. या एका पेशीच्या स्तरापासून अनेक पेशी तयार होतात व त्यातून मेरुरज्जू, सेतूबंध व मोठ्या मेंदूची निर्मिती होते. परंतु यातला गमतीदार भाग असा, की नाडीतंत्र किवा व्यवस्थेतील सर्व पेशींच्या निर्मितीत सहभागी झाल्यानंतर हा आतील स्तर निष्क्रिय होतो. जणू संवेदनशील बाह्य जग व परा-आंतरिक जग यांच्यात एक भिंतच निर्माण होते. गंभीर अशा ध्यानयोगाच्या माध्यमातून ही अडचण दूर करून भौतिक किंवा बाहेरील जगातून आध्यात्मिक जगात प्रवेश करण्याचा प्रयत्न आपण करतो.

जसजसे ध्यान प्रगाढ होत जाते, तसतसा मनुष्य अंतर्मुख होत जातो. जोपर्यंत मन वासना, इच्छा, काम इत्यादींच्या वशात असते, तोपर्यंत प्रसुप्त कुंडलिनी (योगातील नाडी)च्या कुंडलीच्या द्वारे (स्प्रिंगांमुळे) जास्तीत जास्त बाहेर ढकलले जाते. आसन व ध्यानाच्या मदतीने या कुंडलिनीस चालना दिल्याने (जागृत केल्याने) ती आपले कुंडल सोडून सुषुम्ना नाडीत सरळ उभी राहते. ध्यानधारणेने बाहेरील संवेदनांपासून परावृत्त होऊन अंतर्मुख झाल्यानंतरच हे शक्य होते. या अवस्थेत इंद्रिये व त्यांच्या विषयांपासून मनाचा संपर्क तुटतो (नाहीसा होतो). इतकेच नव्हे, तर श्वासोच्छ्वासाची क्रिया चालू आहे की नाही हे सुद्धा कळत नाही. बाहेरील जग व अंतर्गत (जग) यांमध्ये सुषुम्ना भिंतीचे काम करते. ही सुषुम्ना मुख्य नाडी होय. ही नाडी मणक्यातून सूक्ष्म नळीच्या स्वरूपाने मेंदूत जाते. तिसऱ्या व चौथ्या निलयांतून (गुहेतून) अंतरा निलयाच्या मार्गे दोन्ही बाजूंच्या निलयांपर्यंत जाते. या अंतरानिलयाच्या मध्यभागाला 'ब्रह्मरंध्र' असे म्हणतात. सुषुम्ना नाडीच्या मध्यभागी वज्रा नाडी आहे. वज्राच्या आत त्रिवेणी व चित्रिणीच्या मध्यभागी ब्रह्मनाडी आहे. या सर्व नाड्या अतींद्रिय व मानसिद्ध आहेत व यांचे ज्ञान फक्त योगियानांच प्राप्त होऊ शकते. कुंडलिनी शक्ती जागृत होऊन सुषुम्नेत प्रवेश केल्यानंतर बाहेरील इडा,

पिंगला या चित्रिणी व वज्रा नावाने ओळखल्या जातात. बाह्य जगात इडा, पिंगला व सुषुम्नाद्वारे कार्य चालू राहते. आत तीच सुषुम्ना अग्निरूपिणी आहे व वज्रा, चित्रिणी यांच्याकडून आतील कार्य संपन्न होते. जागृत कुंडलिनी पहिल्या केंद्राला विकसित करत त्याला भेदून दुसऱ्या केंद्राला विकसित करते, तेव्हा पहिले केंद्र पूर्वावस्थेत येते. म्हणजेच बंद होते. ही शक्ती मेरुदंडातील चक्रांना भेदून आज्ञाचक्रात स्थिर होते. तरीदेखील आपले संस्कार तसेच असतात. या अवस्थेला सबीज समाधी म्हणतात.

## विज्ञान आणि ध्यानयोग

ध्यान व आसन या क्रियेला विज्ञानाची जोड आहे. शरीररचना शास्त्र व शरीरक्रिया विज्ञान हे सर्व प्राण्यांमध्ये एकसारखेच असल्यामुळे शास्त्राने सिद्ध केलेल्या या ध्यानयोगाचे फायदे सर्वांनाच साध्य होऊ शकतात. हा ध्यानयोग आपल्या मूळ स्वरूपातच असल्यामुळे त्याला वर्णाश्रमाचे किंवा आयुर्मर्यादेचे बंधन नाही. याच्या खरेपणाबद्दल कुणाच्याही मनात शंका असता कामा नये. या ध्यानयोगाचा आधार हे हाडा-मांसाने बनलेले शरीर आहे. याविषयीचे ज्ञान काहींना स्वानुभवाने प्राप्त होते, तर इतरांना प्रयत्नाने व निष्ठेने साध्य होऊ शकते, म्हणूनच हे विज्ञानाला धरून आहे. हे समजून घेण्यासाठी आपल्याला मनुष्य व या संसाराची उत्पत्ती व विकास यावर विचार करणे जरुरीचे आहे. भारतीय संस्कृतीतील योगसाधनेच्या सिद्धांतानुसार इथे आधी काहीच नव्हते. चेतन जेव्हा प्रकृतीच्या संपर्कात आले किंवा चेतनाचा जेव्हा प्रकृतीशी संपर्क झाला, अर्थात् चेतन ज्यावेळी प्रकृतीत प्रतिबिंबित झाले, तेव्हा तिच्यात हालचाल सुरू झाली. हीच प्रकृतीची हिरण्यगर्भावस्था होय. यामुळे मूळ प्रकृतीत क्रमशः विकास होतो.

**१. प्रथम विषम परिणाम** - यालाच महत् तत्त्व म्हणतात. हेच लिंग आहे व सृष्टीच्या नियमांचे बीज होय. यामुळेच साऱ्या सृष्टीची उत्पत्ती होते.

**२. द्वितीय विषम परिणाम** - अहंकार-अहंभावामुळे एकत्व व अनेकत्व तसेच सर्व प्रकारचे भेदभाव निर्माण करणारी परिणती म्हणजे अहंकार. मन, बुद्धी, अहंकार व चित्त हे चार प्रकारचे वृत्तिभेद म्हणजे अंतःकरणचतुष्टय.

**३. ग्राह्य सूक्ष्म विषम परिणाम** - पाच (पंच) तन्मात्रा पंचकर्म करणारी - शब्द, स्पर्श, रस, गंध, रूप -तन्मात्रा. हे सर्व अहंकाराचे ग्राह्य

विषम परिणाम.

**४. अकरा इंद्रियांचे विषम परिणाम** - परस्परांमध्ये (एक दुसऱ्यात) भेद करणारी ज्ञानेंद्रिये - श्रोत्र (कान), त्वचा, चक्षु रसना (जीभ), घ्राण (नाक), पंच कर्मेंद्रिये खालीलप्रमाणे - हात, पाय, वाणी, गुदा, उपस्थ (जननेंद्रिय) आणि अकरावे मन. हे विभाजक (भेदकारी) अहंकाराचे ग्राह्य विषम परिणाम.

**५. ग्राह्य स्थूल परिणाम** - पृथ्वी, जल, वायु, अग्नी व आकाश हे पाच स्थूल तन्मात्रांचे ग्राह्य विषम परिणाम.

या विषम परिणामांमुळेच सत्त्वात (सत्त्वगुणात) राजस व तामस या गुणांचा प्रभाव वाढतो. ही चोवीस जडतत्त्वे सत्व, रज व तमोगुणी आहेत. यांचे गुण असे आहेत - सत्वाचा प्रकाश, रजाची क्रिया व तमाची स्थिती. या चोवीस जडतत्त्वांपासून वेगळा असा पंचविसावा चेतन.

थोडक्यात, चेतन व मूळ प्रकृतीपासून महत् तत्त्व, त्यापासून अहंकार, अहंकारापासून सोळा समूह आणि पाच स्थूल-भूत उत्पन्न होतात. प्रकृतीरूपी चित्ताला धरून ही एकूण चोवीस जडतत्त्वे आहेत. चेतनतत्त्वाच्या संयोगाने निर्मिती या विश्वात सर्व प्राण्यांची उत्पत्ती झाली आहे. सर्व प्राण्यांत मानवप्राणी हा अद्वितीय आहे. पाश्चात्य विज्ञानांनी देखील हेच सिद्ध करून दाखविले आहे, की मनुष्यप्राणीच श्रेष्ठ आहे. हा एकच असा प्राणी आहे, की सर्व प्रापंचिक बंधने तोडून टाकून तो आपल्या मूळ स्वरूपात प्रवेश करू शकतो. ऋग्वेदातील पुरुषसूक्तात विराट् पुरुषाचे वर्णन करताना हा हजारो शीर्षांचा (डोक्यांचा) हजारो डोळ्यांचा, हजारो पायांचा असा सर्व ब्रह्मांड व्यापून राहिलेला असूनदेखील हा बोटांच्या आकाराएवढा (शिल्लक) आहे - 'तत् तिष्ठति दशांगुलम्' माणूसच या सृष्टीचा केंद्रबिंदू आहे. माणसाचा मोठा मेंदू साधारणपणे दहा बोटांच्या आकाराएवढा आहे. या दहा बोटांच्या आकारायेवढ्या जागेत ध्यानाच्या मदतीने त्या मूळ पुरुषाचा साक्षात्कार होऊ शकतो.

शरीराचा अभ्यास करण्यासाठी शवविच्छेदन करावे लागते व त्यातील सूक्ष्म रचनेचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी सूक्ष्मदर्शी भिंगाची व जीवरसायनशास्त्राची मदत घ्यावी लागते. यामुळे सूक्ष्मतत्त्वांचे ज्ञान होऊ शकते. याप्रमाणेच (असेच) अध्यात्माच्या क्षेत्रात स्थूल अशा शरीराला (देहाला) दृढपूर्वक आसनावर बसवून (शरीराला आसनस्थ करून) बाह्य संवेदनांपासून

मुक्त होऊन व मनाला कुठल्यातरी एका विषयावर किंवा ध्येयावर एकाग्र करून अंतर्मुख व्हावे लागते, तेव्हा कुठे आतल्या जगात प्रवेश होतो. अशा वेळी सुषुम्नारूपी पडद्याच्या बाहेरील सर्व कार्यव्यापारांपासून मुक्त झालेल्या योगियांचा वज्रा, चित्रिणी व ब्रह्म नाडीशी संपर्क प्रस्थापित होतो. जसजशी सतत प्रयत्नाने ध्यानाची अवस्था प्रगाढ होत जाते, तसतसे साधकाला काही विशिष्ट प्रकारचे अनुभव येऊ लागतात. उदाहरणार्थ - धुके, धूर, आग (अग्नि), तारे, वीज, सूर्य, चंद्र वगैरे दिसू लागतात. सुगंध, सुस्वाद, मृदु स्पर्श तसेच नादध्वनी यांचा अनुभव येऊ लागतो. तसेच ध्यानाच्या प्रभावामुळे शरीर हलके-हलके वाटू लागते व निरोगी होते. विषयवासना नाहीशी होते. चेहरा सतेज बनू लागतो व त्यावर प्रतिभेची झाक दिसू लागते. विशिष्ट प्रकारचा आनंद प्राप्त होतो. वरील प्रकारचे परिवर्तन प्रगतीचे सूचक आहे. या अनुभवांमुळे साधकाच्या मनाचा विश्वास व निश्चय वाढीस लागतो; त्याला हे देखील पटते, की हे केवळ तंत्र किंवा प्रक्रिया नाही. याप्रमाणे सूक्ष्म तत्त्वे क्रमशः शुद्ध होतात व मन बदलू लागते तेव्हा ते स्थूलाकडून मूळ प्रकृतीकडे जाते व ध्यानाच्या उच्च स्थितीत चेतनस्वरूप परमात्म्याचा त्याला साक्षात्कार होतो. धुळीने माखलेले रत्न धुतल्यानंतर जसे तेजोमय होऊन चमकू लागते, त्याप्रमाणे भेद व भ्रम नाहीसे झाल्यावर स्व-स्वरूपाचे ज्ञान होऊन आनंदाची प्राप्ती होते व सर्व प्रापंचिक बंधनातून मुक्ती मिळते. भौतिक विज्ञानाप्रमाणे या अनुभवांचे प्रत्यक्ष प्रदर्शन शक्य नाही. कारण ध्यानाचे अनुभव हे प्रत्यक्ष दाखविता येत नाहीत. म्हणूनच त्यांना 'पराभौतिक' असे म्हटले आहे, अर्थात् दिसण्यापलीकडचे. अत्यंत मार्मिक शब्दात सांगितले आहे -

**'नाहं मनुष्यो, न च देव यक्षो ।**
**न च ब्राह्मणः क्षत्रिय वैश्य शूद्रः ।**
**न ब्रह्मचारी गृही वनस्थो ।**
**भिक्षुः न चाहं निजबोधरूपः ॥'**

अर्थात् मी मनुष्य, देव, यक्ष, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र वगैरे नाही. मी ब्रह्मचारी, गृहस्थ, वानप्रस्थ (वनात राहणारा) भिक्षुक पण नाही. तर मी कोण आहे? मी तर नित्य शुद्ध, चैतन्य बोधरूप आहे.

ध्यानयोगाचे गांभीर्य व त्याचा क्रियाविधी (करण्याची पद्धत)

पंचकोशाच्या माध्यमातून जाणून घेणे शक्य आहे. कोशाला आवरण म्हणतात. मानवी शरीरात सूक्ष्मातिसूक्ष्मापर्यंत पोचण्याच्या वाटेत पाच कोश आहेत - अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश व आनंदमय कोश.

**१. अन्नमय कोश** - हा कोश अन्ना (आहारा) मुळे उत्पन्न होतो व वाढतो. हे पंचभूतांपासून बनलेले हाडे, मांस व इंद्रियेंयुक्त शरीर होय. वरील त्वचे (कातडी) पासून शरीराच्या आतील आतड्यांच्या आतील त्वचा, रक्तवाहिन्यांच्या आतील स्तरापर्यंतच्या भागाला अन्नमय कोश म्हणतात.

**२. प्राणमय कोश** - हा कोश पाच कर्मेंद्रिये व पाच प्राणांनी बनलेला आहे. या प्राणमय कोशात क्रियाशक्ती असल्यामुळे हा सक्रीय असतो. (कार्यरूप असतो) हा कोश आतडी व रक्तवाहिन्यांत असतो. महाप्राण पाच आहेत. प्राणवायूवरील इंद्रियांचे कार्य-संचालन करतो. अपान वायु खालील इंद्रियांद्वारा मल-मूत्र विसर्जनाचे कार्य करतो. समान वायू खाल्लेल्या पदार्थांचे - पेयांचे पचविण्याचे काम करतो. व्यान वायू सर्व नाड्यांमधून फिरतो व रक्ताचे अभिसरण करतो. उदानवायू सूक्ष्म शरीराला दुसऱ्या शरीरात व दुसऱ्या जगात घेऊन जातो. हा प्राणमय कोश चेतनरूपी आत्म्याला आच्छादित करून भूक, तहान, आळस इत्यादी उत्पन्न करतो व जड (अचल, सुस्त) इंद्रियांना चालना देतो.

**३. मनोमय कोश** - मन व पाच ज्ञानेंद्रियांचा हा तिसरा कोश आहे. यात इच्छाशक्ती व ज्ञान असते. मन व प्राण यांचे अत्यंत निकटचे संबंध असल्यामुळे मनाला प्राणापासून वेगळे करणे कठीण (काम) आहे. हा तिसरा कोश पाच कोशांत मध्यस्थानी आहे. जोपर्यंत वृत्ती बहिर्मुखी असते, मन प्रपंचात अडकलेले असते तेव्हा ते बाह्य आकर्षणाला बळी पडते. हे मन कधीही रिकामे नसते, सतत कुठल्यातरी गोष्टीत गुंतलेले असते. अर्थात् वेगवेगळ्या विषयांकडे धाव घेणे व त्यांना सोडून पुन्हा दुसरीकडे जाणे. मन हे बहिर्मुखी असल्याकारणाने अन्य इंद्रियांशी मिळून (त्यांच्या मदतीने) खेळ खेळत असते. अर्थात् ते प्रापंचिक मायेत अडकलेले असते. असे हे खेळ जागृत अवस्थेत, स्वप्नात व गाढ झोपेत चालू असतात.

ध्यानाच्या प्रगाढ अवस्थेत बाह्य संवेदना बधिर होतात, तेव्हा हे मन बाह्य आकर्षणांपासून मुक्त होऊन शुद्ध होते व उन्मनी अवस्थेला पोचते. अर्थात्

मनाची एकाग्रता वाढते व ते ईश्वरस्वरूपी मिळून जाते. जेव्हा प्राणाच्या मदतीने कुंडलिनी शक्ती सुषुम्ना नाडीत प्रवेश करते, तेव्हा मनाची उन्मनी अवस्था होते. परंतु कार्याचे स्वरूप व परिणाम भिन्न होतात. नंतर जेव्हा कुंडलिनी सुषुम्ना नाडीत प्रवेश करते, तेव्हा मन वज्रा, चित्रिणी व ब्रह्मनाडीशी संलग्न होते, (जुळते).

**४. विज्ञानमय कोश** - हा कोश अहं व बुद्धिप्रधान आहे. हा बाहेरील जगाच्या अहंपेक्षा वेगळा आहे. हा केवळ शुद्ध अहं होय. हा अंतर्जगाचा सूक्ष्मातिसूक्ष्म असल्याने स्वानुभवाचा विषय आहे. जोपर्यंत सुषुम्ना नाडी बाहेर कार्य करते, तोपर्यंत ती अज्ञान व अविद्यामय (युक्त) असते. उन्मनी अवस्थेत ही सुषुम्ना अग्निरूपिणी होते. चित्रिणीरूपी नाडी आत्म्या (पुरुष) चे मनरूपी चंद्र होय व वज्रारूपी नाडी म्हणजे त्याचे सूर्यरूपी डोळे. विज्ञानमय कोशात चित्रिणी नाडीद्वारे रचना होते व साधकाला तिचा अनुभव वज्रानाडीच्या प्रकाशात प्राप्त होतो.

सुषुम्ना, चित्रिणी व वज्रा या तिन्ही नाड्यांचे जेव्हा भृकुटीत मीलन होते, तेव्हा त्याला दिव्य संगम म्हणतात. या संगमात स्नान केल्यानंतर साधकाला दिव्य प्रकाशाची झलक प्राप्त होते (तिचे दर्शन होते). साधक जेव्हा या पार्श्वभूमीवर अविचलित बसून राहतो, तेव्हा त्या दिव्य ज्योती (प्रकाशा)चा सतत अनुभव होत राहतो. यालाच तुरीयावस्था (शांती अवस्था) म्हणतात. या अवस्थेत तमाचा (तमोगुणाचा) लोप होतो. (नाहीसा होतो) व रजोगुण सत्मय होऊन जातो व बुद्धी सत्प्रधान होऊन जाते. यामुळे चित्त स्फटिकमण्यासारखे स्वच्छ होते-चमकू लागते. या अवस्थेत स्फटिकमण्यात पूर्वीचे संस्कार मूर्तिमंत होऊन प्रतिबिंबित होतात. या संस्कारांचे प्रकट होणे हा त्यांचा भोग आहे व त्यांचे नाहीसे होणे म्हणजे त्यांचा नाश. या प्रक्रियेत किंचित् देखील सुख-दुःखाचा अनुभव होत (येत) नाही. ब्रह्मनाडीशी संपर्क झाल्यामुळे साधक केवळ साक्षी बनून राहतो. याप्रमाणे जन्मजन्मांतराचे अर्जित (प्राप्त) संस्कार या जन्मात पूर्णपणे नाहीसे होतात. या अवस्थेत साधक आपली सद्बुद्धी ज्या काळात किंवा ज्या ठिकाणी प्रेषित करू इच्छितो (पाठवू पाहतो) तेथील कार्यकलापाचे, कार्यकारणाचे त्याला ज्ञान होते. सर्वव्यापी अशा आत्म्याचे नित्य, चैतन्य व ज्ञानमय स्वरूप असल्यामुळे हे सहज शक्य होते. अशा

आत्मिक बुद्धीला ब्रह्मास्त्र म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. दिव्यत्व प्राप्त झाल्यावरच अचिंत्य व चिंतनांतर्गत (चिंतनाशी, विचारांशी निगडित) संदेशाच्या रहस्यांचे ज्ञान होते. हे अशा प्रकारचे संदेश दिव्य तरंगां (लहरी) द्वारे प्राप्त होतात.

**५. आनंदमय कोश** - विज्ञानमय कोशाच्या पलीकडे आनंदमय कोश आहे. वैदिक धर्मानुसार याला सत्यलोक व कुंडलिनी तंत्रानुसार परम म्हणतात. विज्ञानमय कोशातून पुढे गेल्यानंतर आनंदमय कोशात प्रवेश होतो. बुद्धी शुद्ध होते व प्रकृतीमध्ये एकरूप होऊन जाते व ती प्रकृती पूर्णपुरुषात लीन होते. तेव्हा साधक या परमानंदरूपी सागरात मग्न होऊन जातो व त्याला बाहेरील जगाचे व आपल्या देहाचे भान राहात नाही. या अवस्थेत काही काळ राहून साधक जेव्हा विज्ञानमय कोशात परत येतो, तेव्हा त्याला अवर्णनीय आनंद होतो. तो आनंद व्यक्त करण्यास त्याच्याजवळ मौनाशिवाय दुसरी भाषा नसते.

अचिंत्य अशा व चिंतनातल्या संदेशांचा भौतिक व रचनात्मक आधार म्हणजे मेंदूतील असंख्य नाड्या व त्यांच्या पेशी. तेथेच या संदेशांचा अर्थ कळतो. मेंदूतील असंख्य नाड्यांच्या जाळ्यात शरीराच्या तीन अवस्था दिसून येतात.

**१) जागृत अवस्था** - यात सत्वगुण गौणरूपाने दबलेला असतो. तमोगुण सत्वाच्या वृत्तीला थांबवतो किंवा त्याला रोखून धरतो, परंतु रजोगुणी प्रधान होऊन चित्ताला इंद्रियांच्याद्वारे बाह्य विषयांशी संपर्क साधून देतो.

**२) स्वप्नावस्था** - यात सत्वगुण थोडा अधिक गौणरूपाने असतो. तमोगुण रजोगुणाला इतका दाबून टाकतो, की तो चित्ताला इंद्रियांच्या मार्गे बाहेर जाऊच देत नाही; परंतु रजोगुणाचे काम सूक्ष्मरूपाने चालू राहते.

**३) सुषुप्ती अवस्था** - यात सत्वगुण जास्तीत जास्त गौणरूपाने दबलेला असतो. ही गाढ झोपेची स्थिती होय.

माणसाच्या स्थूल देहाची तुलना मोटरकारशी करता येईल. त्यात तीन गियर असतात - जणू काय वर सांगितलेल्या सुषुप्ती, स्वप्न व जागृत अवस्थाच. साधारणपणे माणूस या तीन अवस्थांमध्येच राहतो; परंतु या तीन अवस्थांच्या पलीकडची चौथी अवस्था ही तुरीयावस्था. ही सहाव्या आज्ञाचक्रात असते. सुषुम्नेत जेव्हा कुंडलिनी शक्तीचा प्रवेश होतो, तेव्हा या स्थूल देहात ब्रेक

लागल्यासारखी क्रिया होते किंवा बाहेरील गतीला अवरोध (बाधा) होतो. या देहाची अवस्था न्यूट्रल गियरमध्ये चालू असलेल्या मोटरकारप्रमाणे होते व त्याला कमीत कमी इंधन लागते. या अवस्थेत शरीर आसनामध्ये स्थिर राहते, ते कलत नाही, पडत नाही. मोठ्या मेंदूत अंतरानिलय रंध्राच्या वरील बाजूस पार्श्वनिलयच्या भिंतीत पुच्छककेंद्र आहे. (सुकाणू).

हे केंद्र ध्यानावस्थेमध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयोगी असे आहे. कारण त्यातील कामकाजाचे आकलन करून त्याला स्थिरस्थावर करणे हे त्याचे काम आहे. परिणामस्वरूप ते सजीव किंवा निर्जीव समाधीची स्थिरता टिकवून धरते आणि त्याच्यामुळे सबीज अथवा निर्बीज समाधीची स्थिरता टिकून राहते. ध्यानावस्थेत कुंडलिनी शक्ती विशुद्ध व अन्य चक्रांना भेदून आज्ञाचक्रात (चक्रापर्यंत) पोचण्याआधीच या पुच्छकावर अर्थात् गतिनियंत्रित करणाऱ्या केंद्रावर त्याचा प्रभाव पडतो.

हे केंद्र अंतर्गत घडामोडींचे नियंत्रण करते. याचा परिणाम असा होतो, की काही काळापर्यंत साधकाला बाहेरील घडामोडींचे किंवा बाह्य जगाचे ज्ञान होत नाही. पण ही शक्ती तेथे न थांबता आज्ञाचक्रात जाते आणि ही तेथे गेल्यानंतर साधकाला विलक्षण अनुभव येऊ लागतात. या अवस्थेत बुध्दी शुद्ध व सत्वगुणयुक्त होते. कुंडलिनी शक्ती प्राणाच्या मदतीने सुषुम्नेकडे जाते व तिथून आज्ञाचक्रात थोडा वेळ थांबून सहस्रारमध्ये जाते व सर्व मेंदू (संपूर्ण मेंदूत) किंवा डोक्यात दिव्य प्रकाशरूपाने व्यापून राहते. हा दिव्य प्रकाश (ज्योत) पिनियल (pineal gland) अर्थात् मेंदूतील पेशीतून प्रवास करीत भृकुटीत येऊन स्थिरावतो. ही शक्ती ज्या ज्या नाडीकोशात स्थिरावते, तिथे ती दिव्य प्रकाशरूपात दिसते. यामुळे दबलेल्या संस्कारांचे ज्ञान होते.

जन्म-जन्मांतरात हे संस्कार मेंदूतील नाडीकोशात दबून राहिलेले असतात. विश्वविख्यात तंत्रशास्त्रवेत्ता डॉ. पेनफिल्डने याचा शोध लावला आहे.

माणसाच्या मेंदूतील खालच्या भागात (गंडस्थल किंवा कानफाड - (Temporal Lobe) स्मृतिकेंद्र आहे. डॉ. पेनफिल्डनी मेंदूतील या भागाचे काम कसे चालते, याचा विस्तृत अभ्यास करण्याच्या हेतूने विद्युत्प्रवाहयुक्त अत्यंत बारीक अशा तारेच्या सहाय्याने या पेशींना स्पर्श केला. त्यांना असे दिसून आले, की प्रेरक विद्युत् अग्राच्या (Electrode) स्पर्शाने भूतकाळातील

आठवणींचे पुनरुज्जीवन केले जाऊ शकते. या प्रयोगांवरून डॉ. पेनफिल्डनी असा निष्कर्ष काढला, की विद्युदग्राच्या स्पर्शाने केवळ एका स्मृतीचे पुन्हा स्मरण होते. विस्तृत किंवा व्यापक स्मृतींची आठवण होत नाही. या महत्त्वपूर्ण शोधाचा अन्वयार्थ असा होतो, की केवळ गतकाळातील घटनाच व्यापक रूपाने स्मृतिबद्ध नसतात तर त्यांच्याशी संबंधित भावनादेखील स्मृतिबद्ध असतात. दृश्य (दिसणारे) व त्यांच्याशी संबंधित भावना नाडीकोशात अशाप्रकारे एकमेकांत मिसळून गेलेल्या असतात, की त्यांना एकमेकांपासून वेगळे करणे व त्यांचे पुन:स्मरण करणे शक्य नसते. आणि हे देखील लक्षात आले, की केवळ तेच संवेदनात्मक घटक स्मृतिबद्ध होतात, ज्यावर व्यक्ती आपले ध्यान केंद्रित करू शकते. केंद्रीय नाडीव्यवस्थेत (संस्थेत) सतत येणारी सर्व उद्दीपने स्मृतिबद्ध होत नाहीत. गतकालीन अत्यंत जटिल (गुंतागुंतीच्या) अशा स्मृतींच्या साखळीच्या पुन:स्मरणाने हे सिद्ध होते, की प्रत्येक स्मृतीचा एक वेगळा तंत्रिकामार्ग आहे. एका उद्दीपनाच्या प्रक्रियेत व्यक्ती अगदी थोड्या वेळाकरता (काही अत्यल्प काळ) वर्तमानातून हळूच भूतकाळात जाते. शास्त्रज्ञ पेनफिल्डच्या मताप्रमाणे ''मेंदू एका हाई फाइडेलिटी (High Fidelity) अत्यंत प्रामाणिक किंवा अचूक अशा) टेपरेकॉर्डरप्रमाणे काम करतो. मेंदूरूपी या टेपरेकॉर्डरात केवळ जन्मानंतरचेच नव्हे, तर जन्माआधीचे पण संस्कार मुद्रित झालेले असतात.''

वर सांगितल्याप्रमाणे सर्वसाधारणपणे वैज्ञानिक (शास्त्रीय) पद्धतीने गतकालीन संस्कारांचे ज्ञान होऊ शकते, तर योगियाला परमोच्च शक्तीच्या मदतीने जन्मजन्मांतरीचे दबलेल्या संस्कारांव्यतिरिक्त अचिंत्य व आश्चर्यकारक संदेश प्राप्त होत असतील तर त्यात (कसलेही) आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. परंतु यासाठी सहाव्या भूमि-आज्ञा चक्रात पोहोचणे व स्थिरावणे अत्यावश्यक आहे. ध्यानाची ही परम उच्च अवस्था प्राप्त करून घेणे हे सोपे काम नाही; पण महत्त्वाची गोष्ट म्हणजे यासाठी साधकाला चांगल्या गुरूच्या देखरेखीखाली साधना करायला हवी. असा हा गुरू योगिक क्रिया, मन, आत्मा या सर्व गोष्टींचा जाणकार व अनुभवी हवा. अशा आत्मिक योगाच्या सर्व क्रियांचा अभ्यास आत्मज्ञानी गुरूच्याच देखरेखीखाली व्हावा, असे सर्व धर्मावलंबी साधकांचे म्हणणे असते. उदाहरणार्थ - नोबेल पुरस्कार विजेत्या कोणाही

महान शास्त्रज्ञाच्या जीवनाचे अवलोकन केल्यास असे दिसून येते, की त्याला मिळालेले यश हे त्याची कठोर मेहनत, विद्यालय व महाविद्यालयातील त्याचे काम व त्याला लाभलेल्या ज्ञानी व अनुभवी मार्गदर्शकावर अवलंबून असते. एकाच प्रश्नावर, एकाच विषयावर मन लावून वर्षानुवर्षे सतत केलेल्या संशोधनाचे फळ त्याला मिळते. येथे आपण आत्मसाक्षात्कारासारख्या महत्त्वाच्या व जटिल (किचकट) विषयावर विचार करीत आहोत. अशा विषयाचे समाधान अत्यंत कुशल, अनुभवी अशा मार्गदर्शकाच्या देखरेखीखाली होणे आवश्यक असते. साधकाला सांसारिक बंधनातून मुक्त करून आध्यात्मिकतेची जाण करून देणारे असे मोठे सत्पुरुष विरळच असतात. आपल्या या आध्यात्मिक मार्गासाठी साधकांनी प्रामाणिक व योग्यताप्राप्त अशा मार्गदर्शकाचा शोध घेण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत, तसेच डोळसपणे त्याची निवड केली पाहिजे. योगसाधनेच्या या मार्गासाठी अनुभवी पथप्रदर्शक असणे ही अत्यावश्यक गोष्ट असते. त्याचप्रमाणे त्या मार्गदर्शकाचा धर्म, जाती, संप्रदायांविषयी संकुचित दृष्टिकोन असता कामा नये. मान-सन्मानाचा लोभ त्याला नसावा. हा मार्ग दाखविणारा सर्व प्राणिमात्रांत त्या परमात्म्याला पाहणारा व सर्वांचे कल्याण करणारा असा असावा. अशा प्रकारचा मार्गदर्शक शोधण्याआधी साधकाने थोडे अंतर्मुख होऊन आपल्या योग्यतेचा देखील विचार करावा, दोघांमध्ये गुरू-शिष्याचा संबंध कायम स्वरूपाचा राहावा. साधकाने हे विसरता कामा नये की तो (मी) शिष्य आहे व सदा-सर्वदा शिष्यच राहणार आहे'. या सांगितलेल्या सिद्धांताचे पालन त्यांनी केले पाहिजे- शम, दम, उपरती, तितिक्षा (सहनशीलता), समाधान व श्रद्धा. आध्यात्मिक अनुभव व आस्था या आत्मिक व अतींद्रिय असतात. परंतु हेही लक्षात ठेवले पाहिजे, की अशा आध्यात्मिक घटनांचा (अनुभवांचा) आधार हाडा-मासांचे हे शरीरच असते. माणसाचा हा देह म्हणजे परमेश्वराने निर्माण केलेली एक अद्‌भुत व अनुपमेय अशी कलाकृती किंवा रचना आहे. हा देह त्रिगुणमय प्रकृतीने युक्त असा आहे. बुद्धी व ज्ञान त्याच्या सीमा आहेत. तो जेव्हा परमावस्थेला पोचतो, तेव्हा तो असीम होतो. वेगवेगळ्या धर्मांच्या, पंथांच्या संत-महात्म्यांच्या चरित्रांवरून हेच दिसून येते. योगियांना असीम, अलौकिक व अतींद्रिय असे जे अनुभव प्राप्त झाले आहेत, त्यांचे रहस्य अद्याप विज्ञानाला समजलेले नाही.

डॉ. पॉल ब्रँटन यांनी डॉ. कार्ल के. डॅरो यांच्या 'रेनेसन्स ऑफ फिजिक्स' या पुस्तकातील एक अवतरण आपल्या 'दी इनर रियॅलिटी' या पुस्तकात दिले आहे ते असे - भौतिक तत्त्वांना (पदार्थांना) वैज्ञानिक पद्धतीने ऊर्जा (शक्ती) व ज्योती यात रूपांतरित करणे शक्य आहे. अविनाशी परमाणूचे शक्तिशाली विद्युत् अणूंमध्ये विघटन करणे शक्य आहे. ज्योती (प्रकाश)चे सूक्ष्म कण म्हणजे फोटॉन तसेच भौतिक तत्त्वा (पदार्था)चे सूक्ष्म कण विद्युत् अणु, इलेक्ट्रॉन हे सर्व पूर्णतः लोप पावतात किंवा परस्परांत परिवर्तित होतात. भौतिक तत्त्वाचे स्थायित्व नाहीसे होते. कारण भौतिक तत्त्वांच्या विद्युत् कणांना आपण प्रकाशाच्या रूपात बदलू शकतो. कुठलाही पदार्थ किंवा कुठलेही तत्त्व स्थायी (सदा त्याच रूपात राहणे) नाही, इतकेच नव्हे, तर स्वतः प्रकाश (ज्योती) देखील स्थायी नाही. जे काही स्थायी किंवा स्थिर असे आहे असे आपण म्हणतो, ते क्रमाक्रमाने सर्व रूपे धारण करते आणि असे एका रूपातून दुसऱ्या रूपात बदलत असताना देखील ते अक्षय किंवा अविनाशी असते. माझ्या समजुतीप्रमाणे या अनश्वर किंवा अविनाशी तत्त्वाला 'ऊर्जा' हेच नाव योग्य आहे. परंतु नावात काय? त्याला (नावाला) अधिक महत्त्व देण्याचे कारण नाही.

परमाणु सिद्धांत बऱ्याच काळापासून अस्तित्वात होता; परंतु प्रकृतीची एकता किंवा ऐक्य मान्य करणारी, स्वीकार करणारी इतिहासात आमची पिढीच पहिली म्हणावी लागेल आणि ते देखील आधारहीन सिद्धांतांसारखे नाही, तर एक शास्त्रीय सिद्धांत म्हणून. जो साधार तथ्यांवर अवलंबित असा.

विज्ञानाच्या क्षेत्रातील बरीच संशोधने एकाच तत्त्वाला किंवा पदार्थाला भौतिक किंवा पार्थिव जगाच्या सर्व अभिव्यक्तींचा आधार मानतात. प्राचीन विद्वानांनी व तत्त्ववेत्त्यांनी याच विश्वासाची पुष्टी केली आहे. या सत् आधाराचा प्रकट अनुभव करणे हेच ध्यानाचे परम उद्दिष्ट आहे. दोन विचारांमधील जे अदृश्य शक्तीरूप आहे, तेच केवळ सत् होय. योगीजन या ध्यानाच्या अवस्थेत त्या सत् पदाचा अनुभव आपल्या चित्तरूपी स्फटिकमण्यात करतात. जसजसे ध्यान प्रगाढ होत जाते, तसतसे चराचरांत व्यापून राहिलेला 'अखंड मंडलाकार' ज्योतीच्या रूपात प्रकट होत जातो. सुरुवातीला अभ्यासाच्या अवस्थेत म्हणजे अभ्यास करीत असताना आमच्या कामना (इच्छा) त्यात अडचणी निर्माण

करतात व आपल्याला यश मिळत नाही; परंतु काही काळानंतर थोडीशी का होईना, त्या ज्योतीची झलक अनुभवता येते, हा अनुभवही काही कमी महत्त्वाचा नाही.

**'नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ।**
**स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥२.४०॥**

(भगवत्गीता)

(ह्यात पूर्वी आरंभिलेल्या कार्याचा नाश होत नाही व त्यात पुढे विघ्न येत नाही. अशा या धर्माचे अल्प आचरणही मोठ्या भयापासून रक्षण करते.)

**'ध्येय ध्याता ध्यान त्रिपुटी वेगळा ।**
**सहस्रदळी उगवला सूर्य जैसा ॥**
**ज्ञानदेव म्हणे, नैनाची ज्योति ।**
**या नामें रूपे, ती तुम्हीं जाणा ॥'**

- ज्ञानेश्वर

*'या देहाचे डोळे हेच 'प्रकाश' होय, हे डोळे जर एक झाले, तर सारा देह प्रकाशाने भरून जाईल. परमेश्वर हा देखील दिव्य प्रकाशच आहे.'*

- बायबल

'तो अल्ला आकाश व पृथ्वीचा प्रकाश आहे. त्याचे असे आहे - एक कोनाडा आहे, तिथे एक दिवा आहे आणि तो दिवा काचेच्या कंदिलात आहे. तो कंदिल एका नक्षत्रासारखा चमकतो आहे. कृपावंत अशा जैतून वृक्षापासून त्याला तेल मिळते, तो न पूर्वेचा आहे, न पश्चिमेचा. त्याचे तेल इतके शुद्ध व स्वच्छ आहे, की त्याला अग्नीच्या स्पर्शाची पण आवश्यकता नाही. ते आपोआपच पेटते. अल्लाचे प्रेम ज्यांच्यावर आहे, त्याला तो प्रकाश देतो, दाखवतो. तो सर्वज्ञ आहे व दाखले देऊन सर्वांना मार्गदर्शन करतो.'

- कुरान

**'अव्वल अल्ला नूर उपाया, कुदरत के सब बंदे ।**
**एक नूरते सब जग उपजा, कौन भले को मदे ॥'**

- गुरु नानक

**''सोहमस्मि इतिवृत्ति अखंडा ।**
**दीप सिखा सोई परम प्रचंडा ॥**

**आतम अनुभव सुख सुप्रकासा ।**
**तब भव मूल भ्रम नासा ॥"**

**- तुलसीरामायण**

*(तो मीच आहे अशी वृत्ती निरंतर ठेवावी. तो परमेश्वर प्रचंड (दिव्य) प्रकाशासारखा आहे. आत्म्याच्या अनुभवाने साधकाला सुखदायक असा प्रकाश लाभतो, तेव्हा या जगातील भ्रमाचा नाश होतो.)*

या जगातील सारे धर्म, सारे संप्रदाय या दिव्य प्रकाशाला मानतात. वर सांगितल्याप्रमाणे बायबलमध्ये त्याला दिव्य ज्योती म्हटले आहे, कुराणात तो 'अल्ला नूर' आहे, हिंदू धर्मानुसार आत्मा ज्योतिर्मय आहे. जगातील सर्व धर्मांत हा दिव्य प्रकाश आहे. तो सर्व धर्मांना जोडतो. या दिव्य प्रकाशाचा साक्षात्कार होणे, हेच साधकाचे परमकर्तव्य व उद्दिष्ट असले पाहिजे.

परमेश्वर दिव्य प्रकाशमान पुंज आहे. त्यात आपापल्या वेगवेगळ्या आस्था, विश्वासानुरूप आपण राम, कृष्ण, ईसा, मोहम्मद आदींचे दर्शन करू शकतो. हा आत्मस्वरूप आहे, तो स्वत:च्या प्रकाशाने प्रकाशित होतो. सहाव्या आज्ञाचक्रात त्याचा अनुभव होतो. हाच सगुण साकार आहे. परंतु अंतिम सत्य याच्याही पलीकडे आहे, जिथे केवळ परमसत्यच आहे.

**॥ ॐ ॥**

*व्यावहारिक ज्ञान देणारी सर्व प्रमाणे आत्म्याचे ज्ञान देण्यास असमर्थ ठरतात. मग आत्मज्ञानासाठी कोणते प्रमाण आहे. शास्त्रकार सांगतात -*

*वेदान्तो नाम उपनिषद् प्रमाणम् ।*

*वेदान्त म्हणजे उपनिषदे आत्मस्वरूपाचे ज्ञान देण्यासाठी प्रमाण आहेत. ज्याप्रमाणे आपले मुख पाहण्यासाठी दर्पणाची आवश्यकता आहे, त्याप्रमाणे आत्म्याचे स्वरूप पाहण्यासाठी वेदांतशास्त्र म्हणजे उपनिषदे दर्पणाप्रमाणे आहेत. कारण सर्व उपनिषदे आपले अज्ञान दूर करून शुद्ध आत्मस्वरूप प्रकट करतात. साधकाला संच्चिदानंदाची प्राप्ती करून देऊन तृप्त, संतुष्ट करतात. म्हणून साधकाने जिज्ञासूने वेदांतशास्त्राचा आश्रय घ्यावा.*

***- साधना आणि साध्य***

# परमपूज्य गुरुजींकडून शंकानिरसन

**शंका : आध्यात्मिक सद्‌गुरूची व्याख्या काय असावी?**

समाधान : जो योगसाधनेत निपुण आहे, जो शास्त्ररूपी समुद्राचे अवगाहन करतो, नेहमी समता रसरूपी सागरात चिंब रहातो, जो क्षमा करण्यास सर्वदा सक्षम असून आपल्या इंद्रियांचे दमन करणारा असतो, एकमात्र आत्मकल्याणात निष्ठापूर्वक रमणारा असतो, आपल्या शिष्यांचे चित्त, स्पर्शमात्रेण शुद्ध करतो, जो स्वत: भवसागर पोहून जातो आणि दुसऱ्यांना नि:स्वार्थ भावानी तारण्यास मदत करतो, ज्यांना आत्मज्ञान व शरीरविज्ञानाचा पूर्ण अनुभव आहे, अशी व्यक्ती सद्‌गुरूपदास पात्र व त्या पदाची अधिकारी असते.

**शंका : योगी कोणत्या गुणाचे अधिकारी असतात?**

समाधान : योग्यास अतीन्द्रिय पदार्थांचे ज्ञान होते. ते भूत, भविष्य, वर्तमानास साक्षात पहातात. ह्यालाच सर्वंकष सर्वज्ञतेचे बीज म्हटले जाते.

**शंका : अध्यात्मात रत्नत्रय कशाला मानले गेले आहे?**

समाधान : सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चरित्र यास रत्नत्रय मानले गेले आहे.

**शंका : सम्यक दर्शन, सम्यक ज्ञान व सम्यक चरित्र याची व्याख्या**

काय?

समाधान : १) **सम्यक् दर्शन :** ज्या गुणामुळे किंवा शक्तीच्या विकासामुळे सत्य अथवा तत्त्वाची प्रतीति होते, त्या गुण किंवा शक्तीस सम्यक् दर्शन म्हटले जाते.

२) **सम्यक ज्ञान :** प्रमाणासह जीवादि तत्त्वांचा बोध झाल्यावर त्यांस सम्यक ज्ञान समजले पाहिजे.

३) **सम्यक चरित्र :** काशायदिक भाव आणि राग, द्वेष, काम, क्रोध, लोभ, भीति, मानसन्मान, घृणा, लाज, लज्जा आदींच्या निवृत्तीमुळे प्राप्त होणाऱ्या स्वरूपास सम्यक् चरित्र वा पूर्ण चरित्र म्हणजे मोक्ष - कैवल्य म्हणतात. ह्यालाच चारित्र्य (Character) म्हटले जाते.

साधनेच्या माध्यमातून साधक ह्या रत्नत्रयास प्राप्त करून मुक्तावस्था प्राप्त करतो.

**शंका : आत्म्याचे संक्षिप्त गुणधर्म काय?**

समाधान : आत्मा निर्मळ आहे. आत्मा परम, अचल अविनाशी, सर्वत्र, सर्वज्ञ, सर्वशक्तिमान, अजर अमर आहे. आत्म्यास जन्म-मरण नाही. आत्मा सदा नवीन व एकरस आहे. आत्मा परमतत्त्व (Divine Energy) आहे. आत्मा सदा पूर्ण आहे. ह्या आत्म्याला 'आप' नाम मी दिले आहे. 'आप' म्हणजे पाणी- पण आपण नेहमीकरिता आपल्या 'आप' ला (आत्म्याला) विसरलोत, तर केवळ पाणी राहील.

**शंका : आत्मा कोणत्या (भव) जन्मात मुक्त होण्यास समर्थ होतो?**

समाधान : आत्मा आपल्या मानवजन्मात साधनेद्वारा मुक्त होण्यास सक्षम आहे.

केवळ मान व परमपद प्राप्त करून स्वत:ला जीवन-मरणाच्या फेऱ्यातून मुक्त करू शकतो.

**शंका : पुनर्जन्माच्या मान्यतेविषयी मार्गदर्शन करावे.**

समाधान पुनर्जन्मास मान्यता आहे. पुनर्जन्म असतो, हे सत्य आणि शाश्वत आहे.

**शंका :** **साधनेद्वारा पुरुष आणि स्त्री आत्मसाक्षात्काराकरिता समान रूपानी सक्षम आहे काय?**

समाधान : सद्गुरूच्या सान्निध्यात दोन्ही पुरुष आणि स्त्री साधनेद्वारा आत्मसाक्षात्कार करण्याचे अधिकारी आहेत. आपल्याच परिवारातील महिला साधकामध्ये पुष्कळांची स्थिती योगदर्शनानुसार चांगल्या गुणस्थानी आहे. त्या सर्व ह्या सत्याच्या साक्षी आहेत. अनेक महिलांना आत्मसाक्षात्कार झाला आहे. आपले शास्त्र देखील त्यांच्याकरिता साक्षी आहे.

**शंका :** **निष्काम कर्म कशाला म्हणावे?**

समाधान : आत्म्यात क्रीडा करणारे सिद्ध लोक आत्मसाक्षात्काराकरिता जे कर्म करतात, त्यास योगाच्या भाषेत निष्काम कर्म मानले गेले आहे. आत्मक्रीडा सिद्ध लोक आत्मसाक्षात्काररूपी वृक्षाचे बीजारोपण करतात आणि हे बीज अक्षय असते. फलरूप ह्यांत कुठलाही दोष नसतो. कर्म करतेवेळी ते कर्म बंधनाचे निमित्त नसते.

**शंका :** **मुख्य कोष किती मानले गेले आहेत?**

समाधान : १) अन्नमय कोष, २) मनोमय कोष, ३) प्राणमय कोष, ४) विज्ञानमय कोष, ५) आनंदमय कोष ह्या प्रकारे पांच कोष आहेत.

**शंका :** **बुद्धी शुद्ध केव्हा होते?**

समाधान : बुद्धीच्या १) प्रमाण, २) विपर्याय, ३) विकल्प, ४) निद्रा आणि ५) स्मृती ह्या पांच वृत्ती आहेत. जेव्हा बुद्धी ह्या सर्व वृत्तीपासून वंचित होते तेव्हा ती शुद्धबुद्धी म्हटली जाते. जेव्हां बुद्धी शुद्ध होते तेव्हा ती प्रकृतीमध्ये लीन होते व तेव्हा पुरुष पण प्रकृतीमध्ये लीन होतो. ह्या स्थितीस कैवल्य म्हणतात. कैवल्य प्राप्त झाल्यावर सुद्धा परिस्थितीवश केवळ पुरुष शिल्लक राहतो. ही स्थिती आयुष्य पूर्ण होईपर्यंत (देह सुटेपर्यंत) रहाते.

**शंका :** **मनुष्याचा जन्म व पुनर्जन्म त्याच्या स्वत:च्या इच्छेवर अवलंबून असतो काय?**

समाधान : मनुष्य असहाय किंवा निरिच्छ प्राणी नव्हे की जो प्रकृति किंवा मनास येईल तशा काल्पनिक इच्छाशक्तीच्या वशीभूत होऊन राहील. मनुष्य आपल्या कर्मांना, चरित्रास, तसेच सभोवतीच्या घटनांना नियंत्रित व परिवर्तित करण्यास समर्थ आहे. म्हणून कर्म, चरित्र आणि घटनांचे परिणामाकरिता स्वत: उत्तरदायी आहे.

म्हणून म्हणतात की गेलेला काळ मेला आहे आणि येणाऱ्या काळाचा अजून जन्म व्हायचा आहे. तेव्हां वर्तमान आपल्या हातात असताना भविष्याची चिंता कशाला करायची? केवळ मनुष्यातच स्वत:स बदलण्याची शक्ती विद्यमान आहे आणि स्वत:चा उत्कर्ष, परमोत्कर्ष करून घेण्याची क्षमता आहे. तेव्हा हे सिद्धच आहे, की मनुष्याचा जन्म आणि पुनर्जन्म त्याच्या इच्छेवर अवलंबून आहे.

**शंका : साधकांच्या मुख्य श्रेणीचे वर्गीकरण कसे केले आहे?**

समाधान : देशकालानुरूप साधकांच्या मुख्य तीन श्रेणी होतात.

१) **ऋतु प्राज्ञ** - हे सरळहृदयी व समजूतदार असतात, तसेच लवकर आकलन करतात. गुरुआदेशाचे पूर्णपणे पालन करतात.

२) **ऋजु जड** - ह्याच्याकरिता गुरुवाणी समजणे कठीण होते पण समजल्यावर त्याचे पालन चांगल्या तऱ्हेने करतात.

३) **वक्र जड** - गुरू आदेश (वाणी) समजण्यास अवघड वाटते व तिचे पालन करण्यासही कठीणता अनुभवास येते. त्याकरिता तर्ककुतर्कांचा अवलंब घेतात. ऋजुचा अर्थ कुंडलिनी.

**शंका : आत्म्याचा स्वभावविशेष काय?**

समाधान : ज्याप्रमाणे हवा भरलेला फुगा वर जातो तद्वत् आत्म्याचा स्वभाव, साधनाकाळात, वर वर जाण्याचा (ऊर्ध्वगति) असतो. सुषुम्ना नाडीद्वारा साधक आपल्या मनुष्यजन्मात आध्यात्मिक उपलब्धी प्राप्त करून घेईल तर त्याचे आत्मकल्याण नि:संशय होईलच.

अशा आध्यात्मिक स्थितीत आत्मा आपल्या स्वभावानुसार वर-वरच्या गुणकेंद्राकडे जाईल.

**शंका : कुठल्या श्रेणीत मानवाला देव किंवा दानवाची संज्ञा प्राप्त होते?**

समाधान : जोपर्यंत मानव मानवतेच्या सीमेत वावरतो तेव्हा तो मानव नसून देव असतो. जेव्हा तो साधनेशिवाय देवत्त्वाचा अनुभव करतो (किंवा तसा वागण्याचा प्रयत्न करतो) तेव्हा तो मानव नसून दानव असतो.

**शंका : खऱ्या अर्थांनी समर्पण कशाला म्हणायचे?**

समाधान : मनाबरोबरच अंतस्थ भावाचे पूर्ण समर्पण झाले पाहिजे. ह्यालाच खरे समर्पण म्हणतात.

**शंका : भावातीत स्थिती केव्हा होते?**

समाधान : सद्गुरूच्या प्रभावामुळे साधकाला जे अनुभव जाणवतात अशा स्थितीस भावातीत स्थिती म्हणतात.

**शंका : साधकाच्या शरीराला देवालय अवस्था केव्हा प्राप्त करते?**

समाधान : आज्ञाचक्रानंतर साधक साधनेद्वारा जशी जशी ऊर्ध्वगती प्राप्त करितो तशा अवस्थेत त्याचा देह स्थूल शरीर न राहता देवालय अवस्थेत स्थित असतो.

**शंका : आदरणीय गुरुजी, एक किम्वदन्ती आहे, की स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही. ह्याचा योगदर्शनात काय मतितार्थ आहे?**

समाधान : सद्गुरूच्या सान्निध्यात राहून अभ्यासाद्वारा साधक गुणस्थानांच्या केन्द्रात आत्म्याच्या गुणानुरूप वर चढत जातो (ऊर्ध्वगती प्राप्त करतो) जेव्हा साधक ९९ गुणस्थानात स्थापित होतो तेव्हा त्याच्या अवस्थेस समाधिअवस्था म्हणतात. अशी स्थिती मृत्यु अवस्थेसारखीच असते. पण अशा अवस्थेत साधकाचे शरीर गळत नाही, आखडत नाही, सडत नाही. साधकाच्या शरीराजवळ कुठल्याही प्रकारचे जीवजंतु जाऊन त्यास हानी करीत नाहीत. अशा वेळी साधकाचे प्रभामंडळ त्याच्या शरीराचे रक्षण करीत असते.

साधकाचे ते शरीर यथावकाश पूर्ववत सामान्य स्थिती प्राप्त

करिते. अशा प्रकारे साधक शेष संचित कर्माचा भोग घेऊन साधनेद्वारा पुढील गुणकेंद्राकडे अग्रेसर होत असतो. अशा अवस्थेत साधक 'अष्टसिद्धी' व 'नवनिधि' सारख्या शक्ती प्राप्त करतो. परंतु योगदर्शनात अशा सिद्धींना निषिद्ध मानले आहे. ह्या अवस्थेत साधक वर वाढत वाढत मुक्तावस्थेस प्राप्त होतो. अशा अवस्थेस व्यावहारिक भाषेत 'स्वर्ग' म्हणतात.

ह्या संपूर्ण आध्यात्मिक स्थितीस स्वत: मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाही असे म्हटले जाते. पण ही किम्वदन्ती नसून शाश्वत आहे.

शंका : **अरिहन्त, सिद्ध, मारक आणि कारक ह्या स्थिती (अवस्था) कशा असतात?**

समाधान : अरिहन्तकारक होय. सिद्ध निराकार होय. मारक निर्जिव होय. कारक सजीव होय.

शंका : **कोणते सुख अक्षय सुख म्हटले जाते?**

समाधान : आत्म्याची मुक्ती हे अक्षय सुख होय. त्या अवस्थेचा कधीच अंत होत नाही. दुसऱ्या साऱ्या सुखांचा अंत होतो.

शंका : **आध्यात्मिक संसाराचा परिवार कसा असतो?**

समाधान : धैर्य पिता होय, क्षमा माता होय, शान्ति पत्नी होय, सत्य आणि अनुभवाचे बोल हे पुत्र. दया बहीण, संयम ब्रह्मचर्य, बंधू भूमि - शय्या. दहा निशा - वस्त्र, अमृत-भोजन (मुक्ती प्राप्तीकरिता साधना) मानव साधनेद्वारा ह्या परिवारास प्राप्त करू शकतो. योगात साधकाच्या अशा स्थितीस उच्चतम स्थिती मानली गेली आहे.

शंका : **आध्यात्मिक दीक्षा देण्याचा अधिकार कोणाचा असतो?**

समाधान : आध्यात्मिक दीक्षा देण्याचा अधिकार केवळ सद्गुरूचा होय. त्याला भारतीय दर्शनाची मान्यता आहे. दीक्षा देणाऱ्यास आत्मबोध व शरीरबोध होणे आवश्यक आहे, तेव्हांच ती व्यक्ती दीक्षा देण्यास अधिकारी होते.

शंका : **साधक अंतरजगतात केव्हा जातो?**

समाधान : जोपर्यंत साधक सद्गुरूच्या सान्निध्यात आपल्या साधनेद्वारा

सुषुम्ना नाडीचे द्वार उघडीत नाही, तोपर्यंत तो अंतरजगतात जात नाही. तो मृत्युकेन्द्रावर, मृत्यूभयावर विजय प्राप्त करतो. प्राण कंठगत होतात. ह्यावेळी केवळ संचित कर्मे रहातात. नवीन कर्मबंध होत नाहीत व झालेच तर त्याचे वार्धक्य होत रहाते (क्षीण होत रहातात) अर्जित कर्मांचा विनाश होत रहातो. साधक ऊर्ध्वगतीकडे जातो. ह्यावेळी त्यांच्या दृष्टीला सर्व भूमण्डळ प्रकाशमय दिसते. ब्रह्मरंध्र कळस आहे. मेरुदंडाच्या वरील भाग सरळ ताठ आहे. साधक अशा अवस्थेस पोचल्यावर परमपद प्राप्त करतो.

**शंका : आध्यात्मिक जगतात योग्याची स्थिती कशी होते?**

समाधान : योगी स्वत: मुक्त अवस्था प्राप्त करण्यास सक्षम असतो. योगी अभय होतात. त्यांना काळाचे भय रहात नाही. असे योगी आपल्या शिष्य-साधकांना आपल्यासारखीच आध्यात्मिक अवस्था प्राप्त करवून देण्यास सक्षम होतात. त्यांना वाचासिद्धी प्राप्त होऊन त्यानुसार फळे मिळतात. आत्मयोगामुळे त्यांची बुद्धी सूक्ष्म होत जाते, हीच आत्मज्योति होय. ते स्वत:वर सुनियंत्रण प्राप्त करतात. ह्या ठिकाणी अरिहंत (कारक किंवा सजीव) स्थिती प्राप्त होते व सिद्धपुरुष होतो. ह्या स्थितीत आत्मा स्वत: काहीही करीत नाही, परंतु त्यांच्या प्रभामंडळाच्या तेजामुळे दुसऱ्यांचे कल्याण होत असते. त्यांना मागील जन्माचा बोध (सांसारिक) होत असतो. ही अवस्था पूर्ण योगेश्वर जाणावी.

**शंका : ॐ ची स्थिती विशद करावी.**

समाधान : साधकाची बुद्धी जेव्हा प्रकाशमान होते तेव्हां त्यांना ती आकाशवाणीद्वारा ऐकू येत असते. ह्याची अनुभूति साधक केवळ त्याच्या साधनेद्वाराच करतो. आत्मा मुक्तावस्थेचा अधिकारी होतो. त्यालाच नाद ॐ ज्ञान म्हणतात. आत्म्याचे नाम ही ॐ आहे. हरि ओम् !

**शंका : निरोध अवस्थेची स्थिती कशी समजावी?**

समाधान : जेव्हां बुद्धी स्वत:त विलीन होते तेव्हां साधकाची जी अवस्था

होते त्यास निरोध म्हणतात. अतिशयता सर्वज्ञतेचे बीज होय. हेच कैवल्यज्ञान होय. अंतर्मुखी गती स्तब्ध होण्याच्या स्थितीस निरोध म्हटले जाते.

शंका : **साधक कोणत्या गुणअवस्थेस पोचल्यानंतर खालच्या स्थितीस येत नाही?**

समाधान : अकराव्या गुणकेंद्रावर प्रारब्धकर्माचा नाश झाल्यावर सद्गुरूच्या कृपाप्रसादामुळे साधक खालच्या पातळीवर येत नाही. साधक १२ व्या गुणकेंद्रावर स्थिर रहातो. आज्ञाचक्रात ज्योति प्रकाशित होते. अशा गुणस्थितीत साधक त्रिकालदर्शी होतो.

शंका : **एकाग्रतेची अवस्था केव्हा प्राप्त होते?**

समाधान : विचारांचा उदय आणि अस्त विलीन झाल्यावर एकाग्रता प्राप्त होते.

शंका : **कोणच्या कारणामुळे जीवास सुख-दु:खाची अनुभूती होते?**

समाधान : जीव आपल्या भूत व वर्तमानकाळात मन, वचन, शरीर, कर्म इत्यादी कारक शक्तींमुळे कर्माचे (सुख आणि दु:ख) उपार्जन करीत असतो. पुण्य व पाप ह्या अर्जित कर्मानुसार सुख व दु:खाच्या रूपानी भोग भोगतो. अर्जित कर्माचे आरोपण जिवाशी लावल्यामुळे देव आणि योगी सुद्धा सुख आणि दु:खाचे भोक्ते होतात. मोह अवस्थेत आत्मा रडारड व हाय हाय करीत कर्मभोग भोगीत असतो; परंतु ज्ञानअवस्थेत आत्मा हसता हसता अर्जित कर्मांचा भोग भोगतो.

शंका : **कोणत्या अवस्थेत आत्मा कर्मबंधाचे उपार्जन करीत नाही?**

समाधान : योगी व सिद्ध जीवांना वेदनीय कर्मे बाधित नसतात. ह्या ठिकाणी कर्माची क्षीण अवस्था होत असते. त्यानंतर आत्मा मुक्त अवस्थेचा अधिकारी होतो.

शंका : **मनुष्यस्वभाव कसा आहे?**

समाधान : स्वभाव म्हणजे सत्त्व, रज व तम. ही प्रकृति आहे. तीन भागात मिश्रित आहे.

**सत्त्वगुण** - अनुभवाचे बोल, आत्मसाक्षात्कारी अनुभवाचे बोल

बोलतात जे सत्यावर आधारित असतात.

**रजोगुण** - ही फलाकांक्षा आहे.

**तमोगुण** - व्यसनाधीन, क्रोध, झोप, खाणे, कुलहीन जनांची मित्रता करणे. काम, क्रोध व लोभ हे नरकाचे द्वार आहे. ह्यांना सोडले पाहिजे.

**शंका : मनसा वाचा कर्मणाचा आशय काय?**

समाधान : शुभाशुभ कर्मामुळे कुणाचेही अहित होत नाही. अकर्मण्य विषयभोगात लिप्त असतो. योगी आपले स्वत:चाच व दुसऱ्यांचा हिताकांक्षी असतो. ते हित करण्यात सक्षम असतात. शत्रुरहित होतात. दुसऱ्याकडूनही हित करवून घेण्यात ते पूर्णरूपेण सक्षम होतात.

**शंका : आत्मबोध, शरीरबोध साधक केव्हा करतो?**

समाधान : जिथे आत्मबोध झालेला असतो तिथे शरीरबोधही होत असतो. धर्मसाधनेकरिता शरीर स्वस्थ असले पाहिजे. जीवांना जी योगानुभूती होते ती शास्त्रोक्त असते.

**शंका : भाषेचे तात्पर्य काय?**

समाधान : भाषा वर्ण, ज्ञान आहे- लिंग नव्हे. भाषा स्त्रीलिंग आहे. भाषा ज्ञान आहे. ही जगतातील वस्तूंना व्यवहारात आणण्याकरिता शिकविली जाते. बोलल्यास ते ज्ञान आणि लिहिल्यास ती भाषा होय. गुरु, माता, शिक्षक, समाज व अतिथी (स्वत:स जाणण्याकरिता जे बोध करवितात) हे पांचही गुरू आहेत. थोडक्यात, जे आपणास माहिती नाही त्याचे ज्ञान करवून देणारे गुरू आहेत. आध्यात्मिक गुरू सजीव आणि कारक असतात. आपल्याकडे कारकासच स्मारक बनविले आहे.

**शंका : साधक उच्चतम गुणस्थानकावर प्रतिष्ठित झाल्यावर कोणत्या अष्टसिद्धी प्राप्त करतो?**

समाधान : साधनेद्वारा आपले मृत्युकेंद्र पार केल्यानंतर जो साधक अग्रेसर होत असतो तेव्हां त्यास अष्टसिद्धी प्राप्त होतात. ह्या अष्टसिद्धी निम्न आहेत.

१) अणिमा - अणुसारखी सूक्ष्मता धारण करण्याची क्षमता.

२) महिमा - पर्वतासारखे मोठे रूप धारण करण्याची क्षमता.

३) लागिमा - लहानात लहान (सूक्ष्म) रूप धारण करू शकतो.

४) गरिमा - सर्व काही करण्याची क्षमता असते.

५) व्याप्ती - सर्वकाळ संतुष्ट असणे.

६) प्रकाम्य - त्याच्या प्रभावामुळे सर्व कार्ये आपोआप होतात.

७) ईशीत्व - आपल्या प्रभावानी सर्वांना वश करण्याची क्षमता येणे.

८) वशित्व - अजातशत्रू, म्हणजे त्याला कोणीही शत्रू असत नाही.

**शंका : अष्टसिद्धी प्राप्त करण्याबरोबरच साधकास जे नवनिधी प्राप्त होतात ते कोणते?**

समाधान : साधक ज्या गुणकेंद्रावर अष्टसिद्धी व नवनिधी प्राप्त करतो तिथे तो अरिहंत (सजीव) पद मिळविण्यास सक्षम होतो. इथे तो सर्वकाही करण्यास पूर्ण अधिकारी होतो. साधकास केवळ जीवनमुक्ती हवी असते. त्यामुळे तो ह्या सिद्धी व नवनिधीचा उपयोग करीत नाही. त्याचे लक्ष्य केवळ मुक्ती प्राप्त करण्याकडे असते. अत: तो ह्या लक्षाकरिताच समर्पित असतो आणि त्याचा स्वत: अधिकारी रहातो.

**नवनिधि निम्न प्रकारे आहेत.**

१) प्रज्ञा - भूत-भविष्य जाणणे

२) परकायाप्रवेश

३) काहयू - एकाच वेळी अनेक जागी प्रगट होणे.

४) जीवनदान

५) जीवहरण

६) जीवकरण

७) सर्गकरण - प्रतिष्ठापित करणे

९) सर्गहरण - अप्रतिष्ठा करणे

१०) दूरदृष्टी, दूर श्रवण

जी व्यक्ती ह्या अपार शक्तिशाली नवनिधी व अष्टसिद्धी धारण करणाऱ्या महात्म्याच्या बाबतीत समर्पणभाव धारण करते ती व्यक्तीपण स्वत:चे आत्मकल्याण करण्यास सक्षम होते. ज्या साधकास ह्या आध्यात्मिक शक्ती प्राप्त होतात, ते साधक आपले स्वत:चे व दुसऱ्याचे आत्मकल्याण साधण्यास त्यांचा उपयोग करतात.

**शंका : जे तांत्रिक लोक साधनेद्वारा विद्या प्राप्त करून नंतर तंत्र-मंत्रात संलग्न रहातात ते कोणत्या आत्मकल्याणाचे अधिकारी आहेत?**

समाधान : आध्यात्मिक शक्तींचा आत्मकल्याणाशिवाय उपयोग करणे स्पष्टत: निषिद्ध मानले गेले आहे. अत: सिद्धींचा उपयोग आत्मकल्याणात सहायक होत नाही.

**शंका : नमो शब्दाचा आशय काय?**

समाधान : धर्मशास्त्राच्या दृष्टीने ह्याचा आशय विनय आहे. गुरूची सेवा ही विनय होय. नमो शब्दांची संधि-विच्छेद-न + अ + म + ओ अशी असून हे सर्व वर्ण आहेत. ह्या वर्णास उलट क्रमानी वाचल्यास ओ + म + अ + न म्हणजे ॐ शब्दाची उत्पत्ती होते.

नमो चा प्रभाव कल्याणकारी आहे.

**शंका : साधक साधनमार्गात अधोगतीस केव्हां लागतो?**

समाधान : साधनाकाळात साधकाची अधोगती होण्यास बरीच कारणे आहेत. त्यातील एक म्हणजे साधक जेव्हा आज्ञाचक्रात पोचतो, तेव्हां त्याच्या अधोगतीचे भय रहाते. ह्या स्थानावर म्हणजे तृतीय नेत्र Peinial Body ज्यास Mijestirials Gland म्हणतात, Gonedal चा स्राव होत असतो. ह्या स्रावामुळे कामवासना बळावते व इथेच साधक भ्रष्ट होण्याचे भय असते. ह्या अवस्थेत तो आपल्यावर ताबा ठेवू शकत नाही व त्याचे पतन होत असते. ह्याकरीता स्वत:चे मरण पाहणे आवश्यक आहे. जोपर्यंत तो स्वत:चे मरण पाहून आज्ञाचक्राच्या पुढे जात

नाही तोपर्यंत त्याचे पतन होण्याची संभावना असते.

**शंका :** **मृत्युकेंद्रास भेदून जात असता जेव्हां साधक समाधी अवस्थेस प्राप्त होतो तेव्हां काय त्याच्या देहाचा अंत होतो?**

समाधान : मृत्युकेंद्रास भेदून जात असता जेव्हां साधक समाधिअवस्थेस प्राप्त होतो, त्यावेळी तो शरीरासहित माघारा वळून आध्यात्मिक क्रिया पूर्ण करण्यात संलग्न होतो. जसे कर्मांना क्षीण करून स्वत:स पुढच्या केंद्रात स्थापित करणे. अशा स्थितीत साधकाच्या भृकुटिमध्यात स्वर्णिमय प्रकाशाच्या रूपात ज्योति-जी अत्यंत तलम दोऱ्याप्रमाणे असते-प्रकाशित होते. त्यामुळे ते केंद्र ज्योतिर्मय प्रकाशाने प्रकाशित होत असते. साधकाच्या शरीराची कुठल्याही प्रकारे हानी होत नाही. हा सगळा ज्योतीचा प्रभाव आहे. ह्या ठिकाणी ज्योतीचा संपर्क जर तुटला तर तो निर्वाणगतीस प्राप्त होतो. साधकाचा आत्मा पुन: त्या शरीरात प्रवेश करीत नाही.

**शंका :** **साधकाचे शरीर साधनेच्या कोणत्या काळात तीर्थराज होत असते.**

समाधान : बाराव्या केन्द्रानंतर साधक आत्मदेव केवलीच्या श्रेणीत येतो. कबीरजींनी यास १० वी खिडकी म्हणून संबोधले आहे. आश्रय समाप्त झाल्यावर तो स्वत: तीर्थ होतो. ही स्थिती महान होय. ह्यानंतर दुसरी कोणतीही महान स्थिती नाही. इथे साधक पूर्ण झाला. त्यास तीर्थराज देखील म्हटले जाते. दहा इन्द्रिये व मृत्युकेंद्रावर विजय मिळवून साधक १२ व्या केंद्रावर पोचतो, तेव्हा त्यास घाम येणे बंद होते, त्याचे शरीर देवालय होते व त्याच्या प्रभामंडळामुळे ते स्थान प्रभावित राहते.

**शंका :** **अरिहंत व सिद्ध पुरुषांचे भविष्य काय?**

समाधान : अरिहंत आणि सिद्ध पुरुष पूर्ण असतात, अत: त्यांना काहीही भविष्य नसते.

**शंका :** **साधकाचे आरोहण केव्हा होते?**

समाधान : मृत्युकेंद्रावर विजय मिळविल्यावर साधकाचे आरोहण होते.

आरोहणाशिवाय साधकास साक्षात्कार होत नाही. विधातीय कर्मांच्या (संचित, अर्जित इत्यादि) नाशानंतर आरोहण होत असते. आपले स्मारक केवळ स्मरण करण्याकरिता आहे. साधकास कारक प्रयास करावे लागतात. जसे काडेपेटी व आगकाडीत अग्नी असतो, परंतु जोपर्यंत त्याचे घर्षण होणार नाही तोपर्यंत अग्नी प्रकट होणार नाही, आगकाडी प्रज्ज्वलित होणार नाही.

**शंका :** **साधकास उपजीविका, सुरक्षा, उद्धार इत्यादी संबंधात काय प्रयास करावे लागतात का?**

समाधान : अखंड आत्मशक्ती प्राप्त झाल्यावर साधक आपली सुरक्षा, उपजीविका, आणि आपला उद्धार इत्यादीसंबंधांच्या साधनाप्रती चिंतारहित होतो.

**शंका :** **सूक्ष्म शरीरासंबंधी अध्यात्माची धारणा काय?**

समाधान : प्रत्येक प्राण्याच्या आत सूक्ष्म शरीर वास करते. जेव्हा आत्मा ह्या पंचमहाभूतरूपी शरीराचा त्याग करतो, तेव्हाच सूक्ष्म शरीरही बाहेर पडते आणि हेच परलोकात तेथील जीवन व भोगांचा भोक्ता बनते.

**शंका :** **ब्रह्मरंध्रकेंद्रावर साधकाची स्थिती कशी असते?**

समाधान : साधक जेव्हा स्वत:स ब्रह्मरंध्र केंद्रावर स्थापित करतो तेव्हा अशा स्थितीत त्याची कुण्डलिनी स्थाई होते. ह्यावेळी तो लोभ, भय, षडविकार इत्यादीपासून दिवस, रात्र, देश, काल वगैरेंपासून दूर होतो. विदेही अवस्था प्राप्त होते. सांसारिक संस्कार पूर्ण नष्ट होतात. ही जितेन्द्रिय स्थिती जाणावी. जगतात ह्यापेक्षा महान दुसरा आत्मा नाही.

**शंका :** **आदरणीय गुरुजी! आपल्या सान्निध्यात आपल्या परिवारातील सदस्य जेव्हां उच्च कोटीचे अनुभव प्राप्त करतात, तेव्हा आपण त्यांस म्हणता, की तुम्ही तुमच्या मातेचा उद्धार केलात. ह्याचे तात्पर्य काय?**

समाधान : साधक जेव्हा गुरूच्या सान्निध्यात साधनेद्वारा विशिष्ट

आध्यात्मिक अनुभव प्राप्त करतो तेव्हा त्याच्या आध्यात्मिक कृतीने साधकाची आई आत्मदर्शन प्राप्त करते. आत्मदर्शन प्राप्त करणाऱ्या जीवांचे आत्मकल्याण होते. म्हणून साधकाच्या ह्या उच्चतम आध्यात्मिक स्थितीमुळे त्याच्या आईचे पण आत्मकल्याण होऊन ती ह्या भवसागरातून पार होते.

**शंका : आकाशवाणीद्वारा साधकास संदेश केव्हा प्राप्त होतात?**

समाधान : प्रकाशमय लोकस्थितीत अरिहन्त व सिद्ध पुरुषांना अनेक वेळा अनेक प्रकारांनी आकाशवाणी प्राप्त होत असते. (आदरणीय बंधूंनो! तुम्ही सगळे जाणताच, की पूज्य गुरुजींना आकाशवाणी-द्वारा कित्येकदा संदेश प्राप्त झाले आहेत. पूज्य गुरुजी अशा संदेशाच्या माध्यमातून आपल्या शिष्यपरिवारास वेळोवेळी मार्गदर्शन करून त्यांचे कल्याण करतात)

**शंका : शिष्यसमुदायास आध्यात्मिक योग-शिक्षा देण्याकरिता कोणती अवस्था उचित व सहज असते?**

समाधान : १२ ते १८ वर्षांच्या किशोरावस्थेत त्यांचे मन निर्मळ असते. अधिकतर ते बंधनमुक्त रहातात. ह्या काळात जर सद्‌गुरू प्राप्त झाले तर त्यांच्यात साधनेद्वारा भवसागर पार करण्याची क्षमता येते. अतएव किशोरावस्थेतच त्यांना तीर्थकरांच्या तीर्थात पाठविणे उचित होय, ज्यामुळे तेथील प्रभावानी त्यांचे कल्याण व्हावे. कारण अरिहन्त व सिद्ध पुरुषांचा त्या क्षेत्रातील प्रभाव सुदूर काळापर्यंत विद्यमान असतो.

**शंका : तीर्थंकरांचा मार्ग रिद्धी आहे की सिद्धी?**

समाधान : तीर्थंकरांचा मार्ग सिद्धीवर आधारित नसून रिद्धीवर आधारित आहे.

**शंका : आत्मसाक्षात्कारी साधकाकरिता अरिहन्त कसे प्रेरणादायी होतात?**

समाधान : साधकाच्या आत्मसाक्षात्कारी साधनेत अरिहन्त सहायता करतात. ते साधकास पडण्या व बुडण्यापासून वाचवितात व त्यांना विचलित होऊ देत नाहीत. परंतु देवी-देवता केवळ

प्रलोभन देतात. खरा साधक काही मागत नाही. त्याचे उद्दिष्ट आराधनेद्वारा आत्मकल्याण साधणे हेच असते. साधकास त्याच्या सद्गुरू- कृपेनी लौकिक तथा अलौकिक लाभ प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रूपानी आपोआप मिळत असतो.

शंका : **आपल्या सद्गुरूकडून साधकांनी काय मिळविले पाहिजे?**

समाधान : आपल्या आचरणाद्वारे साधकानी सदर गुरूचे कृपापात्र राहिले पाहिजे, ज्यामुळे गुरुकृपेबरोबरच दया व अनुग्रह मिळेल.

शंका : **सद्गुरूद्वारा साधकाच्या आत्मकल्याणासाठी बीज पेरले जाते त्याचे महत्त्व काय?**

समाधान : सद्गुरू आपल्या शिष्याच्या आत्मसाक्षात्काराकरिता दीक्षेच्या रूपानी शक्तिपाताद्वारा बीजारोपण करतात. त्यानंतर साधक हळू हळू ह्या बीजाच्या शक्तीनी आत्मसाक्षात्काराकडे अग्रेसर होतो. जोपर्यंत साधकास आत्मसाक्षात्कार होत नाही तोपर्यंत ते बीज त्याचे पथप्रदर्शन करीत असते.

शंका : **मनुष्यास कर्मबंधन कोणत्या मार्गामुळे प्राप्त होते?**

समाधान : १) **ज्ञानवर्णी कर्म** - आत्म्याच्या असीम ज्ञानास अडथळा आणणे.

२) **दर्शनावर्णी कर्म** - आत्म्याच्या दर्शनगुणास अडथळा करणे

३) **वेदनीय कर्म** - आत्म्याच्या स्पंदनगुणास अडथळा

४) **मोहिनी कर्म** - आत्म्याचे सम्यक्दर्शन व सम्यक्ज्ञानासंबंधी गुणास दाबणे

५) **आयुकर्म** - आत्म्याच्या अविनाशित्व धर्मास अडथळा करणे.

६) **नामकर्म** - आत्म्याच्या अश्वपित्त्व धर्मास अडथळा करणे.

७) **गौत्रकर्म** - आत्म्याच्या अमुख छोट्या गुणास अडथळा करणे.

८) **अन्यायकर्म** - आत्म्याचे लाभकारी गुण जसे वीरता, दान आदीला अडथळा करणारे कर्म.

ह्याप्रकारे ही मुख्य आठ कर्मे आत्मकल्याणाच्या मार्गात बाधक

होत असतात.

**शंका : ध्यानातील मुख्य श्रेणी किती आहेत?**

समाधान : ध्यानाच्या मुख्य चार श्रेणी आहेत.

१) आर्तध्यान, २) रौद्रध्यान, ३) धर्मध्यान, ४) शुक्लध्यान

**शंका : गुरुजी ! 'कार्योत्सर्ग' चा आशय काय?**

समाधान : ध्यान, वाणी व मनाचे नियंत्रण होत असते, पण शरीराचे नियंत्रण कार्योत्सर्गानी करावे लागते.

**शंका : कोणत्या पदार्थांचे चिंतन करावे?**

समाधान : आत्मकल्याण हेतू साधकास जीव, अजीव, पुण्य, आश्रय, निर्जरा, कान्ध व मोक्ष आदि ९ तत्त्वांचे ज्ञान व्हायला पाहिजे. ह्या तत्त्वांचे चिंतन आत्मकल्याणाति सहायक होते.

**शंका : जीवास विभागणाऱ्या श्रेणी कोणत्या?**

समाधान : जीव मुख्यतः पांच श्रेणींत विभागला गेला आहे.

१) एकेन्द्रिय, २) द्विद्वयेन्द्रिय, ३) त्रयेंद्रिय, ४) चतुरेंद्रिय, ५) पंचेंद्रिय.

ह्याप्रकारे संसारी जीवांचे ५ भेद आहेत. त्याचप्रमाणे १) पृथ्वीकाय, २) जयकाय, ३) अग्निकाय, ४) वायुकाय, ५) वनस्पती काय, ६) भसकाय असे हे ६ भेद वेगवेगळे आहेत.

**शंका : ध्यान व मौन ही स्थिती समजावून द्यावी.**

समाधान : ध्यानच मौन आहे. ध्या = पळणे, न = भविष्यता. मौनाचे वजन वाढल्यावर आत्मदर्शन होते. आत्मा स्वतः प्रकट होतो. मौन - स्थाई आहे. ध्यान अस्थाई आहे.

**शंका : दीक्षेचे एकंदर किती प्रकार आहेत?**

समाधान : दीक्षेचे प्रकार खालीलप्रमाणे-

१) कूर्मदीक्षा, २) स्पर्शदीक्षा, ३) दृष्टिपातदीक्षा, ४) स्वप्नदीक्षा, ५) मंत्रदीक्षा हे पांच प्रकार आहेत. ह्या प्रकारांनी सद्गुरू आपल्या शिष्यांना दीक्षित करतात.

**शंका : मोक्षाच्या पर्यायवाची शब्दांविषयी सांगावे.**

समाधान : १) मुक्ती, २) निर्वाण, ३) कैवल्य, ४) उपवर्ग, ५) निश्रेयस्,

६) श्रेयस्, ७) अमृत, ८) मोक्ष हे सर्व पर्यायवाची शब्द होत.

**शंका :** **केवळ आत्माच केव्हा विद्यमान असतो?**

समाधान : सुषुम्नाद्वारा ज्ञानाचा प्रवेश उरकोषात झाल्यानंतर तुर्यावस्थेत भूत, भविष्य व वर्तमान ह्या तिन्ही काळांचा बोध होतो. त्यानंतर आनंदमय कोषात प्रवेश केल्यानंतर सर्व सुख-दु:खाचे बीज निर्बीज होऊन ते आत्म्यात समाविष्ट होते. त्यावेळी केवळ आत्माच विद्यमान असतो.

**शंका :** **दीपावलीच्या दीपज्योतीपासून काय ग्रहण करावे?**

समाधान : दीपज्योती साधकास आत्मज्योतीचे दर्शन करण्यास प्रेरित करते. साधक सावधान राहून ध्यानधारणेद्वारा हे प्राप्त करू शकतात. ह्या आत्मज्योतीचे प्रतीक बुद्धीत प्रविष्ट होऊन चित्तावर अंकित होते व जन्मजन्मांतरापर्यंत ही ज्योती बरोबर असते.

**शंका :** **'लाखो कोस जो गुरू बसे, दीजिये सुरति पठाय' याचा मतितार्थ काय?**

समाधान : शिष्यावर कुठलेही संकट आले असता तो अशावेळी अंत:करणपूर्वक आपल्या सद्गुरूस आवाज देतो किंवा स्मरण करतो, तेव्हां जरी सद्गुरू लाखो कोस दूर असले तरी पापणीच्या उघडझापेच्या वेळात ते शिष्याचे रक्षण करतात आणि त्याला संकटातून बाहेर काढतात. ह्याला 'डिवाईन टेलिपथी' म्हणतात (कूर्मदीक्षा).

**शंका :** **केन्द्रांच्या ठिकाणी असलेल्या शक्तीच्या स्पर्शामुळेच केवळ साधक सिद्ध अवस्थेस पोहोचतो काय?**

समाधान : साधक जेव्हा साधनेत लीन होतो तेव्हा प्रत्येक केन्द्रातील सुप्त प्राकृतिक शक्तीचा त्याला स्पर्श होतो, परंतु ह्या जड शक्तीच्या केवळ स्पर्शानी सिद्ध अवस्था प्राप्त होत नाही. विधातीय कर्मांच्या विनाशानंतरच सिद्ध अवस्था प्राप्त होऊ शकते. त्याचे बीज ॐ आहे.

**शंका :** **घृणा करण्यामुळे कर्मबंध होतो काय?**

समाधान : घृणा करणे न गेल्यास काय गेले? तीच तर जावयास हवी. घृणा

कोणाचीच करू नये. ह्यामुळे चिकटणाऱ्या कर्माचे बंधन येते व ते भोगावेच लागते, म्हणून जे लोक अशा घृणास्पद संसारात घृणेपासून दूर राहतात ते धन्य होत.

शंका : **साधनेचे केंद्र शरीर आहे की आत्मा?**

समाधान : साधनेचे केंद्र आत्माच आहे. शरीरावर नियंत्रण ठेवले पाहिजे, ज्यामुळे आत्मा निर्मळ होण्यास बळ प्राप्त होते. अत: साधनेच्या माध्यमातून जीवन-मरण सुधारून ज्योतिर्मय बनविणे हेच लक्ष असले पाहिजे.

शंका : **आत्म्याच्या संबंधी जाणणे व स्वयं आत्मा जाणणे ह्यात काय अंतर आहे?**

समाधान : हे दोन्ही वेगळे आहेत आणि दोन्हीत मौलिक अंतर आहे. आत्म्याविषयी मौलिक अंतर आहे. आत्म्याविषयी शास्त्रांचे अध्ययन विद्वान व्यक्तिद्वारा समजावून घेतले जाऊ शकते; परंतु आत्म्यास जाणण्याकरिता स्वत: साधना करावी लागते. त्यास आत्मसाक्षात्काराद्वारेच तो जाणू शकतो. त्याकरिता सद्गुरूच्या कृपेची आवश्यकता आहे. केवळ शास्त्रांच्या अध्ययनातून हे कधीही संभवत नाही.

शंका : **अरिहंत अवस्थेविषयी थोडं समजावून द्याल?**

समाधान : अरिहंत, अनंतज्ञान, अनंत दर्शन, अनंत सुख, अनंत आत्म-शक्तीला धारण करणारे असतात.

शंका : **पाण्याचे कोणकोणते प्रकार आहेत?**

समाधान : १) **मरीची** - अंतरिक्षात व्याप्त

२) **मर** - पृथ्वीच्या निर्मितीत सहाय्यक

३) **वाफ** - पृथ्वीच्या गर्भात राहणारी

४) **अम्ब** - द्युलोक सूर्यप्रभावाच्या बाहेरील प्रदेशात व्याप्त असणारे.

शंका : **योगी शब्दाचा अर्थ काय?**

समाधान : योगी = योग + इ

योग = मिलन, ई = शक्ती (दिव्य शक्ती) (Devine Energy)

योगी = दिव्य शक्तीचे मीलन.

**शंका :** **आध्यात्मिक रंगाचे महत्त्व काय?**

समाधान : १) **लाल** - क्रोधसूचक

२) **नारंगी** - सहनशक्ती मिळूनमिसळून रहाणे दर्शविते

३) **पिवळा** - त्याग, सेवा, दास्यता (Service)

४) **हिरवा** - प्रेम, स्नेह, बंध, सत्य मार्गावर चालणारा

५) **आकाशी** - सेवा, वात्सल्य, आदरसत्कार, मातृभावाचे सूचक.

६) **निळा** - सेवा करणारे पण अलिप्त

७) **जांभळा** - हानि.

रोगयुक्त वृत्ती, विकारयुक्त मन, अविश्वास इत्यादीचे सूचक. सगळे रंग मिळून धवल रंग बनतो जो शांतीचे प्रतीक आहे. मनुष्य सगळ्या रंगांपासून वेगळा आहे. म्हणजे जीवन्मुक्त, कोणत्याही आश्रमात राहून तुम्ही जीवन्मुक्त होऊ शकता. जीवन्मुक्त होणेच जीवनाचा मुख्य उद्देश आहे.

**शंका :** **उद्धार आणि कल्याण याचा अर्थ काय?**

समाधान : उद्धार याचा अर्थ जन्ममरणातून मुक्ती मिळविणे. कल्याणचा अर्थ शुद्ध होऊन नेहमी उन्नतीच्या मार्गावर अग्रेसर होणे. आत्मसाक्षात्कारी पुरुषांची सेवा करण्यामुळे कल्याण होते; पण संचित प्रारब्ध भोगावेच लागते.

**शंका :** **जीवाची उत्पत्ती कशी झाली?**

समाधान : परलोकातून जीव मेघाद्वारे आला. मेघापासून वर्षाद्वारे पृथ्वी त्यास ग्रहण करते. पृथ्वीपासून जीव अन्नास धारण करतो. अन्नापासून मनुष्य देह धारण करतो. हाच जीवाच्या उत्पत्तीचा आशय आहे.

**शंका :** **चैतन्यसमाधीचे तात्पर्य काय?**

समाधान : धी म्हणजे बुद्धी. बुद्धी ज्यात विराम पावते ती समाधी. ती सांसारिक असो अथवा आत्मिक (सम्यक् अधीयते यत्र समाधी) जेव्हा बुद्धी सम्यक् रूपाने आत्मस्थ होते तेव्हा ती समाधी होय.

एक चैतन्य (सबीज समाधी) व दुसरी निर्बीज समाधी (सिद्ध अवस्था) आहे. प्रारंभी जे शरीर मिळाले ते केवळ भोग भोगण्याकरिता. त्यानंतर निष्कामकर्म आणि धर्माचरणाच्या प्रभावामुळे जेव्हां बुद्धी शुद्ध होऊन स्फटिकमण्याप्रमाणे आत्मप्रकाशाशी युक्त होते तेव्हा असा अनुभव प्राप्त होतो. हीच चैतन्यसमाधी होय. जिवंतपणी तो साधक जीवन्मुक्त होतो.

**शंका : फकीर याचे तात्पर्य काय?**

समाधान : संधिविच्छेदानुसार फकीर शब्दाचा विच्छेद फे + की + ये + र इत्यादी वर्णांनी होतो. फे-वर्णाचा आशय फाका म्हणजे उपवास - म्हणजे खायला मिळाले तरी ठीक, न मिळाल्यास काही बिघडत नाही. की- जितेन्द्रिय म्हणजे दहा इंद्रियांना जिंकणारा. दहा इन्द्रिये व मन ज्याच्या ताब्यात आहेत असा. याद (आठवण) आत्मतत्त्व जे स्वयंप्रकाशित आहे, दिव्य ज्योती आहे, त्याची आठवण ठेवणे. र - रहम (दया) दया करणारा (शांति, दया, क्षमा)

**शंका : पत्नीस अर्धांगिनी का म्हणतात?**

समाधान : स्त्रीमध्ये (एक्स) बीजच आहे. पुरुषात एक्स व वाय ही दोन्ही बीजे आहेत. जेव्हा पुरुषाकडून एक्स बीज प्राप्त होते तेव्हां कन्येचा जन्म होतो. जेव्हा पुरुषापासून एक्स व वाय ही दोन्ही बीज प्राप्त होतात तेव्हा पुत्र होतो. स्त्रीत एक्स बीज आहे व त्यात पुरुषाचे एक्स बीज मिळाले तर ते स्त्रीप्रधान म्हणजे कन्या होते. जेव्हा स्त्रीच्या बीजात पुरुषाचे वाय बीज मिळते तेव्हा पुत्रप्राप्ती होते. म्हणून स्त्रीमध्ये केवळ एक्स बीज असल्याने तिला अर्धांगिनी म्हटले जाते. अबला म्हटले जाते.

**शंका : जिवाणं शब्दाचा अर्थ काय?**

समाधान : जिवाणं शब्द प्राकृत भाषेचा आहे. ह्याचे तात्पर्य जिनेश्वरशी आहे. ह्याचा पूर्ण आशय - जो स्वयं जिन झालेला आहे व जो दुसऱ्यांना जिन बनविण्यास सक्षम आहे.

**शंका : साधक वैर, प्रतिशोध इत्यादींपासून केव्हा मुक्त होतो?**

समाधान : अरिहंत व सिद्धसाधक पुरुष वैरभावापासून मुक्त असतात. त्यांच्या

मनात प्रतिशोधाची भावना रहात नाही. ह्या स्थितीत अमृत प्रदान करणारी, अभय प्रदान करणारी केवळ विशुद्ध करुणामय स्थिती रहाते.

**शंका : आत्मानुभव प्राप्तीचे माध्यम काय?**

समाधान : आत्मानुभव शिकवला जात नसतो, केला जातो. ह्याकरिता अंत:करणपूर्वक ध्यान लावण्याचे प्रयास करावे लागतात. हे कोणी दुसऱ्याच्या भरवशावर होत नाही. ह्यात सर्व काही सद्‌गुरूच्या मार्गदर्शनाखाली स्वत:च करावे लागते. सद्‌गुरूच्या प्रभावामुळेच हे संभव आहे.

**शंका : आत्म्या - आत्म्यात भेद आहे की सगळे आत्मे एकच आहेत?**

समाधान : सगळे आत्मे समान आहेत. आत्मा लहान किंवा मोठा असत नाही. प्रत्येक आत्मा स्वभावानुसार परम आहे. अंतर्मुख होऊन जर आपण पुरुषार्थ कराल, स्वत:ला स्वत:ची जाण येईल, स्वत:त रत व्हाल, तल्लीन व्हाल तर प्रत्येक आत्मा परमात्मा होण्यास सक्षम होईल.

**शंका : साधना करण्याकरिता साधकास धर्मपरिवर्तन करणे का आवश्यक आहे?**

समाधान : साधनेकरिता कोणत्याही साधकास आपला धर्म बदलण्याची आवश्यकता नाही. तो ज्या धर्माचे पालन करतो त्याचेच पालन करावे. ह्याकरिता सद्‌गुरूच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. सद्‌गुरू प्राप्त झाल्यास त्यांनी सांगितलेल्या मार्गानुसार साधनेत रत व्हावे. आत्मकल्याणाकरिता स्वत: आपल्या सद्‌गुरूच्या सान्निध्यात साधना करावयास पाहिजे.

तुम्हा सगळ्यांना माहितीच आहेच की आजपर्यंत माझ्याकडे आत्मकल्याण हेतू मनात धरून जी जी व्यक्ती आली त्या सर्वांस मी धर्मपरिवर्तन करण्यास, घर-संसार सोडण्यास, किंवा पारिवारिक जिम्मेदारी सोडण्यास कधीच सांगितले नाही. त्यांना त्यांच्या जातीपातीविषयी किंवा धर्माविषयी कधी विचारले नाही. अपितु

ज्यांची तशी मान्यता आहे त्या अनुसारच आत्मसाक्षात्काराचे हेतूने बीजमंत्र दिला. आपल्या शिष्यपरिवारात सर्व वर्गाचे, जाति-धर्माचे साधक आपआपल्या मान्यतेनुसार राहून आत्मकल्याणात मग्न आहेत.

**शंका : भव्य आत्मा व अभव्य आम्याची स्थिती कशी असते?**

समाधान : 'भव्य' चा अर्थ मोक्षप्राप्तीकरिता योग्य व 'अभव्य' चा अर्थ मोक्षप्राप्तीकरिता अयोग्य, भव्य जीवातच मोक्षप्राप्तीची आकांक्षा जागृत होत असते. अभव्य आत्म्यात ही स्थिती नसते.

**शंका : तपाचे मुख्य प्रकार कोणते आहेत?**

समाधान : तपाचे दोन प्रकार १) बाह्य तप, २) अभ्यंतर (आंतील) तप.

**१) बाह्यतप** - जे शरीरास कष्टकारक दिसते. ह्यामुळे सांसारिक प्रसिद्धी मिळते.

**२) अभ्यंतरतप** - आंतरिक मलिन प्रवृत्तींवर विजय मिळविणे. अभ्यंतर तपाशिवाय आत्मकल्याण, आत्मसाक्षात्कार होत नसतो.

**शंका : योगज विभूति-लब्धिधारक कोणास म्हणतात? कोणत्या तरी मनीषीने असे म्हटले आहे की, असे योगी एकाच इंद्रियाने पांचही इंद्रियांची कामे करू शकतात; इंद्रियांच्या अशा विकसित शक्तीस संभिन्न स्त्रोतोपलब्धी म्हटले गेले आहे. कृपा करून ह्यावर प्रकाश टाकावा.**

समाधान : साधनेच्या माध्यमातून साधक जेव्हा आत्मस्थ होतो तेव्हा अशा स्थितीत तो असे करण्याचा अधिकारी होतो. हे सत्य आहे.

**शंका : योग्याच्या अरिहंत अवस्थेत त्याच्याकडून उपकार होत असतो. याचा काय अर्थ?**

समाधान : अरिहंत अवस्था प्राप्त झाल्यानंतर त्यांचा साक्षात्कार करणाऱ्या भव्य आत्म्यांवर उपकार होत असतो. केवळ उपदेशाद्वारेच ते जगतावर उपकार करतात. इतकेच नव्हे, जे नावालाच त्यांची उपासना करतात त्यांचे पण कल्याण होत असते. त्यांचे नाममात्र अवलंबन घेणाऱ्यास देखील तत्स्वरूपाची प्राप्ती होते.

**शंका : आराधनेचे अधिकारी कोण असतात?**

समाधान : आराधनेचे अधिकारी किंवा आराध्य तेच होऊ शकतात- ज्यांची आराधना करणारे साधक-आराधक स्वत:च आराध्य होतात. पूज्य गुरुजी स्वत: म्हणतात, की शिष्य बनवत नसून मी आपल्या शिष्य-साधकाचा माझ्या समकक्ष होण्याचा मार्ग प्रशस्त करतो.

**शंका : भय किती प्रकारचे आहे व आत्मसाक्षात्कारी साधक भयमुक्त केव्हा होतात?**

समाधान : भय खालीलप्रमाणे १) लोकभय, २) परलोकभय, ३) आदानभय, ४) प्रमादभय, ५) आजीवभय, ६) अश्लाध्यभय. आत्मसाक्षात्कारी साधक जेव्हा मृत्युकेंद्रावर विजय प्राप्त करतो तेव्हा तो सर्व भयापासून मुक्त होतो.

**शंका : साधकास मौन किती प्रकारचे केले पाहिजे?**

मौनाचा आश्रय साधकास पूर्ण सहायक होतो. मनाचे मौन, वचन मौन व तनाचे मौन.

१) **मनाचे मौन** - आत्म्यापासून भिन्न अनात्मपोषक पदार्थांचे चिन्तन न करणे हे मनाचे मौन.

२) **वचनमौन** - असत्य, अप्रिय, क्रोधयुक्त, अभिमानयुक्त, लोभकारी न बोलणे हे वचनमौन म्हटले जाते.

३) **तनाचे मौन** - शरीराच्या अध्यात्मभावाकडे नेणाऱ्या क्रियेस तनाचे मौन म्हटले जाते.

मौनाद्वारे आत्मा अशुभ वृत्ती, प्रवृत्तींवर विजय प्राप्त करतो. मौन अवस्थेत साधकाची क्रिया सम्यक् ज्ञानावर आधारित असली पाहिजे.

**शंका : आध्यात्मिक योगाच्या अन्तर्गत कोणकोणते योग येतात?**

समाधान : आध्यात्मिक योगाच्या अन्तर्गत मुख्यत: १) अध्यात्मयोग, २) भावनायोग, ३) ध्यानयोग, ४) समतायोग, ५) वृत्तिसंशय-योग येतात.

**शंका : शरीर कोणत्या ५ तत्त्वांचे बनले आहे. त्यांचे गुणधर्म काय?**

समाधान : ज्या ५ तत्त्वांचे शरीर बनले आहे, ते-तथा त्यांचे गुणधर्म ह्या प्रकारे —

१) पृथ्वी (मिट्टी) - गंध
२) आप (जल), धर्म - वाढणे, गुण - शीतल
३) तेज (अग्नी), धर्म - दाहकता, गुण - प्रकाश
४) वायू (वास), धर्म - स्पर्श, गुण - रुक्षता
५) आकाश, धर्म - आवाज, गुण - शब्द (ध्वनीस वाहून नेणे)

**शंका : दानाची दूषण व भूषण अवस्था विषद करा.**

समाधान : दान देतेवेळी विवेक, सात्त्विक बुद्धी आणि नि:स्वार्थतेचा भाव असायला पाहिजे. दान देतेवेळी घेणाऱ्याचा अनादर करू नये. दान देण्यास विलंब करू नये. अनिच्छापूर्वक दान करू नये व दिल्यानंतर पश्चात्ताप करू नये. दान करतेवेळी ह्या सर्व दोषांपासून दूर राहिले पाहिजे. दान करतेवेळी आनंदाची अनुभूती व्हावयास पाहिजे. घेणाऱ्याचा बहुमान करून मधुर संभाषण केले पाहिजे. दान घेणाऱ्या योग्य व पात्र व्यक्तीचे अनुमोदन केले पाहिजे.

**शंका : दानाचे वेगवेगळे प्रकार कोणते असतात?**

समाधान : दान वेगवेगळ्या प्रकारे केले जाते.

१) **अभयदान** - भयभीत जीवास भयरहित करणे यास अभयदान म्हटले जाते.

२) **सुपात्रदान** - चांगल्या आणि उत्तम व्यक्तिस दिलेले दान सुपात्रदान म्हटले जाते.

३) **अनुकम्पादान** - दयादान, करुणादान, सहानुभूतिदान, हे सर्व अनुकम्पादानाच्या अंतर्गत येतात.

४) **उचितदान** - बक्षिसाच्या रूपात किंवा कर्तव्यबोधातून धन किंवा साधन देणे यास उचितदान म्हटले जाते.

५) **कीर्तिदान** - आपली प्रसिद्धी, मोठेपणा किंवा कीर्तीच्या लालसेपोटी दिलेले दान यास कीर्तिदान म्हटले जाते

**शंका : अभ्यंतर तपाच्या आंत कोणकोणती तपे येतात?**

समाधान : अभ्यंतर तपाच्या आंत सहा प्रकारची तपे येतात.
१) प्रायश्चित्त, २) विनय, ३) नैयावृत्त्य, ४) स्वाध्याय, ५) ध्यान, ६) व्युतसर्ग ह्या सगळ्याकरिता सद्गुरूचे सान्निध्य आणि मार्गदर्शन

आवश्यक आहे.

**शंका : आध्यात्मिक विकासात कोणकोणत्या भावना सहायक होतात?**

समाधान : अनित्यभावना, अशरणभावना, सांसारिकभावना, एकत्त्वभावना, अन्यत्त्वभावना, अशुचित्त्वभावना, आश्रयभावना, संवरभावना, निर्जराभावना, लोकस्वरूप भावना, बोधिदुर्लभ भावना, धर्मभावना. ह्या प्रकारे १२ भावना सहायक होतात; परंतु वरील भावनांचे केवळ नाव ऐकून कुठलाही आध्यात्मिक लाभ होत नाही. सद्गुरूकडून ज्यास उपदेश मिळतो किंवा त्यास जो आदेश मिळतो त्या अनुसार आत्मसाक्षात्कारी साधकास आपल्या साधनेत मग्न राहिले पाहिजे.

**शंका : शरीरातील, शरीरशास्त्रज्ञांनी वर्णन केलेल्या ग्रंथींचा योगचक्राशी संबंध काय?**

समाधान : आपल्या शरीरात अनेक ग्रंथी आहेत. योग्यांनी त्यास योगचक्र नावाने संबोधित केले आहे. शरीरशास्त्रानुसार त्यांना सद्य (Glands) म्हणतात. आपल्या योगशास्त्रात ह्या चक्रकेंद्राचे जे स्थान व आकार (Shape) सांगितला गेला आहे, त्यास आज शरीरशास्त्राद्वारा मान्यता आहे.

शरीरशास्त्रानुसार,

| **ग्रंथी** | **योगचक्र** |
|---|---|
| १) पीनीअल ग्रंथी | सहस्रारचक्र |
| २) पीट्यूटरी ग्रंथी | आज्ञाचक्र |
| ३) थॉयराईड ग्रंथी | विशुद्धचक्र |
| ४) थाईमस ग्रंथी | अनाहतचक्र |
| ५) एंड्रीनल ग्रंथी | मणिपूरचक्र |
| ६) गोनाड ग्रंथी | स्वाधिष्ठान चक्र |
| ७) गोनाड ग्रंथी | मूलाधारचक्र |

**शंका : 'ब्रह्म'चा अर्थ काय?**

समाधान : बृहतधातूपासून ब्रह्म शब्दाची उत्पत्ती आहे. ब्रह्मचा अर्थ महान

असा आहे.

**शंका : विश्लेषज, मोहज, अनुतापज व आगामी दृष्यदर्शनचा अर्थ काय?**

समाधान : **१) विश्लेषज** - मृत्युशय्येवर मृत्यूच्या आधी पीडा असह्य होऊन बेहोष होणे.

**२) मोहज** - परिवारजन एकत्र होतात, डॉक्टर वगैरे येतात. त्यांची संपत्तीसंबंधी चर्चा चालते. अशा स्थितीस मोहज म्हणतात.

**३) अनुतापज** - अनु म्हणजे पश्चात्, तापज म्हणजे ताप देणे. ज्या योनीत जाणे आहे त्याचा बोध होतो.

**४) आगामी दृश्यदर्शन** - जीवनभर जसे कर्म केले तसे त्याचे फळ मिळते. त्यांत संचार होतो. ज्या विचारानी जीवनमापन केले त्याप्रमाणे तशा योनीत संचार करविला जातो.

**शंका : आरतीचे तात्पर्य काय?**

समाधान : आरतीत एक प्रकारचे समर्पण करण्याची भावना आहे. दिव्यामुळे वलय (वर्तुळ) आहे, ज्योती आहे. गती आहे. त्या सर्वांस वाढवायचे आहे. स्वतःस त्यात विलीन करायचे आहे. आरती आपणास आत्मज्योतीकडे केंद्रित करीत असते.

**शंका : सिद्धी कशा प्राप्त होतात?**

समाधान : कोणाकोणास जन्मापासूनच सिद्धी प्राप्त असतात. त्याच्या पूर्वजन्माचे संचितकर्म व संस्कार त्याच्याजवळ असतात, ते सर्व पुढील जन्माचे कारण होतात.

मंत्राच्या अभ्यासाने देखील सिद्धी प्राप्त होऊ शकते. तपाद्वारे पण सिद्धी प्राप्त होते. औषधांच्या प्रयोगामुळे सुद्धा अनेक सिद्धी प्राप्त होऊ शकतात. समाधीत आत्मस्थ स्थिती प्राप्त होत असताना सिद्धी प्राप्त होतात.

**शंका : साक्षात्कार चा अर्थ काय?**

समाधान : साक्षात्कार - स + अक्ष + कार ह्या तीन धातूंमुळे हा शब्द निर्माण झाला.

स = ते = अर्थात पूर्ण ब्रह्म. अक्ष = पाहणे व संशय होय. कार

= अथवा. कारय् किंवा कार्य (कुरू धातूपासून) अत: साक्षात्कार चा अर्थ = त्यास (आत्म्यास) पाहणे किंवा मिळविणे किंवा त्याचे आश्रित होणे वा त्याच्या आधीन होणे.

**शंका : साक्षात्कार कशाप्रकारे होतो?**

समाधान : साक्षात्कार, सद्गुरू (सत्पुरुष) किंवा सिद्ध पुरुषाकडून ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर किंवा त्यांच्या वाणीद्वारा व वर्णसमूहाद्वारा आपली शक्ती प्रदान केल्यानंतर हे जे संशय आणि वासनाजन्य आवरणाचे परिणाम आहेत, सुख-दु:खास कारण जी शक्ती आहे- अर्थात जी जन्म-मृत्यूस कारणीभूत होते, त्या शक्तीस खास प्रक्रियेद्वारा विषेश मार्गाचे अनुसरण करवून आत्मपरमपद प्राप्त करवून देतात.

**शंका : प्रणाम, आशिष व आशीर्वाद यांचा परस्पर संबंध काय?**

समाधान : प्रणामानंतर (नमस्कार) आशिष मिळतो व त्यांना जोडून साखळी बनते. आशिषच्या प्रभावानी कार्य होत असते. आशीर्वाद एक प्रकारे नाद-तत्त्व आहे. ह्या नादातच आशिष मिळतो.

**शंका : 'त्रिवेणीसंगम' चे तात्पर्य काय?**

समाधान : गंगा-यमुनेच्या धारेमध्ये एक रेखा दिसते तीच सरस्वती होय. ह्याचप्रमाणे भूलोकमध्य आहे. मानव आपल्या इच्छेनुसार वर किंवा खाली जाऊ शकतो. कारण मनुष्य कर्म करण्यास स्वतंत्र आहे. अत: त्रिवेणीसंगमाचे तात्पर्य मनुष्यजन्म आणि भूलोक ह्याच्याशी आहे. (सुवर्णसंधी, सुवर्णभूमी)

**शंका : आचार्य कोणास म्हणतात?**

समाधान : शास्त्रानुभूत विषयांचा अभ्यास करून (स्वत:च्या आत्म्याची अनुभूती घेतल्यानंतर) जी व्यक्ती गावोगाव जाऊन स्वत: आचरण करीत असता लोकांमध्ये प्रसार व प्रचार करीत असते त्यास आचार्य म्हणतात.

**(अच्चिनोती शास्त्रार्थमाचारे, आचार्यस्तेन चोच्यते)**

**शंका : अरिहंत राग, द्वेष इत्यादी प्रवृत्तीपासून मुक्त असतात. परंतु परमात्म्यास कर्ता मानून त्याची प्रार्थना व भक्ती करतात. ही वास्तविकता आहे की आपला भ्रम आहे.**

समाधान : हे सत्य आहे की अरिहंत, सर्वज्ञ किंवा परमात्मा स्वत: काहीच करीत नाही. केवळ भक्ताचा समर्पणभाव परिणामकारक होऊन शुभ परिणाम प्राप्त करतो. ह्या परमआत्म्यांच्या स्तुतीमुळे आत्मसाक्षात्कारी साधकास सफलतेबरोबर मुक्तावस्था प्राप्त होते. अरिहंत कर्ता नाही; पण त्याचे निमित्तजन्य कर्तव्य अवश्य मानले गेले आहे.

॥ ॐ ॥

*सृष्टीची उत्पत्ती, स्थिती आणि संहार ही तीन कार्ये ज्यांच्या अधीन आहेत, अशी देवाधिदेवांची नावे अनुक्रमे ब्रह्मा, विष्णु व महेश. ही त्रिमूर्ती विश्वाच्या सर्व व्यवहाराला कारणीभूत आहे, अशी कल्पना स्मृतिपुराणादि ग्रंथांत मांडली आहे. या त्रयीत शंकर किंवा महेश यांचे स्वरूप लोकविलक्षण किंवा देवविलक्षण असं आहे. या देवाची रूपं कार्य आणि लीला इतर दोघांहून फारच भिन्न, अगाध आणि आश्चर्यजनक आहेत.*

*मूळ श्लोकात स्वत: महेश आहे, म्हणजेच इतर दोघे देव असले तर हा महादेव आहे. सासरा पर्वतराज हिमालय आहे, याचा मित्र धनपती कुबेर असून मुलगा सकलविद्यांचे आधिदैवत गणेश हा आहे. तरीसुद्धा शंभुमहादेव हातात कवटीचा कटोरा घेऊन सतत भिक्षेसाठी फिरत असतो, याला काय म्हणावे? परमेश्वराची इच्छा किंवा करणी अगाध आहे, एवढंच म्हणता येईल! या तिन्ही आदिशक्ती आहेत. याचा अर्थ एवढाच की, यांचं खरं स्वरूप अज्ञेय आहे. शंकर हा सर्वश्रेष्ठ देव, महादेव असे मानण्याचं प्रमुख कारण असं दिसतं, की इतर साऱ्या देवतांच्या स्वरूपात प्रमुख भाग सुख-विलास, चैन, करमणूक, क्रीडा, उत्तम खाणं, उत्तम पिणं, गाणं बजावणं वगैरेत आहे. या उलट जीवनातील दु:खमय, कष्टमय, अघोरी असं जे जे आहे ते ते सारं शंकरानं उचललं, स्मशानात वसती, चिंता-भस्म-लेपन, म्हातारा नंदी वाहन, गळ्यात कवट्यांची माळ, जटाजूट, तांडव नृत्य.... थोडक्यात जीवनातील ज्या ज्या गोष्टी इतरांना अजिबात नको असतात, त्या त्या साऱ्या शंकराच्या वाट्याला आल्या. पण समुद्रमंथनातून जेव्हा विश्वसंहारक हालाहल विष निर्माण झालं, तेव्हा त्याला शंकराशिवाय दुसरा कोणी धनी नव्हता! ते सर्व हालाहल प्राशन करून जगावरचं संकट शंकरानंच नाहीसं केलं. दाह टाळण्यासाठक्ष गळ्यात गार असे नाग आणि मस्तकावर थंड असा चंद्र घेतला. हे इतर कुठल्या देवाला जमलं नाही. म्हणून शंकर श्रेष्ठ असे कवी म्हणतो. कुमारसंभवात कालिदास म्हणतो - तो जरी स्मशानात राहत असला तरी इंद्रादी थोर थोर देव तेथे जाऊन आपले रत्नजडित मुकुट त्याच्या पायावर घालतात. सारांश भोगापेक्षा त्याग हे मोठेपणाचं खरं लक्षण होय.*

**- दै. सकाळ**

*प. पू. गुरुजींनी मोह, महंतपद, वैभव यांचा त्याग करून आपले जीवन समृद्ध केले.*

# प. पू. वासुदेव रामेश्वर तिवारी गुरुजी यांच्या जीवनचरित्रातील कालानुक्रमे घटना

१) २३ जुलै १९०८ रोजी जन्म. पहाटे ४ वाजता. दक्षिण अमेरिका ब्रिटिश गियाना जॉर्जटाऊन शहर. श्री. रामेश्वर तिवारी यांचे प्लॉट क्रमांक ४, प्लॅन टेन वॉक डेमेरारा नदीच्या पश्चिमेस वास्तव्य. मूळचे हे कुटुंब अलाहाबाद (उत्तरप्रदेश) येथील. विसाव्या शतकाच्या सुरुवातीला अशी कुटुंबे जॉर्जटाऊन शहरात रहिवासी म्हणून राहात होती. व्यवसाय- कापडाचे दुकान.

वयाच्या तिसऱ्या वर्षी वासुदेवाचे मातृछत्र गेले. म्हणून आजोळी मामा (नंदकिशोर दुबे) मामी, आजोबा (जयशंकर दुबे) यांनी पालनपोषण केले. इंग्लिश शाळेत (किंडरगार्डन) शिक्षण.

वयाच्या सातव्या वर्षी (मुंज) उपनयनविधी. ह्या वेळेपासून तो वडिलांकडे (रामेश्वरजी) राहू लागला. वडील संस्कृत आणि हिंदी लिहावयास व वाचावयास शिकवू लागले.

वयाच्या आठव्या वर्षी दुष्ट शक्तींचे दर्शन आणि निवारण.

वयाच्या नवव्या वर्षी पाठांतराची क्षमता; तीव्र स्मरणशक्तीचा प्रभाव दिसून आला. लहानग्या वासुदेवाचे जीवनात काही दैवी-दिव्य गूढ घटना सातत्याने घडत होत्या. त्या प्रभावाखाली तो वाढत होता. त्याचे वागणे इतरांपेक्षा वेगळे. अखेर रामेश्वरजींनी त्याला हिंदुस्थानात न्यावयाचे ठरवले.

२) ऑगस्ट १९१९ (शेवटचा आठवडा) सतलज बोटीने हिंदुस्थानकडे प्रवास. ५ ऑक्टोबर १९१९ वयाच्या ११ व्या वर्षी वासुदेवाने दीर्घ जलयात्रा

संपवली. बोट कलकत्त्याच्या फोगटिस घाटावर नांगरली. दसरा सण होता.

वासुदेवाला कालिमातेच्या देवळाच्या पायऱ्या चढत असताना कालिमातेचे साक्षात् दर्शन झाले ! तो मूर्च्छा येऊन पडला. 'अलाहाबादला न्या' असे म्हणू लागला. तिथे गेल्यावर तीन नद्यांच्या संगमात त्रिवेणी (गंगा-यमुना-सरस्वती) यथेच्छ स्नान केले. पण समाधान झाले नाही. दुसरीकडे कुठेतरी त्रिवेणी संगम असला पाहिजे, त्याचाच शोध घ्यावा हा पक्का विचार!

रामेश्वरजींनी सेवई ह्या खेड्यात (अलाहाबाद) येथे स्वत:चे घर बांधले.

३) वयाच्या बाराव्या वर्षी (जुलै १९२०) वासुदेवाला गुरे राखण्याचे काम करावे लागले. तो संस्कृत शिकण्यास फार उत्सुक होता. पुढील शिक्षणास रामेश्वरजींचा नकार. वासुदेवाच्या आध्यात्मिक साधनेबद्दल रामेश्वरजींना सहानुभूती नव्हती.

वयाच्या पंधराव्या वर्षीच वासुदेवाच्या लग्नाचा घाट वडिलांनी घातला; हे वासुदेवाला मान्य नव्हते. लग्नाला वासुदेवाचा विरोध होता.

महिन्याभरातच रामेश्वरजींचे निधन झाले ! लहानग्या वासुदेवाला दु:ख. 'आत्या सुदानिया'कडे राहू लागला.

पंडित रघुवीर प्रसादमिश्रा यांनी वासुदेवाने दूर बसून संस्कृत शिकावे अशी व्यवस्था केली.

वयाच्या सोळाव्या वर्षी लग्नाचा पुन: आग्रह. इंदिरासा, वय ६ वर्षे; वधूशी लग्न झाले.

लग्नानंतर एक आठवड्यात वासुदेवाने आपले गाव परमेश्वराच्या शोधार्थ सोडले.

४) जो गुरू त्याला देवदर्शन घडवू शकेल अशा गुरूच्या शोधार्थ. गरज भागवण्यापुरते किमान साहित्य - धोतराची जोडी, लोटा, शाल इ. थोडेसे घेऊन प्रवासास सुरुवात. पायी प्रवास. थकल्यावर झाडाखाली विश्रांती. कोणी धान्य दिल्यास शिजवून खात असे. शिजवलेले घेत नसे. रस्त्याचे बाजूने वहात असलेले पाणी पिण्यास घेई.

पश्चिम महाराष्ट्र, गुजराथ, राजस्थान - ह्या सर्व ठिकाणी वासुदेव हिंदुस्थानातील पवित्र ऋषिमुनींचा शोध घेत होता. अनेक साधुसंत महंत आणि वैदिक पंडितांना भेटला. पण आध्यात्मिक अनुभव किंवा खऱ्याखुऱ्या सत्पुरुषाची

ओळख झाली नाही ! वासुदेव कठोर निश्चयाने पुढे गेला. गुजराथ प्रांतातून वारी या गावी आला.

'वारीका हनुमान' या मंदिराला लागून महंत दासबाबाचा मठ होता. इथे वासुदेवाने काही दिवस ध्यानमग्नतेने घालवले. त्याची तीव्र भक्तिसाधना, अलिप्तता सत्याचा शोध घेण्याचा संकल्प हे पाहून दासबाबाने त्याला शिष्य करून वारस नेमण्याचा विचार केला. वासुदेवाला सत्ता, मान व वैभव नको होते. तो रात्रीच तेथून निसटला.

सुरजी अंजनगाव येथे आला. तिथे जिनिंग फॅक्टरीत काम मिळाले. मॅनेजर श्यामराव तालोकर यांच्या नजरेस वासुदेवाचे शोधकौशल्य आले. काही दिवसांनी फॅक्टरीचा मोसम संपला !

वर्ष १९३०. वासुदेवाने रामलीला कंपनीत प्रवेश मिळवला. इथे शरीरसंपदेकडे लक्ष दिले. कंपनी निरनिराळ्या ठिकाणी प्रयोग करीत नागपूरहून भंडारा रोडवर एका जुन्या घरात आली. इथे भगवान शंकराचे देऊळ होते. इथे वासुदेवाला आध्यात्मिक दृष्टी प्राप्त झाली. हा भ्रमंतीतील पहिलाच अनुभव.

नागपूरहून कंपनी ठिकठिकाणी मुक्काम करीत वरुडगावी आली. इथे एक उच्च आध्यात्मिक अनुभव आला. तसेच परमेश्वर त्याच्या भक्तांना अंतर देत नाही. अडचणीच्या वेळेला कुठूनतरी अनपेक्षितपणे मदत येते, तशी मदत वासुदेवाला मिळाली.

वरुडगावाहून कंपनी ठिकठिकाणी मुक्काम करीत अकोल्याला आली. इथे वासुदेव एका प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य (डॉ.) नंदलाल भारती यांच्या संपर्कात आला. ही पहिलीच भेट मोठी उत्साहवर्धक ठरली.

डॉ. भारतींना ह्या पाहुण्या तरुणाची माहिती पाहिजे होती. वासुदेवाने सगळी कथा तपशीलवार ब्रिटिश गियानामध्ये जन्म झाल्यापासून तो थेट अकोल्याला येईपर्यंत सांगितली. त्याचबरोबर त्याने आपले आध्यात्मिक अनुभव सांगितले. आपण अशा गुरुच्या शोधात आहोत, की जो मला परमेश्वराचा साक्षात्कार घडवील, जो मला दिव्य अनुभव देईल. ह्या तपशिलाने डॉ. भारती भारावून गेले. त्यांनी सगळ्या प्रकारे मदत करण्याचे आश्वासन दिले. तू 'प्रणव' (ओंकाराचा मूळ मंत्र) याचे ध्यान कर. त्याने तसे करण्याचे कबूल केले. प्रत्यक्षात मात्र त्याने कोणालाही गुरू (मार्गदर्शक) खऱ्याखुऱ्या अर्थाने केले

नाही. कुठल्याही संप्रदायाची दीक्षा घेतली नाही. डॉ. भारतींनी प्रणवाची उपासना सांगितल्यावर त्यांना गुरुजी म्हणून ते (वासुदेवाला) आदराने मानू लागले. तसेच वासुदेव (गुरुजी) डॉ. भारतींना स्वामीजी म्हणून संबोधू लागले. रामलीला कंपनीने अकोला सोडले. वाशिम, हिंगोली, नांदेड अन् हुमनाबादला मुक्काम. इथे एक वेगळाच आध्यात्मिक अनुभव वासुदेवाला आला. 'अजमेरचे ख्वाजासाहेब मोइनुद्दिन चिस्ती तुला भेटू इच्छितात.' या अनुभवातील सगळ्या घटना तपशील मुळातूनच वाचण्यासारखा आहेत. शेरखान - पठाण ही भेटही वासुदेवाच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारी आहे.

कंपनी हुनमाबादहून नांदेड, देगलूर इ. ठिकाणी कार्यक्रम करीत मदनूर येथे आली. सर्वच मुक्कामात वासुदेव स्वतः अलिप्त आणि एकांतात - त्याच्या ध्यानधारणेत मग्न असे. नगरशेठनी त्यांना साहाय्य करण्याची तत्परता दाखवली. तरीही वासुदेव कोणत्याही प्रलोभनाला बळी पडले नाहीत.

कंपनी मदनूरहून हैद्राबाद इ. गावे करीत औरंगाबादला आली. इथे वासुदेवाने रामलीला कंपनीशी संबंध तोडले. इथे रामायणावर प्रवचने दिली. जालन्याहून औरंगाबाद. इथे शारीरिक त्रास खूपच झाला. ते भुकेने व तहानेने व्याकूळ झाले होते. आंतरिक समाधान हे आत्म्याच्या बाबतीत ठीक पण शरीराला त्याचा काय उपयोग !

शरीराला चांगले अन्न हवे. शरीराची भूक ही शरीराची गरज. ती भागवलीच पाहिजे. समोरच्या घरातून टाकलेले अन्न घ्यावेसे त्याला वाटले. तेवढ्यात जनावरांनी ते खाल्ले. ते आपल्याकरिता नव्हते असा पोक्त विचार करून तो वडाच्या झाडाकडे वळाला आणि अर्धवट बेशुद्धावस्थेत पडला. सिंह जसा ओरडतो तसा आवाज त्याने ऐकला. त्याच्याभोवती पाच सिंह आहेत - त्याच्याजवळ येत आहेत - नंतर त्याची नजर एका सुमारे पन्नास वय असलेल्या सुंदर स्त्रीवर पडली. ती सुमारे सात फूट उंच. सिंहानी ओरडू नये अशी आज्ञा केली. 'तो आमच्यापैकी एक आहे' आता तुला अन्नाकरिता याचना करावी लागणार नाही, तुझ्या गरजा भागतील' असा आशीर्वाद देऊन ती अदृश्य झाली. ही दुर्गादेवी कालीमाता होती.

नंतर एका शिक्षकाने त्यांना उठवून चहा घेण्याकरिता बरोबर नेले.

औरंगाबादहून पैठण. तेथे भागवतबुवांशी गाठभेट. वासुदेवाने त्यांच्या

बरोबर जाऊन एकनाथ महाराजांचे दर्शन घेतले. वासुदेवाचे गायन-प्रवचन. त्यांनी भागवतबुवांकडून संगीताचे प्राथमिक धडे घेतले.

रामायणावरील प्रवचनास जालन्याहून निमंत्रण. रामायण मंडळाची स्थापना. महंत भागवताचार्यांशी (बीड) संबंध. बालाजी देऊळगावा येथे प्रवचन. पुन्हा जालना. वासुदेवाला मुक्त जीवन हवे होते. मठाधीश होऊन बांधून घेणे नको होते. जालना येथील शिवकुमार शास्त्री यांना जवळच्या चीजवस्तू देऊन ते औरंगाबादला आले. गायत्री मंदिरात वास्तव्य. प्रवचन, पाठ हा उपक्रम.

शेठ मगनलाल व बुलाखी महाराज यांच्याशी परिचय. तेथूनच जवळ असलेल्या गोलछत्रीत व्यवस्था. ध्यानधारणा करत असताना त्याने उंचापुरा मुसलमान संत - पेश इमाम पाहिला. त्याने बीज मंत्राकरिता नारायणकवच पाहिजे. ते घेण्याकरिता श्रीमद्‌भागवतातील सहावा स्कंद पहा असा उपदेश केला. बुलाखी महाराजांकडे मुक्काम करून - इथेही देवीचे दर्शन वेगळ्या स्वरूपात झाले. नंतर त्यांनी गायत्री मंदिरात नारायणकवच लिहून घेतले. पुढे इथेच त्यांनी श्रीकृष्णाचे जीवनावर प्रवचने दिली. निरुपणाची स्वतंत्रशैली. बापूसाहेब देशपांडे व दादा भीमराव जोशी यांच्याशी परिचय. उभयतांचे संबंध वाढले. औरंगाबाद जालना इथे मुक्काम. आपल्या गावी जाण्याची इच्छा. भुसावळहून अलाहाबादच्या गाडीतून प्रवास. अघोरीबाबाशी गाठभेट. सुप्त संघर्ष. प्रवास संपला.

फेब्रुवारी १९३५. वासुदेव जवळच असलेल्या त्यांच्या पत्नीच्या गावी गेले. तिला आपल्या घरी आणले. प्रापंचिकासारखे जीवन त्यांचे काक गोमटी यांचेकडे सुरू केले. दोन महिने सांसारिक सुखात गेले. पुन: भ्रमंतीची लहर. पत्नीला माहेरी पाठवले. साल १९३६. अकोल्याला परत आले. डॉ. भारती (स्वामी) यांचेकडे मुक्काम. पुन: पूर्वी भेट दिलेल्या ठिकाणी भ्रमंती. यात एक वर्ष गेले. औरंगाबादला आले. पूर्वीचा मित्रपरिवार. बापूसाहेब देशपांडे, दादा भीमराव जोशी, श्री बुलाखी महाराज इ. गायत्री मंदिरात मुक्काम. आध्यात्मिक साधनेत अधिक प्रगती व्हावी म्हणून त्यांनी पैठणला जावे असा सल्ला त्यांच्या मित्रांनी दिला.

श्री. बापुसाहेब देशपांड्यांनी रु. १/- बसभाड्याकरिता दिला. पैठण हे गाव प्रसिद्धच. यात्रेचे ठिकाण. वासुदेव इथे तिसऱ्यांदा आले होते. भागवतबुवांनी

समाधी घेतली होती. त्यामुळे त्यांची भेट होणार नव्हतीच.

ध्यानधारणेकरिता वासुदेवाने गोदावरी नदीच्या वाळवंटात जागा शोधली. सुमारे पंधरा दिवसांनी पहाटे तीन-चार चे सुमारास संत एकनाथांचे दर्शन झाले. 'इथले काम संपले, तू अयोध्येला जा. तिथे तुझी इच्छा पूर्ण होईल.'

पैठणहून औरंगाबादला परत. तेरा रुपये व कपडे इ. घेऊन अयोध्येला प्रयाण.

जालना येथील पुजारी नंदकिशोर यांच्याशी गाठभेट. येथे येण्याचा उद्देश सांगितला. प्रथम नेपाळच्या राजघराण्याशी संबंधित मंदिरात सोय. पण अनुष्ठानाकरिता खाजगी जागा अधिक श्रेयस्कर हवी होती. तशी जागा व्यंकटेश मंदिरात मिळाली. महंत श्रीराम प्रपन्नाचार्य स्वामी या मंदिराचे प्रमुख होते. वासुदेवाची उपासना - ध्यानधारणा, तुलसी पत्रे खाऊन, नित्यनेम चालू होता. स्वामींनी उपासनेचा रहस्ये सांगितली. त्याचा चांगला परिणाम झाला.

स्वामीजींनी वासुदेवाची योग्यता ओळखून त्याने संन्यास घेऊन महंत व्हावे, अशी इच्छा. पण याला वासुदेव तयार नव्हता.

वासुदेव परत आले. पत्नीची भेट घेतली. संन्यास घेऊ नये हा प्रश्न कायमचा मिटला. गृहस्थाश्रमात रहावयाचे ठरले. पोटापाण्याचा प्रश्न.

साल १९३७. पुन्हा अकोला येथे. डॉ. नंदलाल भारती यांचेकडे रहाणे. औषधोपचाराचा अभ्यास करावा. वासुदेवाने लगेच तशी सुरुवात केली. थोड्याच दिवसात प्रगती. अनेक रुग्णांचा दुवा मिळाला. सुमारे तीन वर्षांत त्यांनी आयुर्वेद, होमिओपॅथीमध्ये चांगली प्रगती केली. डॉ. भारतींनी योग्य त्या ठिकाणी स्वत:चा व्यवसाय करावा, असे सुचविले. हे ऐकून काय करावे? कोठे जावे? हा मानसिक संघर्ष.

साल १९३९. शेवटी रेचक कुंभक प्रकार करून पहावा म्हणून ठरवले. आणि त्यात ते यशस्वी झाले.

साल १९४०. तेल्हारा. वरील घटनेमुळे वृत्ती प्रसन्न. अकोल्याहून अमरावती इ. ठिकाणाहून तेल्हारा गावी आले. गणेशोत्सवात त्यांनी एक सुंदर भाषण केले. त्यामुळे तेथील स्थानिक लोकांची मने जिंकली. त्यांच्याच सहकार्याने १० ऑक्टोबर १९४४ (दसरा) मध्ये होमिओपॅथीचा दवाखाना सुरू केला. आपल्या पत्नीला व दोन मुलांना आणले व रीतसर प्रापंचिकाचे जीवन

सुरू केले.

इथे निरनिराळ्या विषयावर स्थानिक लोकांशी चर्चा होत. चर्चेत आध्यात्मिक विचाराचा प्रभाव पडे.

येथे अंगुलबाबासंबंधी विचित्र घटना. चमत्कारिक गोष्टीकडे पहाण्याचा लोकांचा कल. डॉ. बाबा भिडे हेही उत्सुक. पण त्यांना वासुदेवाने विशिष्ट योगासन करून प्रचिती घ्यावी असे सुचवले. तसे केल्यावर त्यांना खरोखरच तथाकथित बाबाचे खरे स्वरूप कळून आले. थोड्याच दिवसात त्याला अटक झाली.

डॉ. भिडे हे वासुदेवाचे पहिले शिष्य. येथून पुढे वासुदेव याऐवजी त्यांना वासुदेव गुरुजी असे म्हणू लागले.

सौ. भिडे तिसऱ्यांदा गरोदर. त्यांना पोटाखाली दुखत असे. हालचाल करू शकत नव्हत्या. पण गुरुजींना त्यांना ध्यान करावयास सांगितले व बीजमंत्र दिला. त्यांना एकएक अनुभव येऊ लागले. काही दिवसांनी त्या प्रसुत होऊन मुलगा झाला. नागपूरला जाऊन मेयो हॉस्पिटलमधील ऑपरेशन टळले. मुलाचे नाव मुकुंद. गुरुजींनी सुचविले. हा पुढे ENT स्पेशालिस्ट झाला.

साल १९५६. माँजींना एक स्वप्न पडले. "गुरुजींना आषाढी एकादशी पंढरपूरला यावयास सांगा." प्रत्यक्षात ही गोष्ट उभयता विसरून गेले. एकादशीचे दिवशी हा 'पाहुणा' घरीच आला. गुरुजींना आंघोळ घातली. स्वत: जेवला. जाताना विठोबाला हार घ्यावयास आठ आणे मागितले. तसे दिल्यावर तो निघून गेला आणि दिसेनासा झाला.

साल १९४०. दुसऱ्या महायुद्धामुळे महागाई. सगळीकडेच टंचाई. गुरुजींवर मिलो खाण्याची वेळ. त्यांना मनस्ताप झाला. न जेवताच तसेच ध्यान करीत पडून राहिले. बद्रीदासाने हा प्रश्न सोडवला. असा प्रश्न पुन: येणार नाही असे आश्वासन दिले. असाच प्रश्न मुलांच्या मुंजीसंबंधीचा. दोघा मुलांची मुंज एकत्र करण्याचे ठरवले. खर्च रु. १००/- अगदी जवळचे परिचित बोलवावेत. प्रत्यक्षात सहाशे लोक आले. जेवून गेले. हे कसे? उत्साहात सगळा कार्यक्रम पार पडला. ज्याच्याकडून किराणा माल आणला त्यानेही ते पैसे त्याच्या बायकोकडून मुंजीनिमित्त भेट म्हणून परत केले.

तेल्हारामधील मजहरखान - उर्दू शाळेतील हेडमास्तर. हा वेगळा

जाणकार शिष्य. गुरुजींच्या सानिध्यात अनेक वेगळे आध्यात्मिक अनुभव आले. तो म्हणतो, ''हे गुरुजी हा चालता बोलता संत अकबर बादशहाचे वेळी असता तर एक नवा धर्म काढला असता.''

साल १९५८. तेल्हारामध्ये गुरुजींच्या जवळचे मित्र. श्री. श्रीधर बाबूराव गंगाधर धर्माधिकारी होते. त्यांची नेमणूक खामगावला झाली. बाबूराव धर्माधिकारी यांचे मित्र मधुकरराव देशपांडे, साखरखेडा येथील सधन शेतकरी. मधुकररावांना गुरुजींनी आपल्या गावी यावे, आपली संपन्न स्थिती पहावी, त्याबाबत ते सतत प्रयत्नशील असत. पण शेवटपर्यंत तसे होऊ शकले नाही. 'तुम्ही तुमचे इच्छेने येण्याचे ठरवले तर शक्यता.' एवढेच मधुकाका म्हणाले.

शेठ हनुमानदास मल्ल यांना आध्यात्माची गोडी होती. गुरुजींना घेऊन वृंदावनाला त्यांच्या गुरूकडे दर्शनाकरिता न्यावे असे वाटले. गुरुजींना ध्यानधारणेतूनच त्यांच्या गुरूचे स्वरूप समजून आले. ह्या गुरूंनी हनुमानदासाला कळवले की तेल्हारामधील पंडितजी (गुरुजी) हे आध्यात्मिक दर्जा असलेले मोठे सद्‍गृहस्थ आहेत !

राधा हे नाव उच्चारले की भक्तिप्रेम उचंबळून येते. गुरुजींना तिचे तीनदा दर्शन झाले.

वृंदावन येथे टोपीकुंजचे महंतांनी गुरुजींना गूढ जागा दाखविल्या. त्या पाठीमागचे रहस्य गुरुजींना उलगडून दाखवले. ते ऐकून सगळेच आश्चर्यचकित झाले. गुरुजींना ध्यानस्थ बसले असताना राधाचे आल्हाददायक दर्शन झाले. दुसऱ्या दिवशी त्यांनी त्या ठिकाणी जावयाचे ठरवले. ते तिथे गेले. जसे दर्शन झाले होते, तसेच तिथे वातावरण होते.

वृंदावन येथे गुरुजींच्या नावाचा बोलाबाला झाला. काही विद्यार्थी उत्सुकतेने आले. पण काही कारणांनी गुरुजी तेल्हाराला परत गेले.

इथे आल्यावर गुरुजींना शास्त्रीय संगीत शिकण्याची संधी मिळाली. पैठणच्या पहिल्या मुक्कामात त्यांनी भागवतबुवांकडून प्राथमिक धडे घेतले होते. इथे भागवतबुवा पंढरपूरकर यांच्याकडून शिकण्याची संधी मिळाली. एकदा गणपती उत्सवात त्यांनी गाऊन दाखवले.

संगीताच्या प्रभावाने गुरुजींनी डॉ. भिडे यांची डोकेदुखी बरी केली. संगीताप्रमाणेच गुरुजींनी ज्योतिषशास्त्राचा अभ्यास केला !

साल १९६०. गुरुजींनी आपला वैद्यकीय व्यवसाय बंद करण्याचे ठरविले. तेल्हारातील रहिवासी त्यांच्यावर प्रेम करीत होते. गुरुजीही सर्वांशी प्रेमळपणे वागत. पण केव्हातरी वेगळा विचार करण्याची वेळ येते. मुले मोठी झाल्यामुळे त्यांना उद्योग व्यवसाय शोधून द्यावयाचा होता. तसेच होमिओपॅथीची प्रॅक्टिस चांगली होती. तरी आर्थिकदृष्ट्या फार फायदा होत नव्हता. म्हणून पुढील शोध सुरू झाला.

कलकत्ता, कटक, बनपूर, जगन्नाथपुरी इ. ठिकाणी जाऊन आले. वैजनाथ गुप्त, नागपूर यांना योगविद्येची आवड होती. पण त्यांचा याबाबतचा अनुभव चांगला नव्हता. गुरुजींनी मात्र योग्य मार्गदर्शन करून याबातचा त्यांचा दृष्टिकोन बदलला.

गुरुजी पुन: वृंदावनला दुसऱ्यांदा आले. जागा बदलण्यात अद्याप शोध लागला नव्हता. भिलाई येथे नव्याने कारखाना उभारला जात होता. त्यांच्या मित्राने नागपूरला प्रॅक्टिस करावी असे सुचवले. येथे एस्. के. गुप्ता यांच्याकडे आले. ते आजारी होते. इतर डॉक्टरांचे उपचार चालू होते. पण गुरुजींनी निदान बरोबर करून योग्य तो इलाज केला. गुप्ताजी संपूर्ण बरे झाले. त्यांनी पूर्वी नागपूरला होमिओपॅथीचा दवाखाना काढून देण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात ते तसे करू शकले नाहीत. पण त्यांनी दुर्ग (म. प्र.) येथे तुळाराम आर्य कन्या महाविद्यालयात सहाय्यक गायन शिक्षकाची जागा मिळवून दिली. १९६९ साली गायनशिक्षक म्हणून ते रुजू झाले. दुर्ग येथे ते १४ वर्षे होते. या काळात गुरुजींनी स्वत:चे संगीत विद्यालय सुरू केले. पत्नी आणि मुलांना इथे आणले. संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांना योग पद्धतीचेही शिक्षण दिले. त्याचबरोबर ते अध्यात्माबाबतही मार्गदर्शन करीत.

येथून पुढे गुरुजींचे आध्यात्मिक अनुभव वाढू लागले. अनेक इच्छुक त्यांना भेटत. अशांपैकी कु. गुप्ता, विनायक शंकर दुबे, के. के द्विवेदी. दीपक नगरात गाण्याचा कार्यक्रम होता. गुरुजी तिथे गेले होते. तासाभराने त्यांना गूढ तीव्र संवेदना होऊ लागल्या. ते धावतच घरी परत आले. स्वच्छ होऊन अंथरुणावर पडून राहिले. कुटुंबीय काळजी करू लागले. पण गुरुजींची स्थिती उच्च अनुभूतीच्या स्तरावर होती. याला खरी समाधी म्हणतात ! ह्या सर्वोच्च आनंदात शांत अवस्थेत ते पूर्ण तीन दिवस होते. नंतर पूर्वावस्थेत आले.

दुर्ग येथील वास्तव्यात त्यांच्या मुलांना आर्थिकदृष्ट्या उद्योग व्यवसाय मिळाला. त्यांचे विवाह झाले. ते स्थिरावले. गुरुजी कौटुंबिक जबाबदारीतून मोकळे झाले. संगीत विद्यालयाशी संबंध तोडावेसे वाटू लागले. संगीतामुळे त्यांचे शरीर संवेदनशील होत असे. त्यामुळे ते समाधी अवस्थेत जात. असे अनुभव वरचेवर येऊ लागले.

के. के. द्विवेदी निवृत्त कलेक्टर. यांच्या विनंतीवरून गुरुजी बिलासपूरला आले. त्या मुक्कामात अनेक इच्छूक साधक गुरुजींना भेटले. रामकृष्ण मिशनचे प्रमुख म्हणून गुरुजींनी काम करावे असे द्विवेदींना वाटले. पण तसे झाले नाही. प्रमुख हा संन्यासी असावा असा नियम होता.

एका इच्छुकाला 'समाधीसुख' यांचा खुलासा गुरुजींनी केला.

ह्या काळात जिथे जिथे वास्तव्य होते, तिथे तिथे अनेकांना दीक्षा दिली. दीक्षा विधी अगदी साधा असे.

साल १९७१-७२. संगीत विद्यालयाशी असलेले संबंध सोडले. माँजीं मुलांजवळ राहू लागल्या. गुरुजींची पुन: भ्रमंती सुरू झाली. त्यांचा मार्ग आता ज्ञानप्रसारकाचा होता. ठिकठिकाणी मुक्कामांत त्यांना संवेदना होत असत. ते समाधी अवस्थेत जात. या संबंधात त्यांनी वेळोवेळी व्यक्त केलेले आध्यात्मिक विचार, ज्या प्रसंगातून ते विचार उद्‌भवले ते मुळातूनच वाचण्यासारखे आहेत.

शहडोल येथील काही प्रसंग लक्षात ठेवण्यासारखे आहेत. येथील शिष्यमंडळींनी साधनेत चांगली प्रगती केली. गुरुप्रसाद पांडे हा शिष्य लक्षात ठेवण्यासारखा आहे. श्रीमती दुबे यांचा हृदयविकार उपासनेतून थांबला.

मध्यप्रदेशमधून गुरुजी महाराष्ट्र, नागपूर, वर्धा, अमरावती, अकोला येथे आले. इथे त्यांची शिष्य मंडळी होती.

साल १९७५. देशात आणीबाणी. काही राजकीय कार्यकर्त्यांना अटक. त्यापैकी ॲड. बाबासाहेब तकवले (वर्धा) होते. त्यांनी पहिल्या भेटीतच अनुग्रह घेतला,. वर्धा येथे शिष्य मंडळींचे महत्त्वाचे केंद्र झाले.

साल १९७७. जून. माँजींचे निधन.

पू. गुरुजी हे चमत्कारिक बाबा नाहीत. त्यांच्या मते सगळ्यात मोठा चमत्कार कोणता तर स्वत:ची ओळख - आत्मानुभूती करून घेणे होय. एकदा का परमेश्वराची खात्री झाली की हा इच्छुक चाळवला जात नाही, मोहवश होत

नाही, तिकडे पाठ फिरवतो, (आपल्या सत्याच्या शोधार्थ, अंतिम सत्याकरिता) तेव्हाच गुप्तपणे ठेवलेले रहस्य प्रगट होते. परमेश्वराचे राज्य मोकळे होते.

प. पू. गुरुजींचे दोन आश्रम आहेत. त्यांच्या शिष्य मंडळीत हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन, जैन, शीख इ. विविध पंथीय आहेत. त्यांचा कोणताही विशिष्ट विचाराचा किंवा तत्त्वज्ञान सांगणारा संप्रदाय नाही की ज्यामध्ये त्यांनी स्वत:ची स्वतंत्र विचारसरणी मांडली आहे. त्यांचे सारे तत्त्वज्ञान हे जगातील प्रस्थापित पवित्र धर्मातून, वेद-वेदांत, उपनिषद्, श्रीमद् भागवत, बायबल, कुराण इ. आले आहे.

परमेश्वर माणसाला निर्माण करतो. त्या मानवाने पृथ्वीवरील जीवनात त्या परमेश्वराला जाणून घेऊन त्याच्या उपासनेतून त्याच्यामार्फत पोचण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते आत्मानुभूतितून शक्य आहे.

हे जग खऱ्या अर्थाने अश्रूंनी भरलेले आहे. मग ते टाळावे. परत येणे, पुन: दु:खपूर्ण, कष्टमय जीवन जगावे? म्हणून आध्यात्मिक उद्‌बोधन हवे. परमेश्वराची कृपा आणि सद्‌गुरूचे मार्गदर्शन यामुळे स्वर्गस्थ सुखाचा अक्षय आनंद ह्या जगात राहून मिळतो. असा आनंद मिळवून प. पू. गुरुजी १४ मार्च १९९८ रोजी तीन वेळा ओंकाराचा उच्चार करून मुंगेली (बिलासपूर, म. प्र.) येथे पहाटे ४ वाजता हजारो भक्तांच्या, उपासकांच्या उपस्थितीत ब्रह्मलीन झाले. ते ९० वर्षांचे होते.

॥ ॐ ॥

*न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।*

***- भगवान***

*ह्या विश्वामध्ये ज्ञानासारखी पवित्र वस्तू नाही.*
*कोणतेही ज्ञान प्राप्त करण्यासाठी प्रमाणाची आवश्यकता आहे.*

# प. पू. गुरुजींनी परमेश्वराच्या शोधार्थ भ्रमंती-भटकंती केली ती ठिकाणे :

द. अमेरिका (ब्रिटिश गियाना) : जॉर्जटाऊन शहर
हिंदुस्थानकडे : केप ऑफ गुड होप, केपटाऊन
सतलज बोट कलकत्त्याच्या फोगटिस घाटावर, उपनगर मुटिया बुर्ज.
अलाहाबाद - बरद्वान. त्रिवेणी संगमात स्नान.
अलाहाबाद जि. भेजा (ता.) सेमरिहा खेडे. सेवाई मुझा - नागेसर कालुपूर (सेवाई गावी स्वतः घर बांधून राहू लागले).
वडिलांचे निधनानंतर वाडवडिलांच्या गावी.

**परमेश्वराच्या शोधार्थ :**

१) पसान गाव, पेंट्रारोड मातीन.

२) महाराष्ट्रात प्रवास : शेगाव, दानापूर, भुसावळ.

गुजराथ : भडोच, सुरत, आनंद गोध्रा,

राजस्थानातून काठेवाड, सुरत, विरमगाव, भुसावळ. शेगावहून वारीगावी रामलीला कंपनीत प्रवेश. नागपूर, भंडारा रोड, पांढूणी, मुलताई बैतुल काटोल, वर्धा, आर्वी, मुळगाव, मोर्शी, वरुडगाव. अमरावती, यवतमाळ, पुसद, अकोला, रामलीला कंपनी - वाशीम, हिंगोली, नांदेड, हुमनाबाद, नांदेड, देगलूर, मदनूर.

हैद्राबाद, सिकंदराबाद, बेगमबझार, अमीरपेठ, औरंगाबाद (रामलीला कंपनीशी संबंध संपले). जालना, औरंगाबाद, पैठण, जालना.

देऊळगाव राजा : पुनः जालना नंतर औरंगाबाद.


कालुपूर गाव (अलाहाबाद) : अकोल्याला परत.

औरंगाबाद, पैठण, औरंगाबादला परत.

अयोध्या : महाराष्ट्रात अकोला (डॉ. भारती यांचेकडे वास्तव्य) स्वतंत्र व्यवसाय. तेल्हारा, खामगाव, वृंदावन, गोवर्धन, तेल्हारा परत.

तेल्हारामधून स्थलांतर करण्याचा प्रयत्न. कलकत्ता, बेलधारिया, सालखिया, बनपूर, कटक, जगन्नाथपुरी, भिलाई, नागपूर, बिलासपूर, शहडोल, रायगड, दुर्ग, रायपूर, बेहेतरा, बालोद, पठाणकोट, जम्मू मिरत डेहराडून, मुंगेली, (बिलासपूर (म. प्र.) वासुदेवाश्रमात वास्तव्य.

|| ॐ ||



# प. पू. गुरुजी यांच्या सहवासात आलेल्या / साहाय्य करणाऱ्या व्यक्ती तसेच त्यांचा शिष्यपरिवार

१) वडील रामेश्वर तिवारी, मामा (नंदकिशोर दुबे) मामी, आजोबा - पंडित जयमंगल दुबे. इनामदार, मि. सुब्रतिमियाँ, विद्वान धर्मगुरू - प्रिस्ट, विशप (कॅथॉलिक प्रोटेस्टंट) एक वृद्ध मुस्लिम.

२) हिंदुस्थानात कलकत्ता शहरी एक बंगाली गृहस्थ (सतलज बोटीवरील) श्री भिरवारी.

कालुपूर गावी आत्या सुदानियाँ. बनवास परमसुख, पंडित मिश्रा.

३) परमेश्वराच्या शोधार्थ :

महंत दासबाबा (वारी गावी), श्रीराम अष्टीकर-इंजिनिअर, शामराव तालोकर-मॅनेजर - जिनिंग फॅक्टरी, रामलीला कंपनीत प्रवेश - शरीरसंपदा. मुंगीलाल, वरूडगावी भेटलेला गुराखी.

४) अकोला येथे डॉ. नंदलाल भारती, नानुराम मिश्रा.

डॉ. नंदलाल भारती एकप्रकारे गुरू म्हणून. वासुदेव त्यांना स्वामीजी म्हणू लागले. तर डॉ. भारती वासुदेवाला गुरुजी म्हणू लागले.

रामलीला कंपनी - वाशीम, हिंगोली, नांदेड आणि पुढे हुमनाबाद.

ख्वाजासाहेब मोहुनूद्दिन चिस्ती, शेरखान पठाण.

मदनूर येथील नगरशेठ कोमठी. औरंगाबाद येथे नबाबाच्या गाडीचा ड्रायव्हर.

औरंगाबाद येथे वडाच्या झाडाखाली कालीमातेचे दर्शन झाल्यावर मदत

करणारा एक शिक्षक.

पैठण : हिमतसिंग ठाकूर, एकनाथ महाराजांच्या देवळाचे पुजारी, भागवतबुवा.

जालना : संस्कृत पंडित शिवकुमार शास्त्री (ब्राह्मण), महंत भगवताचार्य (बीड)

औरंगाबाद : शेठ मगनलाल, श्री. बुलाखी महाराज, शेठ मगनलाल यांचा मुलगा गोविंददास : गोल छत्रीत ध्यानधारणा करीत असताना एक उंचापुरा मुस्लिम संत पाहिला- हाच पेश इमाम. (बीजाकरिता नारायणकवच हवेच) बुलाखी महाराज आणि कुटुंबिय.

औरंगाबाद : श्री. बापूसाहेब देशपांडे, दादा भीमराव जोशी, द्वारकादास (पुजाऱ्याचा मुलगा) जालन्याला परत, अकोला (डॉ. नंदलाल भारती)

अघोरीबाबाशी गाठ (अलाहाबादला जाणाऱ्या गाडीत)

वासुदेव पत्नीच्या गावी भेटीस गेले. काका गोमटी यांचेकडे पत्नीसह प्रापंचिकासारखे जीवन सुरू.

अकोल्याला परत. डॉ. नंदलाल भारतींकडे मुक्काम.

पुन: भ्रमंती. औरंगाबाद - बापुसाहेब देशपांडे, दादा भीमराव जोशी, श्री बुलाखी महाराज, पुन: पैठण : हिंमतसिंग ठाकूर, गुलाम अहमद उस्ताद, संत एकनाथांनी दर्शन दिले. औरंगाबादला परत. (एका ड्रायव्हरने गाडीतून सोडले.)

अयोध्या : पुजारी पंडित नंदकिशोर. नेपाळच्या महाराणी - देवळांचे परिसरात गाठभेट. महंत श्रीस्वामीराम प्रपन्नाचार्य (व्यंकटेश मंदीर)

अयोध्येहून परत. पत्नीशी भेट.

महाराष्ट्रात अकोला शहरी परत. डॉ. नंदलाल भारतीं यांचेकडे औषधोपचाराचा अभ्यास. डॉ. वासुदेवाला छोटा स्वामी असे पेशंट म्हणत. दोन स्त्रिया. (एक रुग्ण)

तीन वर्षाच्या दीर्घ अभ्यासानंतर, वैद्यकीय कौशल्य प्राप्त केल्यानंतर स्वतंत्र वयवसाय सुरू करावा, असा डॉ. भारतींचा सल्ला.

तेल्हारा : नंदलाल तिवारी दूध विक्रेता. धर्मशाळेत रहाण्यास खोली दिली. स्थानिक शिक्षकांशी परिचय.

वासुदेवाचे गणेशोत्सवात भाषण. डॉ. घैसास, श्री. संत, श्री. मामा भाजेकर, श्री. श्रीधर गंगाधर धर्माधिकारी (बाबूराव), श्री. केशवराव तागडे. श्री. माटे मास्तर, डॉ. नंदलाल भारती, वासुदेवाच्या दवाखान्याच्या उद्घाटनाकरिता आले.

वासुदेवाने पत्नी व मुलांना आणले.

येथील इतर मित्र : डॉ. भाऊ भिडे, श्री. गोडबोले.

अंगुलबाबा (चमत्कार करणारा) (डॉ. भाऊ भिडे वासुदेवाचे पहिले शिष्य) सौ. भिडे, डॉ. मुकुंद भिडे.

आषाढी एकादशीला आलेले पाहुणा श्री विठ्ठल (पांडुरंग)

बद्रीदास पहाडिया : (एक श्रीमंत शेतकरी)

वासुदेव गुरुजींच्या मुलांचे मौजीबंधन.

(फक्त ७५ लोकांना पुरेल इतके केलेले अन्न ६०० लोकांना कसे पुरवले गेले?) पोलीस इन्स्पेक्टर महाजन व भैय्याजी पांडे.

मगनलाल (व्यापारी)

मजहरखान. उर्दू शाळेचे हेडमास्तर. पहिला मुस्लिम - आध्यात्मिक मार्गदर्शन आणि संस्कार गुरुजींकडून घेतले.

खामगाव : मधुकरराव देशपांडे (सधन शेतकरी)

वृंदावन : शेठ हनुमानदास मल्ल. (गुरुजींना 'राधा'चे दर्शन वृंदावन येथे तीनदा झाले.) टोपी कुंजचे महंत : प्रतापचंद्र चांडक, (हनुमानदास मल्ल यांचे मामा) वृंदावन येथील संस्कृत महाविद्यालयाचे विद्यार्थी.

तेल्हारा परत : अकोला येथील स्थानिक गायक श्री. सकळकळे, ॲड. तायडे भागवतबुवा पंढरपूरकर - गायक - हार्मोनियम वादक. (शेठ मणीलाल शहा) यांचेकडे मुक्काम. गुरुजींनी संगीताच्या अभ्यासास भागवतबुवा यांचेकडे सुरुवात केली. (४७-४९ साल) डॉ. भिडे यांची डोकेदुखी (इंगोले तबलावादक)

ज्योतिषाचा अभ्यास - श्री. काटे.

तेल्हारामधून बाहेर पडण्याचा प्रयत्न (१९६०)

कलकत्ता - महावीर प्रसाद शर्मा, शेठ भालू (कटक ओरिसा), डॉ. मदनलाल वैजनाथ गुप्ता, हरिराम.

भिलाई - काशीराम अगरवाल, एस्. के. गुप्ता (नागपूर), गिरधरलाल शर्मा (सीताबर्डी), दुर्ग (म. प्र.), सहाय्यक गायन शिक्षक - वासुदेव गुरुजींची मदत. स्वामी दिव्यानंद सरस्वती - आर्य समाज.

श्रीमती चंद्रिका प्रसाद पांडे, नारायणभाई सबजीवाला यांच्या साहाय्याने गुरुजींनी स्वतःचे संगीत विद्यालय काढले. (१९६१)

राजेंद्र सुंदर गुप्ता गुरुजींच्या संगीत विद्यालयातील काही विद्यार्थी - गजानन सोनी, चित्रनाथ मिश्रा, चंद्रप्रकाश अगरवाल आणि देवराम अंकोटकर, कु. कृष्णा गुप्ता, विनायक शंकर दुबे, के. के. द्विवेदी.

बिलासपूर : लक्ष्मीप्रसाद मिश्रा, श्री. नर्मदा प्रसाद, हरीशचंद्र त्रिपाठी, लक्ष्मणराव देशपांडे, श्री. काळे.

शहडोल : जानकी प्रसाद मिश्र, हरनारायण दुबे, भैय्यालाल तिवारी, गुरुप्रसाद पांडे, रामखिलवान मिश्रा, हर्षचंद्र पाटील.

बिलासपूर : मिश्रा कुटुंबीय, श्री. काळे, डॉ. देवरस, बालाप्रसाद त्रिपाठी, रघुनाथ कुमठकर, बाळासाहेब देशपांडे, डॉ. गिरीश पांडे. मिस् सुधा व्यास, यादव अमृतराव गोवर्धन, डॉ. पंधेर, डॉ. भानूगुप्ता.

रायगड (म. प्र.) : नर्मदा प्रसाद द्विवेदी.

शहडोल : हर नारायण दुबे, गुरुप्रसाद पांडे, श्रीमती दुबे.

मध्यप्रदेश - महाराष्ट्र : श्री. पांडे.

नागपूर - वर्धा : ॲड. बाबा तकवाले, ए. के. कुरियन्.

रायपूर : श्रीमती सयीदा शिंदे, डॉ. शिंदे

अमरावती : अशोक धर्माधिकारी

सदा स्वरुपानुसंधान । हे मुख्य साधुचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जनांवेगळा ॥ **(मनोबोध)**

*प. पू. गुरुजी साधकांना, उपासकांना, भक्तांना खालील शब्दांत आशीर्वाद देत:*

**आनंद मंगल हो, कल्याण हो,**
**जीवन सफल हो, जीवनयात्रा सफल हो.**

# कुंडलिनी जागृती

(श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज)

***

॥ ॐ ॥

नामाचा चमत्कार असा आहे की नामाने सगुणाचे दर्शन होते, तसा निर्गुणाचा साक्षात्कारदेखील होतो. सगुणाच्या दर्शनामध्ये महाराज सांगत - आपले आराध्य दैवत आपल्या संगतीत राहते. पण नाम साधकाला त्याच्याही पुढे नेते. ते निर्गुणाचा साक्षात्कार करून देते. सर्व विश्व एकाच परमात्मास्वरूपाने भरून गेलेले प्रत्यक्षात अनुभवास येते.

नामाने कुंडलिनीवर जो परिणाम घडतो, त्याच्याबद्दल महाराज म्हणतात, ''मोठी प्रकृति म्हणजे विश्वशक्ती. ती गोळा होऊन माणसाच्या ठिकाणी वास करते. बहुतेक माणसांमध्ये तिचे तोंड खाली असते. शिवाय ती निजलेली असते. सद्गुरूकडून नाम घेतले म्हणजे ती जागी होते व तिचे तोंड वरच्या दिशेला होते. सत्संगाने आणि नुसत्या नामस्मरणाने देखील ती जागी होऊन तिचे तोंड वर होते. जागी झालेली ती शक्ती आपल्या मूळ स्थानावरून वर जाण्याच्या पहिल्या पायरीवर आली की माणूस संतदर्शने घेतो, संतांच्या ग्रंथांचा अभ्यास करतो, संतकृपा व्हावी म्हणून प्रार्थना करतो आणि नियमाने नामस्मरण करतो. या अभ्यासाचा परिणाम होऊन शक्ती वर जाण्याच्या दुसऱ्या पायरीवर येते. ही पायरी बेंबीपाशी असते. माणसाची वासना बेंबीपाशी वास करते. तेथे कुंडलिनी येऊन स्थिर झाली म्हणजे माणसाची वासनाच बदलते. इंद्रियांचे भोग भोगण्याची लालसा नकळत क्षीण होते. नामाला जीवन वाहावे अशी उत्कट

इच्छा होते. काही अभ्यासकांना आतील संघर्षाचा कमी-जास्त तीव्र अनुभव येतो. गत आयुष्याबद्दल पश्चाताप होतो. पण येथे जीवनाचे खरे ध्येय निश्चित होते.

कुंडलिनी बेंबीपर्यंत वर चढणे हा कुंडलिनीच्या वर चढण्याचा पहिला टप्पा आहे. या टप्प्यापर्यंत पोचल्यावर काही लोकांना काव्य सुचते, नवीन कल्पना सुचतात, वाक्चातुर्य प्राप्त होते. येथे न थांबता साधकाने चिकाटीने नामस्मरण चालू ठेवले तर कुंडलिनी हृदयापर्यंत पोचते. तेथे एकीकडे आपल्या आराध्यदेवताचे सानिध्य लाभते आणि दुसरीकडे जागेपणाचा संबंध काळ नामाचे स्मरण टिकते. कधी कधी नामस्मरणातून दिव्य नाद ऐकू येतो. आराध्य दैवताच्या किंवा सद्गुरुच्या मनोमय सान्निध्यातून त्यांच्याबद्दल नि:स्वार्थी प्रेम उदय पावते.

हृदयातून कुंडलिनी कंठामध्ये जाते. तेथे स्वप्नामध्ये व गाढ झोपेमध्ये नाम चालते. येथे कितीतरी वेळ मानसपूजा चालते. तेथून कुंडलिनी दोन्ही भुवयांच्या मध्ये पोचते. तेथे ईश्वराचे सगुणदर्शन घडते. शक्तीच्या वर चढण्याचा हा दुसरा टप्पा समजावा. येथपर्यंत पोचणे फार अवघड नाही. पण पोचल्यावर तेथे स्थिरावणे मात्र कठीण असते. लौकिकाची, सिद्धींची, श्रेष्ठपणाच्या कल्पनेची आकर्षणे केव्हा काय विघ्न आणतील आणि खाली ओढतील याचा नेम नसतो. येथे श्रीसद्गुरूचे संरक्षण अनुभवास येते.

येथून पलीकडे जाणारे थोडेच आढळतात. पलीकडे जाणारा साधक संपूर्ण शरणागत होऊन जातो. काही काळ तो भानावर असत नाही. पण मग देहावर येऊन अनेक लोकांना नामस्मरणाला लावतो.

॥ ॐ ॥

सर्वेऽपि सुखिन: सन्तु । सर्वे सन्तु निरामया: ॥
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित् दु:खभाग् भवेत् ॥

ॐ शान्ति: । शान्ति: । शान्ति: ॥

# ॐ कुंडलिनी जागृती

(श्री रामकृष्णांच्या अमृतवाणीतून)

************************

॥ ॐ ॥

कुंडलिनी आणि आध्यात्मिक जागृती (अमृतवाणी - रामकृष्ण - उपदेश संग्रह) कुंडलिनी जागृत झाल्याशिवाय चैतन्याची प्राप्ती होत नाही. कुंडलिनी ही मूलाधारचक्रात सुप्तपणे वास करीत असते. जागृत झाल्यावर ती स्वाधिष्ठान, मणिपूर आदि चक्रांचा भेद करून शेवटी मस्तकात जाऊन पोहोचते. त्याचवेळी समाधी लागते. हे सर्व मी प्रत्यक्ष पाहिले आहे.

ईश्वराच्या दर्शनाचे एक लक्षण असे आहे - आतून महावायू अगदी गुरगुर करीत उठतो आणि मस्तकापर्यंत जाऊन पोहोचतो. तेव्हा मग समाधी लागते आणि भगवंताचे दर्शन घडते.

कुंडलिनी जागरणाच्या वेळी येणाऱ्या अनुभवांचे वर्णन करताना श्रीरामकृष्ण एकदा म्हणाले होते - "तो वायू सरसर करीत पायापासून निघतो व ऊर्ध्वदिशेने डोक्याकडे झेपावतो. तो डोक्यात पोहोचेपर्यंत मला भान असते; पण तो डोक्यात शिरताच मी अगदी बेशुद्ध होऊन जातो. तेव्हा पाहणे आणि ऐकणेही जिथे बंद होते तिथे मग बोलण्याचा प्रश्नच कुठे उपस्थित होतो? तिथे बोलायला असते कोण? 'मी', 'तू' ही बुद्धीच नाहीशी होते. तुम्हाला सगळे सांगावे, असे मला पुष्कळ वाटते. इथपर्यंत किंवा अधिक म्हणजे इथपर्यंत (क्रमशः हृदयाकडे आणि गळ्याकडे बोट दाखवून) तो जेव्हा येतो, तोपर्यंत सगळे काही सांगितले जाऊ शकते, आणि मी सांगतो देखील, पण एकदा का

त्याने हे स्थान (कंठाकडे बोट दाखवून) ओलांडले की सगळे संपते जणुकाही कोणीतरी माझे तोंड घट्ट दाबून ठेवतो. मग सगळीच गडबड होते. मी स्वत:ला मुळीच सांभाळू शकत नाही. तो वायू या स्थानाच्या वर चढला म्हणजे मला जी दर्शने घडतात ती सांगण्याचा विचार मी मनात आणताच माझे मन चटकन् वर झेप घेते आणि मग मला काहीएक सांगता येत नाही.''

मन जेव्हा कंठाच्या वरच्या चक्रात पोहोचते तेव्हा कोणती दर्शने घडतात, ते सांगण्याचा श्रीरामकृष्णांनी अनेकदा प्रयत्न केला; पण प्रत्येक वेळी ते असफलच ठरले. एक दिवस मोठ्या निश्चयाने त्यांनी त्या सगळ्या गोष्टी सांगायचे ठरवले आणि प्रारंभ केला. मनाच्या कंठचक्रापर्यंत पोचण्याच्या प्रवासात जी काही दर्शने घडतात, त्यांचे त्यांनी उत्तम प्रकारे वर्णन केले. मग आपल्या भुवयांमधील स्थानाकडे अंगुलीनिर्देश करून ते म्हणाले, ''मन या स्थानी पोहचताच जीवाला परमात्म्याचे दर्शन घडते आणि तो समाधिमग्न होऊन जातो. तेव्हा परमात्मा आणि जीवात्मा यांच्यामध्ये एक स्वच्छ पातळसा पडदा मात्र उरतो. त्यावेळी त्याला असे दिसते की ....'' इथपर्यंत येऊन परमात्म्याच्या दर्शनाचे विशेष रूपवर्णन करू लागताच ते समाधिस्थ झाले. समाधी उतरताच पुन्हा जेव्हा त्यांनी सांगण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ते पुन्हा समाधिस्थ झाले. अशा रीतीने वारंवार प्रयत्न करूनही ते जेव्हा असफल ठरले तेव्हा अश्रुपूर्ण नेत्रांनी ते म्हणाले, ''अरे तुम्हाला सगळ्या गोष्टी सांगाव्यात, ते तुमच्यापासून काही एक लपवू नये, असे मला अगदी मनापासून वाटते. पण काय करू? काय वाटेल ते केले तरी आई नाहीच म्हणते. मुळी तोंडच धरून ठेवते.''

सुषुम्नामार्गाने कुंडलिनीशक्ती वर चढू लागली म्हणजे होणाऱ्या विविध प्रकारच्या अनुभवांसंबंधी श्रीरामकृष्ण पुढीलप्रमाणे सांगत असत - ''तो वायू जेव्हा सरसर ध्वनी करीत मस्तकाकडे चढत जातो, तेव्हा तो अनेक प्रकारे चढतो. नेहमी तो एकाच पद्धतीने चढत नाही. शास्त्रात त्याच्या पाच गती सांगितल्या आहेत. (१) पिपीलिका गती - तोंडात अन्नकण घेतलेल्या मुंग्या जशा एका रांगेत तुरुतुरू चालत राहतात, तशी ही कुंडलिनी जेव्हा पायापाशी एक प्रकारचा सुरसुर ध्वनी करून हळूहळू वर चढू लागते, तेव्हा त्या गतीला पिपीलिका गती म्हणतात. ती डोक्यापर्यंत पोहचताच समाधी लागते. (२) भेकगती - बेडूक ज्याप्रमाणे दोन-चार उड्या मारतो आणि थांबतो, पुन्हा

दोन-चार उड्या मारतो पुन्हा थांबतो, अगदी त्याचप्रमाणे कोणती तरी वस्तू पायापासून निघून डोक्याकडे जात असल्याचे जेव्हा प्रतीत होते, तेव्हा ती भेकगती असते. ती वस्तू मस्तकापर्यंत पोहोचताच समाधी लागते. (३) सर्पगती - चांगला लांबलचक साप वेटोळे घालून गुपचूप बसलेला असतो. त्याला समोर आपले भक्ष्य दिसले किंवा काही भीतीचा प्रसंग उत्पन्न झाला की लगेच तो सरसर करीत वळणे घेत वेगाने जसा निघतो तशी जेव्हा जागृत कुंडलिनी सरळ मस्तकापर्यंत जाऊन पोहोचते तेव्हा तत्काल त्या साधकाला समाधी अवस्था प्राप्त होते. (४) पक्षीगती - पक्षी एका स्थानावरून दुसऱ्या स्थानावर जाताना भुर्रकन उडतात. कधी ते वर झेपावतात तर कधी खालून सूर मारतात. पण कोठेही विश्राम न घेता आपल्या गंतव्य स्थानी ते एकदम पोहोचतात. त्याप्रमाणे काहींच्या बाबतीत घडते. त्यांची ती शक्ती सरळ मस्तकी पोहचते आणि लगेच साधकाची समाधी लागते. (५) वानरगती - एका झाडावरून दुसऱ्या झाडावर जाताना किंवा एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडी मारताना वानर 'हुप्' असा ध्वनी काढतात. अशा रीतीने दोन चार उड्डाणातच ते आपल्या गंतव्य स्थानी पोहोचतात. काही योग्यांच्या बाबतीत तसेच घडते. त्यांची शक्ती लांब उड्या मारीत मस्तकापर्यंत पोहोचते आणि लगेच त्यांची समाधी लागते.''

वेदांताच्या दृष्टिकोनातून या दर्शनांची व्याख्या करताना ते म्हणत असत - ''वेदांतात सप्तभूमिकांचा उल्लेख आहे. प्रत्येक भूमीत भिन्न भिन्न प्रकारची दर्शने घडतात. मन त्याच्या स्वभावाप्रमाणे, शौच्येंद्रिय, लिंग आणि बेंबी, या तीन निम्न स्तरांच्या भूमिकांवर चढण्या-उतरण्यात मग्न असते. मनाची दृष्टी खाणे, पिणे आणि मैथुन या तीन गोष्टींतच गुरफटलेली राहते. या तीन भूमी ओलांडून मन जर चौथ्या भूमीत अर्थात हृदयापर्यंत जाऊन पोहोचले, तर मग साधकाला ज्योती दिसू लागते. परंतु कधी कधी हृदयापर्यंत आल्यावर मन पुन्हा खाली उतरते आणि शौच्यस्थान, लिंग आणि नाभी या भूमिका स्वीकारते. हृदयभूमिकेला ओलांडून जर कोणाचे मन पाचव्या भूमिकेप्रत अर्थात कंठस्थानी जाऊन पोहोचले, तर मग तो साधक ईश्वरी चर्चेत इतका रमतो, की ईश्वराशिवाय अन्य गोष्टींत आणि भोगाविषयोपभोगी गप्पात तो मुळीच रस घेऊ शकत नाही. त्या अवस्थेत मला देखील असेच होत असे. कोणी जर माझ्यासमोर विषयांसंबंधी चर्चा करू लागला तर मला कोणी तरी लाठीने प्रहार मारीत आहे

असे वाटायचे, आणि ते सर्व भारूड ऐकावे लागू नये म्हणून, मी पंचवटीकडे पळून जात असे. विषयासक्त लोकांना पाहताच भीती वाटून मी कुठेतरी लपून बसायचा. आत्मीय स्वजन तर मला एखाद्या ओसाड विहिरीसारखे वाटायचे. असे वाटायचे की, 'हे सगळे मिळून कट करून मला ओढत नेऊन विहिरीत फेकणार आहेत. आत पडल्यावर मला उठतासुद्धा येणार नाही.' त्यांना पाहताच माझे प्राण कंठाशी येत व गुदमरल्यासारखे होई. आता मरतो का मग मरतो असे वाटे. तेथून पोबारा केल्यावर मग कुठे मला शांती लाभत असे. कंठापर्यंत मजल मारल्यानंतरही मन पुन्हा शौच्येंद्रिय, लिंग आणि नाभी या खालच्या भूमिकांकडे वळू शकते. म्हणून साधकाने येथे फार सावध राहिले पाहिजे. कंठस्थान ओलांडून ज्या साधकाचे मन भ्रूमध्य-स्थानापर्यंत पोहचते त्याला मग पतनाची भीती राहत नाही. त्यावेळी त्याला परमात्म्याचे दर्शन घडते व तो निरंतर समाधिमग्न होऊन राहतो. या अवस्थेला आणि सहस्राराच्या मधे केवळ एक काचेसारखा पारदर्शक आणि स्वच्छ असा झिळमिळीत पडता असतो. यावेळी साधक परमात्म्याच्या अतिशय निकट पोहचतो. मी ईश्वराला भेटलो, मी ईश्वराशी एकरूप झालो, असे त्याला वाटते. परंतु वस्तुत: तो परमेश्वरस्वरूप झालेला नसतो. या अवस्थेतून मन जर कधी खाली उतरले, तरी ते अधिकात अधिक कंठ अथवा हृदयापर्यंतच उतरते. त्याच्या खाली ते उतरू शकत नाही. जीवकोटीचे साधक इथे येऊन पोहचल्यावर खाली उतरत नाहीत. एकवीस दिवसपर्यंत निरंतर समाधिमग्न राहिल्यानंतर मधला पडदा गळून पडतो. व्यवधान नाहीसे होते. साधक परमात्म्याशी पूर्णत: मिळून एक होऊन जातो. सहस्रारचक्रात परमात्म्याशी एकरूप होणे, म्हणजेच सप्तम भूमीवर आरूढ होणे होय.

कुंडलिनी जागृत होण्याच्या अनुभवाचे वर्णन करताना श्रीरामकृष्ण म्हणाले होते — ''जेव्हा माझी तशी अवस्था झाली तेव्हा माझ्याचसारखा एक मनुष्य आला आणि त्याने माझ्या इडा, पिंगला, सुषुम्ना नाड्यांना झटकले. तो आपल्या जिभेने षट्चक्रांपैकी एकाएका कमळाला स्पर्श करी आणि त्या कमळात शक्ती प्रविष्ट करीत असे. त्याबरोबर ती अधोमुख कमळे विकसित होत असत. सरतेशेवटी सहस्रार कमल उत्फुल्ल झाले.

|| ॐ ||

# अनुवाद - एक प्रसाद

श्रीकांत बर्वे

एका भाषेतून दुसऱ्या भाषेत काही आले की त्यालाच आपण अनुवाद म्हणतो. म्हणजे अनुवाद ग्रंथाद्वारेच ज्ञानाची द्वारे आपल्याला खुली होतात. अनुवादाचे प्रकारही अनेक. शब्दशः अनुवाद (भाषांतर), भावानुवाद, स्वैर अनुवाद, रूपांतर इ. एखाद्या कलाकृतीतील मूळ कल्पना, आशय, विचार, अभिव्यक्ति उचलून तो आपल्या (स्वतंत्र) भाषेत, शैलीत मांडलेला असतो.

अनुवादकार्याकडे आतापर्यंत पाहण्याचा सर्वसामान्य दृष्टिकोन काहीसा विचित्र असे. हे काम हिणकस कमी दर्जाचे मानले जाई. तरीही अनुवाद कार्य चालत आले आहे. असे का? अनुवादकाचा मूळ पिंड साहित्यिकाचा असावा लागतो. तो भाषेतील मर्म जाणणारा असावा. एका भाषेतून तो दुसऱ्या भाषेत जे काही आणत असेल, त्याबद्दल त्याला अतिशय रस असतो. ह्या सामर्थ्यावरच अनुवादकार्य आतापर्यंत होत आले आहे. तशी ती सामाजिक गरजही आहे. त्यामुळे सध्या अनुवादित साहित्याकडे आदरयुक्त सहानुभूतीने पाहिले जाते. या विषयावर तात्त्विक चर्चा होते. अनुवाद या विषयावर खास अंक निघतात. नुकतेच केल्याने भाषांतर ह्या नावाने त्रैमासिक निघाले आहे. देशाटन केल्याने माणसाला शहाणपण येते. तर अनुवाद केल्याने ज्ञानवृद्धि आणि अनुभवसंपन्नता वाढते, असे आपण म्हणू.

या पार्श्वभूमीवर प. पू. वासुदेव रामेश्वर तिवारी गुरुजी यांच्या मूळ इंग्रजीमध्ये असलेल्या चरित्राचा मराठी अनुवाद कसा वाटतो? ह्या चरित्राचा हिंदी आणि संस्कृतमध्येही अनुवाद झाला आहे. पू. तिवारी गुरुजी हे एक मुंगेली (म. प्र.) येथील साक्षात्कारी सत्पुरुष होऊन गेले. त्यांचा जन्म अमेरिकेत झाला. आध्यात्मिक भावनेच्या ओढीने ते भारतात आले. परमेश्वराच्या शोधार्थ भ्रमंती केली. ते ईप्सित साध्य झाल्यावर संसारी माणसासारखे जीवन व्यतीत केले. औपचारिक शिक्षण मिळाले नाही. तरी होमिओपॅथी, आयुर्वेद यांचा अभ्यास करून दवाखाना चालवला. संगीत आणि ज्योतिष याचा व्यासंग जोपासला. स्वतःचा संप्रदाय किंवा अध्यात्मातली स्वतंत्र विचारसरणी न मांडता परंपरागत आलेला अध्यात्मातला वारसा जोपासला. खडतर उपासना केली. अनेक साक्षात्कार झाले... हे चरित्रलेखन गुरुच्या आज्ञेमुळे झाले. पण गुरुसुद्धा योग्य त्या शिष्याकडूनच करून घेतो. श्री. पतकींनी गुरुआज्ञेचे पालन केले आहे. गुरूंबद्दल नितांत श्रद्धा आणि आदरभाव असल्याने हे कार्य घडले. □

# अभिप्राय


(इंग्रजी विषयाचे प्राध्यापक, मुंबई)

एका साक्षात्कारी सत्पुरुषाच्या इंग्रजी चरित्राचा मराठी अनुवाद श्री. पतकी ह्यांनी केल्याने मराठी भाषिकांची सोय झाली आहे. भाषांतर/रूपांतर/अनुवाद/भावानुवाद करणे ही सोपी गोष्ट नाही. ती लेखनासारखीच अवघड कला आहे. मूळ भाषेतील सौंदर्य व आशय ह्यांना धक्का न लावता भाषांतर करावे लागते. श्री. पतकी ह्यांनी हे पथ्य चांगले सांभाळले आहे. त्यांची भाषा सोपी, साधी व सहजसुंदर उतरली आहे.

ह्या चरित्रकथेचा नायक आहे श्री वासुदेव रामेश्वर तिवारी. हे एक साक्षात्कारी सत्पुरुष आहेत. श्री. पतकींचा व त्यांचा परिचय आहे व त्यांच्या आदेशावरूनच त्यांनी हे मराठीत भाषांतर केले आहे. चरित्रनायकाचा बालपणीचा काळ परदेशी गेला. त्यांचे भारतात आगमन, त्यांना आलेले विलक्षण अनुभव, अध्यात्माच्या मार्गावरील त्यांनी केलेली खडतर वाटचाल, शारीरिक कष्ट, भूक, उपासमार ह्यांचे वर्णन फार मनोवेधक झाले आहे. काही ठिकाणी सुरुवातीला क्वचित दुर्बोधता व क्लिष्टता जाणवेल; परंतु पुढे त्याचा मागमूसही रहात नाही. श्री. पतकींना ह्या सत्पुरुषाबद्दल श्रद्धा असल्याने भाषांतराने एक विशिष्ट उंची गाठली आहे व ही त्यांची प्रतिमा ह्या चरित्रग्रंथात आपल्या मन:पटलावर आणण्यात श्री. पतकी यशस्वी झाले आहेत. श्री. पतकींनी हे भाषांतर करण्यात खूप कष्ट घेतले व वेळ दिला. त्यांच्या परिश्रमाचे चीज झाले असे मला वाटते. त्यांच्या हातून असले मौलिक साहित्य पुढेही लिहिले जावो, अशी प्रार्थना.

**— प्र. शि. सबनीस**

## लेखकाचा - अनुवादकाचा परिचय



**नाव :** दत्तात्रय यशवंत पतकी, बी. ए.

**जन्म :** १९२९ मध्ये अहमदनगर येथे.

१९४० पासून पुणे शहरात वास्तव्य.

शालेय व महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात.

(क्रीडाकौशल्य - क्रिकेट आणि मुष्टियुद्ध)

**व्यवसाय / नोकरी :**

- शिक्षण संचलनालय, पुणे (१९४९ ते १९६१)
- बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स, पुणे येथे रजिस्ट्रारपद भूषविले.
- निवृत्तीनंतर भारतीय विद्याभवन, पुणे येथे आय. ए. एस., प्रशिक्षण केंद्र व नानासाहेब परुळेकर कॉलेज ऑफ जर्नेलिझम येथे को-ऑर्डिनेटर म्हणून काम.

**साहित्य-लेखन निर्मिती व प्रसिद्धी :**

- पुणे आकाशवाणी केंद्रावर कै. राम गणेश गडकरी यांच्या स्मृतिदिनानिमित्त रेडिओवर श्रुतिका, भाषण इत्यादी.
- कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या निबंधावर आधारित 'चोरांचे संमेलन' ही श्रुतिका आणि एकांकिका.
- आचार्य अत्रे जन्मशताब्दीनिमित्त लेखन आणि भाषणे.
- दै. सकाळ, दै. केसरीमध्ये प्रासंगिक लेख.
- डायरी कम हँडबुक फॉर कॉलेज ऑफिसेस (स्वतः प्रसिद्ध केले.)
- सार्वजनिक संस्था / शिक्षण संस्था यांच्या विशेष कार्यानिमित्त स्मरणिका संपादन.
- सध्या मुंगेली (बिलासपूर, मध्यप्रदेश) येथील सत्पुरुष प. पू. वासुदेव रामेश्वर तिवारी गुरुजी यांच्या मूळ इंग्रजी चरित्राची मराठी आवृत्ती - 'साधना व दिव्य अनुभूती' हे आध्यात्मिक आवड असणाऱ्यांसाठी २३ जुलै १९९९ रोजी प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकाचे लेखन.

## ॥ ॐ ॥

## ॥ ऋणनिर्देश ॥

प्रस्तुत अनुवाद करताना मला अनेकांचे साहाय्य झाले.
प्रथमतः प. पू. गुरुजी यांची आज्ञा, त्यांचे
चि. अशोकराव (मुंगेली) - वर्धानिवासी उपासक,
डॉ. ज. वा. जोशी (निगडी), मा. भाऊसाहेब बर्वे,
प्रा. व्ही. एचू. जोशी, प्रा. पुजारी, माझे आप्त,
अक्षरजुळणीचे श्री. देशपांडे (यशश्री एंटरप्रायझेस),
श्री. श्रीनिवास पाध्ये (मुद्रितशोधन),
परशुराम प्रोसेसूचे श्री. बर्वे,
तसेच संतकृपा मासिकाचे श्री. काकतकर,
मित्रवर्य गं. मो. नगरकर (शिक्षणखाते),
डॉ. श्री. व सौ. आचार्य (रायपूर) तसेच हे चरित्र पूर्ण
होण्याकरता अनेक सृजनांनी केलेली अप्रत्यक्ष मदत या
सर्वांच्या सहकार्याने हे चरित्र छापून पूर्ण झाले.
या सर्वांचा मी मनःपूर्वक आभारी आहे.

— द. य. पतकी

भोंदू गुरू नकोत, खरा सद्गुरू पाहिजे.

— समर्थ रामदास

□

**नवविधाभक्तीवर समर्थांची रचना**

श्रवण म्हणजे ऐकतचि जावे ।
बरे विवरावे ग्रंथांतरी ॥१॥
ग्रंथांतरी कळे ते मुखें बोलावे ।
कीर्तन जाणावे याचे नावा ॥२॥
नाव घ्यावे साचे सर्वदा देवाचे ।
तिसरे भक्तीचे लक्षण हें ॥३॥
लक्षण चौथीचें तें ऐंसे जाणावें ।
पाऊल सेवावें सद्गुरूचे ॥४॥
गुरूदेव पूजा तेचिं तें अर्चन ।
सहावें वंदन नमस्कार ॥५॥
नमस्कार कीजे सर्व दास्यभावें ।
भक्तीचे जाणावें लक्षण हें ॥६॥
लक्षण हें सख्य आठवे भक्तीचे ।
सांगावे जीवींचे देवापाशी ॥७॥
देवापाशीं होतां उरेना मीपण
आत्मनिवेदन रामदासी ॥८॥

□

- गुरूची कृपा झाल्यावर कशाचेही भय म्हणून उरत नाही. तुम्ही कोण आहात आणि तुमचे स्वरूप काय आहे ते सर्व गुरू तुम्हाला दाखवितात.

- गंगा किनाऱ्यावर निवास करणारे धन्य होत. गंगाजलाची गणना साध्या पाण्यात होत नाही. श्रीवृंदावनातील धूळ ही साधी धूळमाती नसते आणि जगन्नाथाच्या महाप्रसादाला अन्न म्हणत नाहीत. ह्या तिन्ही गोष्टी ब्रह्मस्वरूप आहेत.

**— रामकृष्ण उपदेश संग्रह**

□

## गुरुजींची आरती

ॐ जय जय गुरुजी
जय गुरुदेव दयानिधि, कृपासिंधु जय हो ।
जय जय करुणासागर, वासुदेव जय हो ॥

अष्टसिद्धि तव दासी, नवनिधि के स्वामी ।
जनदुखहरण-परायण, सबके सुखकामी ॥

जन्मसिद्ध तुम योगी, नित परहित-कर्ता ।
साधकजन-पथदर्शक, शरणागत-त्राता ॥

शुद्ध बुद्ध तुम मुक्त भि, निश्चल अविनाशी ।
सत्-चित्-सुख-धन ईश्वर, भक्त हृदय-वासी ॥

गुरुजी, हम पुत्रोंकी, तुम वत्सल जननी ।
तब गुणवर्णन करते, मौन बने वाणी ॥

एक यही वर माँगे, हम तव चरणों में ।
अविचल भक्ति तुम्हारी, सदा रहे मन में ॥

*गुरुपर्व १९७७ भोपाळ*

साधकांच्या परस्पर संवादाचे लडिवाळ माध्यम

## संतकृपा

अध्यात्मविषयक मराठी मासिक गेली २३ वर्षे दरमहा नियमित प्रसिद्ध होते.
कोणत्याही महिन्यापासून ग्राहक होता येते.

किरकोळ अंक रु. १०/- वार्षिक वर्गणी रु. १००/-

पंचवार्षिक वर्गणी रु. ४००/- आजीव वर्गणी रु. १०००/-

रुपये एक हजार भरून आजीव ग्राहक होणाऱ्यांना मासिक बारा वर्षे मिळेलच. शिवाय लगेचच आमच्या संतचरित्रमालेसह उपलब्ध ५० संतचरित्रे प्रसाद भेट म्हणून देण्यात येतील.

## संतकृपा प्रतिष्ठान

१०३५ सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०. ● फोन : ४४७६४४०

●●●

## संतकृपा प्रकाशन - सूची

### संतचरित्रमाला (मूल्य : प्रत्येकी २० रुपये)

१. श्री प्रज्ञानानंद सरस्वती : श्रीमती कमल वैद्य
२. श्री संत तुकोबाराय : प्रा. म. अ. कुलकर्णी
३. श्री शंकर महाराज : योगी ज्ञाननाथजी
४. श्री गुरुदेव रानडे : प्रा. नरेंद्र कुंटे
५. श्री संत गाडगेमहाराज : श्री. इरगोंडा पाटील
६. श्री दासगणू महाराज : श्री. दि. शं. गंधे
७. श्री संत नामदेव : श्री. ज्ञानेश्वर तांदळे
८. भगवान श्री रमणमहर्षि : डॉ. गं. वि. कुलकर्णी
९. श्री विष्णुदास माहुरकर : डॉ. प्र. न. जोशी
१०. स्वामी स्वरूपानंद : प्रा. ग. बा. खानोलकर
११. श्री मुक्तानंद परमहंस : म. अ. कुलकर्णी
१२. योगी हरिनाथजी : योगी ज्ञाननाथजी
१३. श्रीमत् बाबा केशव चैतन्य : श्री. म. स. घोलप
१४. श्री सद्गुरू नारायण महाराज : श्री. श्री. वा. आठवले
१५. भगवान श्रीस्वामी नित्यानंद : प्रा. ग. बा. खानोलकर
१६. योगीराज श्री साईनाथ : श्री. म. स. घोलप
१७. स्वामी रामतीर्थ : श्री. ज्ञानेश्वर तांदळे
१८. श्री पंतमहाराज बाळेकुंद्री : श्री. ना. रा. किल्लेकर
१९. श्री धुंडामहाराज देगलूरकर : श्री. दा. का. थावरे
२०. जे. कृष्णमूर्ती : डॉ. गं. वि. कुलकर्णी
२१. श्री समर्थ रामदास : प्रा. म. अ. कुलकर्णी
२२. श्री निंबरगीकर महाराज : डॉ. के. वा. आपटे
२३. श्री तात्यासाहेब महाराज कोटणीस : दासराम
२४. श्री मामा महाराज केळकर : डॉ. के. वा. आपटे
२५. मातोश्री पार्वतीदेवी देशपांडे : डॉ. द्वारकाबाई साने
२६. श्री देव मास्तर : डॉ. गो. म. फणसे
२७. गोस्वामी श्री तुलसीदास : श्रीमती कमल वैद्य
२८. श्री माधवनाथ महाराज (चित्रकूट) : श्री. शं. द. रबडे

२९. श्री शिवदीन केसरीनाथ : डॉ. सौ. मंगला वैष्णव
३०. स्वामी अमलानंद : प्रा. म. अ. कुलकर्णी
३१. चिमड महाराज : डॉ. के. वा. आपटे
३२. योगानंद परमहंस : श्री. म. स. घोलप
३३. स्वामी शिवानंद टेंबे महाराज : श्री. श्री. द. आगाशे
३४. चैतन्य महाप्रभू : श्री. द. ग. करंदीकर
३५. श्री. केशवमहाराज देशमुख : श्री. शं. द. रबडे
३६. श्री वासुदेवानंद सरस्वती : श्री. श्रीपाद. र. फळणीकर
३७. जोगन विठामाई : गोविंद गोखले, अरुण गोखले
३८. श्री गजाननमहाराज गुप्ते : श्री. म. स. घोलप
३९. श्री साधुमहाराज खंदारकर : श्री. दा. का. थावरे
४०. श्री भाऊसाहेबमहाराज उमदीकर : डॉ. नरेंद्र कुंटे
४१. श्रीसंत नरहरी सोनार : श्री. दा. का. थावरे
४२. महायोगिनी श्रीलक्ष्मी अक्का : डॉ. के. वा. आपटे
४३. संतकवी अमृतराय : डॉ. भास्कर दोडे
४४. डॉ. रामचंद्र महाराज पारनेरकर : श्री. ना. या. जोशी
४५. श्री संत तुका विप्र : श्री. ना. के. विप्र
४६. महायोगी श्री अरविंद : श्री. स. रा. आठले
४७. श्री रामानंद बीडकर : श्री. शं. द. रबडे
४८. श्री भाऊसाहेब आंबेकर : सौ. मीनाक्षी साने
४९. श्री रंगनाथ स्वामी निगडीकर : श्री. वा. द. देशपांडे
५०. श्री सिद्धेश्वर महाराज : श्री. बाळ ज. पंडित
५१. श्री विश्वनाथ महाराज रुकडीकर : योगी ज्ञाननाथजी
५२. कर्मयोगी तात्याजी हराळकर : श्री. दा. का थावरे
५३. श्री संत जनी जनार्दन : डॉ. विद्यासागर पाटंगणकर
५४. श्री. सच्चिदानंद बाबा : श्री. दा. का. थावरे
५५. श्री. दादामहाराज सातारकर : योगी ज्ञाननाथजी
५६. श्री एकनाथमहाराज : डॉ. दा. वि. कुलकर्णी
५७. श्री. रंगनाथमहाराज परभणीकर : श्री. दा. का. थावरे
५८. डॉ. काका उपळेकर : योगी ज्ञाननाथजी
५९. खंडोबाभक्त श्री भावे महाराज : वैद्य रा. शि. मराठे
६०. श्री बाळप्पा महाराज : श्री. दा. का. थावरे
६१. श्रीरंग अवधूत : श्री. श्रीपाद र. फळणीकर
६२. श्री जयरामस्वामी वडगावकर : श्री. वा. द. देशपांडे
६३. श्री गुंडा महाराज : श्री. दा. का. थावरे
६४. श्रीमत् श्रीधरस्वामी महाराज : श्री. पृथ्वीराज भालेराव
६५. थोर हरिभक्त मामा दांडेकर : थावरे, गोडबोले
६६. डॉ. ना. रा. धनेश्वर : डॉ. ना. ना. धनेश्वर
६७. श्रीमाणिकप्रभू : श्री. म. स. घोलप
६८. श्री संत बाबामहाराज आर्वीकर : श्रीमती जिजाताई हाटे
६९. श्री शारदा माता (पूर्वार्ध) : र. श्री. पुजारी
७०. श्री. शारदा माता (उत्तरार्ध) : र. श्री. पुजारी
७१. श्री अंबूराव महाराज : डॉ. नरेंद्र कुंटे
७२. श्री योगानंद सरस्वती : श्रीपाद र. फळणीकर
७३. श्री हरिमहाराज देगलूरकर : चंद्रशेखर देगलूरकर
७४. श्री रघुनाथ प्रिय साधुमहाराज : डॉ. के. वा. आपटे
७५. श्री शिवरामस्वामी : डॉ. भीमाशंकर देशपांडे

•••

## मुद्रितशोधन दोष-दुरुस्ती-टीप

| पान क्र. | पॅरा/ओळ क्र. | दोष | दुरुस्ती |
|---|---|---|---|
| २ | ओळ ३ | वासुदेवाश्रम | वासुदेव योगाश्रम |
| ६ | पॅरेग्राफ ३, ओळ ४ | दिव्य अनुभूति | दिव्य अनुभूती |
| ४० | पॅरेग्राफ २, ओळ १० | राहिला होते | राहिला होता |
| ४१ | पॅरेग्राफ ५, ओळ ८ | काणी | कोणी |
| ६१ | पॅरेग्राफ ६, ओळ १ | वासुदेत्त | वासुदेव |
| ७२ | पॅरेग्राफ ३, ओळ २ | हातात घेतली | घेतला |
| ७५ | पॅरेग्राफ ४, ओळ १ | सुदामियाँ | सुदानिया |
| ८७ | पॅरेग्राफ ४, ओळ ४ | न संबोधत. | न संबोधता. |
| १०४ | पॅरेग्राफ ३, ओळ ८ | अज्ञताचे नाव | अज्ञाताचे नाव |
| १२४ | पॅरेग्राफ २, ओळ २ | आकडेमेडी | आकडेमोड |
| १५६ | पॅरेग्राफ १, ओळ ५ | का हाही | की हाही |
| १६४ | पॅराग्राफ ३, ओळ ५ | अनुभूति | अनुभूती |
| १८५ | पॅराग्राफ २, ओळ ३ | कुंडलीच्या द्वारे | कुंडलाच्या द्वारे |
| २१५ | शंका-फकीर | याद | ये-याद |
| २०१ | शंका-आध्यात्मिक | दहा निशा | दहा दिशा |
| २४९ | पॅरेग्राफ २, ओळ १० | वाटते | वाढते |
| २५१ | डॉट क्रमांक १०, ओळ ३ | साधना व दिव्य अनुभूती | साधना आणि दिव्य अनुभूती |

टीपा :

- कालानुक्रमे घटना - पॅरेग्राफ ५, ओळ २ - 'मूर्च्छा येऊन पडलो' ऐवजी 'मूर्च्छा येऊन पडला' असे वाचणे.
- पान १३८ - १) 'शरीररचना आणि शरीरक्रिया' या चित्राच्या स्पष्टीकरणाकरता पान ८३, ८४, १६९ वरील चर्चा पाहावी.
- पान २३८- प.पू. गुरुजींचा ठिकठिकाणी प्रवास झाला त्याचा नकाशा (प्रमुख गावे-शहरे) पहावा.